साहित्याच्या दरबारांत

म. ग्र. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. १३६१

REFBK-0011529

कृष्ण केशव क्षीरसागर

'श्री. के. क्षी.' साहित्य

व्यक्ति आणि वाङ्मय

राक्षसविवाह

सुवर्णतुला

वाङ्मयीन मूल्यें

सागर मंथन

वादसंवाद

साहित्याच्या दरबारांत

आगामी

बायका

सेतुपार्वती

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 37439 दि: 16.8.04
क्रमांक 9349 दि: 4.12.04

साहित्याच्या दरबारांत



REFBK-0011529

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..३९८३९ विः ..वि.५..
क्रमांक ...२३६९... नोंः दि.८.१२.१९

साहित्याच्या दरबारांत

श्रीकृष्ण केशव क्षीरसागर

सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर–पुणें.

सर्व हक्क सुरक्षित
प्रथमावृत्ति सप्टेंबर १९६१
मूल्य चार रुपये

प्रकाशक : श्यामकान्त बनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
धनतोली नागपूर-१
४६१।१० सदाशिव, पुणें-२

मुद्रक : चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती,
४६१।१० सदाशिव, पुणें-२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 39439 विः ...
क्रमांक ...2264... नोंः दिः ...

वाचकांस सादर—

या पुस्तकांत संग्रहित होत असलेलीं पांच अध्यक्षीय भाषणें मला १९५१ ते १९६१ या दहा वर्षांच्या अवधींत करावीं लागलीं. १९५१ च्या जानेवारींत बडोद्याच्या वाङ्मयपरिषदेंत केलेल्या भाषणांत इंग्रजी शब्दांना घाईनें मराठी प्रतिशब्द बनविण्याच्या क्रियेंत आधुनिक मराठी गद्यावर होत असलेल्या अनिष्ट परिणामांची पाहाणी व चिकित्सा केली आहे. त्या विवेचनाच्या ओघांत मला वृत्तपत्रांकडे जाणाऱ्या दोषाच्या वाट्यांचाहि उच्चार करावा लागला होता. असें असून, त्या भाषणावर पुढें कित्येक महिने जी अनुकूल प्रतिकूल टीका झाली तींत मराठींतील प्रमुख दैनिकांनीं प्रांजलपणें माझ्या चिकित्सेचें स्वागतच केलें होतें असें आठवतें. त्याच्या पुढच्याच वर्षीं अंमळनेर येथें भरलेल्या अखिल महाराष्ट्रीय साहित्यसम्मेलनाच्या टीकाविभागाचें अध्यक्षपद मजकडे होतें. या वेळच्या अध्यक्षीय भाषणांत प्राचीन भारतीय साहित्यशास्त्र आणि अर्वाचीन पाश्चात्त्य टीकाशास्त्र यांची तुलना करून, अर्वाचीन वाङ्मयाचें परीक्षण करण्यास केवळ प्राचीन साहित्यशास्त्र पुरेसें नाहीं, हें मीं दाखवून दिलें आहे. माझ्या टीकात्मक दृष्टिकोणाला साधारणतः विरोध करणाऱ्या कांहीं नियतकालिकांनींहि त्या भाषणाचें मनःपूर्वक स्वागत केल्याचें आढळतें.

हीं भाषणें जरी दहा वर्षांच्या अवधींत मिळून झालेलीं असलीं, तरी यदृच्छेनें त्यांचे स्पष्ट दोन खंड पडले आहेत. १९५१ व १९५२ मध्यें दोन; व त्यानंतर एकदम १९५९ व १९६० मध्यें तीन, अशा दोन हप्त्यांनीं तीं भाषणें होण्याचें कारण, १९५३ मध्यें मजवर आलेल्या कौटुंबिक आपत्तीमुळें पुढें ओळीनें कांहीं वर्षें अशा उत्सवात्मक परिषदांचे अध्यक्षपद स्वीकारण्याकडे माझें मन घेत नव्हतें. दरम्यान १९४८ ते १९५६ पर्यंत प्रथम 'नवयुग' व नंतर 'साप्ताहिक लोकसत्ता' यांतून नियमितपणें चालू असलेल्या माझ्या 'ऊर्मि' 'सुख-संवाद' व 'प्रातसंवाद' कांहीं कारणांनीं खंडित झाले होते. अशा स्थितींत १९५९ सालीं, मिरज येथें भरलेल्या अखिल महाराष्ट्रीय साहित्यसम्मेलनाचें अध्यक्षपद माझ्याकडे आलें. त्या श्रेष्ठ व्यासपीठाच्या परंपरेमुळें असो, कीं खंडित 'प्रातसंवादां'नीं मनावर पडलेल्या ओझ्यामुळे असो, मिरज येथील भाषणांत भाषा, वाङ्मय व महाराष्ट्रसंस्कृति यांच्यासंबंधीचे अनेक प्रश्न मला काढावे लागले होते. त्या भाषणांचेंहि स्वागत विविध क्षेत्रांत विचारवन्तांनी अनुकूल अभिप्रायांनीं व उत्साहानेच केलें होते. त्याच्या पुढच्याच वर्षी म्हणजे १९६० सालीं बृहन्महाराष्ट्रांतील दोन महत्त्वाच्या परिषदांत मला भाषणें करावीं लागलीं. इंदूर येथील भाषणाचे वेळीं माझें मन स्वातंत्र्यप्राप्तीनंतरहि चालू असलेल्या,

नव्हे, वाढत असलेल्या आपल्या पाश्चात्त्यीकरणाने त्रस्त झालेलें होतें. बौद्धिक दास्यांतून व 'आंग्लशूद्र'त्वांतून आपली मुक्तता करण्याचें कार्य राजकीय पुढारी करणार नसून, तें आपण साहित्यिकांनींच केलें पाहिजे अशी 'हाक' मीं त्या भाषणांत दिली आहे.

आणि अगदीं शेवटच्या म्हणजे त्याच वर्षी ग्वाल्हेर येथील वाङ्मय-परिषदेच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत मीं अलिकडे दहा वर्षांत वाङ्मया-ला ग्रासून टाकणाऱ्या अश्लीलतेच्या रोगाचीं निदानासह चिकित्सा करण्याचा यत्न केला आहे.

हीं भाषणें मुळांत लिखित असलीं, तरी ते लेख नव्हेत. त्याना आलेलें 'रूप' विशिष्ट उत्सवप्रसंगामुळें समोर असलेल्या उत्साही श्रोतृसमुदायामुळेंच आलेलें होतें. प्रत्येक भाषणाच्या प्रारंभीं असलेल्या स्थानवन्दनामुळे व श्रोतृ-वन्दनामुळे तो तो प्रसंग वाचकांच्या मनांत उभा राहून त्या त्या वेळच्या श्रोत्यांचे औत्सुक्य त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होईल अशी मला आशा आहे.

वयाच्या पन्नास ते साठ दरम्यानच्या वर्षांत श्रेष्ठ वाङ्मयीन व्यासपीठा-वरून केलेलीं भाषणें, म्हणजे केवळ काव्यशास्त्रविनोद खास नव्हेत! स्वीकार्य असोत कीं विवाद्य असोत, मी माझ्या समकालीनांशीं गंभीरपणें केलेले असे ते

'प्राप्तसंवाद'च आहेत. ज्या गांभीर्यानें, मनःपूर्वकतेनें व सद्भावनेनें मीं तीं भाषणें तयार केलीं व सादर केलीं त्याच वृत्तीनें माझ्या पिढीच्या व पुढच्या पिढ्यांच्या महाराष्ट्रीयांनीं तीं वाचावीं, एवढीच माझी प्रेमाची मागणी आहे.

प्रस्तुत भाषणपंचक महाराष्ट्रांतील असाधारण विद्वान्, दार्शनिक आणि गूढ-विद्यानिधि डॉ. धुंडिराजशास्त्री विनोद यांना अर्पण करण्यांत येत आहे. माझा व त्यांचा प्रत्यक्ष संबंध आयुष्यांत फार उशीरां म्हणजे गेल्या दोन तीन वर्षांतच आला. तथापि, ज्ञानकोशकार केतकर व आहिताग्नि राजवाडे यांच्याप्रमाणें, ज्या अगदीं मोजक्या महाराष्ट्रीय विचारवंतांचें ऋण मान्य करण्यांत मला धन्यता वाटते, त्यांत न्यायरत्न विनोदांचा अन्तर्भाव मी आदरपूर्वक करतों. त्या ऋणाचा उच्चार करण्याला या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेइतकी दुसरी योग्य संधि मला कुठून मिळणार ?

या पुस्तकाला प्रकाशक म्हणून श्री. श्यामकांत बनहट्टी यांच्यासारखे सुविद्य तरुण लाभल्यानें, त्यांचे विद्वान् तीर्थरूप प्रो. श्रीनिवास नारायण बनहट्टी यांच्या पासून असलेल्या आमच्या स्नेहाळ ऋणानुबंधांत भर पडत आहे, याचा मला आनंद आहे.

२९ सप्टेंबर १९६१
महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें २

श्री. के. क्षीरसागर

न्यायरत्न दर्शनालंकार

डॉ. धुंडिराजशास्त्री विनोद,

एम्. ए., पी.एच्. डी.

यांसी आदरपूर्वक समर्पित

अनुक्रमणिका

१. टीका : जुनी व नवी १

२. भाषाशुद्धि आणि राष्ट्रभाषा २५

३. मराठी साहित्य आणि भाषा : कांहीं समस्या ६४

४. वाङ्मयांतील प्रेम, शृंगार आणि अश्लीलता १०२

५. वैचारिक स्वराज्य १२४

♦

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3246.7 वि: ...
क्रमांक 2267 नों. दि. ...



टीका : जुनी व नवी

वाङ्मयप्रेमी सभ्य स्त्री-पुरुषहो,

अमळनेरकर मंडळींनीं येथें उभ्या केलेल्या मोठ्या वाङ्मयसमारोहाचा '**टीकाविभाग**' हा एक पोटविभाग होय. साहित्य सम्मेलन ही संस्था इतकी जुनी, लोकप्रिय आणि सर्वसमावेशक झाली आहे, कीं तिच्या अध्यक्षीय भाषणावर आणि तिच्यातर्फे संमत होणाऱ्या ठरावांवर अनेक घटनांचे आणि विषयांचे वार्षिक हक्क असतात; व म्हणूनच समारंभ, वाङ्मयीन राजकारण आणि तत्त्वचर्चा, असें त्या सम्मेलनाचें त्रिविध स्वरूप झालें आहे व तें स्वाभाविकहि आहे. अशा या व्यापक सम्मेलनांतून एक दोन जिव्हाळ्याच्या वाङ्मयशाखा बाजूला काढून, तत्संबंधीं विशेष अगत्य वाटणाऱ्या मंडळींनीं, तत्त्वचर्चेकरितां स्वतंत्रपणें जमण्याचा परिपाठ अलीकडे पडत आहे, तो सम्मेलनाच्या व्यापाच्या दृष्टीनें इष्टहि आहे आणि अपरिहार्यहि आहे. अमळनेर येथील साहित्य-सम्मेलनानें, टीका आणि अध्यापन हे दोनच विभाग विशेष चर्चेकरितां निवडण्यांत कालदृष्ट्या औचित्य दाखविलें आहे, असें मला वाटतें. कारण वाङ्मयनिर्मिति आणि वाङ्मयाभ्यास यांना वळण लावणें हें जर कांहीं प्रमाणांत मनुष्याधीन

असेल, तर तें टीका आणि अध्यापन या साधनांच्याच हातीं आहे, असें म्हणावें लागेल. आपल्या या टीकाविभागाचें अध्यक्षस्थान मला देऊन आपण माझ्या अल्पस्वल्प वाङ्मयसेवेचा गौरव केला आहे असें मी समजतों, व त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतों.

तथापि, या विषयाचें गेलीं अनेक वर्षें चिंतन केल्यामुळेंच, आपण मजकडे सोपविलेली कामगिरी किती बिकट आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. कारण त्या चिंतनानेंच मला हेंहि शिकविलें आहे कीं, एवढ्या व्यापक विषयासंबंधीं विवेचन व मार्गदर्शन केवळ तास सव्वातासाच्या अवधींत करणें हें फारच कठीण काम आहे; व अधिकारी मनुष्यालाहि त्यांत अपूर्णतेचा अगर एकांगीपणाचा दोष उघड्या डोळ्यांनीं पत्करावाच लागेल. माझा अल्पमात्र अधिकार माहीत असूनहि, मी या अवघड कामाला, उपलब्ध अशा तास सव्वातासांत हात घालीत आहें, तो अपूर्णत्वाचा दोष पत्करूनच घालीत आहें, हें प्रारंभींच सांगून ठेवणें बरें. या विषयासंबंधीं अगत्य असणाऱ्या व यथाशक्ति त्याचें चिंतन करणाऱ्या **एका सामान्य अभ्यासकाला "या क्षणीं, या समाजाला या विषयांखेरीज जें सांगावेसें वाटेल तें"** एवढाच माझ्या आजच्य भाषणाचा आपण अर्थ समजावा अशी माझी नम्र विनंती आहे.

अर्वाचीन काळांत, म्हणजे ब्रिटिश राजवटीच्या द्वारें आपला अर्वाचीन पाश्चात्त्य जगाशीं घनिष्ठ संबंध आल्यापासूनच्या काळांत, देशभाषांतील वाङ्मयाची वाढ मोठ्या प्रमाणांत झाली व नव्या वाटेनेंहि झाली. त्या वाङ्मयांतील एकदेशीयता जाऊन त्यांत विविधता आली. या काळांत कित्येक पाश्चात्त्य वाङ्मयप्रकारहि स्वीकारण्यांत आले. पाश्चात्त्यांच्या वाङ्मयांत धीटपणें व्यक्त झालेल्या कित्येक नैसर्गिक मानवी भावना पाहून आपले लेखकहि आत्मप्रकटीकरणाच्या बाबतींत अधिक नीट व मोकळे बनले. पाश्चात्त्य कथावाङ्मयांतील संभाव्य, स्वाभाविक व वास्तव संसारचित्रें पाहून आपल्या कथावाङ्मयालाहि वेगळें वळण लागलें. ज्ञानवर्धक स्फुट निबंध व दीर्घ प्रबंध यांनाहि आधुनिक भारतीय देशभाषांत स्थान मिळूं लागलें. वृत्तपत्रासारख्या नियतकालिक प्रकारांमुळें प्रचलित घटनांवर प्रासंगिक टीका करण्याचेंहि साधन उपलब्ध झालें. या प्रासंगिक टीकेंत नवीन नवीन ग्रंथांचा परामर्श घेण्याचा पाश्चात्त्य प्रकारहि नियतकालिकांतून सुरू

झाला. "प्रासंगिक टीकेंत ग्रंथावरहि टीका करण्याचा प्रघात" या अर्थानें ह प्रकार आपल्याकडे नवीनच होता. परंतु दुसऱ्याहि एका अर्थानें या वाङ्मयीन टीकेला 'नवीन' रूप घेणें प्राप्त होतें. सभोंवतालीं प्रकट होत असलेलें काव्य, प्राचीन पंचमहाकाव्यांत जमा होण्यासारखेंहि नव्हतें, कीं मराठी संतवाङ्मयांत जमा होण्यासारखेंहि नव्हतें. शिवाय प्रत्यहीं प्रगट होणारें गद्यहि, बखरी, पत्र-व्यवहार व परंपरागत चातुर्यकथा या वर्गांत पडण्यासारखें नव्हतें. ज्याचा परामर्श घ्यावयाचा तें वाङ्मयहि भिन्न होतें, व त्याचा परामर्श घेण्याचें माध्यम व निमित्तहि भिन्न होतें. अर्थात् इतर आधुनिक वाङ्मयप्रकारांप्रमाणेंच आधुनिक टीका-वाङ्मयाच्या क्षेत्रांतहि पाश्चात्त्य वाङ्मयाचा नमुना आपल्या पहिल्या पहिल्या लेखकांना प्रेरणादायक झालाच. अशा प्रकारें टीकाविषय होणाऱ्या वाङ्मयाचें नवें स्वरूप, टीकालेखनाचें नियतकालिकरूप नवें साधन आणि टीका-पद्धतीचा उपलब्ध झालेला नवा पाश्चात्त्य नमुना, या त्रिविध कारणांतून, आज आपण ज्याला टीकावाङ्मय म्हणतों, त्याचा जन्म झाला.

आधुनिक वाङ्मयाच्या इतर शाखांप्रमाणेंच या शाखेची वाढहि बरीच मोठी, पण योजनाविहीन अशी झालेली आहे. पण योजनाविहीनता हा तिजमधील मुख्य दोष नव्हे; किंबहुना अशा 'अनंतहस्तें' होणाऱ्या कार्यांत योजनेची अपेक्षा करणेंहि चुकीचें होईल. तिजमधील आजच्या क्षणींची मुख्य अडचण म्हणजे अपेक्षा, पद्धति आणि सिद्धान्त या तिन्हीसंबंधींच्या 'मतामतांचा गलबला' ही होय. या 'मतामतांच्या गलबल्या'चा जर कोणता विशेष घातुक परिणाम असेल, तर तो या वाङ्मयशाखेवरील विश्वासच ढळणें, हा होय. आज मराठींत टीकावाङ्मय कमी आहे हें खरें वैगुण्य नव्हे; जें आहे तें, पाश्चात्त्य साहित्यशास्त्र आणि भारतीय साहित्यशास्त्र या दोन्ही डगरींवर सोयीप्रमाणें हात ठेवतें, हेंहि मुख्य वैगुण्य नव्हे; आजच्या टीकावाङ्मयांत भरतमुनि अगर ॲरिस्टॉटल्, अभिनव गुप्त अगर क्रोचे, यांच्या तोडीचे शास्त्रकार नाहींत हीहि मुख्य उणीव नव्हे. मुख्य उणीव ही आहे कीं, जें टीकावाङ्मय निर्माण झालें आहे, तेंहि नवोन्मेषापेक्षां, नियमपालनावरच भिस्त ठेवणाऱ्या पंडिती संप्रदायालाच चिकटून आहे. त्यांत टीकाकाराच्या जिवन्त प्रतिक्रियांपेक्षां त्यांच्या वाचनांत नुकत्याच येऊन गेलेल्या शास्त्रग्रंथांचें प्रतिबिंब अधिक आहे!

पहिली गोष्ट म्हणजे टीकावाङ्मय हें स्वयंजीवी वाङ्मय नसून परोपजीवी वाङ्मय आहे. या दृष्टीनें टीकाकारांची योग्यता कवि, नाटककार, अगर कादंबरीकार यांच्या मानानें दुय्यम प्रतीची आहे. कवि जीवनावर भाष्य करीत असतो, तर टीकाकार काव्यावर भाष्य करीत असतो. जीवनाचा अर्थ व जीवनाचें सौंदर्य समजावून घेण्याला कवींच्या कृतींची जेवढी गरज आहे, तेवढीच गरज, कवींच्या कृतींचा अर्थ व सौंदर्य समजावून घेण्याला टीकेची आहे. टीका-व्यापारांचें प्रधान कार्य—किंबहुना एकमेव कार्य—सौंदर्यदर्शन व रहस्यदर्शन हेंच आहे.

हें मी, सहज मला वाटलें तें, व आपणांलाहि सहज पटेल असें, सांगून गेलों खरा; पण टीकाशास्त्राचें क्षेत्र हें—इतर अनेक क्षेत्रांप्रमाणेंच !—आज एक रणक्षेत्र होऊन राहिलें आहे. सिद्धान्तवाक्य तोंडांतून काढण्याचा अतिक्रम केला रे केला, कीं वक्त्याचें पाऊल या रणक्षेत्रावर पेरलेल्या स्फोटशील सुरुंगावर पडलेंच म्हणून समजावें ! मी आतां आपणांस टीकेचें जें सात्त्विक आणि विधायक कार्य सांगितलें, तें सांगण्यांतहि मी नकळत एक अतीव विवाद्य पक्ष घेण्याचा गुन्हा केला आहे ! टीकेनें काव्याचें रहस्यदर्शन करायचें, याचा अर्थ इतर कार्यें करणारी टीका खरी टीका नव्हे काय ? टीकेनें टीकाविषय झालेल्या ललितकृतीला 'बरें', 'वाईट', 'श्रेष्ठ', 'कनिष्ठ' म्हणायचें कीं नाहीं ? आणि वाङ्मयकृतीचा आस्वाद घेत असतां, अगर तिला 'बरें-वाईट' ठरवीत असतां, टीकाकाराला एखाद्या शास्त्राचा आश्रय करावा लागतो कीं नाहीं ? काव्यसौंदर्यासंबंधीं बोलत असतां, त्यानें त्या सौंदर्यनिर्मितीमागील मनोव्यापाराचें पृथक्करण करून सौंदर्या-स्वादांत भर घालावी कीं घालूं नये ? कीं केवळ आनंदोद्गार काढून काव्यावरहि प्रतिकाव्य रचावें ? काव्यासंबंधीं बोलतांना कवीसंबंधीं बोलणेंहि स्वाभाविक नाहीं का ? कवीच्या करामतीचें कौतुक करतांना त्याच्या कुलाचा, परंपरेचा आणि पूर्व-संस्कारांचाहि विषय निघणें स्वाभाविक नाहीं का ?

आणि त्यांतून पुन्हा अर्वाचीन काळ हा प्राधान्येंकरून इतिहास आणि समाजशास्त्र यांचा काळ आहे. इतिहासाचें 'शास्त्र' बनविणें, त्या शास्त्राच्या दृष्टींतून सामाजिक सिद्धान्त बसविणें, आणि त्या सामाजिक सिद्धान्तांच्या अनु-रोधानें व्यक्तींच्या चरित्रांची आणि कलाकृतींचीहि संगति लावणें, हा आजच्या काळाचा प्रमुख छंद,—प्रमुख pre-occupation—आहे. व्यक्तीचा व त्याच्या

कृतीचा अर्थ लावण्याचा हा आधुनिक शास्त्रीय मार्ग टीकाशास्त्रानें पत्करायचा कीं नाहीं ? हे व यासारखे अनेक प्रश्न आजच्या टीकाशास्त्रांत, एक एक स्वतंत्र संप्रदाय करून राहिले आहेत.

पण हे सर्व विकल्प मनांत उभे राहात असून, व या सर्व संप्रदायांचा आश्रय आजचे टीकाकार प्रसंगानुरूप करीत असून, कित्येकदा या सर्व चक्रव्यूहांतून मागील दारानें निसटून जाण्याचा व्यर्थ यत्नहि केलेला आढळतो ! या चावतींत कांहीं लोक असाहि एक चातुर्यपूर्ण पर्याय सुचवितात कीं,—" हे सर्व भाष्यप्रकार पाश्चात्त्य टीका-वाङ्मयांतून आलेले आहेत; तेव्हां प्रथमतः आपण आपल्या प्राचीन टीका-शास्त्राप्रमाणें वर्तायचें, कीं या अर्वाचीन पाश्चात्त्य टीकाशास्त्राप्रमाणें वर्तायचें, हें ठरवून टाकूं; आणि आपल्या प्राचीन भारतीय टीका-शास्त्राप्रमाणें वर्तायचें ठरल्यास, आतांपर्यंतच्या विवेचनांत अप्रत्यक्षपणें सूचित केलेल्या पाश्चात्त्य संप्रदायमालिकेला, दाराबाहेरूनच ' बिदा ' करण्यास हरकत नाहीं !"

आपलें प्राचीन साहित्यशास्त्र आजच्या टीका-प्रयोजनांचें कार्य कितपत करूं शकेल याचा विचार करण्यापूर्वी, या क्षेत्रांतील आणखी कांहीं भ्रामक मतांचा विचार केला पाहिजे. आधुनिक पाश्चात्त्य वाङ्मय-प्रकार पत्करून, आपण ज्याप्रमाणें अनेक जुन्या कलाप्रकारांपासून न कळत बाजूला सरकलों आहों, त्याचप्रमाणें टीकेचाहि नवा प्रकार पत्करल्यानें जुन्या टीकाशास्त्रापासून आपण दूर गेलों आहों; आणि ही ऐतिहासिक वस्तुस्थिति ग्रहण करावयाची असेल, तर साहित्यशास्त्र आणि टीकावाङ्मय हीं एक नव्हत, असें मानणें प्राप्त आहे, असें मला वाटतें. प्राचीन काळीं ' साहित्यशास्त्र ' फार परिणतावस्थेला पोहोंचलें होतें, परंतु टीका-वाङ्मयासंबंधीं कल्पना जुजबी होती, असें मीं म्हटलें, तर संस्कृतप्रेमी विद्वानांनीं मला क्षमा केली पाहिजे ? साहित्यशास्त्रांतील सिद्धान्तांची चर्चा करणें, अगर नियमांची अंमलबजावणी करणें हें वेगळें; आणि टीकाकारानें आपल्यासमोर आलेल्या कलाकृतीचें रहस्य व सौंदर्य विशद करणें वेगळें. हें सौंदर्य विशद करण्याच्या निमित्तानें त्याला एखादे वेळीं " प्रस्तुत काव्य सुंदर नाहीं, " म्हणजेच " प्रस्तुत ' काव्य ' ' काव्य 'च नाहीं " असेंहि म्हणावें लागेल. हें सांगतांना तो कांहीं कारणमीमांसा व तत्त्वचर्चाहि करील; परंतु ' काव्य म्हणजे काय ?' आणि विशिष्ट ' काव्यप्रकारांत कोणकोणत्या गोष्टी मंजूर अगर नामंजूर

होत ?' या दोन प्रश्नांच्या सामान्य चर्चेहून, विशिष्ट काव्याचें रहस्यदर्शन, ही वेगळीच क्रिया होय, हें आपण मान्य करणें जरूर आहे. उत्तरोक्त क्रियेला जर ' टीकालेखन ' म्हटलें, तर पूर्वोक्त चर्चेला साहित्यशास्त्र असें म्हणतां येईल. आजच्या टीका-लेखनाला जुन्या साहित्यशास्त्रांतील कांहीं भागाचा पुष्कळ उपयोग आहे. परंतु जुन्या टीकापद्धतीचा मात्र फारसा उपयोग नाहीं. शिवाय, असे अनेक प्रश्न आजच्या टीकावाङ्मयानें उपस्थित केले आहेत, कीं जे जुन्या साहित्यशास्त्राला सुचले नव्हते, किंवा अप्रस्तुत वाटत होते.

जुन्या साहित्यशास्त्रांतील काव्यस्वरूपमीमांसा व काव्यानंदमीमांसा अत्यंत खोल आहे. परंतु विशिष्ट रहस्यदर्शनाकडे अगर रसास्वादाकडे,—म्हणजे त्यांच्या त्या कौतुकास्पद साहित्यसिद्धान्ताच्या प्रत्यक्ष विनियोगाकडे,—आमचे प्राचीन लोक वळले, कीं ते तांत्रिक आणि जुजबी बनत असत. त्यांचेच शब्द वापरून सांगायचें झालें, तर त्यांचा भर ' वाक्यगुण '—विवेकावर असे; तर अर्वाचीनांचा भर प्रबंधगुण-विवेकावर आहे. पृथक्पणें एकेका श्लोकाचें अथवा एकेका प्रसंगीं पुष्टत्व पावलेल्या रसाचें विवेचन करण्यांत प्राचीन लोक निपुण होते, तर संपूर्ण प्रबंधाचा मनावर कोणता संस्कार होतो; याचा विवेक करण्यांत अर्वाचीनांनीं फार पुढची मजल मारली आहे. कालिदासाचें शाकुंतल प्राचीनांनींहि शिरोधार्य मानलें; कविवर्य गटे-रवींद्र-अरविंद यांजसारख्या अर्वाचीनांनींहि शिरोधार्य मानलें. परंतु गटे-रवींद्र-अरविंद हे समग्र प्रबंधांतून उमटणारा अर्थ ओळखण्यांत अधिक निपुण आहेत, हें प्राचीन परंपरेंतील लोकांनाहि मान्य करावें लागेल.

पण प्राचीन आणि अर्वाचीन परंपरेंतील फरक वेगळाच आहे. काव्यानंदाला ' ब्रह्मानंदसहोदर ' मानूनहि आणि रसिक-हृदय हें शेवटचें कोर्ट मानल्यानंतरहि, काव्यगुण ही बाहेरून आणून जोडतां येण्यासारखी एक स्वतंत्र ' वस्तु ' होय, या बहिर्मुख दृष्टीनें पाहण्याची प्रवृत्ति आपल्या जुन्या साहित्यशास्त्रांत व टीकावाङ्मयांत दिसून येते. अर्वाचीन प्रवृत्ति याच्या अगदीं विरुद्ध टोकाची आहे. पण मी येथें मुख्य भेद भारतीय साहित्यशास्त्र आणि पाश्चात्त्य साहित्यशास्त्र असा करीत नसून, जुनी टीकादृष्टि आणि नवी टीकादृष्टि असा करीत आहे, हें मुद्दाम सांगणें जरूर आहे. कारण पाश्चात्त्य टीकावाङ्मयांतहि या बहिर्मुख वृत्तीचा पगडा अनेक शतकें होता. कलेच्या क्षेत्रांत ग्रीक लोक हे युरोपचे गुरु होत; आणि ॲरिस्टॉटल् हा तर कांहीं शतकें या क्षेत्रांत प्रायः ' बादशहा '

म्हणूनच ओळखला जात असे. शिल्प, मूर्ति, काव्य, नाट्य इत्यादि अनेक कलांत प्राचीन ग्रीकांनीं अनेक शतकांच्या आणि अनेक राष्ट्रांच्या कौतुकाचा विषय होण्यासारख्या अमर कृति करून ठेवल्या यांत शंका नाहीं. तथापि कला-मीमांसेंतील त्यांची दृष्टि बहिर्मुख आणि बुद्धिप्रधानच होती. कलेला ते निसर्गाची सुसूत्र, सहेतुक आणि सुबुद्ध प्रतिकृतिच मानीत. जीवनांतील घटक घेऊन त्यांना सहेतुकपणें नवा आकार देणें म्हणजे कला, अशी त्यांची कलेसंबंधींची कल्पना होती. जीवनाच्या, निसर्गाच्या अगर सौंदर्याच्या दर्शनानें, कवीनें अपरिहार्यत्वानें काढलेला उद्गार, हें कलेचें नवोन्मेषशाली स्वरूप त्यांनीं मान्य केलेलें नव्हतें. एखादी कलाकृति तर्कविरोधी, नीतिविरोधी, अगर शास्त्रविरोधी (टेक्निक्-विरोधी) आहे, म्हणून ती सदोष ठरविणें त्यांना अप्रशस्त वाटत नसे! वस्तुतः ॲरिस्टॉटल् हा त्याच्या काळीं उपलब्ध असलेल्या आदर्श कृतीवरून कांहीं कला-विषयक ठोकताळे बसवीत होता. परंतु त्याच्या या 'उद्गमनात्मक' (Inductive) निष्कर्षांनाच, पुढें वेदवाक्यांचें स्वरूप प्राप्त झालें. होरेस या रोमन साहित्य-शास्त्रकारानें तर आपल्याकडील साहित्यशास्त्रांतील कांहीं ठोकळ आणि अर्थशून्य दंडकाप्रमाणें ठोक नियमच घालून दिले! रंगभूमीवर एका वेळीं तिघांहून अधिक पात्रें असतां कामा नयेत! नाटकाला अंक पांचच असले पाहिजेत; सहा असणें जितकें चूक व तितकेंच चार असणें म्हणजेहि चूक! अशा प्रकारचे नियम या रोमन शास्त्रकारानें घालून दिले आहेत! आणि या दोन वाङ्मयीन मोंगल बादशहांची हुकमत युरोपच्या साहित्यिकांनीं अनेक शतकें खुषीनें मान्य केली होती.

अर्थात् ही अनैसर्गिक हुकमत अगदीं बिनबोभाट चालली असें मात्र नव्हे. प्रत्येक कालखंडांत स्वयंस्फूर्तता आणि शास्त्रपूतता या दोन प्रवृत्तींत दोन हात झाल्याखेरीज राहिलेले नाहींत. ज्या कालखंडांत ॲरिस्टॉटल् याला साहित्य-शास्त्राचा सम्राट् मानणारे स्कॅलिगरसारखे इटॅलियन टीकाकार झाले, त्याच शतकांत, प्रतिभावन्ताच्या हृदयाची ऊर्मि हेंच काय तें एक साहित्यशास्त्र; आणि वैयक्तिक अभिरुचि हेंच काय तें अखेरचें प्रमाण, असें पुकारणारे पीत्रो ॲरेतिनो-सारखे अन्तःस्फूर्तिवादी टीकाकारहि इटलींत निर्माण झाले होते. तथापि स्थूल-मानानें असें म्हणतां येईल कीं, युरोपीय अभिजात संप्रदायाचे लोक, वाङ्मय ही एक 'करमत' अगर 'हुन्नर' मानीत. 'शक्ति' व 'अभ्यास' या जोडीपैकीं, त्यांचा भरंवसा अभ्यासावरच अधिक असे. ग्रीक व रोमन काव्यनाट्यादिकांचा

अभ्यास करणें, हाच कवि बनवण्याचा राजमार्ग होय, असें त्यांचें मत होतें. प्राचीनांनीं मानव व निसर्ग यांचीं चित्रें जशीं काढलीं तशींच आपणहि काढलीं म्हणजे काव्य झालें, ही त्यांची काव्याविषयींची कल्पना होती. जीवनाचें प्रत्येक हृदयांत पडणारें प्रतिबिंब नवीन व वेगळें असूं शकेल, नव्हे वेगळें असलें पाहिजे, याची त्यांना कल्पना नव्हती.

वाङ्मयासंबंधींच्या या कृत्रिम कल्पनांचा पगडा युरोपमध्यें प्रायः एकोणिसाव्या शतकापर्यंत, म्हणजे अर्वाचीन रोमँटिसिझमच्या उदयापर्यंत होता म्हटला तरी चालेल. वाङ्मय हें बाह्य नियमांनीं बद्ध नसून अन्तर्गत व स्वयंनिर्मित उद्दिष्टांनीं व नियमांनीं चालणारें आहे, ही कल्पना एकोणिसाव्या शतकांतील सौंदर्यवादाच्या उदयानें विविध संप्रदायी टीकाकारांना, या ना त्या स्वरूपांत मान्य करावी लागली. याचाच अर्थ ललित वाङ्मय हें बाह्य नियमांप्रमाणें रचिलें जात नाहीं व बाह्य नियमांनीं परीक्षिलेंहि जात नाहीं; काव्य ही कारागिरी नसून स्वयंस्फूर्त व स्वयंपूर्ण अशा अभिनव मनोमय वस्तूचा 'आविष्कार' होय; मग तो कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा असो, कीं त्याच्या देशकालादि परिस्थितीचा असो, कीं वस्तुगत सौंदर्यतत्त्वाचा असो, हें तत्त्व या काळांत सर्वमान्य झालें. .

अर्थात् या अर्वाचीन दृष्टीप्रमाणें विचार करतांना रीति, अलंकार, रसपरिपोष आणि विचारांची तर्कशुद्धता यांच्या चर्चेला गौण स्थान येतें. शाकुंतल किंवा हॅम्लेट् यांसारख्या जिवन्त आणि स्वयंपूर्ण कलाकृतींच्या सजीवतेचें आणि स्वयंपूर्णतेचें बीज कशांत आहे, या प्रश्नाचें उत्तर शोधण्याचा यत्न ही आधुनिक टीकापद्धति करते. कारण केवळ साहित्यशास्त्रांत निर्दिशिलेले दोष टाळण्यानें अगर नियम पाळण्यानें, हॅम्लेट् किंवा शाकुंतल या कृति, आहेत तशा घडल्या आहेत, असें मानण्याचा भोळेपणा जुने टीकाकारदेखील करणार नाहींत, हें उघड आहे. ज्याच्या रसांचा परिपोष आणि ज्याच्या गात्रांची वाढ आंतून होत असते, अशी ही जिवंत कृति, "अंकुरली आहे तरी कोणत्या बीजांतून ?" याचा विचार आधुनिक टीका करते. टीकापद्धतीचें हें नवें स्वरूप आधुनिक जर्मन तत्त्ववेत्त्यांनीं पूर्णतेला नेलें.

विघातक टीका आणि विधायक टीका हे शब्द आज आपण पाश्चात्त्य वाङ्मयाच्या संपर्कामुळें प्रत्यहीं वापरतों. पण ते शब्द माझ्या समजुतीप्रमाणें प्रथम

गटे यानें वापरले; आणि तेहि, आज वापरले जातात त्याहून फारच वेगळ्या अर्थानें वापरले. प्रतिकूल टीका असेल, ती ती विघातक टीका होय, असा गटेचा अर्थ नव्हता. यांत्रिक आणि बाह्य नियमांनीं काव्याची परीक्षा करणें ही गटेच्या दृष्टीनें विघातक टीका होय. आणि कवीचा आणि काव्याचा हेतु समजावून घेणें व तो कितपत साध्य झाला आहे हें पाहणें, याला त्यानें विधायक टीका म्हटलें आहे. ही विधायक पद्धति हाच अर्वाचीन टीकापद्धतीचा विशेष होय. कलाबीज शोधणें व त्या बीजाचा वृक्ष कसा झाला हें दाखविणें, एवढेंच केवळ आधुनिक टीकेचें उद्दिष्ट नाहीं. या संपूर्ण वृक्षाचा "**माझ्या**" मनावर परिणाम कोणता झाला, हेंहि ती टीकापद्धति कथन करते. सारांश, एखादी कलाकृति नियमांना धरून आहे कीं नाहीं, असा प्रश्न स्वतःला करण्याऐवजीं हा कलाविष्कार कोणत्या जीवननियमांनीं सिद्ध झाला आहे, हा प्रश्न आजचा टीकाकार स्वतःला करतो. त्याबरोबरच तो आविष्कार कशाचा आहे, कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा आहे, कीं त्याच्या देशकालादिकांचा आहे, कीं त्याला विशिष्ट क्षणीं दिसलेल्या जीवनस्वरूपाचा आहे—हा प्रश्नहि तो उपस्थित करतो. या प्रश्नाचें उत्तर देतांना त्याची कोणत्याहि एका शास्त्रावर भिस्त नसते. प्रत्यक्ष साहित्यशास्त्रावर तो विसंबत नाहीं. डोळ्यासमोर धरलेली कलाकृति व तो स्वतः या दोघांचा जणू आस्वादरूप एकान्तच घडत असतो. पण हा आधुनिक 'आस्वाद' म्हणजे जुन्या दरबारी रसिकांच्या बैठ्या धन्योद्गारासारखा 'अकर्ता' (passive) नसतो. आधुनिक टीकाकारांच्या आनंदाचें पर्यवसान कलाप्रक्रियाविषयक प्रश्नांत होतें आणि त्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याकरितां त्याला कलाकृतीच्या मुखानें कवीच्या मानससरोवरापर्यंत उलटा प्रवास करावा लागतो. सारांश, तो कवीची संपूर्ण कृति मनानें पुनः रचतो; संपूर्ण अनुभव पुनः अनुभवितो, व या अनुभूतीचें चित्र तो कवीइतक्याच निरंकुशतेनें व तन्मयतेनें काढतो. हें '**तादात्म्यचित्र**' म्हणजेच आधुनिक टीका होय.

कवीच्या कृतीचा असा मनोमय अनुभव घेतांना उद्भूत होणाऱ्या प्रश्नांत कविचरित्रासंबंधीं, कवीच्या समाजवलयासंबंधीं, कवीच्या पूर्वसंस्कारासंबंधीं व जीवनदृष्टीसंबंधीं प्रश्न उपस्थित होणार नाहींत, असें नाहीं. पण केवळ कवीच्या चरित्राचें संशोधन म्हणजे वाङ्मयटीका नव्हे; केवळ कवीच्या कालखंडांतील समाजस्थितीचें संशोधन म्हणजेहि वाङ्मयटीका नव्हे; कवीच्या काव्यांतून

निबंधाच्या नैतिक निष्कर्षांची चर्चा म्हणजेहि वाङ्मयटीका नव्हे. कवीच्या काव्याचा समकालीन समाजावर होणारा परिणाम, ऐतिहासिकदृष्ट्या पुरोगामी आहे कीं प्रतिगामी आहे, यासंबंधींचा फैसला म्हणजेहि खरी वाङ्मयटीका नव्हे! या सर्व संशोधनाची उपयुक्तताहि, कवीचा कलानिविष्ट अनुभव आपण स्वतः मिळविण्यास ज्या मानानें त्या संशोधनाला त्याचा उपयोग असेल त्या मानानेंच ठरेल.

या प्रकारच्या कलास्वादांत कलाकृतीच्या एकजीवित्वावर (organic unity) भर असतो, हें लक्षांत घेतलें पाहिजे. काव्यांत अगर नाटकांत कवि एक एक अलंकार अगर सौंदर्यांग बाहेर आणून जोडतो असें मानणें, ही कलेसंबंधींची निकृष्ट कल्पना आहे. संपूर्ण कलाकृति कवीच्या मनांत अकस्मात् बीजरूपानें अवतीर्ण होते, असें मानणेंच कलाविष्काराच्या प्रक्रियेस अधिक धरून होईल; व या दृष्टीनेंहि, आपलें प्राचीन साहित्यशास्त्र हत्तीचे दात, सोंड, शेपूट वेगवेगळे चांचपून पाहणाऱ्या आंधळ्याप्रमाणेंच प्रायः वर्तत होतें, असें दिसून येईल. भरतमुनिहि ॲरिस्टॉटलप्रमाणें 'त्रैलोक्यानुकृति' अथवा Imitation हेंच नाट्याचें प्रमुख स्वरूप म्हणून सांगतो; व लोकस्वभावावलोकन हेंच सर्वोत्कृष्ट नाट्यशिक्षण म्हणून सांगून आधुनिक वास्तववादहि सूचित करतो. (अर्थात् हें तो प्राधान्येंकरून प्रयोगासंबंधीं सांगत आहे.)

लोकसिद्धं प्रवेत् सिद्धं नाट्यं लोकस्वभावजम् ।
तस्मान्नाट्यप्रयोगे तु प्रमाणं लोक इष्यते ॥

पण या 'त्रैलोक्यानुकृतींत' आणि 'लोकस्वभाव'–चित्रणांतहि, अन्तिम उद्देश एखादा रस निर्माण करण्याहून अधिक व्यापक नसे. विरहावस्थेंतील नायिका कृशांगी नसेल तर तो मोठा दोष होय, येथपर्यंतच सामान्यतः प्राचीनांचा औचित्यविचार जाई. विशिष्ट जागीं विशिष्ट रसाचा भंग न करणें, यापलीकडे संपूर्ण प्रबंधाचें नियामक तत्त्व किंवा unity कोणती, म्हणून पाहावें, तर रोमन साहित्यशास्त्रज्ञ होरेस यानें सांगितलेल्या अर्थशून्य तांत्रिक नियमापलीकडे फारसें हातीं लागत नाहीं. नाटक असल्यास अंकांची संख्या अमुक, 'प्रकरण' असल्यास अमुक;–नाटकाचा नायक क्षत्रिय पाहिजे; प्रकरणाचा नायक ब्राह्मण किंवा वैश्य असावा, नाटकाचें पर्यवसान आनंदमयच असावें, यांसारखे ठोकळ नियम, म्हणजेच काय तें संपूर्ण प्रबंधाचें नियामक तत्त्व! व याचाच अर्थ केवळ

अनुक्रम ...
टीका : जुनी व नवी ११
क्रमांक ...
नोंद दि. ...

कृत्रिम परंपरेनें बनलेलें 'टेक्निक्' ऊर्फ शास्त्र म्हणजेच कलेचा अंतिम निष्कर्ष मानण्यांत येई.

संपूर्ण प्रबंधाचा म्हणून एखादा गुण मानल्याचे पुसट पुरावे प्राचीन साहित्यशास्त्राचे अभिमानी काढून दाखवूं शकणार नाहीं असें नाहीं. उदा०

भाविकत्वमिति प्राहुः प्रबन्धविषयं गुणम् ।
प्रत्यक्षा इव दृश्यन्ते यत्रार्था भूतभाविनः ॥

या वचनांत भामहानें 'भाविकत्व' हा प्रबंधगुण म्हणूनच सांगितला आहे. भाविक किंवा भावित या गुणाचा निश्चित अर्थ कोणता यावर टीकाकारांनीं पुष्कळच विवेचन केलेलें आहे. पण "प्रत्यक्षायमानत्व" हा स्थूल अर्थ घेतला तरी त्यांतून संपूर्ण प्रबंधाला व्यापणारा 'गुण' निष्पन्न होतो; परंतु प्रबंधाचें नियामक 'बीज' निष्पन्न होत नाहीं. नाट्यबीजांतील कोणत्या धर्मामुळें नाटक आनंदपर्यवसायी झालें? कोणतें बीज असतें, तर तें शोकपर्यवसायी होणें अपरिहार्य होतें? कवीला मानवी संसारासंबंधीं कोणता संकलित संस्कार वाचकावर ठसवावयाचा होता, म्हणून त्यानें धीरोदात्त नायक निवडला? हे प्रश्न काव्य-निर्मितीच्या दृष्टीनेंच नव्हेत, तर काव्यास्वादाच्या दृष्टीनेंहि अधिक व्यापक, प्रस्तुत व खोल आहेत. पण ते संस्कृत साहित्यशास्त्रकार उपस्थित करीत नाहींत, कारण त्यांना कवीनें काय 'केलें आहे' हें पाहायचें नसून, कवीनें काय 'केलें पाहिजे' हें सांगावयाचें असतें. साहित्यशास्त्रकारांच्याच अपेक्षा अशा तांत्रिक असल्यावर निर्जीव नाट्यकृति लिहिण्याचा प्रघात पडल्यास आश्चर्य नाहीं. सुप्रसिद्ध संस्कृत पंडित प्रो. कीथ यांनीं या निर्जीवतेचें मूळ, पंडिती बाण्याच्या ब्राह्मण लेखकांच्या विशिष्ट वृत्तींशीं नेऊन भिडवलें आहे. ते म्हणतात :

"The Brahmin, in fact, much abused as he has been in this, as in other matters, was the source of intellectual distinction of India. As he produced Indian philosophy, so by another effort of his intellect, he evolved the subtle and effective form of the drama....They were idealists in outlook, capable of large generalizations, but regardless of accuracy in detail; and to create a realistic drama was totally

incompatible with their temperament. The accurate delineation of facts or character was to them nothing *they aimed at the creation.....of sentiment.*"*

अर्थात् नाट्यांत देखील, काव्याप्रमाणें रसनिर्मिति हेंच उद्दिष्ट असे; व त्याच्या अनुरोधानें इतर अंगांचें औचित्य ठरविलें जाई. प्रमुख पात्राच्या स्वभावपरिपोषाला प्राधान्य देणें; प्रमुख घटनेच्या अनुरोधानें इतर घटनांना व रसपरिपोषाला वाव देणें, ही महत्त्व-श्रेणी ते झुगारून देत. सारांश, काव्य आणि नाट्य यांच्या प्रयोजनांतील फरक संस्कृत साहित्यिकांनीं ओळखला नव्हता. जेथें त्यांचें नाट्य जिवंत असे, ते तेथें प्रायः lyrical अथवा काव्यमय असे; आणि जेथें तें 'लिरिकल' नसे, तेथें तें निर्जीव आणि सांकेतिक असे! अर्थात् संविधानक व स्वभावपरिपोष यांच्या दृष्टीनें निर्जीव असलेल्या नाट्यांगांतहि वाक्पाटवाला आणि सुभाषितांना वाण नसे. म्हणजे संस्कृत नाट्यांत काव्य असे; वाक्चातुर्य अथवा wit भरपूर असे; पण नाट्यच नेमकें क्षीण नसे! प्रसिद्ध आदर्शाबरहुकूम नायक रंगविणें, आणि प्रसिद्ध कर्मविपाककल्पनेला धरून सुकृत-दुष्कृताचीं फळें रंगविणें, या पलीकडे हे दरबारी आणि वेदान्ती नाटककार जात नसत. इतरांचीं जीवनविषयक उत्तरें निमूटपणें न पत्करतां, जीवनाला आणि भवितव्याला स्वतः प्रश्न करणें, हें निदान साहित्यशास्त्रोदयानंतरच्या, अगदीं थोडे अपवाद सोडल्यास उत्तरकालीन संस्कृत कवींना तरी जमलेलें नाहीं. पण रामायण व महाभारत यांत ही स्थिति आढळत नाहीं. तेथें केवळ रसपरिपोष हा हेतु नसून वीरमानव आणि भीषण भवितव्य यांचें चित्रण हा हेतु दिसतो. या आर्ष महाकाव्यांत कर्माची गति जितकी गहन वाटते आणि मानवी गति जितकी गूढ वाटते, तितकी उत्तरकालीन काव्यनाट्यांतील दरबारी जगांत वाटत नाहीं.

लखनौ विद्यापीठाचे डॉ. कान्तिचंद्र पांडे यांनीं आपल्या '**इंडियन ईस्थेटिक्स**' या विद्वन्मान्य ग्रंथांत संस्कृत नाटकाची ही प्रकृति मान्य करूनहि तिचें समर्थन केलें आहे व डॉ. कीथ यांच्याच पदरीं अज्ञान बांधलें आहे! दोन प्रसिद्ध डॉक्टरांच्या तंट्यांत पडलेल्या अशा बिकट 'केस'मध्यें, मजसारख्यानें "Where doctors differ" असें म्हणून मोकळे होणेंच अधिक सोईचें! पण डॉ. कान्तिचंद्र पांडे यांच्या '**इंडियन ईस्थेटिक्स**' या पांडित्यप्रचुर

* *Classical Sanskrit Literature : A. B. Keith.*

ग्रंथाबद्दल खराखुरा आदर असूनहि, मला त्यांची या बाबतींतील विचारसरणी पटत नाहीं. तें म्हणतात :

" Accordingly, while the Western dramatists...present the character, manifesting itself in action, the Indian dramatist presents a basic mental state at its highest relishable pitch in an ideal situation. Thus, while according to the former, the character is the central fact for presentation in drama, according to the latter, the basic mental state occupies the central position."

महान् वाङ्मयकृतींचें अंतिम प्रयोजन रसोत्पत्ति एवढेंच असतें, कीं त्याहून व्यापक, खोल व क्षोभक असतें, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. रामायण-महाभारतांचाच केवळ नव्हे, तर शाकुंतल व उत्तररामचरित यांसारख्या असाधारण नाट्यकृतींचाहि अन्तिम हेतु व परिणाम, केवळ रसिकांना विशिष्ट आस्वाद्य मनःस्थितींच्या गुंगींत सोडणें हा आहे, असें म्हणणें कठीण आहे. हीं नाटकें लिहितांना कवीच्या डोळ्यांसमोर एक सुस्पष्ट जीवनाकृति—हेगेलची Aesthetic idea म्हणा, किंवा बेनेदेत्तो क्रोचेची Intuition म्हणा हवी तर !—होती; व त्या विशिष्ट आकृतींचें दर्शन वाचकांना घडविणें हा त्यांचा हेतु दिसत आहे. जीवनाची विशिष्ट कल्पना उमटविणें हा येथील उदात्त कलेचा हेतु आहे. विशिष्ट रसाचा आस्वाद घडविणें हा हेतु नव्हे.

कांहींहि असो, रसाहून अधिक व्यापक तत्त्व मानल्याखेरीज, महाकाव्यें आणि श्रेष्ठ प्रतींचीं नाटकें यांचा मनावर होणारा अंतिम आणि संकलित परिणाम ओळखतां येणार नाहीं; व या अंतिम आणि संकलित परिणामाला प्राधान्य दिल्याखेरीज औचित्य आणि ध्वनि यांचाहि निर्णय करतां येणार नाहीं. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं कलाकृतीच्या सर्वांगांना व्यापणारें बीज न मानल्यामुळें, औचित्य आणि ध्वनि या व्यापकतर तत्त्वांचाहि विनियोग, जुन्या टीकालेखनांत कसा फुटकळ आणि जुजबी केलेला आढळतो हें मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं.

पण केवळ रसाहून व्यापक तत्त्व मानल्यानें टीका निर्दोष होईल असा माझा आतांपर्यंतच्या विवेचनाचा अर्थ नव्हे. प्रसिद्ध इंग्लिश टीकाकार मॅथ्यू आर्नोल्ड याचा कटाक्ष विषयाच्या शाश्वत महत्त्वावर विशेष असे. थोर कवीचा

हात शाश्वत महत्त्वाच्या विषयाला लागला कीं, त्यांतून उदात्त काव्य निर्माण होतें, असें त्याचें समीकरण होतें. या समीकरणानें सन्नद्ध होत्साता, तो आपल्या काळांतील सर्वश्रेष्ठ कलाकृतींचें मापन करूं लागतो,–स्तिमित होतो आणि आपलें समीकरण हातांतून टाकण्याऐवजीं, मापायला घेतलेली जगद्विख्यात कृति 'अॅना कॅरेनिनाच' टाकून देतो! या कृतीकडे कलाकृति म्हणून पाहण्यांत अर्थच नाहीं, असें तो ठरवतो! कारण त्याच्या कलेच्या मापांत या कादंबरींतील अजब दुनिया बसत नाहीं! पण अॅना कॅरेनिना ही कलाकृति नाहीं, असें ठरवितां ठरवितांच, आर्नोल्डनें त्या कृतीमागची जी मानसप्रक्रिया सांगितली आहे, तिजमध्यें कलेचा आणि टीकेचा एक नवीन सिद्धान्त सांगितला गेला आहे, याची आर्नोल्डला स्वतःला तरी कल्पना होती कीं नाहीं कोण जाणे!

तो लिहितो—

"The author has not invented and combined it, he has seen it. It has all happened before his inward eye..... *and what his novel in this way loses in art, it gains in reality.*"

महर्षि टॉलस्टॉय यांच्या या अमर कृतीचा कथाविषय आर्नोल्डच्या कसोटीला उतरण्यासारखा नाहीं. त्याची कथनपद्धतीहि आर्नोल्डच्या पसंतीला उतरणारी नाहीं. या कथेंतील विकारातिरेक जवळ जवळ विकृतीच्या थराला गेला आहे. कथेचा अन्त दारुण आहे. विकाराच्या झंझावातांत सांपडलेलीं पात्रें, आणि प्राचीन महाकाव्यांतील कथांच्या मानानें क्षुद्र आणि विकृत वाटण्यासारखें कथानक, यामुळें ही कति आर्नोल्डच्या टीकानिकषांनीं महान् कलाकृति ठरणें शक्य नव्हतें. परंतु आर्नोल्ड याच्याजवळ केवळ टीकाशास्त्रच नव्हतें, तर हृदयहि होतें; व त्यामुळें त्यानें या अभिनव कलाकृतीमागील अभिनव तंत्र ओळखलें! "दीर्घकथा कशा लिहाव्या?" या विषयावरील एखादें तंत्रविषयक पुस्तक वाचून टॉलस्टॉय यानें ही कथा 'जुळविली' नव्हती, तर ती त्याच्या डोळ्यांसमोर समग्र उभी राहिली होती. तर्कबुद्धीच्या पलीकडील Intuition ला, अथवा प्रत्यक्षानुभूतीला ती एकदम प्रतीत झाली होती! व म्हणूनच 'सहृदय' अशा आर्नोल्डला, या ठिकाणीं आपल्या सिद्धान्ताच्या तटबंदीबाहेर पडून, कोचेची भाषा न कळत वापरणें भाग पडलें आहे. मात्र तो टॉलस्टॉयच्या या

कृतीला 'कलाकृति' म्हणायला तयार नाहीं एवढेंच काय तें. तिला तो 'वास्तवता' हें नांव देतो.

पण ॲना कॅरेनिना ही कलाकृति नसून वास्तवकथन आहे, याचा अर्थ तरी काय ?

गोरपत्यं बलीवर्दः तृणान्यत्ति मुखेन सः ।

इ० श्लोकांत कथन केलेल्या वास्तवांत ही कथा मोडेल काय ?

कीं हें कथन,

गतोस्तमर्कों भातीन्दुः याति वासाय पक्षिणः ।
इत्येवमादि किं काव्यं ? वार्तामेनां प्रचक्षते ॥

यांत भामहानें निर्दिष्ट केलेल्या '**वार्ता**' वर्गांत मोडेल ? कीं हें कथानक इतपतहि निर्मळ सत्य नसल्यानें, पोलिसांत दाखल झालेल्या एखाद्या गुन्ह्याच्या रुक्ष रिपोर्टाच्या वास्तवतेंत गणतां येईल ? मला वाटतें, यांपैकीं कोणत्याहि वर्गांत तें ढकलतां आलें नसतें. टॉलस्टॉयनें चितारलेलीं चित्रें पतितांचीं आहेत; त्यांचा अंत दारुण आहे. तथापि त्या सर्व मोहचरितांत आणि पातककथेंतहि, टॉलस्टॉयनें कोणत्या जादूनें एवढें करुण, पावन, दयामय, प्रेममय वातावरण निर्माण केलें आहे, तें त्याचें त्यालाच माहीत ! टॉलस्टॉय यानें कलाकौशल्य न वापरतां, केवळ पाहिलें तसें सरळ वर्णन केलें आहे, हें आर्नोल्डचें म्हणणेंहि वस्तुतः तितकेंसें बरोबर नाहीं ! आपणां प्राकृत आणि पोटार्थी माणसांना ज्या घटना व व्यक्ति प्रायः भीषण आणि पातकी वाटल्या असत्या, त्याच घटनांकडे व व्यक्तींकडे महर्षि टॉलस्टॉय जणू महर्षि व्यासांच्या करुणामय नेत्रांनीं पाहात आहेत आणि एखाद्या बेभान चित्रकाराच्या उन्मत्त उत्साहानें त्यांचें चित्र चितारीत आहेत. व्यक्तिशः मला तर त्या कादंबरीच्या पानापानांत, शब्दाशब्दांत, निर्मितीचा आनंद भरलेला आढळतो. "All art is dedicated to joy" हें जर्मन कवि शिलर याचें वचन, जर मला कोणत्या कलाकृतीच्या पानापानावर कोरलेलें आढळलें असेल, तर तें या दारुण शोककथेच्या ! अर्थातच या असाधारण विकार-चित्राकडे पाहतांना, कवि कुठें उभा राहून तें पाहात होता, हें समजावून घेतलें पाहिजे. कवीला केवळ विशिष्ट रस निर्माण करायचा नाहीं; विशिष्ट शैली वापरून

दाखवावयाची नाहीं; केवळ विशिष्ट घडामोडी तुमच्यापर्यंत आणून पोहोचत्या करायच्या,–मादाम कॅरेनिनाची चहाडी अगर नालस्ती करून एखाद्या कुटाळ-कंपूची करमणूक करायची, हाहि त्याचा हेतु नाहीं. कुटाळकंपूत निघतो त्या-सारखा विषय निघाला आहे खरा; पण सांगणारा मात्र महर्षि व्यासांच्या तोलाचा आहे. आणि म्हणून त्यानें कुटाळकी निक्षून बाजूला रोखून, मानवता व भवितव्यच तेवढें आपल्यापुढें उभें केलें आहे. या कृतींत त्याला कथानकाच्या अधर्म्यतेमुळें, सामान्य लेखकाप्रमाणें शरमिंदें होण्याची गरजच नाहीं. त्याच्या शब्दाशब्दांत करुणा, आनंद आणि धन्यताच आहे. या वृत्तीनें पाहणें आणि ही वृत्ति वाचकांत उद्दित करणें एवढें साधल्यानंतर, आणखी कला ती कोणती साधायची होती? परंतु कलेसंबंधींच्या पूर्व कल्पनांनीं आर्नोल्ड बद्ध आहे. तो आनंद घेण्याला मोकळा आहे, पण धन्यवाद देण्याला मोकळा नाहीं.

या अमर कृतीकडून आतां मी थोडा आपल्या अर्वाचीन मराठी काव्याच्या लहानशा प्रान्ताकडे वळतों. आमचे केशवसुतसंप्रदायी कवि, आपआपल्या भूमिकांवरून मोठ्या श्रद्धेनें लिहून गेले. त्यांची श्रद्धा त्यांना त्यांच्या पिढींतील अंधारांतहि आशा देण्याला पुरेशी होती. विचाऱ्यांना आपल्या पिढीला काव्याच्या प्रयोजनासंबंधींहि कैफियत द्यावी लागली! स्वजनांतील शिथिलता घालविण्याचेंहि सामर्थ्य आपल्या तुतारींत आहे, हें त्यांना माहीत होतें; परंतु "निदान गाण्यानें श्रमपरिहार होईल एवढें तरी कबूल कराल कीं नाहीं?" असें ते तळमळून विचारीत आहेत. प्रौढपणींहि शैशव टिकविण्याचा,—**पांडित्येन निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्** ' चा त्यांचा बाणा होता; साध्याहि विषयांत आशय पाहणारी त्यांची दृष्टि होती. क्वचित् केवळ तंतुवाद्याच्या नादलहरीवर तरंगत जाऊन आपलें व्यक्तिमत्त्व विश्वाला व्यापीत आहे, असाहि त्यांना साक्षात्कार होई; तर कधीं कंटकशल्यहि बोचत नाहींत, आणि मखमलीनें गुदगुल्याहि होत नाहींत; हर्षहि नाहीं आणि खेदहि नाहीं अशी विदेही अवस्थाहि त्यांना स्पर्शून जाई!

कधीं "**देवदानवा नरें निर्मिलें**" असा त्यांना साक्षात्कार होई; तर कधीं स्वप्राणानें भरून घुमणाऱ्या तुतारीनें, सबंध भारतवर्ष आपण हालवून सोडूं असा त्यांना आत्मविश्वास वाटे! या कवीचीं कलाविषयक तत्त्वें कोणतीं? आदर्श कोणते? त्याला कोणत्या मापानें मापावा? ज्ञानेश्वरीच्या, रघुवंशाच्या कीं अभंग-

गाथेच्या ? वर्डस्वर्थच्या कीं शेलीच्या ? तो आपल्या हृदयाला भिडत आहे, एवढेंच वास्तविक पुरेसें आहे. परिचित मापें कांहीं दिवस सांदीला पडून राहिलीं म्हणून काय बिघडणार होतें ? केशवसुतांना त्यांच्या काळांतहि विपुल नसले तरी मातब्बर भोक्ते मिळाले. हरिभाऊ आपटे आणि प्रि० वासुदेव बळवंत पटवर्धन या दोघांतील एका चाहत्यामुळेंहि केशवसुतांना एका समग्र पिढीच्या अरसिक हेटाळणीची भरपाई झाली असें वाटण्यास हरकत नव्हती; आणि रविकिरण मंडळापासूनच्या पिढीनें तर त्यांना क्रांतिकारक व कविकुलगुरु म्हणून चौरंगावरच बसविलें. परंतु अलीकडे माझे मित्र प्रा. जोग यांच्या दोन सुंदर ग्रंथांनीं तर केशवसुतांच्या काव्याच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाची कायमची तरतूद करून ठेवली आहे. म्हणजे आतां या कवीच्या भवितव्यासंबंधीं वस्तुतः चिन्ता उरली नाहीं. तथापि शास्त्रशुद्ध अभ्यास म्हटला कीं, त्यांत कांहीं धोकेहि असतात ! व त्या अभ्यासाचा पाया घालणाऱ्या विद्वानांचें ऋण कबूल करूनहि मला त्यांतील धोके दाखविणें भाग पडतें ! केशवसुत यांची 'पुष्पाप्रत' ही कविता घ्या. या कवितेंतील अलंकार व रस यांचा विचार केल्यानें कवितेचा आस्वाद घेतल्यासारखें होईल काय ? कालिदासाचीं सूक्ष्म आणि विद्वत्ताप्रचुर निसर्गवर्णनें निकष म्हणून घेण्यानें मूल्यमापनास कांहीं मदत होण्यासारखी आहे काय ? या कवितेचें वर्गीकरण तरी कोणतें करायचें ? ही कविता निसर्गपर आहे असें समजून तिची प्रतवारी लावावी काय ? माझ्या मतें यांतहि आर्नोल्डसारखाच, एका सौंदर्यानें दुसरें सौंदर्य मापण्याचा, एका दुःखोद्गारांचें मापन दुसऱ्या दुःखोद्गारानें करण्याचा किंवहुना मथळ्याच्या लेखी पुराव्यावरून कवितेवर प्रतिज्ञाभंगाचा ठपका ठेवण्याचा पुस्तकी प्रकार होईल. कविता निसर्गपर कशावरून ? तर मथळ्यावरून ! आणि निसर्गपर कवितेचे आवश्यक गुण कोणते ? तर कालिदास आणि माधव जूलियन् यांच्या वर्णनांत आढळणारे ! असा कांहींसा प्रकार आधुनिक कवींच्या कांहीं करुण, खिन्न, पूर्वस्मृतिपूर्ण, आत्मचरित्रपर, सुंदर कवितांच्या बाबतींत केलेला दिसतो ! परंतु प्राचीन आदर्शांचें दडपण बाजूला करून, जोंपर्यंत प्रत्येक कलाकृतीकडे आपण एक स्वतंत्र सृष्टि म्हणून पाहात नाहीं, तोंपर्यंत विद्वानांच्या हातून आणि विशेषतः विद्वानांच्याच हातून अशा गफलती झाल्या नाहींत तरच नवल ! मजसारख्या साध्याभोळ्या वाचकाला मात्र त्या कवितेंत विशिष्ट फुलाच्या रंगाऐवजीं केशवसुतांच्या हळव्या अन्तरंगाचा आरक्त रंगच दिसला तरी पुरें आहे. कवीच्या पूर्ववयांतील स्मृतींचा पर्युत्सुक गंध माझ्या हृदयांत दाटल्यावर, मला त्या फुलाचें नांव, गांव,

गंध कळलें नाहीं तरी दुःख नाहीं ! सारांश, कवि स्वतः कांहींहि म्हणो, कवितेचा विषय ' पुष्प ' हा नसून ' केशवसुत ' हा आहे.

काव्याचे ठराविक प्रकार करून ठेवण्यानें–विशिष्ट प्रकारांचीं विशिष्ट तंत्रें सांगण्यानें, एकीकडून उन्मेषाचा संकोच होतो, तर दुसरीकडून रसिकाच्या आतुर आस्वादक्रियेंत व्यत्यय निर्माण होतो. पण इतकें अनसूहि शास्त्रें सांगण्याचा अट्टाहास होतो, तो व्यावहारिक तडजोडीच्या भूमिकेवरूनच होतो हें उघड आहे. अभिनव गुप्तानें भरताच्या नाट्यशास्त्रावरील आपल्या टीकेंत, साहित्यशास्त्राच्या या व्यावहारिक भूमिकेची मनमोकळी कैफियत सादर केली आहे. ज्याच्याजवळ नैसर्गिक नाट्यलेखनशक्ति आहे, त्याला पूर्वीच्या प्रतिभावन्तांच्या कृतींचा व अनुभवांचा लाभ घडविणें हा शास्त्रलेखनाचा हेतु होय, असें तो सांगतो. हिमालयाच्या शिखराची मोहीम आंखणाऱ्या धाडसी यात्रिकास, पूर्वीच्या प्रवाश्यांचे अनुभव सांगण्यासारखाच हा प्रयत्न असतो असें तो बजावतो. *

भरत आणि ॲरिस्टॉटल् हे दोघेहि मुनि, तंत्राग्रही नाहींत हें खरें. अभिनव गुप्तानें भरतमुनींच्या उदार दृष्टीचें केलेलें समर्थनहि मान्य होण्यासारखेंच आहे. पण शिकाऊ साहित्यिक व अपक्व वाचक, यांच्याकरितां त्यांनीं दिलेल्या व्यावहारिक सूचनांचेंच कडक सोवळें माजवून, अखेर कलेची व कलास्वादाची गळचेपी आपल्या साहित्यशास्त्रांत, केली गेली कीं नाहीं, हा मुख्य प्रश्न आहे. भारतीय व युरोपीय साहित्यशास्त्राचा इतिहास पाहिल्यास ती झाल्याचें आपणांस कबूल करावेंच लागेल.

पण कलानियम आणि नियमबद्ध कला यांच्या परंपरेनें दुसरें एक याहूनहि मोठें नुकसान होतें. लेखक आणि वाचक या दोघांच्याहि अपेक्षा वाजवीपेक्षां अधिक निश्चित, स्पष्ट व म्हणूनच मर्यादित बनून जातात. या निश्चिततेमुळें गूढताविरोधी, व्यवहारी टीकाकारांना समाधान होत असेल; परंतु कलारूप विहंगमाला पंजरगत करण्यांत, फायद्याहून तोटेच अधिक आहेत; व इथेंच वास्तववादी विरुद्ध सौंदर्यवादी, सुव्यक्ततावादी विरुद्ध सूचकतावादी असे कलासंप्रदाय निर्माण होतात. कवीनें जें सांगितलें आहे, तेवढेंच त्याला म्हणायचें होतें; व जें त्याला म्हणायचें

---

* *तावन्नानेन किंचिदुपदिश्यते तं प्रत्युपकारादृते ।*

—अभिनवभारती.

होतें तें सर्व सांगून झालें आहे, असें वाटणें, यांत कलेचेंहि दारिद्र्य आहे, आणि कलास्वादाचेंहि दारिद्र्य आहे, असें मी समजतों. कवि यशवन्त यांनीं एका सुंदर सुनीतांत म्हटलें आहे—

वाणी व्यक्त जरी करील हृदयें, व्यापार आटोपला

जें व्यक्त झालें आहे त्याहून जें अव्यक्त राहिलें आहे, तें अनंतपटींनीं सुंदर व विशाल आहे, असा संस्कार वाचकाच्या मनावर राहण्यांत कवीच्या व काव्याच्या जन्माचें सार्थक आहे. यालाच मी खरा 'ध्वनि' समजतों. रसध्वनीहूनहि हा 'अनंतत्व–ध्वनि,' विशाल आहे;----उदात्त आहे. जर 'सान्ता'च्या साधनानें 'अनन्ता'चा ध्वनि उमटावयाचा नसेल, व्यक्त सौंदर्यांतून अव्यक्त सौंदर्याची चाहूल ऐकवायची नसेल, तर काव्यानंदाला 'ब्रह्मानंदसहोदर' म्हणण्याचा अधिकार आपणाला कसा काय पोहोचतो? कीं कालिदासाच्या पूर्णोपमेनें आणि सुबंधूच्या 'प्रत्यक्षरश्लेषमयप्रपंचा'नें आमच्या शास्त्रीपंडितांना होणारा आनंद म्हणजेच 'ब्रह्मानंदाचा सहोदर' समजायचा? गेल्या कित्येक शतकांतील आपली धडपड तर त्या ब्रह्मानंदाचे व्याकरणप्राय फॉर्म्युले तयार करण्याचीच दिसत आहे!

विद्वज्जनहो! मी फिरून एकवार आपणांला सांगतों, कीं हा फक्त 'भारतीय कलादृष्टि विरुद्ध पाश्चात्त्य कलादृष्टि' असा वाद नाहीं. कारण पाश्चात्त्य देशांत, कला आणि कलास्वाद या दोहोंनाहि फॉर्म्युल्यांच्या हातकडयांतून मोकळे करण्याचे यशस्वी प्रयत्न गेल्या शतकाच्या प्रारंभापासून झाले असले, तरी तिकडेहि यांत्रिक कल्पनांचे भोक्ते अद्याप आहेतच; व म्हणून पाश्चात्त्य असो कीं पौरस्त्य असो, निर्जीव तंत्रनिष्ठा ही कलेला व कलास्वादाला मारक आहे हें मला सांगायचें आहे. पण कलेंत हा अनंताचा ध्वनि उमटविणें व अनिर्वचनीय आणि विश्वात्मक सौंदर्याची ही 'सहज हालचाल' ऐकून मंत्रमुग्ध होणें, हें शास्त्रांच्या कक्षेबाहेरचें आहे. जें सौंदर्य आपल्या स्वतांत नाहीं, तें बाहेर साकार झालें, तरी आपल्याला ओळखतां येणार नाहीं. निसर्गदृश्यांत,----'लँडस्केप्' मध्यें सौंदर्य नसतें; तर त्या निसर्गशकलांत चित्रकार आपल्या अंतरंगांतून स्फुरणारें, सौंदर्य पाहात असतो. सौंदर्य 'लैला' च्या शरीरांत नव्हतें,--तें तर काळेंसावळेंच होतें!--तें मजनूंच्या डोळ्यांत होतें.

इमर्सन् म्हणतो,

"He (the painter) should know that landscape has beauty for his eye.....*because the same power which sees through his eyes is seen in that spectacle.*"

आणि म्हणून

– निसर्गाची नुसती छबी काढूं नका, तर निसर्गाच्या मुखावर जो अर्थपूर्ण भाव आहे त्याला साकार करा. निसर्गातील गद्यप्राय तपशील सोडून द्या; आम्हाला तुम्ही फक्त त्यांतील चैतन्य आणि वैभव चित्रित करून द्या. ललित कलांचें ध्येय प्रतिकृति हें नव्हे, तर नूतन निर्मिति हें आहे. (Thus in our fine arts, not imitation, but creation, is the aim.) आणि जें कलेला लागू, तेंच कलास्वादालाहि लागू आहे! कलेंत जें व्यक्त झालें आहे, त्याचें अलंकारव्याकरणादि तपासणें, म्हणजे कलास्वाद नव्हे. व्यक्त सौंदर्यातून अव्यक्त सौंदर्यापर्यंत पोहोचणें, म्हणजे खरा आस्वाद होय. कारण अद्याप 'तें' व्यक्त झालें नाहीं, हें तुम्ही ओळखण्यांत कवीला जेवढा आनंद आहे, तेवढा अलंकार ओळखण्यांत नाहीं, आणि कवीला जें शब्दापलीकडचें वाटत आहे, किंवा कदाचित् जें लपविण्यांतच आनंद वाटत आहे, तें लडिवाळ बालकाप्रमाणें त्याच्या पदराशीं झोंबून काढून घेणें यांत रसिकव्यापाराची परिसीमा व सार्थकता आहे. Genius आणि Taste—प्रतिभा आणि सहृदयता, या एकाच सुवर्णमुद्रेच्या दोन बाजू आहेत. एकाच नटेश्वराचीं तीं दोन अंगें आहेत.

पण टीकाव्यापार प्रत्यक्ष काव्यकृतीच्या पदवीला पोहोचावयाचा असेल, तर आपण आपली शास्त्रावरील, मोजदादीवरील, यांत्रिक पैदासीवरील, सारांश बहिर्मुख वृत्तीवरील भिस्त कमी केली पाहिजे! सौंदर्याला आणि सौंदर्यनिर्मितीला तोटा नाहीं; फक्त सौंदर्यासंबंधींचा दुजाभाव सोडून तो आपलाच, पण अद्याप न सांपडलेला, भाग आहे, ही दृष्टि, कवींतच नव्हे तर वाचकांतहि निर्माण झाली पाहिजे. शास्त्राभिमानाची, विच्छेदनाची, मोजदादीची घमेंड सोडून, आपण नम्र आणि भक्तिमान् झालें पाहिजे. म्हणजे त्या नम्रतेंतच असा साक्षात्कार होईल कीं, केवळ सौंदर्यच नव्हे, तर सौंदर्यनिर्मात्री प्रतिभादेखील सर्वत्र आहे. माफ करा, फिरून मला इमर्सन्कडेच धाव घेतली पाहिजे, तो म्हणतो,

"The young man reveres men of genius, because, to speak truly, they are *more himself than he.*"

पण दुर्दैवानें आज टीकाकारांनाच काय, पण कवींनाहि जडवादाच्या पोकळ परिभाषेनें आणि पोकळ अवसानानें बाधा केली आहे. (Criticism is infested with a can't of materialism—**Emerson**) या जडनिष्ठतेमुळें, जीवनाकडे आणि कलेकडे पाहण्याची सौंदर्यवादी, नवोन्मेषशील दृष्टि नाहींशी झाली आहे.

मित्रहो! माझा रोख शास्त्रावर नाहीं, तर शास्त्रावरील फाजील विश्वासावर आहे. जुन्या शास्त्रकारांनीं, नैय्यायिकांना आणि वैय्याकरणांना शोभेशी, काव्याची जी चिकित्सा केली आहे, ती त्या विशिष्ट मार्गाची, म्हणजे पृथक्करणमार्गाची परिसीमाच आहे. पण बहिर्मुख शास्त्रांनीं आपली मर्यादा ओळखली पाहिजे. जेथें नवनिर्मितीचा प्रसंग उद्भवला, तेथें या बहुर्मुखतेनें बाजूलाच झालें पाहिजें. कारण टीका म्हणजे मानवी शास्त्राची अंमलबजावणी नव्हे, तर सौंदर्यनिर्मितीच्या दैवी अधिकाराची अंमलबजावणी होय. टीकाव्यापारांत एका विशिष्ट मर्यादेपलीकडे शास्त्रांना येऊं देतां उपयोगी नाहीं. सुफी गूढवाद्यांचा 'सरताज'—मुकुटमणि—**जलालुद्दीन रुमी** म्हणतो,

Reason is like an officer when the king appears,

The officer then loses his power and hides hsmself.

प्रत्यक्षानुभूति, अन्तःस्फूर्ति, Intuition, हाच तो राजाधिराज कीं ज्याचें आगमन होतांच तर्कबुद्धीनें तोंड लपविलें पाहिजे! पण हा Intuition रूपी राजाधिराज, केव्हां आणि कसा येऊन दाखल होतो? पुन्हा **जलालुद्दीन रुमीच** आपणांला त्याचें गुपित सांगतो :—

Sell your cleverness and buy bewilderment,

Cleverness is mere opinion, bewilderment is intuition.

तो म्हणतो,—केवळ बौद्धिक तरतरी, येईल त्या दरानें फुंकून टाका! आणि कौतुकानें, आदरानें स्मिमित होण्याचें नाजूक सामर्थ्य पैदा करा. **सौंदर्यवाद** आणि **गूढवाद** हे अनुक्रमें **कौतुकमार्ग** आणि **भक्तिमार्ग** आहेत. शास्त्राध्ययनाचा उपयोग खासच आहे; पण आजच्या युगांत शास्त्रावरील फाजील

भरंवशामुळें आपण चकित होण्याची, पुलकित होण्याची, अवनम्र होण्याची शक्तिच गमावूं लागलों आहों !

विद्याविकासाच्या मार्गानें टीकेच्या क्षेत्रांत जें करण्यासारखें आहे, तें मराठींत कमी होत आहे असें नाहीं. जुन्या वाङ्मयाच्या क्षेत्रांत पांगारकर, आजगांवकर, भावे यांच्यापासून ते य. खु. देशपांडे, नेने, डॉ. कोलते, प्रियोळकर, पुणें विद्यापीठाचे डॉ. तुळपुळे यांच्यापर्यंतच्या विद्वानांनीं केलेली कामगिरी पर्वतप्राय आहे. संस्कृत आणि इंग्रजी साहित्यांतील सौंदर्यसिद्धान्तांचा आणि साहित्यसिद्धन्तांचा चिकित्सापूर्ण परिचय मराठी वाचकाला करून देण्याचें कार्य पुण्याचे दोन साहित्यशास्त्रज्ञ प्रा. जोग आणि डॉ. वाटवे यांनीं केलें आहे. प्रा. जोग यांनीं आधुनिक मराठी काव्याच्या अभ्यासाचा पद्धतशीर पाया दोन ग्रंथांच्या द्वारें घातला आहे. प्रा. भवानीशंकर पंडित तोच पाया अधिक संशोधनानें धक्कम भरून काढीत आहेत. श्री. बा. सी. मर्ढेकर व सौ. कुसुमावतीबाई देशपांडे आपल्या व्यासंगानें व कुशाग्रबुद्धीनें टीकेच्या प्रान्तांत बहुमोल भर घालीत आहेत. श्री. वा. ना. देशपांडे आपल्या तत्त्वचिकित्सक लिखाणानें टीकावाङ्मयांत भर घालीत आहेत. श्री. दि. के. बेडेकर हे कम्यूनिस्ट विचारसरणीचे विद्वान् हेगेलच्या कलासिद्धान्ताचा उपयोग मराठी टीकेंत करीत आहेत. पुण्याचे प्रा. रा. शं. वाळिंबे पाश्चात्त्य टीका-शास्त्रासंबंधींच्या विपुल माहितीनें भरलेले ग्रंथ आकर्षक भाषेंत लिहून, टीका–वाङ्मयांत बहुमोल भर घालीत आहेत. मुंबईचे प्रा. वा. ल. कुलकर्णी याच क्षेत्रांत निष्ठेनें कार्य करीत आहेत. नागपूरच्या डॉ. देशमुखांनीं मराठीचें स्वतंत्र साहित्यशास्त्र बनविण्याचा यत्न केला आहे. या सर्वांनीं उपलब्ध करून दिलेल्या टीका-वाङ्मयामुळें आजचा अभ्यासक, कालच्या अभ्यासकाहून खासच अधिक माहितगार होत आहे. अभ्यासक या नात्यानें मी स्वतःहि, या मंडळींचा ऋणी आहें. तथापि हें ऋण मान्य करूनहि मला असें म्हणावेंसें वाटतें कीं, साक्षात् हाडाचा कवि काव्यासंबंधीं जेव्हां बोलतो तेव्हांची मौज कांहीं वेगळी असते ! रवींद्रनाथांनीं वाल्मिकीसंबंधीं अगर कालिदासासंबंधीं लिहिल्यास, जें टीका-काव्य निर्माण होतें, तें कांहीं वेगळेंच असतें ! जेव्हां आमच्याकडील कांहीं मंडळी, शिवरामपंत परांजप्यांच्या 'प्रणयिनीचा मनोभंग' व 'भासाची भवितव्यता' यासारख्या उत्प्रेक्षाप्रधान पण उथळ लिखाणाला, या काव्यरूप टीकेच्या (Creative Criticism) वर्गांत घालतात, तेव्हां मला परम खेद

होतो. पण अनेक शतकें संस्कृत अलंकारशास्त्राला महत्त्व दिल्यावर असा मूल्य-संकर झाला नाहीं तरच नवल !

या काव्यमय टीकेची माधुरी मराठींतील कांहीं कवि नसलेल्या टीकाकारांनींहि दिलेली नाहीं असें नाहीं. पण कवींनीं मराठी टीकावाङ्मयांत घातलेल्या बहुमोल भरीचें स्मरण करतांना, मला कविवर्य भास्करराव तांबे यांच्या उदात्त कला-मीमांसेचें स्मरण प्रथम होतें. भास्करराव‌ांच्या भावनकशी कलापूजनाला तुलना रवींद्रनाथांच्या सौंदर्यपूजनाचीच ! आणि त्यांच्यानंतर, कां कोण जाणें, मला एकदम अनिलांचें स्मरण होतें. आणि त्यानंतर विठ्ठलराव घाटे यांचें स्मरण होतें. ज्यांनीं काव्याकडे अस्सल कवीच्या भूमिकेखेरीज कोणत्याहि भूमिकेनें पाहायचें नाहीं असें ठरविलें, अशा टीकाकारांच्या वर्गांत मी या तिघांनाहि घालतों. माधवराव पटवर्धनहि या काव्यमय रसग्रहणाच्या भूमीवर क्वचित् पाऊल टाकीत; पण त्यांचा दुसरा पाय पांडित्याच्या खुंटाला बांधलेला असे !

व्यक्तिशः मला कांहीं मित्रांनीं, कांहीं सिद्धान्त व संप्रदाय चिकटविण्याचा यत्न केला आहे. जर माझ्या टीका-लेखनांत एखाद्या सिद्धान्ताचें मंडन व अनुसरण, अथवा एखाद्या संप्रदायाचें आग्रहपूर्वक पालन झालें असेल, तर तो मजहून प्रखर मनांचा व मतांचा मजवर तात्पुरता बसलेला पगडा आहे असें समजून माझ्या वाचकांनीं तो विसरून जावा. जिथें मी ग्रंथपांडित्य व सिद्धान्त विसरून, तर्कबुद्धि विसर्जित करून, नम्रभावानें सत्य आणि सौंदर्य यांच्या देदीप्यमान आविष्कारापुढें अवनम्र झालों असेन, तेथेंच माझें स्वतःचें टीकालेखन आहे, असें समजावें. इतर लेखन म्हणजे आजच्या तर्कप्रधान आणि पांडित्यप्रधान युगाचा माझ्या अंगाला लागलेला मळ असें समजावें, अशी माझी नम्र प्रार्थना आहे.

विद्यार्जन ही तर विसाव्या शतकांतील प्राथमिक आवश्यकताच आहे. अवघड गोष्ट ती पुढेंच आहे. सटरफटर विद्यांचा...मग त्या मानसशास्त्र, समाजशास्त्र, यांपासून ते साहित्यशास्त्रापर्यंत कोणत्याहि विद्या असोत ! प्राथमिक उपयोग संपल्या-वर रहस्यप्राप्तीच्या बहुमोल क्षणीं त्यांना निरोप देतां आला पाहिजे. पाठराखणी म्हणून आलेली मैत्रीण मीलनाच्या क्षणींहि लुडबुड करूं लागेल, तर दोन हृदयांचें मीलन होणार कसें ?

अर्थात् टीकाकाराचें कार्य म्हणजे,—प्रथम बहुविध विद्या संपादणें; नंतर हृदयमीलनाच्या क्षणीं तिची अडचण न होईलशी तजवीज करणें; पूज्य पूर्वजांची

आवडती विद्या असली, तरीहि तिचा दुराग्रह चालू न देणें. साहित्य-संगीताचे आलाप बरोबर घेऊन येणारा वारा, अप्रिय अशा पश्चिमेकडून आला तरीहि कानांत प्राण आणून, हृदयाचीं दारें खोलून त्याचें

Make me thy lyre even as the forest is

या वृत्तीनें स्वागत करणें.

* * *

मित्रहो !

असा जटिल विषय आपल्यासारख्या विद्वानांपुढें मांडण्याकरितां आवश्यक असलेली निर्वैधता व शांतता मला गेल्या महिनाभर मिळालेली नव्हती. तरीहि मीं यथाशक्ति तो आतांपर्यंत मांडण्याचा यत्न केला. आपण माझे हे साधेभोळे विचार प्रेमानें ऐकून घेतले, हा मी माझा गौरव मानीत नसून, विषय, प्रसंग व आपलें सौजन्य यांचाच गौरव मानतों, व वन्दनपूर्वक निरोप घेतों.

♥ ♥

अंमळनेर येथील पसतिसाव्या महाराष्ट्र साहित्य सम्मेलनांतील टीकाविभागाच्या अध्यक्षपदावरून केलेलें भाषण : आक्टोबर १९५२

भाषाशुद्धि आणि राष्ट्रभाषा

वाङ्मयप्रेमी बंधु-भगिनींनो,

आपल्या या सुप्रसिद्ध परिषदेच्या चौदाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदीं मजी निवड करून आपण माझा मोठा बहुमान केला आहे, हें तर खरेंच. पण आपल्या या उदार गुणग्राहकतेबद्दल आपले आभार मानण्याच्याहि आधीं माझ्या डोळ्यांपुढें या कामगिरीचा बिकटपणा उभा राहिल्याखेरीज राहात नाहीं. एक तर बडोद्याच्या वाङ्मय-परिषदेचें अध्यक्षपद स्वीकारणें हें इतर कुठल्याहि ठिकाणच्या परिषदेचें अध्यक्षपद पत्करण्याहून एका अर्थी अभिमानास्पद आहे, तसेंच तें बिकटहि आहे. अनेक विद्या व कला यांचें माहेरघर म्हणून बडोद्याचा लौकिक गेलीं पन्नास वर्षें महाराष्ट्र व गुजराथ या दोन प्रांतांतच नव्हे, तर उभ्या हिंदुस्थानांत दुमदुमत आहे. विश्वामित्रीच्या कांठच्या या सुंदर नगरींत भारतांतील दोन सुंदर आणि संपन्न भाषांचा आधींच प्रीतिसंगम झालेला. त्यांतच कै० सयाजीराव महाराजांसारख्या रत्नपारखी अधिपतींची राजवट या शहराच्या

सुदैवानें त्याला दीर्घकाल लाभलेली. त्यामुळें विद्या आणि कला यांच्या विकासाला गेलीं कित्येक वर्षें या शहरांत जेवढी अनुकूलता होती, तेवढी पश्चिम भारतांतील कोणत्याहि एका शहरांत आढळली असती असें वाटत नाहीं. व्यक्तिशः मी श्रीमंत सयाजीराव यांना अर्वाचीन महाराष्ट्रांतील व भारतांतील एक अत्यंत कर्तबगार राज्यकर्ते आणि दूरदर्शी समाजनेते या नात्यानें फार मानीत असल्यानें त्यांच्या हातांनीं वाढलेलें शहर म्हणूनहि मला या नगरीविषयीं आदर व धाक वाटला असता. पण या शहराशीं माझ्या पिढीचे आणि माझ्या रुचीचे लोक इतरहि कारणांनीं निबद्ध आहेत. माझा ज्यांच्याशीं अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आला व जे आपल्या काव्यांनीं महाराष्ट्राच्या भावी काळांतील प्रत्येक तरुण पिढीचे लाडके कवि राहतील, त्या कै० माधवराव पटवर्धनांचें बालपण याच ठिकाणीं व्यतीत झालें. याच राजवटीचे राजकवि, कविवर्य चंद्रशेखर, माधवरावांच्या कोवळ्या काव्यांकुराला प्रेमळ उत्तेजन देते झाले. याच बडोद्यांत त्यांना श्रीपतराव शिंदे, विठ्ठलराव घाटे यांच्यासारखे दिलदार मराठा गडी बाळमित्र म्हणून लाभल्यानें, प्रेमाच्या संजीवक सामर्थ्यावर त्यांचा अढळ विश्वास बसला; व उत्तरायुष्यांतील अनेक विपरीत अनुभवांनींहि ते अलीकडच्या कित्येक कवींप्रमाणें भावनाद्वेष्टे झाले नाहींत. याच नगरींत अगदीं निकृष्ट नोकरींत रखडणारें कविवर्य चंद्रशेखरांसारखें झांकलें माणिक अचूक नजरेनें हेरून राजकविपदावर भूषविलें गेलें.

या शहरची 'दृष्टी' नजर केवळ वाङ्मयांतच घोटाळत होती असेंहि नाहीं. रियासतकार सरदेसाई यांसारखा इतिहासकार, आपल्या पर्वतप्राय कामाचा पाया इथेंच भरीत होता.

या शहरांत सर्व तऱ्हेच्या गुणांचा आणि कर्तृत्वाचा संग्रह करण्याचा त्याच्या भाग्यविधात्यांनीं जणू विडाच उचललेला होता. कर्तव्यकठोर राज्यकारभाऱ्यापासून ते दुनियेबाबत बेखबर असणाऱ्या धुंद दरबारगवयांपर्यंत, प्रत्येक क्षेत्रांतील निवडक रत्नांचा या नगरीच्या जवाहरखान्यांत संग्रह झालेला होता. **अफ्ताबे मूसीकी** मरहूम फैय्याजखाँ हेहि भारतांतील अनेक राजधान्या सोडून बडोद्यांतच स्थायिक झाले होते. जुम्मादादा, माणिकराव, मुजुमदार यांनीं व्यायामक्षेत्रांत या शहराचें नांव अखिल भारतांत विख्यात केलें आहे.

माझ्या या स्मरणतर्पणांत अनुक्रम गुणाधिक्याचा नसून वैयक्तिक आकर्षणाचाच आहे, हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. पण मला हें मात्र सांगितलें पाहिजे

कीं, या शहराच्या या दीर्घकालीन गुणपूजनांत जर कोणत्या एका निमित्तानें त्याचें नांव देशोदेशीं शतकानुशतकें घेतलें जाणार असेल, तर तें श्रीअरविंदांच्या येथील निवासाच्या निमित्तानें ! श्रीअरविंद अर्धशतकामागें या शहरांत रेव्हिन्यू ऑफिसर म्हणून, अगर प्रोफेसर म्हणून, सामान्य माणसाप्रमाणें रस्त्यांतून जातांना, अनेक वर्षें नजरेस पडत होते, या गोष्टीचा हेवा देशोदेशींचे अरविंदभक्त यापुढें अनेक शतकें करीत राहतील यांत मला शंका नाहीं.

या शहराची ही गुणपूजनपरंपरा माझ्या डोळ्यांपुढें उभी राहते, म्हणून तर मला येथें एका मोठ्या विद्वत्परिषदेचा अध्यक्ष म्हणून उभें राहण्यास विशेषच संकोच वाटतो. पण भूतकालाइतकेंच या अध्यक्षपदाला वर्तमानकालाचेंहि भय व दडपण वाटणें साहजिकच आहे. आज आपल्या इतिहास-प्रसिद्ध देशांत प्रत्येक क्षेत्रांत तपासणी आणि उलथापालथ सुरू आहे. एका देशाचे दोन देश झाले आहेत. राज्येंच्या राज्यें होत्यांचीं नव्हतीं झालीं आहेत,....होत आहेत. लष्करापासून ते विद्यापीठापर्यंत, आणि भाषेपासून ते समाजसंबंधांपर्यंत सर्वत्र पुनर्घटना चालू आहे. अशा या क्रान्तीच्या काळांत वाङ्मयपरिषदेच्या निमित्तानें एकत्र येणाऱ्या एकभाषी बंधुभगिनींच्या मनांतहि केवळ काव्यानंदमीमांसेचेच प्रश्न घोळत असतील, असें मला वाटत नाहीं. भाषेच्या अस्तित्वापासून ते वाङ्मयाच्या विकासापर्यंत, आणि शब्दांच्या अर्थापासून ते कलेच्या निकषापर्यंत, आज सर्वच गोष्टी 'प्रश्नां'च्या सदरांत जाऊन पडल्या आहेत. शिवाय वाङ्मयाचें क्षेत्र हें एक असें क्षेत्र आहे कीं, ज्यांत 'अनधिकारी' कोणीच नाहीं ! लेखक, टीकाकार आणि भाषाकोविदच काय ते भाषेचे प्रश्न सोडवीत आहेत, असें नाहीं. वाचक, वृत्तपत्रकार, इतिहाससंशोधक, अभ्यासक्रम ठरविणारे कुलगुरु आणि सरहद्दी ठरविणारे पुढारी हे सर्वच भाषेच्या प्रश्नांत निरंकुशपणें हात घालीत आहेत. उत्तर सुचविणारांची संख्या बेसुमार वाढली कीं, त्याचा पहिला परिणाम म्हणजे खरे प्रश्न कोणते आहेत हेंच कळेनासें होणें हा होय ! मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रांत आज असेंच झालें आहे.

आपल्यासारखे वाङ्मयसेवक एकत्र जमल्यावर त्यानीं आपली दृष्टि कुठें स्थिर करावी ? जुन्या ग्रंथांच्या संशोधनावर कीं, तात्त्विक काव्यमीमांसेवर, कीं नव-वाङ्मयप्रकारावर ? स्थलभेदानुसार, अगर व्यक्तिभेदानुसार, प्रत्येक सम्मेलनांत निराळाच सूर लागलेला आपणांस ऐकूं येईल; आणि अखेर या सर्व अनवस्थेमुळें

चावरून जाऊन, कांहीं व्यवहारी वृत्तीचे----अथवा वास्तववादी म्हणा हवे तर---- विचाराग्रणी, अशा भाषिक सम्मेलनांना जबरदस्तीनें राजकारणाच्या रुळावर ढकलतांना दिसतील. महानुभाव-वाङ्मयापासून ते रससिद्धान्तापर्यंत सर्वच 'अप्रस्तुत' व 'अनुपयुक्त' वाटल्यामुळें, ते भाषेवरील (म्हणजेच सरहद्दीवरील !) आक्रमणाचा विषय काढतात ! अथवा मार्क्सवादी अगर गांधीवादी वाङ्मयाची आवश्यकता प्रतिपादून आपल्या आवडत्या पक्षाच्या प्रचाराची सोय करतात.

व्यक्तिशः मी वाङ्मयाचा आस्वाद व पुरस्कार हेंच वाङ्मयपरिषदांचें मुख्य कार्य असें समजतों. तसेंच वाङ्मयपरिषदांच्या दृष्टीनें 'वाङ्मय' म्हणजे ललित वाङ्मयच, असेंहि मीं अनेकवार प्रतिपादिलें आहे. या दृष्टीनें पाहतां ज्या क्षेत्राशीं माझा स्वतःचा निकटचा संबंध आहे, तें म्हणजे टीकावाङ्मयाचें क्षेत्रहि, दुय्यम क्षेत्र होय, व या अर्थानें मी स्वतःला दुय्यम क्षेत्रांत काम करणारा साहित्यिक समजतों, हेंहि मीं पूर्वी एका रेडिओ व्याख्यानमालेच्या प्रसंगीं स्पष्ट सांगितलेलें आहे; व या गौणप्रधानभावाप्रमाणें पाहतां, भाषाशास्त्राचा आणि व्याकरणाचा तर अशा परिषदांशीं त्याहूनहि अप्रत्यक्ष व दूरचा संबंध आहे असें मी मानतों; आणि मराठी-कानडी जिल्ह्यांच्या अगर मराठी-गुजराथी जिल्ह्यांच्या सरहद्दीचे तंटे तोडणें हें काम तर साहित्यिकांचें नसून कायदेमंडळांतील सभासदांचें आहे, असें माझें स्पष्ट मत आहे. तथापि ज्या ललित वाङ्मयाच्या आणि विशेषतः काव्याच्या, सौंदर्य-परीक्षेला मी अग्रस्थान देतों, तिला आजच्या माझ्या भाषणांत मात्र मला अग्रस्थान द्यावेसें वाटत नाहीं. आज मलाहि इतर वाङ्मयसेवकांप्रमाणें भाषेवरील आक्रमणाचाच प्रश्न अधिक अस्वस्थ करून सोडीत आहे, हें प्रथमच सांगून टाकलें पाहिजे.

पण मला त्रस्त करणारें आक्रमण तालुक्याच्या सरहद्दीवरील स्थूल आक्रमण नसून शब्दांच्या, वाक्प्रचारांच्या आणि वाक्यरचनेच्या अंगाशीं अविनीत अतिप्रसंग करणारें सूक्ष्म आणि अन्तर्गत अतिक्रमण होय. या दृष्टीनें पाहतां मी आज मराठी भाषेच्या अस्तित्वाचाच प्रश्न प्रथम विचारार्थ आपल्यापुढें मांडणार आहें असें म्हटलें तरी चालेल.

या प्रश्नाचा विचार इतिहासाचार्य राजवाडे, ज्ञानकोशकार केतकर, देशभक्त सावरकर आणि प्रा. माधवराव पटवर्धन यांनीं आपल्या दृष्टीनें १९२५ साला-

पासून पुढें अनेक प्रसंगीं मोठ्या आवेशानें आणि पांडित्यानें प्रतिपादिला आहे. या विद्वानांनीं भाषेच्या आणि समाजाच्या स्थितीचें मंथन करून काढलेले सिद्धान्त गेलीं पंचवीस वर्षें अनेक लेखकांच्या लेखांचे आणि अध्यक्षांच्या भाषणाचे जणू आधारस्तंभ बनलेले आहेत. कोर्टकचेऱ्या, टपाल, रेल्वेप्रवास वगैरेंचे व्यवहार आपण इंग्रजींतून करतों, एवढेंच नव्हे तर खाजगी पत्रेंहि इंग्रजींतून लिहितों. त्या अर्थी आपली भाषा मरणार असा राजवाड्यांचा अशुभ अंदाज होता. भाषेंतील व्यवहाराचें क्षेत्र वाढण्याकरितां, स्वराज्य व स्वातंत्र्य मिळवणें हाच एक इलाज आहे, यावर राजवाडे व केतकर यांचें एकमत होतें. इंग्रजी शब्दांवर बहिष्कार घालणें, रूढ अरबी-फारसी शब्द खणून काढणें व या द्विविध बहिष्काराकरितां सामग्री म्हणून लागतील तेवढे संस्कृत शब्द तयार करणें हा सावरकर—पटवर्धनांचा कार्यक्रम होता.

या चार असामान्य बुद्धीच्या आणि नेटाच्या देशभक्तांनीं केलेलें रोगनिदान आणि औषधयोजना सशास्त्र कीं अशास्त्र, उपयोगी कीं निरुपयोगी हें ठरविण्याला आतां भरपूर साधनें उपलब्ध आहेत. इंग्रजी शिक्षणच नव्हे तर परदेशी पदव्याहि मिळवून आल्यानंतर नैष्ठिकपणें मराठींतून पत्रव्यवहार करणारे अनेक विद्वान् आज दिसत आहेत. कांहीं तर केंब्रिज् येथील पदवी लावून मोडींतून पत्रव्यवहार करतात आणि अशा प्रकरणीं आपल्याहून कमी दक्ष असलेल्या लोकांना खजील करतात. कित्येक संस्था आज आपला कारभार मराठींतूनच करीत आहेत, व कायदेमंडळांतहि मराठींतून भाषणें करणारे नामदार आहेत. पण सर्वांत महत्त्वाची आणि पूर्वीच्या विद्वानांना सर्वांत लांबची वाटणारी गोष्ट जी राजकीय स्वतंत्रता, तीहि आज हस्तगत झालेली आहे. इंग्रजी व फारसी शब्दांच्या उच्चाटनाकरितां जन्माला घातलेल्या शुद्ध संस्कृत शब्दांची संख्या तर आज हजारांनीं मोजावी लागेल. राजवाड्यांपासून पटवर्धनांपर्यंत विद्वानांना ज्या आपत्तीची भीति वाटत होती, ती जरी एका दिवसांत टळणारी नसली, तरी ती आतां बरीच दूर गेलेली असेल असें मानण्यास वरील परिस्थितींत खूपच जागा आहे; व म्हणूनच पंचवीस वर्षांपूर्वी मराठी भाषेचें मुख दिसत होतें, त्याहून तें आज थोडें कमी मलिन दिसत असणार अशी आशा केल्यास, ती वावगी होणार नाहीं. पण वस्तुस्थिति तशीच आहे का?—तोच प्रश्न तर मीं विवेचनाकरतां प्रथम घेतलेला आहे.

पण आजची स्थिति तपासण्यापूर्वी पूर्वीच्या सांस्कृतिक पुढाऱ्यांनीं केलेलें रोगनिदान अचूक होतें किंवा कसें, हें पाहिलें पाहिजे.

इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारानंतर सुशिक्षितांच्या खाजगी व्यवहारांत इंग्रजी शब्दांचा व भाषेचा बराच भर असला, तरी मुसल्मानी अमदानींत व मराठेशाहींत, लिखित गद्यांत जसे परकीय राज्यकर्त्यांच्या भाषेंतील शब्द बेसुमार शिरले तसे ते इंग्रजी अमलांत शिरले नाहींत. इंग्रजींत खाजगी पत्रव्यवहार करणारे चिपळूणकर–टिळक हे वाङ्मयांत अत्यंत शुद्ध मराठी लिहीत. टिळक अत्यंत शुद्ध व सुगम मराठींत वक्तृत्वहि करीत. त्यांच्या खाजगी संभाषणांतील आणि पत्रव्यवहारांतील इंग्रजी, आज केवळ मनोरंजक आठवणीपुरतेंच शिल्लक आहे. अर्थात् त्यासंबंधीं राजवाडे व सावरकर यांच्यासारख्यांनीं केलेला गवगवा, मराठी भाषेच्या स्थैर्याच्या दृष्टीनें सर्वस्वीं अप्रस्तुत होता हें उघड आहे. याउलट आजच्या पिढींतील कित्येक प्रसिद्ध साहित्यिक व विद्वान् 'व्रत' म्हणून मराठींतून पत्रव्यवहार करतात, एवढ्यावरून त्यांच्या लेखनांतील मराठी भाषा अधिक शुद्ध असेल, अशी अपेक्षा करणेंहि बरोबर ठरणार नाहीं. कै. राजवाडे यांनीं पुण्याच्या 'नूतन मराठी विद्यालय हायस्कूल(?)' च्या पंचवीस वर्षांपूर्वीच्या निमंत्रण–पत्रिकेंतील एकूण सत्याऐंशी शब्दांपैकीं अठ्ठावन्न इंग्रजी शब्द मोजून दाखविले होते. अर्थात् या चिपळूणकराभिमानी संस्थेनें 'विद्यालय हायस्कूल' या शब्दप्रयोगापासूनच हास्यास्पद भ्रष्टाकाराला सुरुवात केली आहे, हें मलाहि मान्य आहे. पण आज एकहि इंग्रजी शब्द न वापरतां पत्रव्यवहार करणारे तरुण साहित्यिक जेव्हां पत्राच्या पत्त्यावर कित्येकदा––

'प्रति–

प्राध्यापक क्षीरसागर'

यासारखें 'शुद्ध' मराठी लिहितात, तेव्हां मला $\frac{5}{6}$ इंग्रजी शब्द असलेली निमंत्रण-पत्रिका येण्याहूनहि अधिक दुःख होतें! सारांश, "व्यक्ति व संस्था यांचा व्यवहार मराठींतूनच चालला आहे ना? मग भाषेची 'तब्येत' ठीक आहे." असें म्हणण्यांत मोठीच चूक होत आहे व या चुकीचें मूळ राजवाडे, सावरकर, पटवर्धन यांच्या शाब्दिक शुद्धीच्या आग्रहांत आहे.

भाषा जिवन्त व वाढती राखण्याचा आणखी एक इलाज म्हणजे स्वातंत्र्यसंपादन. या बाबतींत कोणाचेंच दुमत नाहीं. पण आज जगाचा व्यवहार इतका गुंता-

गुंतीचा झाला आहे कीं, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरहि, आणि आपले व्यवहार आपल्या भाषेंत चालविण्याचें ठरविल्यावरहि, भाषेची शुद्धता राखण्याकरितां त्याखेरीज इतर कांहीं करण्याची गरज नाहीं अशी कल्पना असेल, तर ती चूक आहे; व आज अनुभव तोच येत आहे.

आज बरेच राष्ट्रीय, राजकीय व सामाजिक व्यवहार देशी भाषांतून चालत आहेत. (आजहि सर्वच तसे चालत आहेत असें नाहीं; पण याचा अर्थच हा कीं, हे व्यवहार इंग्रजींतून चालण्याचा आणि इंग्रजी राज्याचा तितकासा संबंध नव्हता) व या दृष्टीनें पाहतां, राजवाडे, केतकर, पोतदार यांना हवा असलेला भाषिक व्यवहाराचा विस्तार आज अंशतः तरी झालेला आहे. केतकरांना हवें असलेलें बहुजन-समाजाचें शिक्षणहि आज वाढीला लागलें आहे. ज्यांना ज्ञानाची व वाङ्मयानंदाची भूक मराठीखेरीज अन्य भाषांतून भागवितां येत नाहीं असा बहुजनवर्गीय वाचकवर्गहि आज वाढलेला आहे. वाचकांची मागणी पाहून लिहिणारे लेखकहि, केतकरांच्या इच्छेनुरूप वाढत आहेत; आणि तरीहि आज मराठी भाषा राजवाडे-केतकरांच्या वेळेहूनहि मरणाच्या अधिक सन्निध आहे, असें मला वाटतें.

राजवाडे यांनीं मराठी भाषेला चार 'महारोग' लागल्याचें निदान केलें होतें व त्यांचें निवारण केल्याखेरीज तिचा मृत्यु टळत नाहीं असें म्हटलें होतें. मला स्वतःला राजवाडे यांनीं वापरलेला अभद्र शब्द मान्य नाहीं. तथापि त्या शब्दानें नकळत मराठीची भावी विकृति सूचित केली होती, हें खास! कारण महारोगाचा संबंध मरणाहून विद्रूपतेशीं आणि विच्छिन्नतेशींच अधिक असतो. आज मराठी भाषेला जर कशाची भीति असेल तर ती मरणापेक्षां विद्रूपतेची आणि दुर्बलतेचीच अधिक आहे.

आणि दुर्दैवाचा निष्ठुर खेळ तो हा कीं, तिच्या व्यवहाराचा आणि वाङ्मयाचा विकास हेंच तिच्या विद्रूप विकृतीचें कारण ठरत आहे! माझ्या या निराशेच्या सुराचा अर्थ समजावून घ्यायचा असेल, तर मासिकांची वाढती संख्या, ग्रंथांची तिरंगी वेष्टनें, वृत्तपत्रांचा प्रचंड खप आणि नवीन शब्दांची अखंड टांकसाळ एवढ्या बाह्य आणि संख्यात्मक पैदाशीकडे पाहून चालणार नाहीं. या सर्व भरपूर पिकांत निकोप वाढीचीं बीजें किती, आणि क्षयाचीं बीजें किती याचा विचार होणें जरूर आहे.

मराठी शब्दांच्या लेखनांत, उपयोगांत व नवनिर्मितींत आज अज्ञान, बेजबाबदारपणा, आणि अशुद्धता यांचें जें निरंकुश राज्य दिसून येतें, त्याकडे पाहिलें, म्हणजे केवळ परकीय राज्यकर्त्यांच्या भाषेंतील शब्द टाळणें आणि स्वभाषेंतील व्यवहाराचें क्षेत्र वाढविणें, हे उपाय पुरेसे नाहींत हें दिसून येईल. मी अलीकडे लेखांत, व्याख्यानांत, साहित्यसम्मेलनांत या बेबंद राज्याच्या ज्या एकाच प्रांताचा उल्लेख पुनः पुनः केला होता, तो प्रांत म्हणजे वृत्तपत्रांचा. वृत्तपत्रांत घाईमुळें आणि नावीन्यप्रेमामुळें दररोज शेंकडों प्रकारच्या चुका होतात; तसेंच इतर कुठल्याहि वाङ्मयापेक्षां वृत्तपत्रांचें वाचन सर्व वर्गांच्या लोकांकडून नियमानें होत असल्यानें, त्या चुकांचा प्रसार अधिक होतो, हा माझ्या अलीकडच्या प्रतिपादनाचा रोख होता. अलीकडे पुण्या-मुंबईच्या दैनिकांत एक वार्ता प्रसिद्ध झाली आहे. एका विवाहित स्त्रीचा ताबा मागण्यासंबंधींच्या सोलापूरच्या खटल्याची ती वार्ता आहे. तिजमध्यें पुढील शब्दप्रयोग आहे : " आणि **उर्वरित तरुणीस** पोलिसांनीं ज्या ठिकाणाहून नेलें त्या ठिकाणीं आणून पतीच्या स्वाधीन करावें." या वार्तेंतील बाकीचे शब्द कदाचित् मागेंपुढें झाले असतील, पण ' उर्वरित तरुणीस ' हे शब्द त्यांत होते हे खास. ' उर्वरित ' हा शब्द त्या ठिकाणीं ' उपरिनिर्दिष्ट ' या अर्थी त्या सोलापूरकर बातमीदारानेंच वापरला असेल, किंवा मुंबईच्या कचेरींतील उपसंपादकानें " And the said lady..... " या तारेंतील शब्दांचें प्रौढ मराठीकरण करण्याचा यत्न केला असेल ! त्याच सुमारास पुण्याच्या एका साप्ताहिकांत ' अन्तर्मुख जीवन ' या ऐवजीं ' अन्तर्भूत जीवन ' असा शब्दप्रयोग एका संपूर्ण लेखांत अनेकदा केला होता. घाईत असलेल्या आमच्या तरुण लेखकांना हे अवजड शब्द पेलत तरी नसावेत, नाहीं तर ' एकेका शब्दाकडे इतकें निरखून पाहणें हें रिकामटेकड्या साहित्यिकांचें काम होय,—आम्हां पराक्रमी राजकीय चळवळ्यांचें काम नव्हे ' अशी तरी त्यांनीं भूमिका घेतली असली पाहिजे.

आजकालच्या वृत्तपत्रांतील अशुद्ध अगर अर्थशून्य शब्दांसंबंधीं मी जेव्हां हाकाटी करतों, तेव्हां माझी तक्रार केवळ व्याकरणशुद्धतेची असते असें नाहीं; – केवळ राजकीय बहिष्काराची तर ती दृष्टि नसतेच. माझी हांकाटी अर्थशून्य आणि बोजड शब्द वापरण्याच्या बौद्धिक विकृतीसंबंधीं आहे. बोजड शब्द शुद्ध स्वरूपांत वापरले तरीहि मी ती एक आपत्ति समजतों. कारण भाषा तुम्ही जितकी कृत्रिम आणि

अनुभाषाशुद्धि आणि राष्ट्रभाषा वि: ..... दि. ..... अंक ..... नों. दि. .....

पंडिती बनवाल, तितकी बहुजनसमाजापासून दूर जाईल; इतकंच नव्हे, तर मूळच्या निकोप प्रकृतीलाहि मुकेल. गेल्या पंचवीस वर्षांत—म्हणजेच भाषाशुद्धीच्या आग्रहामुळें अनधिकारी व्यक्तींनाहि शब्दनिर्मितीची सनद मिळाल्यापासून—मराठी शब्दसंग्रहांत फार मोठी भर पडली आहे, व या दृष्टीनें पाहतां भाषेची वाढ झाली आहे. पण शब्दांचीं शुद्ध रूपें, शुद्ध उच्चार यांची हानि झाली आहे; आणि वापरलेले शब्द ज्यांना समजतात, अशा वाचकांची संख्या कमी झालेली आहे. शब्दांची संख्या वाढली आणि भाषेची सुबोधता कमी झाली, तर भाषेंत वाढ झाली असें मी म्हणूं शकत नाहीं. पूर्वीच्या वृत्तपत्रांत एका वर्षांत वीस नवीन बनविलेले शब्द वापरावे लागत असले, आणि आजच्या वृत्तपत्रांत एका दिवसांत वीस नवीन शब्द बनविले जात असले, तर आजचीं वृत्तपत्रें एका अर्थानें भाषेंत भर घालीत आहेत असें म्हणतां आलें असतें. पण पूर्वीच्या शब्दांपैकीं जर शेंकडा नव्वद शब्द सामान्य वाचकांच्या परिचयाचे असतील, आणि आजच्या शब्दांपैकीं शेंकडा साठ शब्द अपरिचित व अशुद्ध असतील, तर ती भर आहे असें म्हणणें कठीण जाईल. सिनेमाच्या क्षुल्लक वार्तासंग्रहांत 'एकमेव चित्रवितरक' (Sole distributor) यांसारखे जाडजूड शब्द असले, तर ते केवळ शास्त्रज्ञांकरितां अगर पंडितांकरितां आहेत असें समर्थन खासच करतां येणार नाहीं. 'यौद्धिक', 'सामरिक', 'नौदल', 'सांसदिक', 'विधेयक', 'अवैध', 'दग्धभू धोरण' यांसारखे शब्द दैनिकांच्या रात्रपाळींत पेंगतां पेंगतां वापरावे व बनवावेहि लागत आहेत, व सकाळीं चहाबरोबर पडल्या पडल्या वाचले जात आहेत. नवीन शब्द बनविणें—आणि तेहि प्रगल्भ पाश्चात्त्य भाषांतील शब्दांना प्रतिशब्द म्हणून बनविणें ही इतकी सोपी अगर क्षुल्लक गोष्ट खास नाहीं कीं, जी तरुण उपसंपादकांना पेंगतां पेंगतां करतां यावी! किंबहुना ती केवळ पंडितांनीं कोश हाताशीं घेऊन करण्याचीहि गोष्ट नव्हे. स्वभाषेच्या प्रकृतीचें सूक्ष्म ज्ञान, ज्या परभाषेंतील शब्दांचें भाषांतर करायचें तिचें सूक्ष्म ज्ञान, वाचकांना सुबोध अर्थप्रतीति करून देण्याची तळमळ, व योग्य स्थळीं योग्य शब्द सुचण्याइतपत भाषाप्रभुत्व, इतक्या गोष्टी एकत्र असतील, तरच स्वभाषेची विटंबना आणि सामान्य वाचकांचे हाल न करतां, नवे शब्द योजतां येतील. आज 'अद्यावत्', 'नेत्रदीपक', 'उपभारतमंत्री' यांसारखे अशुद्ध व अर्थशून्य शब्द शेंकड्यांनीं बाहेर पडत आहेत; व

'इंग्रजी शब्द मराठींत वापरून ती भ्रष्ट होण्याचा प्रसंग टळला' एवढ्या आनंदाप्रीत्यर्थ ते खपवून घेतले जात आहेत.

'अपटुडेट्' हा इंग्रजी शब्द टाळण्याचें सत्कृत्य साधतें म्हणून, व शिवाय सावरकरांसारख्या थोर देशभक्तानें व प्रतिभावन्त साहित्यिकानें तयार केलेला शब्द वापरायचा म्हणून, मराठी वृत्तपत्रांनीं 'अद्यावत्' हा शब्द सुमारें वीस वर्षें वापरला. अखेर सावरकरांच्या एका उताऱ्यांतून मुंबई विद्यापीठाच्या पाठ्यपुस्तकांत तो शब्द छापण्याची वेळ आली व मग कंसांत 'अद्ययावत्' हें शुद्ध रूप देणें भाग पडलें!

मराठी भाषा वापरांतून जाऊन आपण गोव्यांतील, सीलोनमधील अगर फिजी बेटांतील अशिक्षितांच्या भाषेसारखी भ्रष्ट इंग्रजीमिश्रित भाषा बोलूं लागणार, अशी राजवाड्यांना भीति पडली होती. सुशिक्षितांचें काम इंग्रजी ग्रंथ व वृत्तपत्रें यांवर भागत असल्यामुळें मराठी वाङ्मयाचाच ग्रंथ आटोपेल, अशी केतकरांना भीति पडली होती. पण या दोन्ही भीति आज खोट्या ठरल्या आहेत. ज्यांत एकहि इंग्रजी शब्द नाहीं, असें वाङ्मय आजहि निर्माण होत आहे. पण तें वाङ्मय जर वर निर्देशिलेल्या भ्रष्ट व दुर्बोध शब्दसंग्रहानें भरलेलें असेल तर ती भाषेची वाढ अगर शुद्धता म्हणण्याला मी तयार नाहीं; इतकेंच नव्हे तर अशा विद्रूप शब्दांनीं बनलेल्या मराठीला मी मराठीहि म्हणण्यास तयार नाहीं.

प्रत्येक इंग्रजी शब्दाला मराठी प्रतिशब्द बनविण्याचा हट्ट सोडला पाहिजे; दीर्घकाल रूढ असलेल्या फारसी शब्दांना पंडिती संस्कृत प्रतिशब्द बनविणें बंद केलें पाहिजे; सोपेपणाखातर क्वचित् इंग्रजी शब्दहि घेतले पाहिजेत; हायकोर्ट, कौन्सिल, स्टेशन यांसारखे शब्द अशिक्षितापर्यंत पोंचले आहेत, त्यांचें बोजड भाषांतर करण्याचें बंद केलें पाहिजे. क्वचित् प्रतिशब्दाचा नाद सोडून कल्पनाविस्तारहि केला पाहिजे. De-mobilization (कीं De-militarization ?) चें भाषान्तर 'निर्लष्करीकरण' असें केलेलें मीं अनेक ठिकाणीं (केसरींतहि!) वाचलें आहे! अशा ठिकाणीं मूळ इंग्रजी शब्दच बोजड आहे हें लक्षांत घेऊन 'नामाला नाम' तयार करण्याचा नाद सोडावा; व चारदोन शब्दांत अर्थ सांगावा. पण प्रत्येक इंग्रजी शब्दाला प्रतिशब्द बनविण्याचा हव्यास आणि अनधिकारी व्यक्तींनाहि शब्द तयार करण्याची मिळालेली मुभा, एवढेंच या रोगाचें मूळ

नाहीं. हिंदी, बंगाली, गुजराथी या भगिनी-भाषांतील शब्द मराठींत वापरून सर्व भारतीय भाषांचें ऐक्य साधायचें, ही भूमिकाहि आज मोकाट सुटलेल्या पंडिती शब्दनिर्मितीच्या बुडाशीं आहे. 'कादंबरी' हा सुंदर शब्द टाकून 'उपन्यास' वापरणें; 'आपला' हा आपला शब्द टाकून 'भवदीय' किंवा 'सेवेंत' हा शब्द पत्राच्या खालीं वापरणें; 'नामांकित' हा कर्णमधुर आणि इतिहास-प्रसिद्ध शब्द एकदाहि न वापरतां ख्यातनाम अगर स्वनामधन्य हे शब्द वापरणें, या सर्व प्रकारच्या मुळाशीं हीच प्रवृत्ति आहे. आज प्रत्येक जण प्रांतिक भाषांचें ऐक्य करण्याच्या जाणिवेनेंच, मूळचे परिचित शब्द टाकून हे अपरिचित व बोजड शब्द वापरीत आहे असें नव्हे; कांहीं जण केवळ अनुकरण म्हणूनहि ते वापरीत आहेत! पण मूळ प्रारंभ करणारांनीं मात्र सर्व देशाला एक भाषा उपलब्ध करून देण्याची चतुर योजना म्हणूनच हे शब्द पत्करले. उत्तरदायित्व, हार्दिक, साहित्यिक, हे शब्द या प्रवृत्तीमुळेंच अन्य प्रांतिक भाषांतून उचलण्यांत आले आहेत.

पण यांत केवळ कांहीं बोजड शब्दांची भर पडत आहे हाच काय तो तोटा नाहीं. मराठींतील रूढ शब्द-प्रयोगांची या चळवळींत उघड उघड पायमल्ली होत आहे. 'केसरी'सारख्या दीर्घ परंपरेच्या पत्रानें हिंदीच्या अनुकरणानें 'स्वर्गीय मालवीयजी' किंवा 'स्वर्गीय गांधीजी' असा प्रयोग करणें म्हणजे भाषेविरुद्ध गुन्हा आहे. मराठींत स्वर्गीय याचा अर्थ 'स्वर्गस्थ' असा नाहीं; आणि स्वर्गस्थ या शब्दाला कैलासवासी, वैकुंठवासी व परलोकवासी हे तीन शब्द अनेक पिढ्या रूढ आहेत.

दुसरा 'श्रीमती' शब्द घ्या. गंगाभागीरथी या शब्दानें केशवपनाचें दुष्ट स्मरण होऊन रानड्यांच्या पिढींतील सुधारकांच्या दाक्षिण्याला असह्य वेदना होऊं लागल्या; व म्हणून विधवा स्त्रियांच्या नांवामागें 'श्रीमती' हें उपपद घालावयाचें ठरलें. सधवा स्त्रियांच्या नांवामागें तर 'सौभाग्यवती' हें कर्णमधुर व मंगल विशेषण महाराष्ट्रांत अनेक शतकें रूढ आहे. पण आज भाषेचें ऐक्य करण्याच्या नांवाखालीं हें विधवांच्या मागील उपपद, सधवांच्या मागें लागत आहे! मतीस कोटी प्रजेला एकभाषेचें सौभाग्य केव्हां लाभेल तेव्हां लाभो! आज हा दोन सौभाग्यवतीच्या सौभाग्यावर मात्र भाषेच्या क्षेत्रांत घाला आहे खरा! 'श्रीयुत' या मामुली मायन्यांतील उपपदाऐवजीं नुसतें 'श्री' हें पूज्यभावदर्शक

उपपद वापरण्याचा प्रमादहि हिंदीच आहे! (उदा० श्रीगजानन, श्रीअरविंद याबरोबरच श्रीनेहरू, श्रीगाडगीळ असें म्हणणें!)

बहुजनसमाज आज अधिकाधिक वाचूं लागला आहे. त्यानें वाचण्यासारखे शेंकडों सुबोध, ज्ञानवर्धक, आनंदवर्धक ग्रंथ मराठींत उपलब्ध आहेत. पण तुकारामाचे अभंग, रामदासांचा दासबोध, चिटणिशी बखरी, टिळक-आगरकरांचे लेख, हरिभाऊंच्या कादंबऱ्या, केळूसकरांचें शिवाजीचरित्र, चिंतामणराव वैद्यांचें कृष्णचरित्र यांसारखीं सर्वमान्य आणि सुबोध मराठी पुस्तकें वाचून सुसंस्कृत होऊं पाहणारा वाचकवर्ग, जेव्हां आजचें वाङ्मय हातीं घेतो, तेव्हां राष्ट्रभाषा निर्माण करण्याच्या धांदलींत त्याला स्वभाषेंतील सौभाग्यवतीची 'श्रीमती' झालेली आढळते; आणि तिचें 'स्वर्गीय' सौंदर्य म्हणजे 'मेलेलें' सौंदर्य कीं काय अशी शंका पडते!

आणि इतर बाबतींत राजवाड्यांचे अंदाज कितीहि चुकले असले, तरी एवढ्या बाबतींत मात्र त्यांनीं योग्य इशारा दिलेला होता हें कबूल केलें पाहिजे. बलुचिस्तानपासून मलायापर्यंत, आणि बुखाऱ्यापासून कोलंबोपर्यंत, जेवढे देश इंग्रज जिंकतील तेवढ्या सगळ्यांची एकभाषा करण्याची 'महंमद तघलकी' योजना करूं नका, असा इशारा त्यांनीं दिलेला होता. आज आपण त्यांचा इशारा विसरून तोच खुळेपणा करीत आहों.

आपण रेडिओ लावून बसलों, तर आपणांला हिंदी, गुजराथी, बंगाली बातम्या व भाषणें तर समजतातच, पण तेलगू-कानडी वार्ताहि स्थूलमानानें ध्यानांत येतात. पण त्याचें कारण आपलें थोडेंफार संस्कृतचें अध्ययन झालेलें असतें हेंच आहे. परंतु सर्व भाषांचा शब्दसंग्रह एक करायचा म्हटल्यास, बाकीच्या भाषांचें कल्याण होईल, कीं अकल्याण होईल मला माहीत नाहीं; मराठीचें—आणि माझ्या अल्पमतीप्रमाणें—गुजराथीचेंहि अकल्याण होईल. कारण मराठी व गुजराथी यांच्या मानानें हिंदी व बंगाली या भाषा फाजील संस्कृत-प्रचुर व बोजड आहेत. (अलीकडेच बोजड केल्या गेल्या आहेत!) मराठींतहि संस्कृत शब्दांचा भरणा कमी नाहीं; पण ते प्रत्यक्ष व्यवहारांत सहज शिरलेले, अनेक पिढ्या वापरांत असलेले, सुगम असे शब्द आहेत. पण त्याच अर्थाचे आणि त्याहून बोजड असे हिंदी-बंगालींतील शब्द घेऊन अनेक भाषांचें ऐक्य साधण्यांत

बहुजनसमाजाचा व भाषेचा फायदा कितपत आहे, हा मुख्य प्रश्न आहे. या बाबतींत डॉ. केतकर यांनीं एक महत्त्वाचा इशारा देऊन ठेवला आहे. स्वभाषेंत वाङ्मय वाढलें नाहीं, तर इंग्रजी व संस्कृत शिकलेल्या उच्चवर्गीयांचें नुकसान होत नाहीं! कारण ते प्राधान्येंकरून इंग्रजी व संस्कृत यांसारख्या अन्य भाषांवरच पोसलेले असतात. पण ज्यांना सराईतपणें वाचण्याइतपत स्वभाषेचें शिक्षण आत्तांसें कुठें मिळत आहे, त्या मागासलेल्या वर्गांचें आणि स्त्रियांचें मात्र सर्वस्वीं स्वभाषेवरच अवलंबून असल्यानें नुकसान खास होतें. डॉ. केतकरांच्या इशाऱ्यांतील हीच सामाजिक दृष्टि थोडी पुढें नेऊन मी असें म्हणेन कीं, गैरकायदा याऐवजीं 'अवैध' म्हणण्यानें, 'लोकसभा' म्हणण्याऐवजीं 'संसद्' म्हणण्यानें अगर निवडणूक म्हणण्याऐवजीं 'निर्वाचन' म्हणण्यानें, इथें जमलेल्या विद्वानांसारख्यांचें कांहींच नुकसान नसेल; पण लाखों अल्पशिक्षित देशबांधवांचें मात्र खास नुकसान आहे. शिवाय बोजडपणा येऊन भाषेचें कायमचें नुकसान होतें तें वेगळेंच.

पण हा प्रश्न फक्त हिंदी भाषेच्या नजीक जाण्याचा व चार पंडिती शब्द पत्करण्याचाच आहे असेंहि नाहीं. या सर्व सौद्यांत बरेच अशुद्ध आणि अर्थशून्य शब्दहि बिचाऱ्या बालबोध मराठीला (व बहुधा गुजराथीलाहि) गिळावे लागणार आहेत. महाराष्ट्रीय पंडितांची अगर पदवीधरांची तर गोष्टच नको, पण मराठी प्राथमिक शाळेंतील शिक्षकहि 'राजनीतिक' हें अशुद्ध रूप करणार नाहींत; पण पहिल्या दर्जाच्या हिंदी दैनिकांत जाड मथळ्यांत मी हा शब्द रोज वाचीत आहें! आणि "राजनैतिक" असा एकदाहि वाचूं शकलेलों नाहीं. 'महत्त्वपूर्ण परिवर्तन' हे शब्द, हिंदी दैनिकांतील मथळ्यांत 'महत्वपूर्ण परिवर्तन' असे छापलेले आढळतील. (शिवाय तेथें परिवर्तन हा शब्द मराठींतील अर्थाहून वेगळ्याच अर्थानें असेल.) 'घनश्यामदास बिर्ला' यांत 'घनःश्याम' असें विसर्गयुक्त लिहिलेलें असेल. 'शरच्चंद्र' याऐवजीं 'शरश्चंद्र' लिहिलेलें असेल.

हें सर्व हिंदींत शुद्ध कीं अशुद्ध हें ठरविणें माझें काम नाहीं. पण जी एक गोष्ट मी भयावह मानतों, तिजकडे अद्याप वाङ्मय-व्यवसायी लोकांखेरीज इतरांचें कदाचित् लक्ष गेलेंहि नसेल. 'हिंदीच्या जवळ पोहोंचणें म्हणजे एक-राष्ट्रीयत्वाच्या जवळ पोहोंचणें होय' या कल्पनेनें असो, कीं 'भाषा म्हणजे पोरखेळाकरितां मोकळें मैदान' या कल्पनेमुळें असो, पण आज मराठींत

'घनःश्याम', 'शरश्चंद्र' असें शेंकडों वेळां छापलेलें आढळेल; बाजारपेठेंतील रंगीबेरंगी व अवाढव्य पाट्यांवर रंगविलेलेंहि आढळेल!

बहुजनसमाजापर्यंत शिक्षण पोहोंचावें म्हणून संस्कृतच्या अध्ययनाला गौण-स्थान देण्याचा उपक्रम आणि राष्ट्रभाषेच्या नांवाखालीं हिंदीचें अंध अनुकरण करण्याचा उपक्रम हे दोन्ही एकाच वेळीं सुरू व्हावे हा एक अशुभ योगायोगच म्हटला पाहिजे. यांचीं फळें अद्याप सुदैवानें आपल्यापैकीं कित्येकांपर्यंत पोहोंचलीं नसतील; पण मीं जर त्यांतील एकदोन सांगितलीं, तर आपण प्रथम भरपूर हसाल आणि त्यानंतर भाषेच्या भवितव्यासंबंधीं चिंतातुर व्हाल!

शाळांतून अर्धमागधी वगैरेसारख्या पळवाटांचा मिळेल तितका फायदा घेतल्यामुळें, व अखेर सदोष छापलेले व निष्काळजीपणें वापरलेले जाडजूड शब्द भरपूर वाचल्यामुळें, आजचे तरुण किती विद्रूप मराठी लिहीत आहेत, त्याचें एक उदाहरण सांगतों. 'फर्स्ट इयर सायन्स'–मधील एका विद्यार्थ्यानें– 'शिवाजीच्या काळीं महाराष्ट्र-भूमीवर **यौवनांनीं** आक्रमण केलें होतें' असें वाक्य लिहिलेलें मीं वाचलें; तर त्याच्याहि वरच्या वर्गांतील म्हणजे इंटर-सायन्समधील विद्यार्थ्यानें 'ती कॉलेजांतील एक तरुणी होती; तिच्या अंगांत **यवनानें** नुकताच प्रवेश केला होता' असें वाक्य लिहिलें होतें! शब्दनिर्मितीच्या व लिपि-सुधारणेच्या आजच्या अराजकानें तरुण पिढीच्या डोक्यांत असा गोंधळ झाला नाहीं तरच आश्चर्य!

'लेखनशुद्धि ही किरकोळ बाब होय' व वरीलसारख्या चुका फार तर अपक्व लेखकांच्या लिखाणांत आढळणार, असें म्हणून कानाडोळा करणाऱ्यांनीं, भाषेच्या घटनेशींच आज क्षणोक्षणीं केवढा अविनय आचरला जात आहे तें पाहावें. 'पश्चिम बंगाल', अगर 'उत्तर कोरिया' याऐवजीं '**पश्चिमी** बंगाल' व '**उत्तरी** कोरिया' असा प्रयोग भाषा-शुद्धीच्या नांवानें टाहो फोडणारीं हिंदुत्व-निष्ठ पत्रेंहि जाड ठशांत वापरीत आहेत! आणि हें मराठी अशुद्ध आहे, इतकेंच नव्हें तर ती मराठीची विटंबना आहे, असें म्हटल्यास त्या पत्रांस तें समजणारहि नाहीं! कारण 'पश्चिमी' हा शब्द इंग्रजी अगर फारसी असतां, तरच त्यांत कांहीं अशुद्ध! बाकी सर्व पावन होय! व शिवाय हिंदींत असेल तें रूप वापरावयाचें,

एवढेंच या प्रचारवादी लोकांना माहीत असतें ; यालाच आज भाषाभिमान असें मानतात ! व यांतच मराठीचें मरण आहे.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, 'मश्रिकी' आणि 'मग्रिबी' हे रूढ अरबी शब्द टाळण्याकरितां हिंदीनें त्यांचें संस्कृत भाषांतर केलें. 'पूर्व' हा शब्द विशेषण म्हणून हिंदींत रूढ नसल्यानें म्हणा, कीं हिंदीशब्दसाधकांचें संस्कृतचें ज्ञान बेताचेंच असल्यामुळें म्हणा, पण संस्कृतचें रूप फारसीच्या वळणावर तयार करण्यांत आलें, व मश्रिकी बंगालचें 'पूर्वी बंगाल' असें झालें ! हिंदीनें 'मश्रिकी' हा अरबी शब्द टाळण्याचें तरी पुण्य जोडलें; पण 'उत्तरी कोरिया', 'पूर्वी बंगाल' हे शब्द मराठींत वापरणारांनीं काय साधलें ?

हिंदींत 'उनकी पुस्तक' असा स्त्रीलिंगी प्रयोग कां ?–तर फारसींत 'किताब' स्त्रीलिंगी म्हणून. हिंदींत 'बसन्तकी ऋतु आयी' असें कां ? तर अरबींत 'फस्ल' म्हणजे ऋतु हा शब्द स्त्रीलिंगी आहे म्हणून ! फारसी-इंग्रजीवर बहिष्कार आणि हिंदी-बंगालींतून उसनवारी, या दुहेरी कार्यक्रमालाच भाषिक देशाभिमान समजणारांना, या सर्व धेडगुजरी भानगडींत लक्ष घालण्याला वेळ तरी नाहीं, किंवा बारकावा तरी नाहीं ! मी तर थोडें पुढें जाऊन असेंहि म्हणेन कीं, एकदा एखादा शब्द हिंदींतून उचलण्याचें शतकृत्य केलें, कीं नंतर शब्दांच्या उपयोगांत शुद्धता, सूक्ष्मता, वगैरे राखणें जरूर आहे, याची जाणीव या प्रचार-मूढ लोकांना नसते. कपात, कारवाई, समझौता, कार्यवाही, हे शब्द हिंदींत कसे वापरतात व हिंदीचें अनुकरण करणारे लोक तेच शब्द मराठींत कसे वापरतात, याचें संशोधन होणें जरूर आहे. पुण्याच्या एका दैनिकानें गेल्या महिन्यांतच "जनरल् मॅक्आर्थर यांना आपल्या सैन्याच्या लढाऊ वृत्तींत 'कपात' झाल्याचें आढळून आलें" असा 'कपात' शब्दाचा उपयोग केला होता. दुसऱ्यानें 'मलायांतील भारतीय जामात' असा 'जामात' या शब्दाचा उपयोग केला होता. 'बेकायदा' या सर्व-परिचित शब्दाला 'अवैध' हा पंडिती शब्द वापरणारे लोकच दुसऱ्या परिच्छेदांत लगेच 'समाज' याऐवजीं 'जमात' वापरून मोकळे होतात ? कारण कांहीं तरी नवीन आणि हिंदींतल्यासारखें करणें, एवढें एकच सूत्र त्यांस अवगत आहे.

पण यांत पांच अगर पांचशें चुकांचाच केवळ प्रश्न आहे असें नव्हे ; शब्दाच्या अन्वर्थकतेपेक्षां अपरिचिततेला आज अधिक तेजी आहे ? एकीकडून

परकीय शब्दांवर बहिष्कार व दुसरीकडून परप्रांतीय आणि अनोळखी शब्दांचा हव्यास, असें हें दुहेरी वेड लागल्यानें, मेंदू आणि लेखणी यांचा संबंधच तुटल्यासारखा झाला आहे. एका दैनिकानें अलीकडेच उदयशंकर यांच्या मद्रास येथील व्याख्यानाचें वृत्त दिलें होतें. त्यांत म्हटलें होतें, " हिंदी नृत्याचें **पौर्वात्यकरण** केल्यास युरोपचा त्यास विरोध होईल." या वृत्तलेखकास 'पाश्चात्यीकरण' असें Westernization या तारेंतील शब्दाचें भाषांतर करावयाचें होतें, हें उघड आहे, पण एवढे जाड शब्द घाईच्या वेळीं पेलणें या लोकांना इतकें जड जात आहे, कीं पौर्वात्यीकरण आणि पाश्चात्यीकरण दोन्ही शब्द त्यांस सारखेच अवजड, अतएव सारखेच अर्थशून्य वाटत आहेत. आम्ही कॉलेजमध्यें असतां 'पौर्वात्य' शब्दासहि गौण ठरवून त्याऐवजीं पौरस्त्य शब्द घालणें अधिक इष्ट कीं काय यावर चर्चा चालत असे, असें आठवतें. शिवाय 'पौर्वात्यकरण' हें शुद्ध नसून 'पौर्वात्यीकरण' हें शुद्ध होय, हें आजचाहि संस्कृतज्ञ तरुण सांगेल. पण 'पौर्वात्य' आणि 'पाश्चात्य' यांतच गोंधळ करणारें छापील वाङ्मय रोज वाचण्यांत येऊं लागल्यावर पूर्वोक्त व्याकरणदोषांची चर्चाच आटोपली.

हौसेनें दत्तक घेतलेल्या पंडिती शब्दांचे हे हाल असल्यावर कानाकोपऱ्यांतल्या मराठी रूपांची आणि प्रयोगांची चर्चा करण्याला अवसरच नाहीं. 'तांदूळ' याचें विभक्तिरूप करतांना 'दू' चा 'द' होतो, असें व्याकरण सांगतें. 'तांदूळ-तांदळाचा', 'कापूस-कापसाचा', इ. पण भाषेची प्रकृति माहीत नसणारे लोक अधिक शुद्ध असें समजून 'कापुसाचा', 'पाउलाचा', असें छापीत आहेत. 'वितुष्ट' ऐवजीं 'वितुष्टत्व' हा शब्द मीं हेडलाइन्समध्यें वाचला आहे! 'सकेशा' हें रूप सदोष समजून 'स्वकेशा' वापरण्यांतलाच हा प्रकार होय!

प्रयोगाच्या बाबतींतहि सूक्ष्म दृष्टीच्या अभावीं अर्थशून्य भाषा लिहिण्याचें व खपवून घेण्याचें प्रमाण इतकें वाढत आहे कीं, भाषेंतील शुद्धाशुद्ध विचार इतउत्तर अशक्यप्राय होणार आहे. रेडिओंतील दैनिक वार्तांतून मीं पुढील वाक्य टिपून घेतलें आहे: " उटकमंडहून त्रिवेंद्रमला निघालेल्या विमानाची कालपर्यंत बातमी नव्हती..... तें नीलगिरि पर्वतांत पडलें असें समजण्यांत येतें." 'असें समजतें' आणि 'असें समजण्यांत येतें' यांचे अर्थ अगदीं भिन्न आहेत, हें मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं.

हिंदीप्रमाणेंच बंगाली, गुजराथी, वगैरेंतूनहि संस्कृत शब्द उचलणें हें एक-राष्ट्रीयत्वाच्या खातीं पुण्यकर्मांत जमा होत असतें. गुजराथींत 'साक्षर' हा शब्द विद्वान् या अर्थी वापरतात; म्हणून मराठींत तो तसाच वापरून गुजराथ आणि महाराष्ट्र यांचें ऐक्य साधूं पाहणारेहि बहादर आहेत! याबद्दल मीं श्री. काका कालेलकर यांनाच एका चर्चाप्रसंगीं विचारलें. पण त्यांच्याच पुस्तकांच्या मराठी भाषांतरांत असले शब्द असूनहि, या प्रकाराला त्यांनीं शुद्ध मूर्खपणांत घातलें, हें त्यांच्या भाषांतरकारांनीं लक्षांत घ्यावें. तथापि बंगाली पुस्तकांचीं भाषांतरें करणारे लेखक, आज हाच प्रकार करून आधुनिक मराठी शब्दसंग्रहाचा बोजडपणा व अर्थशून्यपणा वाढवीत आहेत.

माझ्या मतें बंगालींत तर पंडिती शब्दांचा भरणा हिंदीहूनहि अधिक आहे. 'गतकाल अपराण्हे', 'प्रतियोगिता', 'परिकल्पना', 'भारतस्थित प्रतिनिधि', 'इतिपूर्व', आलोचना', 'साक्षात् करिछिल', 'निम्नलिखित', 'वाणिज्यमंत्री' यांसारखे शब्दप्रयोग त्यांच्या दैनिक वार्तेंत पदोपदीं आढळतात. हे सर्व शब्द संस्कृत आहेत एवढ्या आधारावर, आमचे राष्ट्रैक्यमग्न लोक ते मराठींत वापरण्याला मुभा देणार काय? 'बातमीदार' याला हिंदींत व बंगालींत 'संवाद-दाता' हा शब्द वापरतात; निर्वासित याच अर्थानें हिंदींत 'विस्थापित' वापरतात; 'स्थानिक' या अर्थी 'स्थानीय' वापरतात; एखाद्या कृत्याचा सभेंत 'निषेध' केला म्हणण्याऐवजीं 'निंदा' केली असें म्हणतात! हिंदींत माणसाला 'प्रामाणिक' म्हणण्याऐवजीं प्रामाणिक कोश (Standard) असा प्रयोग करतात. कांहीं तरी नवीन करून लक्ष वेधण्यासाठीं धडपडणारे लोक आणि भाषांचें ऐक्य करतां येईल असें प्रामाणिकपणें समजणारे लोक, असे दोघे मिळून मराठी प्रयोगांशीं विसंगत असे हे शब्द मराठींत घुसडूं लागल्यास भाषेची अवस्था काय होईल? नव्या भारतीय राज्यघटनेचें भाषांतर करतांना असे कित्येक पंडिती शब्द त्यांत वापरलेच पाहिजेत, अशी सरकारी सूचना आहे असें कळतें. हें खरें असल्यास त्या भाषांतराला मराठी भाषांतर कां म्हणावें हा प्रश्नच आहे.

'निवडणूक' या अस्सल मराठी शब्दाऐवजीं 'निर्वाचन' आणि 'राज्य-घटना' या सुगम शब्दाऐवजीं 'संविधान' हे शब्द मराठींत वापरल्यानें कोणाचा फायदा होणार आहे? 'पार्लमेंट' या शब्दाला 'लोकसभा' किंवा 'राष्ट्रसभा'

यासारखा सोपा शब्द सुचवावयाचा सोडून 'संसद्' हा शब्द सुचविणाऱ्यांनीं काय साधलें? (शिवाय याचा उच्चार 'सन्सद्' केला पाहिजे म्हणे!) मी तर उलट म्हणेन, 'कॉंग्रेस' हा शब्द घेतला त्याप्रमाणें 'पार्लमेंट' अगर 'कौन्सिल' हे शब्दहि सरळ इंग्रजींतून घेण्याला हरकत नव्हती. श्री. काका कालेलकरांसारखे लोक तर भावनांना 'अॅपील्' करणें यासारखे प्रयोग करण्यास हरकत नाहीं असें प्रतिपादितांना मीं ऐकलें आहे. आणि फारसी-इंग्रजी शब्दांना प्रतिशब्द म्हणून शेंकडों नवे शब्द तयार करणाऱ्या हिंदींत तर आज 'अॅपील्' हा शब्द उघडपणें वापरलाहि जातो! पण हिंदीला आज जे शेंकडों संस्कृत शब्द, फारसी टाळण्याकरितां घडवावे लागत आहेत, त्यांच्याऐवजीं सोपे व शुद्ध शब्द आज कित्येक पिढ्या आमच्याकडे रूढ आहेत! अशा स्थितींत घटनेचें भाषांतर करण्याच्या निमित्तानें कित्येक बोजड व सर्वस्वीं अनावश्यक शब्द मराठी भाषांतरकर्त्यांनीं कां स्वीकारावे? आमच्या नागपूरस्थ भाषिक प्रतिनिधींनीं (डॉ. देशमुख आणि प्रा. बनहट्टी) यांनीं या गोष्टीबद्दल नापसंती दर्शविल्याचें कळतें. कोशकार य. रा. दाते यांनीं तर नापसंती दाखविलीच असणार. पण असल्या आत्मघातकी अटींवर भाषांतर करण्याचेंच नाकारलें कां नाहीं? याचा परिणाम म्हणजे या तीन पंडितांनीं केलेल्या या भाषांतराचें आणखी एक मराठी भाषांतर करावें लागेल! नाहीं तर त्यापूर्वीचें श्री. देवगिरीकर यांचें कमी पंडिती, पण अधिक 'मराठी' भाषांतर, महाराष्ट्रांत मान्य समजावें लागेल.

मीं प्रारंभींच सांगितलें आहे कीं, वृत्तपत्रांतील भाषा-दोषांवर भर देण्याचें कारण, त्यांचा परिणाम अत्यल्प अवधींत जास्तींत जास्त वाचकांवर होण्याचा संभव हेंच होय. वृत्तपत्रेंच काय तीं गुन्हेगार आहेत म्हणून नव्हे, तर वृत्तपत्रेंच काय तीं आजच्या पिढीच्या नित्यपाठांत आहेत, म्हणून वृत्तपत्रांकडे बोट प्रथम करावें लागतें, व अधिक करावें लागतें. पण या अप्रिय पंक्तिभेदाच्या क्षालनार्थ, हेंहि सांगितलें पाहिजे कीं, वृत्तपत्रांचें जीवन, आज प्रायः इंग्रजींतून येणाऱ्या तारांवर अवलंबून आहे, व त्यांचें भाषांतर त्यांना घाईनें करावें लागतें. (अर्थात् याहि कारणानें भाषेचें स्वरूप रोज भ्रष्ट आणि विद्रूप करणें सर्वस्वीं अक्षम्यच होय.) पण ज्यांना घाई हेंहि कारण नाहीं, असे ग्रंथलेखक जर हेच भाषिक अपराध करीत असतील, तर ते त्याहूनहि अक्षम्य नाहींत का?—ग्रंथांचा दुष्परिणाम वृत्तपत्रांइतका व्यापक आणि त्वरित नसला, तरी त्यांचा अपराध मात्र वृत्तपत्रांहूनहि

अक्षम्य होय, यांत शंका नाहीं; व म्हणूनच मुंबई येथील गेल्या साहित्य-संमेलनांत, जेव्हां वृत्तपत्रांबरोबरच इतरहि नव-वाङ्मयांतील दोषांचा माझ्या ठरावांत निर्देश करण्याची सूचना माझ्या वृत्तपत्रकार-मित्रांनीं केली, तेव्हां ती मीं बिनबोभाट मान्य केली. भाषेंतील हे दोष करणारे लेखक एका विशिष्ट संप्रदायाचेच आहेत; व तो संप्रदाय मोडून काढला पाहिजे, हें माझें आजचें प्रतिपादन आहे. संप्रदाय हा शब्द मी परिचित राजकारणी संप्रदायांच्या अर्थानें वापरीत नाहीं. कारण या क्षेत्रांत हिंदुत्ववादी, गांधीवादी, समाजवादी—आणि साम्यवादीहि—सारखेच अपराधी आहेत. प्रारंभ मात्र भाजाशुद्धिवादी हिंदुत्वनिष्ठांनीं केला, या दृष्टीनें ते या दोषाला अधिक जबाबदार आहेत एवढेंच काय तें.

ज्यांची भाषा अन्यांच्यासारख्या जातिवन्त मराठी लिहिणाराला सुगमत्वाचा नमुना वाटते त्या साने गुरुजींनीं, 'तिची खोली **आद्यतन** होती' यासारखे अशुद्ध, अर्थशून्य व क्लिष्ट प्रयोग केलेले आढळतील. 'माझी काव्यलोलुप वृत्तिच **भाग्यशील** नाहीं', या वाक्याचा अर्थ किती लोकांना कळेल? आणि कळला तरी 'भाग्यशाली' हा पिढ्यान् पिढ्यांचा शब्द सोडून 'भाग्यशील' वापरणाऱ्या लेखकानें पोरकट अनुकरणाखेरीज काय साधलें? 'कालविपर्यास' हा शब्द आज अनेक वर्षें वापरांत आहे; त्याच अर्थीं 'कालवैसदृश्य' हा शब्द वापरण्यानें काय साधलें? आणि शिवाय हे नवीन लष्ट शब्द तयार करणारे लोक 'दृश्य' ऐवजीं 'दृष्य' लिहिण्याइतपतच संस्कृतचे सोयरे असतात तें वेगळेंच! संस्कृतचा सोस असलेल्या 'असंस्कृत' लोकांना शब्दसिद्धीची सनद देणें म्हणजेच मराठींत भर कीं काय?

इंग्रजीच्या अंध अनुकरणामुळें आज—'**जेव्हां डोकें रिकामें असतें**'—यासारखे अशुद्ध वाक्यार्ध मथळा म्हणून वापरले जात आहेत. अशा वाक्यार्धांत अध्याहृत ठेवावयाचेंच झालें, तर 'जेव्हां' हें अव्यक्त ठेवतां येईल व इंग्रजीच्या थाटावर मथळा द्यावयाचाच म्हटला तर '**डोकें रिकामें असतें तेव्हां**'—असा द्यावा लागेल, ही चूक फार तर एखादा मराठींत लिहिणारा मिशनरीच करूं शकेल; व अशा परकीय लेखकांकरितां एका पाश्चात्त्य लेखिकेनें लिहिलेल्या मराठीच्या व्याकरणांतच प्रथमतः मीं या नियमाचा निर्देश वाचल्याचें स्मरतें. पण मराठी लेखकांना या व्याकरणनिर्देशाचें कारणच नाहीं; त्यांना हें स्वभावतःच कळायला हवें.

'डॉ. लोहिया यांचे पैसे लावून व्याख्यान,' 'तो छापण्याचे गोपालस्वामींनीं एकजात नाकारलें.' या वार्तांतील वाक्प्रचारांचा खून; तसेंच 'जहागीर' यांचें अनेकवचन 'जहागिऱ्या', 'They removed the wounded' या बातमीच्या भाषांतरांत 'जखमींना तेथून नेलें' यांसारखे प्रयोग दररोज करण्यांत येत असल्यानें, नवीन पिढीला भाषा शिकविणें अशक्यप्राय होत आहे. आणि इकडे मराठीचा प्रवेश पदवीच्या अभ्यासांत करून देणें, एवढेंच मराठीचे अभिमानी आपलें कर्तव्य समजत आहेत!

इकडे आमच्या विद्यापीठांना जुन्या ग्रंथांचें संशोधन एवढेंच मराठीच्या प्रान्तांत राजाश्रयानें अगर पीठाश्रयानें करण्यासारखें कार्य दिसत आहे! पण आजच्या या भाषिक धरणीकंपाची पाहणी कोण करणार? कीं 'जें जुनें नव्हे तें संशोधनच नव्हे' असें आमचीं विद्यापीठें मानतात? कीं आमच्या विद्यापीठांनाहि ही भाषेची वाढच वाटत आहे? अशा अडाणी शब्दसिद्धीची वाढ करणाऱ्या लेखकांचे उतारे शाळांच्या आणि कॉलेजांच्या पाठ्यपुस्तकांतून उत्साहानें घेतले जात आहेत, व ते उतारे 'मतें' असलेलें पण 'मत' नसलेले आमच्यासारखे 'प्राध्यापक' शिकवीत आहेत! विचारांचें तेज आणि भाषेची शुद्धता यांचा मराठी भाषेंत इतका दुष्काळ खास नाहीं कीं, असें अशुद्ध लिखाण आमच्या तरुण पिढीपुढें अभ्यसनीय म्हणून ठेवलें जावें! परंतु आजच्या वाङ्मयाच्या आणि विद्येच्या क्षेत्रांत राजकीय आणि प्रचारी दृष्टीचें इतकें प्रस्थ आहे कीं, खऱ्या विद्येची दृष्टि विद्यापीठांतहि दुर्मिळ झाली आहे—निदान अर्वाचीन देशभाषांच्या बाबतींत तरी तशी स्थिति आहे.

या अराजकाला कारण, प्रचारकल्पनांप्रमाणेंच घिसाडघाई आणि बाजारी वृत्ति ही देखील आहे. चाळीस वर्षांपूर्वीच्या, एखाद्या आज विसरूनहि गेलेल्या लेखकाचें पुस्तक पाहा, आणि आजचीं प्रसिद्ध लेखकांचीं पुस्तकें पाहा. फार कशाला, विद्यापीठानें मंजूर करून नेमलेलीं पुस्तकें पाहा. जुनें अप्रसिद्ध पुस्तक अधिक चांगलें छापलेलें—व अधिक चांगलें बांधलेलेंहि असेल, तर उलट खास विद्यापीठाकरितां छापलेल्या आजच्या पाठ्य-पुस्तकांत पानोपानीं अशुद्ध छपाई आढळेल. टिळकांचे किंवा आगरकरांचे निबंध 'विद्यापीठानें लावले' म्हणून घाईनें छापायचे, आणि पूर्वीच्या आवृत्तीपेक्षां दसपट अशुद्ध आणि बेढब आवृत्ति

विद्यार्थ्यांच्या हातीं द्यायची, याला मातृभाषेचा काळाबाजार कां म्हणूं नये? मुद्दाम ओरड करून मराठी हा विषय कॉलेजच्या पहिल्या दोन वर्षांना नेमून घेण्यांत आला आहे. त्या वर्षांना मुंबईच्या व पुण्याच्या कॉलेजांत शिकवावीं लागणारीं पुस्तकें पाहावीं, म्हणजे पुस्तकांचा उद्देश विद्यार्थ्यांना ज्ञानदान हा नसून प्रकाशकांना द्रव्यदान हा आहे, असें वाटल्यावांचून राहात नाहीं. तसेंच पुस्तकांच्या संपादकांचें काम, जुजबी आणि तऱ्हेवाईक प्रस्तावना व टीपा जोडणें एवढेंच असावें; आणि प्रकाशकांचें काम पहिल्याहून दसपट चुका करून पुस्तक विद्यार्थ्यांच्या हातीं देणें हें असावें, असें वाटल्यावांचून राहणार नाहीं ! जेव्हां मुद्रण-दोषामुळें अर्थ लागेनासा होईल, तेव्हां विद्यार्थ्यांपैकीं ज्याच्या हातांत जुनी आवृत्ति असेल त्याच्या पुस्तकाचा उपयोग करणें, हा क्रम मला तरी ठेवावा लागला आहे व उपयोगी पडत आहे. 'कवित्व' यांत शेंकडा पन्नास ठिकाणीं 'त' चें द्वित्व आढळेल; 'महत्त्व' यांत तितक्याच वेळां 'त' चें द्वित्व नाहीं असें आढळेल! उज्ज्वल यांत 'ज' चें द्वित्व मला फारच थोड्या पाठ्य-पुस्तकांत आढळलें. मी मघाशीं हिंदी व मराठी वृत्तपत्रांतील लेखनदोषांबद्दल दुःख केलें. पण कॉलेजमध्यें नेमून घेण्याकरितां मुद्दाम तयार केलेल्या गद्यवेंचांत जर 'शृंगारवीरादि' याबद्दल 'श्रंगारवीरादि' असें छापलेलें असेल, 'अत्याचार' याऐवजीं 'अत्त्याचार' असें असेल 'महर्षि कर्वे' यांत 'र्षि' दीर्घ असेल आणि 'र्वे' वर जर अनुस्वार असेल, आणि अशा चुका पानोंपानीं असतील, तर विद्यार्थ्यांना शुद्ध लिहिण्याचें वळण लावणें कितपत शक्य आहे?

पण हा झाला केवळ मुद्रणदोषांचा प्रकार. अपरिचित शब्दयोजनेमुळें होणारे घोटाळे याहून आगळेच आहेत! आमचे माडखोलकर आजच्या पिढी-प्रमाणें अशुद्ध व अर्थशून्य शब्द तयार करीत नसले, तरी त्यांना अपरिचित पण कर्णमधुर संस्कृत शब्दांचा हव्यास दांडगा! त्यांच्या एका उताऱ्यांत 'निर्विण्ण मनःस्थिति' असा शब्दप्रयोग आहे. घाईनें पुस्तक छापून विद्यापीठाकडे धाडतांना संपादकांना संकट पडलें! त्यांनीं 'निर्विण्ण' हा अनोळखी शब्द चुकीनें पडला असणार असें ठरवून, त्याऐवजीं 'निर्विषण्ण मनःस्थिति' अशी दुरुस्ती केली! अर्थ करण्याची जबाबदारी लेखकावरहि नाहीं, संपादकावरहि नाहीं! जिवंत लेखकाच्या उताऱ्याची ही स्थिति, तर बिचाऱ्या आगरकर-लोकहितवादींची स्थिति काय होत असेल?

सदोष वाक्प्रयोग, विचित्र शब्दयोजना व कम्पॉझिटरच्या सोयीकरितां लिपिसुधारणा, यांतच मुद्रण-दोष, टाइप उडणें, इत्यादींची भर पडल्यावर पाठ्य-पुस्तकाची दशा काय होत असेल? कॉलेजचे प्रौढ विद्यार्थी केवळ मतलबाकडे लक्ष देतात; किंबहुना मूळ लिखाणाएवजीं सारांश वाचून पसार होतात. पण हायस्कूल व प्राथमिक शाळा यांच्याहि हातीं आपल्याला शुद्ध पाठ्य-पुस्तकें देता येऊं नयेत, ही गोष्ट भाषेच्या भवितव्याच्या दृष्टीनें भयावह आहे.

'लगीन करतो बेडूकराव' यासारखे मथळे आजच्या प्राथमिक पुस्तकांत आढळतात! बिचारा नुकता कुठें वाचायला शिकलेला वसंत, 'सिंधी लोक', याऐवजीं 'सिंधि लाक', देणगीएवजीं 'देगणी' असे शब्द वाचून, आईबापांना व मास्तरांना सतावून सोडतो. त्याला छापखान्यांतील गर्दी, कागदावरील 'कंट्रोल' आणि पाठ्य-पुस्तकांच्या प्रकाशकांत लागून राहिलेली घोड्याची शर्यत, यांची खबर कशी असणार?

भाषेंत नव्यानेंच शिरलेले अशुद्ध व बोजड शब्द कोशाच्या साहाय्यानें काढूनहि टाकतां येतील; पण उच्चाराच्या शुद्धतेचा ऱ्हास एकदा झाला, म्हणजे त्याची सुधारणा पुढेंमागें अशक्य होईल. 'एकदा रूढ झाल्यावर कोणत्याहि शब्दाला मान्यता मिळते' असें म्हणून दडपून पाहिजे ते शब्द रूढ करणें, फक्त ते फारसी अगर इंग्रजी नाहींत, एवढेंच पाहून घेणें—ही 'दांडगेश्वर-नीति' च काय ती ज्यांना अवगत आहे, त्यांची गोष्ट वेगळी. पण इतरांना हें ठाऊक असेल कीं, एका स्वराच्या दीर्घ अगर ऱ्हस्व, उदात्त अगर अनुदात्त उच्चारानें कोणत्याहि समाजांत मनुष्याचें शिक्षण व सामाजिक स्थान जोखलें जातें.

महाभारताच्या स्वर्गारोहणपर्वांत, तें आपलें राष्ट्रीय काव्य वाचावें कोणत्या पद्धतीनें याच्याहि तपशीलवार सूचना देऊन ठेवलेल्या आहेत! त्यांत असें सांगितलें आहे कीं, वाचतांना त्रेसष्टच्या त्रेसष्ट वर्णांचे उच्चार सुस्पष्ट झाले पाहिजेत. उच्चाराच्या स्पष्टतेबद्दल आम्हां महाराष्ट्रीयांचा प्राचीन काळापासून लौकिकहि आहे. अशा स्थितींत लाखों रुपयांच्या सरकारी साधनसामग्रीच्या द्वारें जे शब्द लहानथोरांच्या कानीं जाणार, ते सर्वमान्य हवेत;—निदान शुद्ध तरी हवेत. या दृष्टीनें पाहतां, ऑल इंडिया रेडिओनें संग्रहीं ठेवलेल्या मराठी वक्त्यांचीं भाषणें उद्वेगजनक होतात, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं.

कोणत्याहि दिवशींच्या ऑल इंडिया रेडिओच्या वार्ता ऐकल्या, तरी मी म्हणतों त्याचें प्रत्यंतर येईल. मीं सहज सांपडलेल्या गेल्या जुलैमधील एका टिपणांतील नमुना सांगतों. ता. १४ जुलै रोजींच्या बातम्यांत पुढील वाक्य होतें—"देशांतील वकिलातींना सूचना देण्यांत आल्या." हें वाक्य आमच्या अखिल भारतीय मराठी 'ध्वनिक्षेपका' नें पुढीलप्रमाणें उच्चारलें. 'देशांतील **वकिलान्तीना** सूचना देण्यांत आल्या." कारण 'घरान्त', 'त्यान्त', 'ह्यान्त' या उच्चारांचा त्या वक्त्याला सराव होताच! त्याच महिन्यांतील आणखी एका टिपणांतील नमुना : 'वटहुकूम' या शब्दांतील 'वट'चा उच्चार '**वट**सावित्री'तील 'वट' च्या उच्चाराप्रमाणें केला गेला! या गोष्टी 'लहान' नव्हेत, तर 'सूक्ष्म' आहेत. आणि संस्कृति, शुद्धता व माधुर्य यांचें मापन धडापासरीनें करायचें नसून तोळा-माशांनींच करायचें असतें. पण कापडाच्या अगर लोखंडाच्या कारखान्याप्रमाणें भाषण-लेखनाचेहि कारखाने उघडले, कीं 'प्रगती'ला उशीर नाहीं, ही आजच्या कारखानदार-युगाची कल्पना! छापखाने व रेडिओ यांच्या द्वारें ज्ञानप्रसार झपाट्यानें होतो, एवढी एकतर्फी वार्ताच आम्हीं पाठ केली आहे; पण त्याच साधनांच्या द्वारें अज्ञान व भाषादोष यांचा प्रसारहि तितक्याच झपाट्यानें होतो, हें आमच्या नूतन राज्यकर्त्यांनीं लक्षांत घेतलें पाहिजे, व हीं साधनें अपात्र लोकांची मिरास होणार नाहींत याची खबरदारी घेतली पाहिजे.

या ज्ञानप्रसाराच्या आणि वाङ्मयप्रसाराच्या साधनांचीं आणखी कांहीं फळें सादर करतों—गेल्या सप्टेंबरमधील वार्ता : "शिब्बनलाल सक्सेनांनीं एका **उपसूचनाच्या** द्वारा विरोध केला." तसेंच 'गैरवाजवी' याचा उच्चार 'गैर-वाजवी.' इ० आतां गोवा रेडिओवरील उच्चाराचे नमुने : 'पुस्तक-परीक्षण' याऐवजीं 'पुस्तक-परीक्शण,' 'प्रसिद्ध झाला' याचा उच्चार 'प्रसीध् झाला' इ. इ. रेडिओच्या संग्रहींच्या वक्त्यांचें भाषण सर्वमान्य मराठींत होण्याएवजीं मिशनरी मराठींतच दररोज एकूं यावें, यापेक्षां रेडिओच्या साधनाचा दुरुपयोग कोणता?

'अल्पसंख्याक' या शब्दाचा उच्चार मुंबई रेडिओच्या नेहमींच्या वक्त्यांच्या तोंडून मीं एकदाहि शुद्ध स्वरूपांत एकलेला नाहीं. तो शब्द 'अल्पसंख्याक' असा आहे, 'अल्पसंख्याङ्क' असा नाहीं, हें या वक्त्यांना आतां तरी कोणीं

सांगणें व त्यांच्याकडून म्हणवून घेणें जरूर आहे. (नाहीं तर रेडिओचा खर्च करून मुलाबाळांना अशुद्ध बोलायला शिकविल्याचें श्रेय येणार आहे!) तर उल्ट मद्रास रेडिओवरील कानडी व तेलगू वक्त्याच्या तोंडून मीं हा शब्द एकदाहि सदोष उच्चारलेला ऐकला नाहीं; कीं ते वक्ते कृत्रिम नाटकी आवाजांत बोलतांनाहि मला कधीं आढळले नाहींत. इतर भाषांप्रमाणें मराठींतहि उच्चाराला महत्त्व आहे, याची जाणीव ऑल इंडिया रेडिओला करून देण्याची वेळ आली आहे. आमचीं साहित्य-सम्मेलनें, फॅसिस्टविरोधी आघाडीपासून डांग जिल्ह्याच्या सरहद्दीपर्यंत सर्व राजकीय स्वरूपाचे ठराव करतील, पण मराठीच्या माजघरांतच मराठीला जो सूक्ष्म क्षय लागत आहे, तिची दखल घेणार नाहींत! आजचें युग ढोबळ व स्थूल गोष्टींचें युग आहे. पण माणसांचें काय, कीं संस्कृतीचें काय, जीवन आणि मरण सूक्ष्म गोष्टींतच असतें.

ज्या शहरांत पारशी, मुसल्मान, ख्रिस्ती, युरोपियन यांसारख्या छप्पन्न प्रकारच्या लोकांशीं क्षणोक्षणीं संबंध येतो, किंबहुना ज्यांत त्याच्याच बोलण्याच्या ढंगाला मान असतो, त्या शहरांतील मराठीचे उच्चार भ्रष्ट होण्याचा पुष्कळच संभव असतो. वाक्यांतील पांच शब्दांत दोन शब्द इंग्रजी असले, तर भाषा बाटते, हें राजवाडे–सावरकरांनीं ओरडून सांगितलें; पण 'वटहुकूम'च्या ऐवजीं 'वटहुकूम'; 'प्रसिद्ध' च्या ऐवजीं 'प्रसीध्' या उच्चारांनीं जीभच बाटते, हें ओरडून कोण सांगणार? 'बी. बी. सी.' आम्हाला रोज झोपेच्या वेळीं इंग्रजीच्या वर्णोच्चारशास्त्रावरील धडे ऐकवते;—आमच्या मराठीचे वर्णोच्चार आम्हांला कोण शिकविणार? रेडिओनें पगार देऊन ठेवलेले वक्ते उच्चार बिघडविण्याचेंच काम करीत आहेत.

गीता, उपनिषदें यांचे अत्यंत अशुद्ध पाठ ऐकविण्याबद्दल तर रेडिओवर फिर्याद करण्याला एखादें कल्प सांपडतें का याचा विचार मनांत आल्यावांचून राहात नाहीं. या बाबतींत मुंबईच्या वृत्तपत्रांतून लेखी ओरडहि झाली आहे. 'स्थितधीः किं प्रभाषेत। किमासीत व्रजेत किम्।' या चरणाची (व इतर अनेक चरणांची) रेडिओनें केलेली विटंबना श्रोत्यांना खरोखर ऐकवंत नाहीं! रेडिओवरील वक्त्यांची निवड आज अत्यंत बेजबाबदारपणें होत आहे, असें नाइलाजानें म्हणावें लागतें. मराठीचे व संस्कृतचे ज्याचे उच्चार मिशनरी वळणाचे नाहींत, असा वक्ता उभ्या महाराष्ट्रांत मिळत नाहीं काय?

मुंबईचें वातावरण बकाली असलें, तरी ज्यांचें उच्चार अत्यंत शुद्ध आणि अस्सल मराठी आहेत, अशीं माणसें मुंबईतहि अनेक आहेत. तथापि या ठिकाणीं मुंबईकरांना एक प्रेमाचा इशारा मात्र देऊन ठेवतों. हवामानामुळें असो कीं मद्यपानामुळें असो, कांहीं देशांतील लोकांत अस्पष्ट व उडत उच्चार करणें ही एक 'फॅशन' समजली जाते. मराठींतहि कांहीं 'फॅशन्स' अगर ढंग असतील; पण 'Fashionable Stammer' ऊर्फ तोतरेपणा, हा महाराष्ट्रांत तरी गुण मानला जात नाहीं. हा दोष अनेक आधुनिक वक्त्यांच्या व नटांच्या बोलण्यांत – विशेषतः मुंबईत राहण्यानें – शिरला आहे. असल्या लोकांची निवड ज्ञानप्रसाराच्या खात्यांत (रेडिओ, विद्यालयें वगैरेंत) तरी होणें भाषेच्या शुद्धतेच्या व गोडीच्या दृष्टीनें धोक्याचें आहे.

भाषेंत किती हजार शब्द आहेत, याबरोबरच त्यांपैकीं किती शब्द जास्तींत जास्त लोकांना समजतात; किती शब्द त्या भाषेच्या प्रकृतीशीं जुळणारे आहेत; किती त्या भाषेच्या कुशींत जन्म घेणारांच्या प्रत्यक्ष सामाजिक आणि सांसारिक क्रियांशीं व संकेतांशीं संबद्ध आहेत, याला महत्त्व दिलें पाहिजे. आणि या दृष्टीनें पाहतां ज्ञानेश्वरीची जुनाट पद्यशैली आणि भाऊसाहेबांच्या बखरीची फारसी-मिश्रित गद्यशैली या देखील आजच्या तरुण लेखकांच्या शैलीहून मराठी भाषेला अधिक जवळच्या आहेत. स्वजनांच्या अन्तरंगाला जाऊन भिडण्याची तळमळ आणि संस्कृतचें साक्षात् ज्ञान, यामुळें लोकहितवादी, लोकमान्य टिळक, यांच्यासारखे पूर्वीच्या पिढीचे लोक सुगम, शुद्ध आणि भेदक मराठी लिहूं शकले. आजच्या पुष्कळशा लेखकांचा संस्कृतशीं संबंध मध्यस्थामार्फत ('सेकंड हँड'!) असल्यामुळेंच उलट त्यांना त्या भाषेशीं पंडिती लगट करावीशी वाटते! दुर्दैव हें कीं, आजचे तरुण लेखक, केळकर, फडके, खांडेकर, माडखोलकर यांची भाषा जितकी वाचतात, तितकी टिळक, महादेव शिवराम गोळे, चिंतामणराव वैद्य, धनुर्धारी (टिकेकर) यांची वाचीत नाहींत. ती वाचतील तर ते अधिक जातिवंत मराठी लिहितील. आणि लोकहितवादींची भाषा वाचतील, तर त्यांस इंग्रजपूर्व गद्याचाहि गाभा आत्मसात् केल्याचें श्रेय मिळेल. कारण लोकहितवादींच्या लिखाणांत इंग्रजीनंतरची आधुनिक दृष्टि व इंग्रजपूर्वीचें बाळबोध वळण यांचा मधुर मिलाफ झाला आहे. (त्यांना संस्कृतचा गंध नव्हता, हें चिपळूणकरांचें मत,

आणि त्यांना स्वतंत्र रचना करण्याची कुवत नव्हती, हें विसूभाऊ राजवाड्यांचें मत हीं दोन्हीं त्यांचें समग्र लिखाण न वाचतां दिलेलीं, अतएव अज्ञानमूलक मतें आहेत.)

निकोप गद्य आणि स्वाभाविक सुगम शब्दसंग्रह, या भाषेच्या अगदीं प्राथमिक गरजा आहेत. राष्ट्रैक्याच्या विशाल ध्येयाखातरहि या दोन अमोल ठेव्यांवर कोणत्याहि आधुनिक देशभाषेनें पाणी सोडूं नये. आजकाल निर्माण होणारें पुष्कळसें गद्य या दोन प्राणभूत गोष्टींच्या मुळावरच जन्मत आहे, ही दुर्दैवाची गोष्ट होय. अखिल भारतीय व्यवहाराची भाषा म्हणून प्रत्येक प्रान्तांतील सुशिक्षितांनीं हिंदीचा अभ्यास जरूर करावा. पण नवी राष्ट्रभाषा निर्माण करण्याच्या हव्यासानें दीर्घपरंपरेच्या प्रान्तिक भाषांच्या शब्दसंपत्तीचा जुगार मांडणें, हा शुद्ध वेडेपणा होय. आणि हिंदी देखील, आम्ही तिच्या स्वाभाविक स्वरूपांतच शिकूं. राजकीय हेतूनें तिला दिलेलें पंडिती वळण लोक-व्यवहारांत फार काल टिकणें शक्य नाहीं.

शुद्ध व जिवंत मराठींत लिहिलेलीं अनेक पुस्तकें, आज आवृत्त्या संपल्यामुळें बाजारांत नाहींत; व अनेक भिकार पुस्तकें केवळ आज विक्रेत्यांच्या कपाटांत तिरंगी वेष्टनांत मांडलीं आहेत, म्हणूनच ग्रंथालयांत भरलीं जात आहेत! नव्या शाळा, नवीं कॉलेजें यांच्या पुस्तकालयांच्या याद्या तपासून पाहण्यासारख्या आहेत. मी ज्या कॉलेजांत काम करतों, तें लहानसें व बाल्यावस्थेंत असलेलें कॉलेज आहे. पहिल्या वर्षी इतर अनेक विभागांप्रमाणें मराठी विभाग भरतांना, अगदीं काटकसरीनें म्हटलीं, तरी पांचशें पुस्तकें घेण्याची आमची इच्छा व तयारी होती. परंतु ज्या पांचशेंना कोणत्याहि विद्यालयाच्या ग्रंथालयानें प्रथम जागा द्यावी असें मी म्हणेन, त्यांतील तीन-चतुर्थांश पुस्तकें पुण्यासारख्या ठिकाणींहि उपलब्ध नसतात. कारण तीं 'लेटेस्ट' नसतात! आणि कित्येक तर आज अजीबात दुर्मिळच आहेत. ज्ञानकोशकार केतकरांचे स्फुट लेख; लोकहितवादींचा 'स्वाध्याय' हा अमोल ग्रंथ, अगर त्यांचेच ऐतिहासिक दंतकथांचे तीन भाग हे ग्रंथालयाकरतां घ्यायचे म्हटलें तर मिळत नाहींत. गोळे व धनुर्धारी यांचीं पुस्तकें तरुण मराठी वाचकांना ठाऊकहि नाहींत. भाऊसाहेबांची बखर विद्यापीठानें नेमली असूनहि कित्येक दिवस उपलब्ध नव्हती. पण क्लिष्ट भाषा आणि विकृत भावना यांनीं भरलेलीं ताजीं पुस्तकें मात्र तरुण वाचकांच्या हातीं न चुकतां पडत आहेत. श्रीअरविंद

वा. नं. ९५२९

यांच्या निर्याणानंतर पंधराहि दिवस झाले नसतील तेव्हांची गोष्ट. मीं एका सुशिक्षित पुस्तक-विक्रेत्याला व प्रकाशकाला म्हटलें—"तुमच्याकडे अरविंदांचीं कांहीं पुस्तकें ठेवलीं आहेत कीं नाहीं? सध्यां त्यांना मागणी असेल?"

माझें वाक्यहि पुरें होण्याच्या आंत तो म्हणाला, "अरविंद गोखल्यांचीं ना? —आहेत कीं."

या संवादावरून आजच्या पिढीचे सहचर कोण आहेत, हें लक्षांत येण्यास मदत होईल! व अरविंदांनीं आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्राचें, वासुदेव गोविंद आपटे यांनीं केलेलें भाषान्तर, अद्यापहि पुण्याच्या '**आनंद कार्यालयां**'त शिल्लक पडून कां आहे हेंहि कळेल!

सर्वमान्य व प्रातिनिधिक मराठी गद्यग्रंथ प्रत्येक ग्रंथालयांत उपलब्ध असणें जरूर आहे, व प्रत्येक तरुण लेखकाच्या वाचण्यांत ते प्रथम येणें जरूर आहे. त्यांची विस्मृति न होऊं देणें, त्यांची योग्यता वाचकांना पुनः पुनः पटविणें, हीं कामें विद्यापीठांचीं आणि टीकाकारांचीं आहेत. त्यांनींच आपलें काम नीट केलें नाहीं, तर बिचारे प्रकाशक काय? आपल्या अक्कलहुशारीप्रमाणें बाजार सजवीतच आहेत!

निकोप व जिवन्त गद्य ही वाढत्या भाषेची पहिली गरज असली, तरी कोणत्याहि स्थितींतील समाजाचें तेवढ्यानें भागेल असें नाहीं. समाजाच्या प्रेमाच्या आणि भक्तीच्या विषयांना, समाजाच्या तीव्र सुखदुःखांना आणि उच्च ध्येयांना स्थान, त्याच्या काव्यांतच अधिक यथार्थतेनें मिळतें. ब्रिटिश अमलापूर्वीच्या काव्यांत ईश्वरभक्ति आणि देवादिकांच्या पौराणिक कथा यांनाच हक्काचें स्थान असे. प्राकृत जनांचें प्रेम आणि प्राकृत वीरांचे पराक्रमहि काव्यांत गायिले जात; पण त्या काव्याला प्रतिष्ठित स्थान मिळत नसे. ब्रिटिश अमलांतील नव्या शिक्षणानें, व्यक्तिस्वातंत्र्यामुळें आणि इंग्रजी वाङ्मयाच्या वाचनामुळें मराठी काव्यावरील कृत्रिम दडपण नाहींसें होऊन, तें कवींच्या व वाचकांच्या स्वाभाविक सुखदुःख-विषयांचें गान करूं लागलें.

विषय आणि रचना या दोहोंतहि स्वाभाविकतेला अवसर सांपडल्यामुळें उत्कट आणि प्रसादपूर्ण रचनेला बहर आला. केशवसुत, चंद्रशेखर, टिळक, तांबे, गडकरी, बालकवि हे अर्वाचीन पिढीच्या भावनांचे आणि ध्येयांचे उद्गाते

झाले. पण एका पिढींतच हा पहिला बहर ओसरला आणि त्याच सुमारास पाश्चात्त्य वाङ्मयाच्या अधिक परिचयामुळें तंत्राचे विविध नमुने व प्रयोग, बुद्धिमान् तरुणांच्या नजरेला पडूं लागले. आत्माविष्कार, स्वैरता व रचनास्वातंत्र्य यांची जागा, 'नावीन्याचे प्रयोग' आणि 'प्रयोगाखातर नावीन्य' या प्रवृत्तींनीं घेतली. रविकिरण-मंडळाची कविता, ही उत्कटता आणि प्रयोगशीलता या दोहोंतून निघाली आहे. अनिल हेहि त्याच संमिश्र प्रवृत्तीचे एक उत्कृष्ट प्रतिनिधि आहेत. कुसुमाग्रज, बोरकर, हेहि त्याच वर्गात प्रायः मोडतात.

पण त्याच सुमारास रचनेच्या विविध पाश्चात्त्य नमुन्यांबरोबरच मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यांचेंहि आधुनिक सिद्धान्त सामान्य साहित्यिकापर्यंत येऊन पोहोंचले. स्त्री, निसर्ग आणि राष्ट्र, हे कुतूहलाचे आणि आदराचे विषय होण्याऐवजीं प्रयोगाचे आणि पृथक्करणाचे विषय वाटूं लागले. काव्याचे विषयहि पूजनापेक्षां प्रयोगाला अधिक पात्र आहेत, अशी कल्पना झाल्यावर, वस्तुतः काव्य कांहीं काळ थांबलें असतें, आणि वैज्ञानिक वाङ्मयच लिहिलें जातें, तरी तादृश नुकसान नव्हतें. परंतु एक बौद्धिक उद्योग आणि प्रयोग-क्षेत्र म्हणून काव्याचा खेळ चालूच राहिला. तंत्राचे, वृत्ताचे, शब्दयोजनेचे आणि उपमादृष्टान्तांचे प्रयोग, हें या पिढींतील कवितेचें एक प्रमुख अंग होऊन राहिलें आहे. विचित्र आणि अपवादात्मक विषय, तऱ्हेवाईक आणि करामतीची रचना यांमुळें आजच्या कवितेला आत्माविष्कारापेक्षां पांडित्यप्रदर्शनाचें आणि बौद्धिक कसरतीचेंच स्वरूप अधिक आहे. केशवसुत, टिळक, चंद्रशेखर, तांबे, बालकवि यांचा हळवेपणा, श्रद्धाळूपणा व सात्त्विकपणा जाऊन त्याऐवजीं तुच्छता आणि तऱ्हेवाईकपणा यांचें राज्य आलें. बौद्धिकता, पांडित्य आणि तऱ्हेवाईकपणा यांना कै. माधव जूलियन् यांच्या अनुकरणानें रविकिरण-मंडळांतील प्रमुख कवींनीं स्थान दिलेंच होतें. पण निसर्ग, भावना आणि राष्ट्र यांच्यासंबंधींच्या उत्कट श्रद्धेंत रविकिरण-मंडळाचे कवि केशवसुत-संप्रदायीच होते. या दृष्टीनें आजच्या युगांतील कविता, ही 'अश्रद्ध कवींनीं लिहिलेली कविता' असें म्हणतां येईल. पण कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, ज्या अश्रद्धेनें करतांच येणार नाहींत. जिला मातृत्व म्हणजे एक पर्वणी वाटत नाहीं, तिचें अपत्यसंगोपन; ज्याचा स्त्रीवर आणि प्रेमावर विश्वास नाहीं, त्याचा संसारप्रवेश; ज्याचा वरिष्ठांवरहि विश्वास नाहीं, कीं युद्धहेतूवरहि विश्वास नाहीं, त्याचा सैन्य-प्रवेश;—म्हणजे पवित्र गोष्टींची

विटंबना होय. मानवासंबंधीं प्रेम व तें व्यक्त करण्याच्या साधनासंबंधीं म्हणजेच काव्यासंबंधीं आदर, हा काव्य-लेखनाचा पाया होय. पण हा पायाच नसतांना केवळ प्रयोग, अनुकरण व बौद्धिक खेळ म्हणून कविता होऊं लागल्यास, काव्याची काय अवस्था होईल हें आजकाल 'नवीन कविता' म्हणून निर्माण होणाऱ्या कवितेकडे पाहिल्यावर दिसून येईल.

आजच्या जगांत माणुसकीची आणि सुंदरतेची पायमल्ली होत आहे, ही गोष्ट सत्य आहे. तथापि सर्व सौंदर्यनिर्मितीचा उगम मानवी मनाच्या सुंदरतेंत आहे. तें मुळांतच इतकें सुंदर आहे कीं, जगांतील सुंदरतेच्या विनाशासंबंधीं त्यानें केलेला विलापहि रम्य आणि हृदयस्पर्शी व्हावा. फारसी कवि उमर खय्याम आणि लॅटिन कवि ल्युक्रीशियस् हे दोघेहि आपल्या काव्यांत विश्वाच्या रचनेबद्दल आणि मानवाच्या दुर्दैवाबद्दल शोकच करीत आहेत. पण त्यांचें तें मधुर आणि आर्त आक्रन्दन वाचतांना, 'जगांत बाकी कांहीं रक्षणीय आणि स्तवनीय असो अगर नसो, निदान खय्याम आणि ल्युक्रीशियस् यांचीं कोमल आणि आतुर मनें तरी सुंदर आणि रक्षणीय होतीं' याबद्दल शंका राहात नाहीं. आजच्या काव्याचा परिणाम बरोबर उलटा होतो! आजचें जग, हे नवे कवि म्हणतात तितकें बीभत्स आणि निर्दय असो अगर नसो; या कवींचें काव्य आणि मन, बीभत्स आणि निर्दय आहे, याबद्दल मात्र शंका राहात नाहीं! त्या काव्यांत, सात्त्विकतेहून असात्त्विकतेचें व दुःखाहून द्वेषाचेंच प्रदर्शन अधिक असतें. त्यामुळें काव्यानें आनंद होत नाहीं; आणि कवीबद्दल सहानुभूति वाटत नाहीं. शिवाय भाषेची विटंबना करण्यांत आजचें हें काव्य गद्याच्याहि पुढें आहे. पण गद्याइतकें पद्य वाचलें जात नाहीं,– व सर्वसामान्य जनतेच्या भाषेला तर अशा मुलखावेगळ्या आणि लोकबहिष्कृत काव्याचा विटाळ होणें संभवनीयच नाहीं, म्हणून मी माझ्या प्राथमिक विवेचनांत त्या काव्याच्या भाषेचा विचार केला नाहीं. या काव्याचें समर्थन करतांना मात्र त्याच्या पुरस्कर्त्यांनीं 'उगिचतावाद' हा विदूषकी शब्द वापरल्याचें व लगेच मराठीच्या प्राध्यापकांनींहि तो लाचारपणें उचलल्याचें मीं जेव्हां ऐकलें, तेव्हां पद्याप्रमाणेंच गद्यालाहि हे लोक शुद्ध पोरखेळ समजतात, हें पाहून मला भाषेच्या भवितव्यासंबंधीं अधिकच चिंता वाटूं लागली. प्रौढशिक्षण, प्रादेशिक विद्यापीठें, वगैरे ज्ञानसाधनें वाढविण्याकरितां आपल्या नूतन सरकारचे जिवापाड प्रयत्न चालले असतां, ज्ञानाचें पहिलें साधन जें निकोप

गद्य त्याचीच विटंबना करण्याचा विडा तिच्यांतील कवींनींहि उचलावा हें दुर्दैव होय !

पण या वाङ्मयीन प्रवृत्तींचा विचार करतांना थोडाफार युगमानाचा विचार मनांत आणणेंहि जरूर आहे. प्रयत्न, प्रयोग व पृथक्करण हे आजच्या युगाचे जणू प्रणवोच्चार आहेत. सुंदर वस्तु असो, कीं सुखदुःखात्मक घटना असो, तिचा सहजास्वाद घेण्याऐवजीं,—तिजशीं समरस होण्याऐवजीं, हटवादीपणानें तिची चीरफाड करण्याकडे या शास्त्रीय युगाचा कल अधिक आहे. त्यामुळें ज्याला संपूर्ण व्यक्तिमत्त्वानें (म्हणजेच खुल्या दिलानें) घेतलेला सहजानुभव म्हणतां येईल, त्याला आजचा मानव—निदान त्यांतील विज्ञानाभिमानी वर्ग—पारखाच झाला आहे ! अर्भकाचें चुंबन घेतांना अगर अर्धांगीला आलिंगन देतांनाहि तो 'वास्तववादी पृथक्करणा'चा अवलंब करील; आणि त्या मधुर अनुभवाचें वर्णन करतांना वक्रोक्तीचा आणि उपरोधाचा अवलंब करील ! आणि त्याच्या प्रत्यक्ष जीवनांत जर ही स्थिति नसेल तर त्याच्या काव्यांत तरी सर्वत्र 'नाटक' असलें पाहिजे;—'पोजिंग' असलें पाहिजे ! कारण जीवनांतील हे सदैव नूतन व सदैव सुंदर अनुभव ज्याच्या वांट्याला आले, त्याच्या काव्यांत सौंदर्य, कोमलता आणि कारुण्य यांचा मागमूसहि नाहीं – उद्वेग आणि बीभत्सता यांचेंच राज्य आहे, असें कां दिसावें ? आणि या कवींच्या वांट्याला बीभत्स अनुभवाखेरीज कांहींच आलें नाहीं असें गृहीत धरलें, तरी त्यांच्या कृत्रिम, क्लिष्ट आणि विक्षिप्त भाषेचें स्पष्टीकरण कोणतें ? सारांश, हें धड दुःखाचेंहि चित्रण नाहीं; प्रेमाचें तर नाहींच; हें फार तर कांहीं विचित्र पुस्तकी सिद्धान्तांचें चित्रण असेल !

सहजता, सुंदरता आणि कोमलता यांचे भोक्ते म्हणवणाऱ्या कवींनींच, अभ्यास-जडता आणि कर्कशता या दोन अवदसांशीं घरोबा केल्यावर, टीकाकारांना त्याच्याहीवर कडी करून दाखविल्यावांचून इलाजच उरला नाहीं ! काव्यसौंदर्याचें 'व्याकरण' करून टाकण्याची करामत आमच्या संस्कृत पूर्वजांनींच करून दाखविलेली ! अर्थात् आधुनिक शास्त्र्यांनीं त्याची केमिस्ट्री किंवा बीजगणित करून दाखविणें एवढेंच उरलें होतें. जें अनिश्चित, अनियमित व अचपळ आहे, त्याचेहि कायदे बांधून दाखविणें यांत मानवी बुद्धि व शास्त्र या दोहोंचाहि उत्कर्ष आहे, यांत शंका नाहीं. तथापि, काव्याचा आस्वाद आणि रचना या

39C39 वि: ...
...

दोन्हीहि क्रिया, बंधनांच्या आकलनावर अवलंबून नसून स्वैरतेच्या शक्तीवर (Capacity वर) अवलंबून आहेत. नियम बांधण्याकरितां मन घट्ट केलें, आणि त्याला घाबरलेल्या कवितेनें त्यांत प्रवेशच केला नाहीं तर? त्यापेक्षां मन मोकळें केलें, हृदय खुलें केलें, तर निदान त्यांत काव्याचा प्रवेश तरी होईल!

अध्ययन आणि पृथक्करण यापेक्षां कल्पनाशक्ति (Imagination) हीच काव्याच्या, व्यक्तीच्या अगर घटनेच्या अन्तरंगापर्यंत नेऊन पोहोंचविणारी शक्ति आहे. रचनेचाहि तीच प्राण आहे आणि आस्वादाचाहि तीच आधार आहे. पण 'कल्पकता' या शब्दालाहि अलीकडच्या कित्येक मराठी लेखकांनीं फार संकुचित अर्थ दिला आहे. चार रिकामटेकड्या कोट्या अगर चार पोकळ निरर्थक उत्प्रेक्षा करणाराजवळच काय ती कल्पकता आहे, अशी कित्येकांच्या टीका-लेखनावरून कल्पना होईल.

'कल्पनाशक्ति' अथवा 'Imagination' हा एक वास्तवता विसरण्याकरितां केलेला, दुर्बल पंखांचा फडफडाट नसून वस्तूच्या, घटनेच्या अगर कलाकृतीच्या अज्ञात आवृत अन्तरंगांत प्रवेश करण्याकरितां, कलावन्ताच्या मनानें स्वीकारलेली द्रवावस्था होय. कल्पनाशक्ति म्हणजे द्रष्ट्यानें दृश्याचें, कवीनें काव्यविषयाचें जीवन जगणें होय. सारांश, वर्ण्यविषयापासून दूर भराऱ्या मारण्याकरितां आणि अप्रस्तुत कोट्या-कल्पना करण्याकरितां, 'प्रतिभा' अथवा 'Imagination' हें साधन नसून, त्याच्याशीं तद्रूप होण्याचीच ती शक्ति आहे. पण वर्ण्यविषयाशीं तद्रूप झाल्यावर, ज्याला विज्ञानपूजक साहित्यिक 'वास्तवता' म्हणतात तीच हस्तगत होईल, असें मात्र नाहीं. प्रतिभावान् कवि, जीवनाशीं तद्रूप होऊन जें हस्तगत व चित्रगत करील, तें त्याचें 'रहस्य' असेल यांत शंका नाहीं; पण तें विज्ञानभक्तांना 'वास्तव' वाटेल असेंच चित्र असेल, अशी मात्र हमी देतां येणार नाहीं.

कल्पनाशक्तीचें मूळ तद्रूप होण्याच्या सामर्थ्यांत आहे; आणि तद्रूप होण्याचें सामर्थ्य प्रेम करण्याच्या सामर्थ्यांत आहे. याचा अर्थ ज्या ज्या वस्तूचें, घटनेचें अगर कल्पनेचें चित्र कलावन्त काढतो, त्या त्या कल्पनेवर त्याचें एकाच स्वरूपाचें प्रेम असतें असें नव्हे. शेक्स्पियर हॅम्लेटच्या मनोमय मूर्तीशीं ज्या अर्थानें तद्रूप झाला आहे, त्याहून वेगळ्या अर्थानें पोलोनियस्शीं तद्रूप

झाला आहे; किंवा माझ्या भाषेंत सांगावयाचें झालें, तर हॅम्लेट-संबंधीं शेक्स्पियरला वाटत आहे, त्याच प्रकारचें 'प्रेम' पोलोनियस्शीं वाटत नाहीं खास; परंतु पोलोनियसच्या अन्तरंगाचें तो इतकें स्पष्ट व इतकें रम्य चित्र काढतो, तेंहि प्रेमजनित तद्रूपतेमुळेंच ! तें प्रेम चित्रकाराला कोणत्याहि वैशिष्ट्यपूर्ण वस्तूविषयीं वाटणाऱ्या प्रेमासारखें असेल, किंवा हॅम्लेटविषयींच्या असाधारण आत्मीयतेमुळें शेक्सपियरला त्याच्याभोंवतालचें तें संपूर्ण दरबारी वर्तुळ प्रकाशित झालेलें व स्वच्छ दिसत असेल.

या मूलभूत बैठकींतच आजची कविता व्यंगयुक्त आहे. नवे कवि काव्य-विषयावर प्रेमच करूं शकत नाहींत, काव्यविषयाच्या चिंतनानें द्रव पावून, त्याच्या अन्तरंगांत शिरून, त्याचें अन्तर्दर्शन घेऊं शकत नाहींत;—नव्हे, त्यांचा या वृत्तीवर आणि या पद्धतीवर विश्वासच नाहीं ! मानसशास्त्र व समाजशास्त्र याच्या अनुरोधानें वस्तूचें पृथक्करण करणें व त्या पृथक्करणांतून हातीं लागलेल्या शास्त्रीय अहवालाचा नकाशा शक्य तितक्या विक्षिप्त, पण समकालीन शास्त्रीय संस्कृतींतील प्रतीकांनीं काढणें, हें त्यांचें तंत्र आहे. आणि हेंच तंत्र पत्करण्याचें कारण तरी तें त्यांना अपरिहार्य माध्यम वाटतें हें नव्हे ! कसेंहि करून जुने संकेत टाळणें म्हणजे प्रगति, ही त्यांची कल्पना आहे. आणि 'प्रगति' ऊर्फ 'कुठें तरी अधिक पुढें जाणें' एवढें एकच मूल्य ते कुठल्याहि क्षेत्रांत लावूं इच्छितात !

पण आधुनिकांच्या बहिर्मुखतेसंबंधीं केलेलें हें अल्पसें विषयांतर सोडून व आपल्या प्रेमजनित तद्रूपतेच्या उपपत्तीकडे पुन्हा वळून एक मुद्दा स्पष्ट केला पाहिजे. कलेंतील प्रेम व कलेंतील तद्रूपता, ही व्यवहारांतील आसक्तियुक्त तद्रूपते-सारखी नसते; व म्हणून 'ॲरिस्टॉटल काय कीं जुने भारतीय साहित्यशास्त्रज्ञ काय भावनात्मक अनुभवाच्या पुनरावृत्तीपलीकडे जात नाहींत', ही श्री. दि. के. बेडेकर यांनीं आपल्या हेगेलियन् कलामीमांसेंत व्यक्त केलेली भीति तितकीशी बरोबर नाहीं. हेगेलच्या Aesthetic Idea च्या सिद्धान्तानें जुन्या कलाविषयक कल्पना अधिक सुस्पष्ट झाल्या यांत शंका नाहीं. तथापि, जुन्या कलाविषयक तत्त्वज्ञांनाहि कलेंतील अनुभव व व्यावहारिक अनुभव यांतील फरक अवगत होता. शोपेनहौर हा कलेंतील अनुभवाचें वेगळेंपण सांगतांना, 'तो अनुभव will च्या अगर वासनात्मक जीवनाच्या बाहेरचा असतो' असें सांगतो. 'एक सुखावह आसन

या दृष्टीनें खुर्चीकडे पाहणें, आणि तिचेंच चित्र काढण्याकरितां तिजशीं तद्रूप होणें, या दोन अनुभवांत फरक आहे. विषयतृप्तीकरितां शृंगारांत बुडणें आणि काव्य-लेखनाकरितां शृंगारदृश्याशीं समरस होणें यांत फरक आहे. पहिल्यांत शृंगार आपल्याला व्यापतो; तर दुसऱ्यांत आपण शृंगाराला व्यापून उरतों. अशा उन्नत मनःस्थितींत होणारें जीवनानुभवाचें दर्शन वेगळें; आणि वासनांत आपादमस्तक बुडलेल्याला, व्यावहारिक हेतुपूर्ति म्हणजेच जीवन मानणाराला, दिसणारें जीवनाचें दृश्य वेगळें. सारांश, कलावन्त हाहि तत्त्ववेत्त्याप्रमाणेंच वैयक्तिक जीवनांत गाडला गेला नसल्यानेंच, तें अधिक स्पष्टपणें पाहूं शकतो.

या प्रेममूलक तद्रूपतेमुळें पोलोनियस्सारखा लोचट म्हातारा शेक्स्पियरच्या डोळ्यापुढें संपूर्णपणें, जिवंतपणें व रम्यपणें उभा राहिला. एखादा इतिहास-संशोधक एखाद्या जुन्या सरदाराचें जें अहवालवजा टांचण देईल; एखादा मानस-शास्त्रज्ञ त्याच्या मनोविकृतीचें जें पृथक्करण करील, त्यापेक्षां शेक्स्पियरनें काढलेलें चित्र वेगळें आहे व रम्य आहे एवढें खास. संशोधकानें काढलेलें चित्र अधिक 'वास्तव' कीं शेक्स्पियरचें अधिक 'वास्तव' हा प्रश्न, "वास्तवता म्हणजेच कला" हा सिद्धान्त कवटाळणारांनीं सोडवावा!

ज्या तद्रूपतेमुळें प्रतिभावन्त कवि जिवंत चित्रें निर्माण करतो, त्याच तद्रूपतेनें त्यांचा संपूर्ण अर्थहि काढावा लागतो. कलाकृतीचा अर्थ काढण्याच्या या पद्धतीला मी कोणतेंच नांव देऊं इच्छीत नाहीं. तथापि, "**एकच प्याला**"सारख्या श्रेष्ठ कलाकृतीकडे नव्या दृष्टीनें पाहण्याची आवश्यकता प्रतिपादण्याच्या निमित्तानें मीं जें विवेचन केलें आहे, त्याला श्री. दि. के. बेडेकर यांनीं '**आत्मनिष्ठ सौंदर्यवाद**' असें नांव देऊन, त्याचा अपुरेपणा दाखविण्याचा यत्न केला आहे. त्यांच्या मतें जुन्या बोधवादी कलामीमांसेहून, मीं अवलंबिलेली पद्धति अधिक खोल व फलप्रद असली, तरी हेगेलच्या कलास्वरूप-सिद्धान्ताच्या निकषावर घासल्यास ती अपूर्ण व सदोष ठरते.

कलावंताचें मन आणि कलाविषय यांच्या सन्निकर्षानें कलाविषयाचेंच स्पष्टतर चित्र निघतें, असें मी म्हणत आहें; व तो फिरून 'प्रतिबिंबवाद'च होतो, अशी श्री. बेडेकर यांस सकारण भीति वाटते. इंद्रियार्थसन्निकर्षानें काय, कीं द्रष्टा व दृश्य यांच्या सन्निकर्षानें काय, एक अपूर्व वस्तु निर्माण होते, हा

हेगेलियन् मंडळींचा आग्रह आहे. माझ्या मतें कलेच्या, प्रेमाच्या, सौंदर्यपूजनाच्या नजरेनें पाहणें, हें मुख्य आहे ; तसें पाहिल्यावर जी दिसते, ती वस्तु 'अपूर्व' असते, कीं तीच मूळ वस्तु असून, व्यावहारिक दृष्ट्या दिसलेली वस्तु हीच मुळीं असत्य व अपूर्ण असते हा प्रश्नच आहे ! हेगेलियन् मीमांसकांना, थीसिस्, ॲण्टीथीसिस् आणि सिंथेसिस्च्या त्रैराशिकांत बसविण्याच्या दृष्टीनें कदाचित् त्यांची उपपत्ति अधिक सोयीची वाटत असेल.

पण 'रुग्ण मनाचें चित्रण हाच कलेचा विषय आहे', असें सौंदर्यवादी मानतात.—निदान माझ्या 'ट्रॅजेडी'–विवेचनांत तरी तसें प्रतिपादिलें आहे, हें श्री. बेडेकर यांचें मत मात्र बरोबर नाहीं. ट्रॅजेडीमध्यें इतर वाङ्मय-प्रकारांहून अधिक खोल व तीव्र जीवनदर्शन असतें ; आणि उत्कट व अतिरेकी व्यक्ति शोकपर्यवसानाला जणू निमंत्रणच देतात, एवढाच माझ्या विवेचनाचा रोख होता.

श्री. दि. के. बेडेकर हे माझ्या ट्रॅजेडी-विवेचनासंबंधीं व आत्मनिष्ठ सौंदर्यवादासंबंधीं कांहींहि म्हणोत ; त्यांनीं हेगेलच्या कलास्वरूपशास्त्रासंबंधीं व भरताच्या रसकल्पनेसंबंधीं शास्त्रशुद्ध विवेचन करून मराठींतील काव्य-मीमांसेला अधिक तत्त्वज्ञानात्मक वळणावर नेण्याचा अभिनंदनीय यत्न केला आहे यांत शंका नाहीं. रससिद्धान्त कितीहि खोल व व्यापक असला, तरी अर्वाचीन टीका-पद्धतीच्या मानानें तो अपुरा आहे. त्याचा तो अपुरेपणा रसाच्या भरतप्रणीत संख्येंतहि नाहीं, कीं प्राचीनांच्या सदोष मानसशास्त्रांतहि नाहीं. जुने साहित्य-संप्रदाय—रस, रीति, औचित्य अगर ध्वनि, हे सर्वच, कलावन्ताचें व्यक्तिमत्त्व, त्याचा दृष्टिकोण, त्याच्या काव्यांतील साकल्यात्मक संदेश यांना मूलभूत स्थान न देतां कलाकृतींचा विचार करीत, हा त्यांचा खरा दोष व अपुरेपणा होता. आधुनिक व्यक्तिमत्त्वप्रधान कलाकृतींच्या आस्वादास—उदाहरणार्थ, आधुनिक मराठी काव्याच्या आस्वादास—तर जुनें साहित्यशास्त्र फारच अपुरें पडतें, असें मी व मजसारखे अनेक प्रतिपादीत होते. त्यांच्या म्हणण्याला श्री. बेडेकर यांच्या रससिद्धान्तविषयक संशोधनाच्या ओघांत अप्रत्यक्षपणें पुष्टीच मिळालेली आहे. द्वंद्वकल्पनेला प्राचीन तत्त्वज्ञानांत, आणि यज्ञसंस्थेला प्राचीन धर्मांत, जें खोल व प्राणभूत स्थान होतें, त्याचें महत्त्व ओळखल्यामुळें व ऐतिहासिक पद्धतीचा अचूक उपयोग केल्यामुळें तर बेडेकरांचें विवेचन आजपर्यंतच्या मराठींतील साहित्य-

शास्त्रीय विवेचनाहून अधिक खोल व सशास्त्र झालें आहे. तथापि, कोणाहि अर्वाचीन विवेचकाला ही दिशा सांपडलीच नाहीं, ही त्यांची कल्पना अहिताग्नि राजवाडे यांचे ग्रंथ वाचणारास बरोबर वाटणार नाहीं. यज्ञ व द्वंद्व (Polarism) याच दोन कल्पनांना राजवाड्यांच्या तत्त्वज्ञानांत मध्यवर्ती स्थान आहे. त्यांनीं प्रत्यक्ष रससिद्धान्तावर वेगळें लिहिलें नसलें, तरी कलास्वरूपशास्त्रावर अनेक ग्रंथांत जागजागीं लिहिलें आहे, व प्राचीन नाट्यावर दीर्घ व्याख्यानमाला गुंफलेली आहे. त्यांच्या वाङ्मयाकडे अर्वाचीन मंडळींचें व विद्यापीठांचेंहि लक्ष जात नाहीं, हें चालू युगप्रवृत्तीला धरूनच आहे. अखेर बेडेकरांसारखा एक कम्यूनिस्ट टीकाकार, राजवाडे यांच्या तत्त्वज्ञानाच्या अधिक नजीक पोहोंचतो, तर उलट प्राचीनाभिमानी विद्वान् त्यांना 'सनातनी' म्हणून सोडून देतात, ही एक अर्थपूर्ण घटनाच म्हटली पाहिजे !

मित्र हो ! कलास्वरूप-विवेचन हा विषय कितीहि आकर्षक असला, तरी आज आपण हे तात्त्विक प्रश्न पिंजण्याच्या मनःस्थितींत नाहीं, हें मी जाणतों. आज मानवी संस्कृतीच्या भवितव्यासंबंधींच आपण चिंतातुर झालों आहों. शास्त्राच्या साहाय्यानें यंत्रनिर्मिति करायची; आणि यंत्राच्या साहाय्यानें निसर्गावर विजय मिळवायचा; या मनोरथामागें धावत धावत मनुष्य आज सर्वनाशाच्या खोल दरीच्या कांठावर येऊन उभा आहे. त्याचें शास्त्रज्ञान व शस्त्रबळ त्याच्या मदतीला धावून येण्याऐवजीं ती दरी अधिक खोल खणण्यालाच मदत करीत आहे. अशा स्थितींत कलेच्या किमयेचा उलगडा करण्यांत मन कसें रमणार ?

तथापि, मानवानें खणून ठेवलेल्या या खड्ड्याचा कलेशीं कांहींच संबंध नाहीं, असें मात्र नाहीं. ज्या समाजाचें सूत्रबंधन सौंदर्यपूजन हें नसून 'नफापूजन' व 'सत्तापूजन' हें झालें, तो यापूर्वीच विनाशाच्या गर्तेत जाऊन पडला नाहीं, हेंच आश्चर्य म्हटलें पाहिजे ! यंत्राच्या आणि उत्पादनाच्या वाढीनें सर्व प्रश्न सुटतील असें मानण्यांत आधुनिक काळांतील कम्यूनिस्ट आणि कम्यूनिस्टेतर दोघेहि चुकत आहेत. अमेरिकेच्या पुरोगामी भांडवलशाहींत किंवा रशियाच्या मजूरशाहींत कलेला स्थान नाहीं असें नाहीं. तथापि, अमेरिकेंतहि जीवन कलेच्या अनुरोधानें रचलें जात नसून, उत्पादनाधिक्याच्या अनुरोधानें रचलें जात आहे;

तर रशियांत जीवन प्रचाराच्या आणि सत्ता टिकविण्याच्या अनुरोधानें रचलें जात आहे. एकांत कला नफेबाजांची दासी आहे, तर दुसऱ्यांत ती पक्षप्रचाराची आणि हुकूमशाहीची दासी आहे. प्राचीन भारतीय व ग्रीक समाजांत जीवनाचा आधार कला होती व कलेचा आश्रय धर्म होता. आज मात्र नफा व सत्ता यांखेरीज सर्वच गोष्टी निराधार आणि पोरक्या झाल्या आहेत!

आज जुना विविध विधियुक्त धर्म पुन्हा चालू करावा, अगर करतां येईलच, असें मी म्हणत नाहीं. तथापि, द्रव्यनिष्ठा आणि पक्षनिष्ठा यांच्यापलीकडे ज्या समाजाला धर्मच नाहीं, तो ॲटम बॉंबनें नष्ट झाल्यास इतिहासाला आश्चर्य वाटणार नाहीं, व व्यक्तिशः मला दुःख वाटणार नाहीं!

नव्या युगांत धर्माची जागा काव्य घेईल, या मॅथ्यू अर्नोल्डच्या म्हणण्यांत खोल अर्थ आहे. यज्ञादि विधि आणि स्वर्गनरकादि कल्पना मानवी मनाच्या गूढ आकांक्षांच्या व अनुभवांच्या बाह्य प्रतीकांसारख्या असतात. त्या कल्पना व ते विधि मागें पडले, तरी मानवी मनाच्या गूढ आकांक्षा नष्ट होत नाहींत. काव्यांत, गूढवादांत व साक्षात्कारानुभवांत, त्या व्यक्त व सफल होत असतात.

धार्मिक विधि एक वेळ मागें पडतील व मागें पडले तरी चालतील, परंतु काव्यप्रेम आणि गूढानुभवाच्या आकांक्षाहि मानवी समाजांतून नष्ट झाल्या, तर मनुष्य आणि पशु यांत फरक नाहीं; नव्हे तो पशूहूनहि आकांक्षाशून्य होईल.....तो 'यंत्र' होईल!

आणि आज शिक्षण, राजकारण, समाजरचना, भाषासुधारणा या सर्वांचा रोख कोणत्या दिशेनें आहे असें तुम्हांला वाटतें? माणसांचीं यंत्रें बनविण्याकडेच आहे! "माणसांनीं हातांनीं काय करावें यासंबंधींच नव्हे, तर मनांत काय आणावें यासंबंधींहि त्यास आजच्या युगांत सरकारी सूचना मिळत असतात". अशा अर्थाचे जे उद्गार सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीं परवां तत्त्वज्ञानपरिषदेंत काढले त्यांचा अर्थ हाच होता. माणसांचीं यंत्रें बनविणें हेंच मुळीं आध्यात्मिक मरण होय. पण शिवाय हीं यंत्रें बनलेलीं माणसें, अखिल मानवजातीचें मरण त्वरेनें ओढवून घेण्यांत गर्क राहतात, तें वेगळेंच!

आजच्या मानवजातीचे शत्रु दोन: राजकारणाच्या क्षेत्रांत असहिष्णुता; आणि विद्याकलांच्या क्षेत्रांत पुस्तकीपणा. 'दहा ग्रंथ वाचून अकरावा लिहिणें

म्हणजे वाङ्मय' ही कल्पना आहे, तोंपर्यंत खरें वाङ्मय निर्माण होणें शक्य नाहीं धर्माचे सिद्धान्तच नव्हेत, तर वाङ्मयाचे सिद्धान्तहि जीवनांत अनुभविणें आवश्यक असतें. ज्यांनीं प्रथम ते सिद्धान्त काढले त्यांनीं ते पुस्तकांत वाचून काढले नाहींत; ते स्वतःच जणू ते सिद्धान्त बनले होते. इतके ते त्यांत जगत होते, रमले होते. जें नवीन पुस्तक दिसलें तें वाचावयाचें व अशा प्रकारें झालेल्या अव्यवस्थित ज्ञानाच्या अपचनाचें प्रदर्शन, स्वतःच्या एका पुस्तकांत करायचें, ही आजच्या विपुल वाचनाच्या काळांतील स्थिति आहे. आजच्या युगांत चिंतनाला वेळहि नाहीं आणि किंमतहि नाहीं.

राष्ट्राराष्ट्रांच्या, धर्माधर्मांच्या व्यवहारांत जर विनाशाचें बीज कोणी पेरीत असेल तर तें Fanaticism ऊर्फ असहिष्णुता. सर्व राष्ट्रें माझ्या 'इझम्' चे अनुयायी होईपर्यंत, किंवा माझ्या पैगंबराचे अनुयायी होईपर्यंत त्यांचा उद्धार नाहीं, आणि मला धोका आहे, या कल्पनेंत 'फॅनॅटिसिझम्'चा उगम आहे. इतिहासांत राज्याच्या आशेनें अगर कीर्तीच्या आशेनें जेवढ्या कत्तली झाल्या नाहींत, तेवढ्या धार्मिक कडवेपणामुळें झाल्या आहेत. तो रानटी धार्मिक कडवेपणा आधुनिक ज्ञानानें कमी होण्याचें लांबच राहिलें, उलट राजकीय मताभिनिवेश धर्माभिमानाहून क्रूर आणि कडवा होत आहे! दुसऱ्यांना सक्तीनें अगर लांड्याल्बाड्यांनीं स्वधर्मांत अगर स्वपक्षांत आणणें हें सत्कृत्य आहे व त्यांत दुसऱ्यांचेंहि आपण कल्याण करतों, या कल्पनेहून घाणेरडी आणि घातुक कल्पना दुसरी कोणतीच नसेल. ही कल्पना जगांतील धर्मवेड्यांनीं व पक्षवेड्यांनीं सोडली, तर हिंदुस्थानांत व हिंदुस्थानबाहेर आज जे पाशवी प्रकार दिसत आहेत ते दिसणार नाहींत. कारण आधुनिक युगांत साम्राज्यशाही अगर भांडवलशाही यावर इलाज सांपडले आहेत. पण ही जी 'परकल्याणशाही' आहे, तिच्या आततायीपणावर मात्र इलाज सांपडत नाहीं!

'No liberty to the enemies of liberty!' असें, मला वाटतें, फ्रेंच रेव्होल्यूशनच्या नेत्यांपैकीं एकाचें वचन आहे: आजच्या युगांत "असहिष्णु धर्मांना आणि पक्षांना सहिष्णुता दाखविणें पाप आहे!" या मताचा आपण प्रचार केला पाहिजे.

पण असहिष्णु लोकांचे दोष कोणतेहि असले तरी त्यांना श्रद्धा असते. त्यांच्यापुढें उभे ठाकणाऱ्या आपली श्रद्धा कोणती? असहिष्णु लोकांशींहि

सहिष्णुतेनें वागणाराला केवढी हिमालयप्राय श्रद्धा असावी लागते, हें आपणाला गांधीजींनीं दाखवून दिलें; व आज जवाहरलालजी दाखवून देत आहेत. आपण निदान असहिष्णु संप्रदायापुढें पड खायची नाहीं एवढें ठरविलें, तरी आपली श्रद्धा कोणती? राजकीय सत्ता आणि वैज्ञानिक प्रगति यांनाच सर्वस्व मानावयाचें हम्टल्यास, आततायी संप्रदायांत व आपणांत फरकच नाहीं.

'मानवतावाद' हा आज आपल्यापुढें नवा धर्म म्हणून फेकला जात आहे. पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे विद्वान् प्रिन्सिपल बेन् हे 'मानवता' या भाववाचक कल्पनेच्या पूजेला मनसुराद हसत असत, असें अहिताग्नि राजवाडे सांगतात! ज्यांना एका पुरुषावर अगर एका स्त्रीवर प्रेम करतां येत नाहीं, ते चीनच्या, कोरियाच्या अगर पॅलेस्टाइन्च्या 'मानवते'वर प्रेम तें काय करणार? आणि त्यांचा धर्म तो कसा बनवणार? अशा पंचेंद्रियवान् जिवन्त माणसावर प्रेम करायला जर कोणी शिकवीत असेल, तर तो कवि,—कलावन्त शिकवितो. मनुष्य, देश, अगर निसर्ग, यांच्यावर प्रेम करायचें तर प्रथम त्यांचें सौंदर्य समजलें पाहिजे; ते प्रिय झाले पाहिजेत.

एक 'अनाथालय' म्हणून जगाची कींव करायची नसेल आणि जगावर खरेंखुरें प्रेम करायचें असेल, तर तुम्हांला हा प्रेमाचा धर्म कविच शिकवूं शकेल. आजच्या यंत्रग्रस्त आणि स्पर्धामूढ जगाला शुद्धीवर आणण्याचें काम कवि आणि कलावन्तच करूं शकतील.

डॉ. महंमद इक्बाल यांनीं आपल्या सामर्थ्यपूजक काव्यानें व तत्त्वज्ञानानें हेंच केलें. केशवसुत, तांबे यांनींहि सौंदर्यपूजेच्या द्वारें हेंच केलें. राजकारणाचें आणि विज्ञानाचें दास्य सोडतील, तर आजचे साहित्यिकहि हेंच कार्य आपआपल्या मगदुराप्रमाणें करूं शकतील. हाच साहित्यिकाचा धर्म होय; आणि आजच्या जगाला याच धर्माची वाण आहे. आजच्या महाराष्ट्राचें दैन्यहि या प्रेमाधिष्ठित सौंदर्य-दृष्टीनें व जीवननिष्ठेनेंच फिटेल!

मित्र हो! मी आपणांशीं बोलेन म्हणून ठरविलें होतें, त्याहून अधिक बोलून गेलों! कदाचित् माझ्या अधिकारापेक्षांहि अधिक बोलून गेलों असेन! पण रसिकता व ऋजुता यासंबंधींच्या आपल्या शहराच्या लौकिकामुळेंच मला थोडा अधिक बोलण्याचा मोह झाला असावा. शिवाय एखाद्या सिद्धान्ताचें मंडन अगर अनेक

ग्रंथांतील विद्वत्ताप्रचुर अवतरणें, यांच्या भरीस न पडतां, आजच्या काळांत व आजच्या परिस्थितींत मला जे अत्यंत निकडीचे वाटले, तेच विचार मी बोलून गेलों आहें. विद्वत्ता आणि ग्रंथाधार एखाद्यानें पुण्याहून अगर नागपूरहून येऊन बडोदेकरांना पेश करणें हास्यास्पद होईल. पण तळमळ आणि प्रेम लहानांनीं मोठ्यांना दाखविणेंहि चुकीचें होणार नाहीं. मजजवळ तर दुसरें कांहींच नव्हतें!

होतें तेंच आपण इतका वेळ गोड करून घेतल्याबद्दल मी आपले आभार मानतों.

♥ ♥

बडोदें येथील चवदाव्या वाङ्मय
परिषदेच्या अध्यक्षपदावरून
केलेलें भाषण : १९५१

मराठी साहित्य आणि भाषा
कांहीं समस्या

साहित्यप्रेमी बंधुभगिनींनो,

मराठी साहित्य संमेलनाच्या या वर्षीच्या—म्हणजे एकेचाळिसाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदीं माझी निवड करून आपण माझा जो बहुमान केला आहे, तो मी आपणां रसज्ञांचा आणि आपणां रसज्ञांच्याच हस्तें लाभलेला श्रीसरस्वतीदेवीचा कृपाप्रसाद समजतों. या मानाला मी पात्र आहें कीं नाहीं, हा प्रश्न माझ्या मतें अप्रस्तुत आहे, कारण सरस्वतीचा आणि सरस्वतीपूजकांचा कृपाप्रसाद म्हटल्यावर पात्रतेचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. पण आपण प्रेमामुळें आणि औदार्यामुळें पात्रापात्रतेचा विचार मनांत आणला नाहींत, तरी माझ्या मनांत तो आल्याखेरीज कसा राहणार? पण माझ्या अपात्रतेच्या शंभर गोष्टी मनांत आल्या, तरी माझ्या बाजूनें एक गोष्ट मात्र मनांत आल्याखेरीज राहात नाहीं; आणि ती म्हणजे विद्यालयीन शिक्षण संपवून व्यावसायिक जीवन सुरू केल्यापासून सतत अठ्ठावीस-तीस वर्षें मीं यथाशक्ति ह्याच एक उपासना केली आहे. पण माझी ही यथाशक्ति

उपासना सरस्वतीदेवीला सदय बनविण्याला पुरेशी आहे असें क्षणभर म्हटलें तरी त्या उपासनेच्या पुण्याईवर शेंकडों विद्वानांनीं, कवींनीं, लेखकांनीं, वाचकांनीं मंडित अशा या परिषदेला मीं मार्गदर्शन करायला धजावें असें मात्र नाहीं! कृपाप्रसादाला पदर पुढें करणें सोपें आहे, उजूहि आहे. पण मार्गदर्शनाला प्रवृत्त होणें हें मात्र माझ्या स्वभावाला थोडें अप्रशस्त वाटतें. पण ज्या क्षेत्रांत प्रायः सर्व आयुष्य वेचलें, त्या क्षेत्रांतली सर्वोच्च जबाबदारी आपल्यासारख्यांनीं मजवर सोंपवल्यावर, तिजपुढें आदरपूर्वक मान लवविणें हें मी माझें पवित्र कर्तव्य समजतों

अध्यक्षाची अथवा मार्गदर्शकाची भूमिका पत्करण्याला मला संकोच वाटत असला, तरी आपल्याशीं बोलायचें असें मजजवळ कांहींच नाहीं असें मात्र मी म्हणत नाहीं. तसें असतें तर माझ्या निवडीला मीं संमतिच दिली नसती. माझ्या महाराष्ट्रीय बांधवांना मी लहानमोठ्या व्यासपीठांवरून, माझ्या लहानमोठ्या लिखाणांतून गेलीं पंचवीस वर्षें जें सांगत आहें तें या सवाच्च मराठी पीठावरून सांगण्याला कांहीं विशेष अर्थ आणि विशेष फल आहे, याचीहि मला जाणीव आहे.

आणि तें सांगण्याची मी घाई करीत आहें असेंहि मला वाटत नाहीं. कांहीं प्रेमळ वृत्तपत्रकारांनीं माझी निवड म्हणजे 'तरुण' अध्यक्षाची निवड असें समजून मतदारांचें अभिनंदन केलें असलें तरी मी आज साठीच्या घरांत आहे हें मी स्वतः विसरूं शकत नाहीं! महाराष्ट्र सारस्वताच्या आणि संयुक्त महाराष्ट्राच्या आपल्यासारख्या भक्तांची गांठ गात्रें गलित झाल्यावर घेणें किंवा दैववशात् अजिबातच राहून जाणें हेंहि गैरच! १९५३ नंतर कांहीं वर्षें मीं कांहीं प्रापंचिक कारणांनीं या निवडीला संमति दिली नसली तरी अखेर आयुष्याच्या मर्यादिततेचा आणि आपल्या सदिच्छेचा विचार करून मीं या निवडीला संमति दिली, नव्हे, निवडीपूर्वीहि माझें मनोगत आपणांस कळविलें हें सांगण्याला लोकशाही निवडणुकीच्या काळांत मला कांहींच कमीपणा वाटत नाहीं. पण मला आपणांशीं आपल्या व माझ्या जिव्हाळ्याच्या कांहीं गोष्टींसंबंधीं बोलायचें असलें, तरी माझी आपणांला एक प्रार्थना आहे. माझ्या भाषिक मित्रांची, वाङ्मयीन समानधर्म्यांची आणि महाराष्ट्रप्रेमी देशबांधवांची एकत्र गांठ घेण्याची एक दुर्लभ संधि म्हणूनच मी हें स्थान स्वीकारीत आहें असें आपण समजावें; आपल्याला मार्गदर्शन करण्याला मी पात्र आहें, या कल्पनेनें नव्हे!

या वर्षीच्या अधिवेशनाच्या स्थळाचें माहात्म्य मीं आपणांला सांगायला हवें असें नाहीं. मिरज, सांगली, कोल्हापूर, बेळगांव या भागाला आपण सामान्यपणें दक्षिण महाराष्ट्र या नांवानें संबोधतों. महाराष्ट्राच्या भौगोलिक नकाशांत हा भाग महाराष्ट्राच्या केन्द्रस्थानीं नाहीं; – बेळगांव, कारवार तर महाराष्ट्राच्या सीमाप्रदेशांतच आहे. पण भौगोलिक नकाशापेक्षां ऐतिहासिक नकाशाच आपणां साहित्यप्रेमी मंडळींच्या अधिक परिचयाचा असतो. आणि एखाद्या देशाचें भौगोलिक केंद्र हेंच ऐतिहासिक केंद्र असेल असें नाहीं. आपल्या महाराष्ट्राचीच गोष्ट घेतली, तर महाराष्ट्राचा हरएक विभाग कुठल्या ना कुठल्या काळीं महाराष्ट्राचें ऐतिहासिक केंद्र, म्हणजेच कर्तृत्वाचें केंद्र बनल्याचें दिसून येईल. आपणां मराठ्यांच्या इतिहासांत कोल्हापूरचें माहात्म्य जगाला महशूर आहे. प्रख्यात पन्हाळगड, शूर राणी ताराबाई, हुकुमतपनाह रामचंद्रपंत अमात्य या इतिहासप्रसिद्ध नांवांबरोबरच अर्वाचीन काळांतल्या अनेक गुणज्ञांची व गुणिजनांचीं नांवें आपल्या डोळ्यांपुढें उभीं राहतील. सांगली, मिरज, बुधगांव, कुरुंदवाड, बेळगांव हा भाग इतिहासकाळांत जेवढा प्रसिद्ध होता त्याहूनहि अर्वाचीन काळांत अधिक प्रसिद्धीस आला. नाट्य आणि गायन, या दोन कलांबद्दल महाराष्ट्र गेल्या शतकाच्या मध्यापासून जो प्रसिद्धीला आला, तो या तथाकथित 'दक्षिण' महाराष्ट्राच्या सामान्य गुणिजनांमुळें आणि गुणज्ञ श्रीमंतांमुळेंच! कोल्हापूरकर छत्रपति आणि पटवर्धन सरदार यांच्या रसिक राजवटींत नाट्य-गायनासारख्या नाजुक कलाच काय त्या बहरल्या असें नाहीं; तर मल्लविद्या व तिचेंच युरोपीय भावंड जी 'सर्कस' तिच्यामुळेंहि हा भाग उभ्या आशिया खंडांत गाजला आहे. अशा या रसिक आणि कर्तृत्ववान् भागानें आजच्या राष्ट्रीय संक्रमणाच्या काळांत मराठी साहित्य संमेलनाच्या नांवानें बृहन्महाराष्ट्रांतल्या साहित्यिकांना आणि रसिकांना हांक दिल्यावर त्यांतून विचारांची सुस्पष्टता आणि हृदयाचें ऐक्य निर्माण झाल्याखेरीज राहणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

आधुनिक साहित्यांतील प्रपंचगौरव

जुने म्हणजे ब्रिटिश-पूर्व काळांतील मराठी साहित्यिक व आजकालचे मराठी साहित्यिक यांच्या भूमिकांत अगदीं मूलभूत फरक आहे. प्राचीन साहित्यिक परमार्थाच्या किनाऱ्यालगत तरी आपली नौका चालवीत असत, नाहीं तर परंपरेच्या कांठाकांठानें तरी जात असत. त्यांनीं आपली नौका परमार्थाच्या किनाऱ्यानें चाल-

विली म्हणजे स्वतःच्या अगर स्वसमाजाच्या ऐहिक जीवनाकडे दुर्लक्ष करणें त्यांना प्राप्तच असे. आणि त्यांनीं परंपरेचा कांठ पकडून ठेवला म्हणजे त्यांच्यावर आत्म-प्रकटीकरणाचा बोजा पडत नसे. या सर्वसामान्य वर्णनाला अपवाद नाहींत असें नाहीं. लावणीकार, बखरकार हे तर अपवाद आहेतच; पण रामदासांसारखे समाज-जागृत संतहि वरील वर्णनाला थोडेफार अपवाद होत. तरी पण स्थूलमानानें असें म्हणायला हरकत नाहीं कीं अलंकारिक काव्य लिहिणाऱ्या पंडित कवींना आत्म-प्रकटीकरणाची फारशी कदर नव्हती; तर तळमळीनें आत्मप्रकटीकरण करणाऱ्या संतकवींना स्वतःच्या अगर स्वजनांच्या ऐहिक जीवनाची पर्वा नव्हती. उलट प्रपंच-गौरव व अनुभूतिगौरव हें आधुनिक मराठी वाङ्मयाचें वैशिष्ट्य होय. बहुसंख्य प्राचीन कवि माणसांचे संत बनविण्याची उमेद धरीत, तर यच्चयावत् आधुनिक कवि माणसांना माणसें बनविण्याचा यत्न करतात. पण कांहींहि असलें तरी कच्च्या मालासारख्या, ओल्या मातीसारख्या संस्कारविहीन मानवाला संस्कारित करून कांहीं आकार देण्याचें कार्य कोणतेंहि राष्ट्रीय वाङ्मय करीत असतें. एकूणएक माणसांना मुमुक्षु आणि संत बनविण्याची मनीषा अशक्यप्रायच नव्हे, तर व्यर्थहि आहे. माणसांना सुसंस्कृत, कार्यकुशल, रसज्ञ, चतुर, समर्थ आणि संघटित बनविणें हें त्याहून अधिक अगत्याचें आणि अधिक शक्य कोटींतील आहे. आजकालचें वाङ्मय कळत नकळत हेंच कार्य करीत असतें.

आपण सामान्यपणें 'मानव', 'काव्य' व 'ऐहिक सुख' यांसारखे व्यापक आणि 'पघळ' शब्द वापरीत असलों, तरी मानवरूपीं तरूला कुठल्या ना कुठल्या संस्थारूप पाटवणांतूनच जीवन पोहोंचतें करावें लागतें, असें दिसून येईल. 'आकाशांतून उतरला आणि धरणीवर सांवरला' असा कोणताच मनुष्य असूं शकत नाहीं. आणि असा कोणी 'अदिमानव' आपण कल्पिलाच तर त्याला फार फार तर आहारनिद्रादि हीन प्रतीचींच सुखें पुरविणें शक्य होईल. यापलीकडचीं सुखें निर्मायचीं व द्यायचीं म्हटलीं, कीं संघटना, संकेत, परंपरा यांचा आश्रय करावाच लागणार. काव्य, संगीत, शिल्प इत्यादींची गोष्ट बाजूला ठेवली तरी साधे मैत्रीचें अथवा सहवासाचें सुख म्हटलें, तरी संघटना व संकेत हे आलेच. सामान्यतः चार्वाकपंथी मानल्या जाणाऱ्या एपिक्युरस् या प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यानेंहि मित्रसहवास हें इहलोकींचें प्रमुख सुख मानलें आहे. तो म्हणे 'आपल्याला काय खायला मिळणार आहे यापेक्षां तें कुणाच्या संगतींत खावें लागणार आहे, हें कळणें अधिक महत्त्वाचें आहे.' (It is more important to know with

whom we are to eat than what we are to eat.) पण हें मित्रसुखहि समान भाषा व समान राहणी यांवर बरेंच अवलंबून आहे. ज्याला आपण एक समाज म्हणतों तो, समान भाषा व समान राहणी यांच्या साहाय्यानें संविभक्त संसारसुख घेऊं शकणारा असा मानवसमूह असतो, असें म्हणतां येईल. भाषा आणि राहणी या दोहोंनींच संस्कृति बनत असते. समान संस्कृतींचीं माणसें सुलभतेनें संसारसुख घेऊं शकतात; सुलभतेनें संघटित होऊं शकतात आणि सुलभतेनें प्रगति करूं शकतात – म्हणजेच चारी पुरुषार्थांची वाट चालूं लागतात. समान संस्कृति हें सुखवर्धनाचें आणि पुरुषार्थसाधनाचें एक प्राथमिक आणि प्रमुख साधन आहे.

मराठी बांधवांची कृत्रिम विभागणी

मराठी भाषा बोलणारे आपण महाराष्ट्रीय बांधव ब्रिटिश अमलापूर्वीहि विभक्त होतों, ब्रिटिश अमलांतहि विभक्त होतों. ज्यांचीं कुलदैवतें एक, ज्यांचीं कुलव्रतें समान, ज्यांना सोयरिकीच्या निमित्तानें एकमेकाचा शोध काढीत कृत्रिम राजकीय सरहद्दीपलीकडे जावें लागे, अशीं महाराष्ट्रीय कुटुंबें राज्यकारभाराच्या दृष्टीनें मात्र एकमेकांना परप्रांतीय अथवा परकीय समजत ! ही विपरीत स्थिति शक्य तेवढ्या लवकर नाहींशी करण्याची मनीषा हिंदुस्थानामधील सर्वच प्रांतांनीं धरली होती. स्वातंत्र्याच्या आगमनानंतर तरी समभाषिकांचें हें विच्छेदन नष्ट होऊन एकभाषिक प्रान्त निर्माण होतील अशी आपण इच्छा धरली होती.

या पुनर्घटनेंत कांहीं अडचणी नव्हत्या असें नाहीं. बहुजनांचें मन हें बाल्का-सारखें विस्मृतिप्रवण असतें असें म्हणतात. पण या नियमाचीच दुसरी बाजू म्हणजे सामान्य जनतेला केवळ एका पिढींतच एखाद्या कृत्रिम, कामचलाऊ व्यवस्थेची इतकी संवय जडून जाते, कीं ती तात्पुरती व्यवस्था म्हणजे जणू त्रिकाला-बाधित प्रकृतीच ! मोंगलाईतल्या मराठी जिल्ह्यांना महाराष्ट्रांत येतांना अवघड वाटतें, – मराठी भाषा आणि परंपरा यांचा जाज्वल्य अभिमान असणाऱ्या विदर्भाला, महाराष्ट्रांत सामील होतांना भीति वाटते ! पण याहिपेक्षां नाजुक बाब म्हणजे सरहद्दीवरील शहरांची व खेड्यांची. ज्या प्रान्तांचीं माणसें शेंकडों वर्षें सरहद्दीवर सरमिसळ होऊन, दोन्ही भाषा सारख्याच सफाईनें बोलून गुण्यागोविंदानें राहिलीं, त्यांना नकाशांतील रेषा बदलतांना, हपिसांच्या पाट्या बदलतांना आणि मैलांच्या दगडावरचे आंकडे बदलतांना जणू राज्यें गेल्याइतकें दुःख होऊं लागतें !

आमचें दुःख वेगळेंच

हीं सर्व संभाव्य दुखणीं लक्षांत घेऊन, भाषिक विभागणीचा ब्रह्मराक्षस इतक्यांत जागा करूं नये असेंहि कित्येक विचारवन्तांना वाटत असे, हें प्रसिद्ध आहे. पण आपल्या मराठी भाषिक विभागाचें दुःख वेगळें, तीव्र आणि खरेंखुरें आहे. 'इतर प्रांतांना त्यांच्या न्याय्य वांट्याचें आहे तें देऊन आजच्या सरकारनें मराठी भाषिकांना तेवढें सवतीच्या पोरासारखें वागविलें.' हें आम्हां मराठी भाषिकांचें दुःख आहे. मुंबई शहराचा प्रश्न अवघड म्हणून द्विभाषिकाच्या लांबरुंद दुलईत लपेटून ठेवला गेला; – तर बेळगांव कारवारकडील सरहद्दीचा प्रश्न अवघड नसूनहि तेढीचा करून ठेवण्यांत आला. भाषिक अन्याय वेशीवर टांगणारांना, भाषिक लढा शेवटपर्यंत लढविणारांना, भांडकुढळ, अत्याचारी, विघ्नसंतोषी – व अखेर कम्युनिस्टधार्जिणे हीं साभिप्राय विशेषणें प्रतिपक्षाकडून लाविलीं जातात; पण गांधीजींचें तत्त्वज्ञान ज्यांच्या रोमरोमांत भिनलें आहे अशा बावनकशी एस्. एम्. जोशी यांच्यापासून ते पक्षातीत राजकार्यधुरंधर चिंतामणराव देशमुखांपर्यंत सर्वांना भांडकुढळ आणि कम्युनिस्टधार्जिणे ठरविणें सोपें नाहीं.

भाषिक ऐक्याचा सदैव पुरस्कार करणाऱ्या मराठी साहित्य संमेलनानें बेळगांवच्या साहित्य संमेलनापासून हा प्रश्न तळमळीनें आणि आवेशानें अखिल भारतीय जगतापुढें मांडला आहे; व या भाषिक, वाङ्मयीन, सांस्कृतिक व्यासपीठानेंच तो प्रथम मांडायला हवा हें खास. पण ज्या गोष्टी मुळांत कायद्याच्या रूपानें झालेल्या असतात व कायद्यानेंच बदलायच्या असतात, त्या अखेर राजकारणाच्या कक्षेंतच जातात. आज हा अन्याय धुऊन काढण्याकरितां जे आमचे पुढारी बेळगांव–कारवार भागांत लढा लढवीत आहेत त्यांना निःसंदिग्ध पाठिंबा व धन्यवाद देणें आमचें काम आहे. स्वकीय सरकारकडून अन्यायाचें परिमार्जन करून घेणें हें काम अधिकच नाजुक असतें. या नाजुक कार्यांत गांधीजींचें द्वेषरहित प्रतिकाराचें तंत्रच अपरिहार्य होय हें आज सर्व पक्षांना मान्य करावें लागत आहे. आमचे कानडी बांधव आणि आम्ही, आज शेंकडों वर्षें गुण्यागोविंदानें राहिलों आहों. इतकेंच नव्हे तर आम्हीं प्रायः संयुक्त संस्कृतिच निर्माण केली आहे. कर्नाटक आणि महाराष्ट्र यांनीं एकमेकांशीं जितका सांस्कृतिक विनिमय केला आहे, तितका दुसऱ्या कुठल्याहि प्रान्तांनीं केला नसेल. अशा दोन प्रान्तांच्या जनतांमध्यें खराखुरा बेबनाव निर्माण होणें अशक्यप्रायच आहे – आणि क्षणैक तसा बेबनाव झाल्यास तो टिकणें अशक्यप्रायच आहे. पण आज सीमालढा

लढविणारे आमचे बांधव खरोखरच एक असिधाराव्रत पाळून दाखवीत आहेत यांत शंका नाहीं. म्हैसूर राज्यांत जाण्याला कडवा विरोध करूनहि आपल्या कानडी शेजाऱ्यांसंबंधीं पूर्ण बंधुभाव बाळगणें हें खरोखरच एक अवघड व्रत आहे; व तें इतक्या कडकपणें पाळणाऱ्या आमच्या मराठी भाषिक बांधवांचा मला यथार्थ अभिमान वाटतो. पण स्वतः कन्नड भाषिक असूनहि शेजारधर्माला व न्यायबुद्धीला जागून ज्या आमच्या कानडी बांधवांनीं या सीमालढ्यांत आमच्यार्शी सहकार्य केलें, त्यांचा तर गौरव करावा तेवढा थोडाच आहे.

एक राजकीय पापशंका

मीं आपणांस प्रथमच सांगितलें आहे, कीं या भाषिक लढ्याकडे पाहण्याची आपणां साहित्यभक्तांची दृष्टि राजकारणी लोकांपेक्षां अधिक शुद्ध, सुस्पष्ट आणि सुसंगत असली पाहिजे. राजकीय पक्षांच्या हातीं एखादा प्रश्न गेला म्हणजे तर राजकारणबाह्य लोकांनीं आपल्या तारतम्य बुद्धीची विशेषच काळजी घेणें जरूर असतें. साधनांची शुचिता असो, कीं देशाचें अखंडत्व असो, कीं भाषिक प्रांतांची निर्मिति असो, राजकीय पक्ष त्यांकडे केवळ तत्त्वाच्या दृष्टीनें पाहणें अशक्यप्राय असतें. ज्या तत्त्वाला अगर कार्यक्रमाला ते या निवडणुकीच्या वेळीं पहिलें स्थान देतील, तिलाच पुढच्या निवडणुकीच्या वेळीं शेवटचें स्थान किंबहुना तिलांजलीहि देतील! याकरितांच प्रान्तरचनेसारख्या प्रश्नांची तड अखेर राजकारणी लोकच लावणार असले, तरी त्यांचें स्वरूप समजून घेण्याचें व देण्याचें काम मात्र आपलें आपणच केलें पाहिजे. म्हणून हें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे कीं, हा प्रश्न केवळ प्रान्तिक मुलुखगिरीपासून बचाव करण्याचा नसून राष्ट्रनिर्मितीचें भाषारूप हत्यार जतन करण्याचा, पाजळण्याचा व चातुर्यानें वापरण्याचा आहे. या विधायक दृष्टीनें भाषिक प्रान्तरचनेकडे पाहिलें, तर आजचे सरहद्दीचे आणि राजधान्यांचेहि तंटे पुष्कळसे टळतील. मराठी भाषिकांचें राज्य वाढविण्याचा किंवा अन्य भाषिकांवर हुकुमत गाजविण्याचा हा प्रश्न नसून सर्व मराठी भाषिक प्रजा एकत्र आणण्याचा व त्यायोगें महान् भारतीय राष्ट्राचा महाराष्ट्ररूप महाबाहु सबल आणि सज्ज करण्याचा हा यत्न आहे. मी या जटिल प्रश्नाला मिथ्या सुकरत्व चिकटवीत आहें, अशी शंका येईल. पण माझा तसा यत्न नाहीं. महाराष्ट्राच्या सरहद्दी आणि मुंबईसारखें आन्तरप्रान्तीय, —नव्हे आन्तरराष्ट्रीय शहर यांचे प्रश्न गुंतागुंतीचे आहेत. पण 'एक भाषा दुसरीवर राज्य करण्याचा यत्न करीत आहे'

ही शंका नष्ट झाली, तरच हे प्रश्न सोपे होतील...निदान साफ नजरेनें पाहिले जातील, एवढेंच मला सुचवायचें आहे. आणि ही राजकीय पापशंका नष्ट करायची असली, तर केवळ सांस्कृतिक, केवळ राष्ट्रसंवर्धनाची दृष्टि मनांत बाळगणें, सत्ता गाजविण्याची किंवा प्रधानमंडळांत वांटा मिळविण्याची दृष्टि टाकून देणें हाच मार्ग आहे.

एकदा अधिकार-विभागणीची आणि स्पर्धेची दृष्टि सुरू झाली कीं आपण एकमेकांपापासून कसे दूर जातों, तें अलीकडेच विदर्भांत ऐकूं येणाऱ्या सुरांवरून समजून येईल. माझे मित्र प्रो. यादवराव पाठक यांना मी अनेक वर्षें ओळखतों. कै. माधवराव पटवर्धनांमुळें मला जे कविमित्र लाभले आणि अलीकडे एकदोनदा नागपुरास भेटल्यावर ज्यांच्या मैत्रीचा गोडवा पूर्वीइतकाच कायम आहे असें मला आढळून आलें, त्यांत यादव मुकुंद हे एक आहेत. या रसिक आणि दिलदार कवीनें केलेल्या विदर्भ-साहित्य-संघाच्या वार्षिक संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांत पुण्या-मुंबईकडील अनेक लोकांच्या भावना दुखविण्यासारखीं विधानें असावींत हें दुर्दैव आहे. श्री. पाठक यांनीं उथळ, पोशाखी आणि दाक्षिण्यशून्य लोकांवर जी टीका केली, ती कुणाला आणि कितपत लागूं होते हा प्रश्न सोडला, तरी आधुनिक पिढींतल्या दुर्गुणांसंबंधींचा सात्त्विक संताप म्हणून त्यांच्या भाषणांतला तेवढा भाग महाराष्ट्रांतल्या सर्व भागांतील लोकांनींच विचार करण्यासारखा आहे.

दोषांची भौगोलिक विभागणी !

प्रो. पाठक यांच्या भावनांच्या सच्चेपणाबद्दल शंका घेणें मजसारख्या त्यांच्या परिचितांना तरी अशक्य आहे. पण आधुनिक शिक्षणानें आणि शहरी राहणीनें आपल्या सुशिक्षितांत शिरलेल्या दोषांची पाठकांनीं जी भौगोलिक विभागणी केली ती मात्र सदोष आहे. एकेकाळचा राजकीय दाखला द्यायचा झाला तर मी म्हणेन, – जहाल पक्षांतहि त्या काळीं जसे कांहीं मवाळ असत आणि मवाळांतहि जसे कांहीं जहाल असत, तशीच गोष्ट पाठकांनीं उल्लेखिलेल्या प्रांतिक गुणदोषांची आहे. क्षणभर आपण 'पुणेरी' या शब्दाचा कांहीं ठिकाणीं रूढ असलेला 'तुटक', 'आतिथ्यशून्य', 'असंतुष्ट' हा अर्थ खरा समजूं आणि 'वऱ्हाडी'–'नागपुरी' या शब्दांत पुष्कळदा सूचित होणारा 'उदार', 'सढळ', 'संतुष्ट' हा अर्थ खरा समजूं. विवेचनाच्या सोयीकरितां हे अर्थ खरे धरून मी असें म्हणेन कीं, पुण्यांतहि अनेक नागपुरी मनें आहेत;–आणि नागपुरांतहि कित्येक पुणेरी मनें आहेत. म्हणून

दुर्गुणांची ही भोगोलिक विभागणी माझे मित्र पाठक यांच्या प्रामाणिक पण क्षणिक क्रोधांतूनच निघाली आहे असें मी म्हणेन. पाठकांच्या सात्त्विक संतापामुळें आपण सर्वांनींच आत्मपरीक्षणाला प्रवृत्त झालें पाहिजे. यासंबंधांत मला एक गमतीचा योगायोग आठवतो. गेल्या नाताळांत मी मुंबईस गेलों असतां मुंबईतील एका प्रमुख दैनिकाच्या संपादकांच्या बोलण्यांत 'अंगुष्ठोदकांत' तरारलेल्या कित्येक नव्या विद्वानांसंबंधींचा हाच सात्त्विक संताप मला दिसून आला. पण त्या प्राचीन-विद्याविभूषित संपादकांनीं आधुनिक विद्वानांच्या दुर्गुणांचें मूळ मुंबई हें स्थलविशेष न ठरवतां औद्योगिक प्रगति व बकाली राहणी हें ठरविलें, हें लक्षांत घेण्या-सारखें आहे.

क्षणभर आपण असें गृहीत धरूं कीं कांहीं मराठी भाषिक शहरांत कांहीं विशिष्ट दुर्गुण आहेत. मग काय, तेवढ्याकरितां मराठी भाषिकांनीं एकमेकांपासून दूर राहायचें ? 'आम्हांला सवता-सुभा द्या' म्हणून दिल्लीपतींकडे 'दरखास्त' करायची ? जर आम्हां मराठ्यांसारखे सुजाण जागृत एकभाषिक लोक एकत्र नांदूं शकत नसतील, तर हा अवाढव्य बहुभाषिक, बहुधर्मी भारतवर्ष अर्वाचीन भेदनीतीनें बुजबुजलेल्या जगांत एकजुटीनें कसा उभा राहणार ? प्रो. पाठक यांनीं दाखवून दिलेल्या आधुनिक दुर्गुणांचा आपण चिन्तनीय म्हणून स्वीकार केला पाहिजे; पण पाठकांनीं वेगळ्या विदर्भ राज्याचा जो राजकीय इलाज सुचविला आहे त्याचा मात्र निराशाजनित विचार म्हणून ठामपणें अव्हेरच केला पाहिजे.

आरोग्य, प्रेम, ऐक्य यांच्यासंबंधीं मनुष्यानें यावज्जीव निराश होऊं नये, हें तत्त्व विदर्भात जन्मलेल्या एका आधुनिक महर्षीनेंच, डॉ. केतकर यांनींच, महाराष्ट्राला शिकविलें आहे. ज्या पापशंकांचा पाठकांनीं उच्चार केला, त्या आजच्या बेदिलीच्या जमान्यांत कुणालाहि, कुणाविषयींहि, मनांत आणण्यास प्रत्यवाय नाहीं. मुंबईसंबंधीं पुणेंहि त्या शंका घेऊं शकेल, पुण्यासंबंधीं कोल्हा-पूरहि त्या शंका घेऊं शकेल. शंकेलाच महत्त्व देऊन दूरदूर राहणें हा शंका-निरसनाचा, भय-निरसनाचा मार्ग खासच नव्हे. विश्वास धरून एकमेकांजवळ जाणें हाच त्यावर तोडगा आहे. किंबहुना दैववशात् आजवर दूरदूर राहिलों त्याचें फळ म्हणजेच या पापशंका होत !

आजच्या बौद्धिक जीवनाला जडलेला रोग

तथापि, एक गोष्ट मात्र विसरतां येत नाहीं. परंपरेचा व घरंदाजपणाचा धिक्कार, एकांडेपणाचा व बकाली राहणीचा गौरव, स्वैरता आणि अराजक

याचेंच तत्त्वज्ञान, हें आजच्या वाङ्मयीन व बौद्धिक जीवनाचें एक लक्षण होऊन बसलें आहे खास ! एकेकाळीं आपण पारतंत्र्य हें सर्व राष्ट्रीय दुर्गुणांचें मूळ समजत होतों. तें पारतंत्र्य जाऊन बारा वर्षें झालीं. पण आपल्यांतील दुर्गुणांची संख्या कमी होण्याऐवजीं अधिकच होत आहे कीं काय, असें वाटतें. आज आपल्यांतील पुढारलेल्या म्हणविणाऱ्या लोकांत जर कोणता प्रमुख दोष दिसत असेल तर तो म्हणजे वृथा पाश्चात्त्यानुकरण हा होय. वास्तविक इंग्रजी शिक्षितांच्या पहिल्या पिढींत हा दोष होता असें आपण समजतों; व तो चिपळूणकरांच्या निबंधमालेनें पार नाहींसा केला असेंहि मानतों. परंतु आपण गेल्या शंभर वर्षांचें सूक्ष्म अवलोकन केलें, तर एकच दोष वेगवेगळे मुखवटे घालून वावरतांना आपणांला दिसेल. कधीं ख्रिस्ती उपासनेचें अनुकरण करण्यांत आमच्या बुद्धिमन्तांना धन्यता वाटली; कधीं व्हिक्टोरियन् आचार-धर्माचें पालन करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना आपण गुरु मानलें; राजकारणांतहि शस्त्र म्हणून का होईना, आपल्याला त्यांचे मार्ग व त्यांचे शब्द पत्करावे लागले. (प्रसिद्ध 'काँग्रेस' हा शब्द हेंच दाखवितो.)व स्वातंत्र्याची चळवळ ऐन धामधुमींत असतांनाहि राजकीय, सामाजिक, वैज्ञानिक आणि वाङ्मयीन पुरोगामित्वाच्या नांवाखालीं आपण अनेक पाश्चात्त्य कल्पना आंधळेपणानें स्वीकारल्या. पण 'कल्पना स्वीकारल्या' हा शब्दप्रयोग म्हणजेहि आपला एकप्रकारें वृथागौरवच आहे. मी म्हणेन, अनेक लाटांपुढें आपण उतावीळपणानें व खेबळपणानें लोटांगण घातलें ! असल्या नेभळ्या पुरोगामित्वापेक्षां पुराणपूजक हट्टीपणा देखील कांहीं दृष्टींनीं निकोप होय असें म्हणतां येईल. पण परम आश्चर्याची आणि शरमेची गोष्ट म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हें अंध पाश्चात्त्यानुकरण अधिकच वाढीला लागलें आहे ! गेल्या चार पिढ्यांत पुनःपुन्हा संजीवन पावणाऱ्या या पाश्चात्त्यानुकरणाच्या मुळाशीं कांहीं दृढमूल भ्रम अथवा 'अविद्या' आहेत. त्यांतील प्रमुख भ्रम म्हणजे पाश्चात्त्यीकरण व अर्वाचीकरण यांचें अभिन्नत्व कल्पिणे हा होय. आधुनिक यंत्र-युगांत व चिकित्सा-युगांत आपणहि आपल्या मानसिक संवयी बदलल्या पाहिजेत हें खरें; पण 'पाश्चात्त्य रिवाज उचलणें म्हणजेच आधुनिक होणें होय' ही कल्पना मात्र खुळेपणाची आहे. अनेकदा असें दिसून येतें कीं, मनुष्य राहणीनें पाश्चात्त्य बनूनहि खराखुरा आधुनिक झालेला नसतो. आजच्या शहरी राहणीकडे आपण थोड्या बारकाईनें पाहिलें, तर त्यांत पाश्चात्त्य सुखसोयींचाच केवळ नव्हे,—

पाश्चात्त्य पोषाखाचाच केवळ नव्हे, तर पाश्चात्त्य आहाराचा, विहाराचा व शिष्टाचाराचा फार खोलपर्यंत प्रवेश झाला आहे. दसऱ्याच्या दिवशीं सांकेतिक सोनें लुटणें किंवा संक्रांतीच्यादिवशीं प्रेमप्रतीक म्हणून तिळगूळ देणें हे स्वकीय रिवाज ज्यांना गौण अथवा हास्यास्पद वाटतात, त्यांनाच पाहुण्याच्या आरोग्या-प्रीत्यर्थ पेल्याला पेला भिडविणें, वाढदिवसानिमित्त मोठ्ठा 'केक' कापणें, बासुंदी-पुरीची मेजवानीहि टेबलावर देणें या विलायती तऱ्हा मोठ्या अर्थपूर्ण वाटतात! नव्हे, या आंग्ल आन्हिकांत कांहीं चुकलें तर ब्रह्महत्येचा दोष घडल्यासारखें वाटतें! आमच्या पुढारलेल्या मेजवान्यांत अतिथिपत्नी व यजमानपत्नी यांनीं आंग्लस्मृत्यनुसार भाविकपणें एकमेकींच्या जागा घेतलेल्या पाहिल्या म्हणजे तर मला हंसावें कीं रडावें हेंच समजत नाहीं!

जें जें महाराष्ट्रीय तें तें मागासलेलें?

या सर्व हास्यास्पद अनुकरणाच्या मुळाशीं खोटा न्यूनभाव असो, कीं खोटें आधुनिकत्व असो; त्याचा फार खोल असा परिणाम आपल्या श्रद्धेवर, स्वाभिमानावर, औचित्य-कल्पनांवर व सौंदर्य-कल्पनांवर होत आहे, यांत शंका नाहीं. जें जें परंपरागत, जें जें भारतीय, विशेषतः जें जें महाराष्ट्रीय, तें तें मागासलेलें, सनातनी आणि त्याज्य, अशी आपली ठाम कल्पना होत आहे. जेव्हां आपण पाश्चात्त्य रिवाजांपुढें मान लवविलेली नसेल, तेव्हां निदान अ-महाराष्ट्रीय रिवाजांपुढें मान लवविली असेल. आमची तरुण पिढी 'नमस्कार!' म्हणायला लाजते,– 'नमस्ते!' म्हणण्यांत नवेपणा आणि सफाई आहे असें तिला वाटतें. पण पितृतुल्य व्यक्तींना किंवा नेहरूंसारख्या पूज्य पुढाऱ्यांना 'नमस्ते' म्हणजे 'तुला नमस्कार' म्हणणें, हा 'शिष्टाचार' नसून 'अशिष्टाचार' होय, हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. पण पितरांना आणि नेत्यांना 'अरे' 'तुरे' करण्यांतील अनौचित्यापेक्षां कुठलेंहि कारण नसतां शेंकडों वर्षांचा रिवाज सोडण्यांतील गुलामी वृत्ति मला अधिक तिरस्करणीय वाटते. ज्या प्रांतांत 'अदाब अर्ज' हाच शिष्टाचार होता, त्यांनीं आपला नूतन सांस्कृतिक व्रतबंध करण्या-करितां 'नमस्ते' सारखा प्रणामशब्द घाईघाईनें काढला असला, तरी शिष्टाचार आणि इतिहास यांत संपन्न असलेल्या महाराष्ट्रीयांनीं कुणा दुर्दैवी कुलहीनाप्रमाणें, दिसेल त्या नव्या शिष्टाचाराच्या गळ्यांत पडणें मला शोचनीय वाटतें.

जो समाज दुसऱ्याच्या संस्कृतींत शिरण्याचा यत्न करतो, त्याला त्या संस्कृतीच्या शेवटच्या पायरीवर उभें राहावें लागतें असा नियम आहे. इंग्रजी भाषा, इंग्रजी शिष्टाचार व इंग्रजांचे भारतीय इतिहासाबद्दलचे सिद्धान्त म्हणजे वेदवाक्य समजल्यानें आमचे विद्वान् अखेर 'आंग्लशूद्र' या पदवीला पोहोंचले, असें ज्ञानकोशकार केतकरांचें मत होतें. महाराष्ट्रीयांनीं आधुनिक व्हावें, पाश्चात्यपूजक होऊं नये; – आंग्लपूजक तर प्राणान्तींहि होऊं नये. महाराष्ट्रीयांनीं भारताचें ऐक्य व सामर्थ्य वाढवावें; पण त्याकरितां मराठी भाषा व मराठी रिवाज सोडला पाहिजे असें मात्र नाहीं.

आपण भाषिक सरहद्दीबद्दल चिन्तातुर आहोंत. पण भाषिक आणि सांस्कृतिक चंचुप्रवेशाबद्दल – 'Infiltration' बद्दल म्हणा हवें तर! — बेफिकीर आहोंत. जेव्हां आमची भारतीय नभोवाणी मराठी कार्यक्रमांत 'भीमसेन जोशी' किंवा 'पुष्पलता कुलकर्णी' पूरिया धनाश्री 'प्रस्तुत करतील' असें जाहीर करते, तेव्हां माझ्या कानांना होणाऱ्या वेदना भीमसेनांच्या गायनानें व पुष्पमालाबाईंच्या व्हायोलिन्-वादनानेंहि शान्त होत नाहींत! आजचे मराठी 'अनाउन्सर' तंबोऱ्याऐवजीं 'तन्पुरा' म्हणण्यांत धन्यता मानीत आहेत! 'पखवाजवर' असा सामान्यरूपविहीन प्रयोग करून हिंदी-सदृश मराठी जन्माला घालीत आहेत! या नव्या मराठीचा परिणाम नव्या पिढीवरच विशेष होणार असल्यानें तिच्या रक्षणार्थ स्वतंत्र **बालसाहित्य परिषद्** वेळींच भरविणारांचे आभार मानले पाहिजेत.

नीतीचें मूळहि सौंदर्यभावनेंतच

शिष्टाचारांतील आणि शिष्ट भाषेंतील परदेशानुकरणाची व परप्रांतानुकरणाची ही उतावीळ उपेक्षणीय नाहीं. कारण तो म्हणजे एका गुप्त सामाजिक रोगाचें प्रकट लक्षण होय. औचित्यकल्पना आणि सौंदर्यकल्पना केवळ कलेच्याच मुळाशीं असतात असें नव्हे, तर नीतीच्याहि मुळाशीं असतात. ज्या समाजाच्या औचित्यकल्पना ढांसळल्या, ज्याचा सौंदर्यावरचा विश्वास उडाला, तो समाज नीति, एकता, प्रेम, स्वाभिमान यांनाहि पारखा झाल्याशिवाय राहात नाहीं. मानवी हृदयांत वास्तव्य करणारें सौंदर्यप्रेम हें केवळ वासनातर्पणहि नव्हे, कीं रिकामपणची करामतहि नव्हे. मानवी संस्कृतीची वाढच मुळीं सौंदर्यप्रेमांतून झाली आहे.

मनुष्याच्या राहणीचा दर्जा उच्चतर होण्याला आर्थिक सुबत्ता ही केवळ सामग्री पुरविते; पण उच्चतर सांस्कृतिक पातळींची ओढ मूळ आपल्या सौंदर्यप्रेमांत उगम पावते. स्त्री-पुरुषांच्या अन्तःकरणांत वास्तव्य करणाऱ्या सौंदर्य–प्रेमांत शरीर-विलासांचाच केवळ उगम आहे असें नव्हे, – केवळ कलांचा उगम आहे असेंहि नव्हे; – तर दाक्षिण्य, विनय, शिष्टाचार, धार्मिक विधि, सामाजिक समारंभ यांचाहि उगम आपल्या जन्मजात सौंदर्यप्रेमांतच आहे. आपल्या भारतीय संस्कृतींतील, म्हणजेच राहणींतील, शुभाशुभांची आणि मांगल्यांची कल्पना म्हणजे दैनंदिन आहारनिद्रादि क्रियांनाच सुंदर बनविण्याची धडपड आहे. शुभत्वाच्या आणि मांगल्याच्या कल्पनेंत आकर्षकता, उचितता आणि अर्थपूर्णता यांचें चमत्कारिक पण अपूर्व मिश्रण आहे. आणि हेंच मिश्रण आपल्या भारतीय जीवन-पद्धतींत अथवा आचारांत आहे. संसारासंबंधींची ही सुंदर, सार्थ आणि मंगल कल्पना म्हणजे श्रेष्ठ वाङ्मयाचा एकीकडून आधार होय, तर दुसरीकडून हेतु होय. संसारा-संबंधींच्या मांगल्यकल्पनेमुळें आपण ललित वाङ्मय लिहायला प्रवृत्त होतों, तर उलट ललितोदात्त वाङ्मयप्रकारांनीं जीवनाला अधिकाधिक मांगल्य येत जातें.

विधिनिषेधरूप धर्माच्या अवनत अवस्थेंत शुभाशुभ कल्पनांना आपल्याकडे अगदींच पोरकट स्वरूप आलें हें खरें. परंतु संस्कार-कल्पना आणि शुभत्व-कल्पना या आपल्या संस्कृतींतील प्राणभूत कल्पना आहेत असें आढळून येईल. मुळांत सुंदर आणि असुंदर, मंगल आणि बीभत्स यांचें मिश्रण असलेल्या मानवी जीवनाचा स्वीकार मांगल्याच्या वेदीवरून करणें हाच या दोन्ही कल्पनांचा उद्देश आहे. किंबहुना ज्याला शुभत्वाची चाड असेल तोच संस्कारवान् अथवा द्विज होय,— ज्याला शुभाशुभ कांहींच नाहीं तो शूद्र होय हीच कल्पना—'शूद्रस्याशुभं नास्ति' या प्राचीन वचनांत सूचित झालेली आढळते. ज्याला जर्मन तत्त्ववेत्ता नीत्झे हा जीवनासंबंधीं स्वीकाराची अथवा 'प्रवृत्तिरूप' 'Yea-Saying attitude' म्हणतो, ती भावना निर्माण करणें, व त्या भावनेला अनुकूल असें जीवन निर्माण करणें, हा साहित्याचा आणि संस्कृतीचा हेतु आहे. हीच खरी विधायक मानवी वृत्ति होय. क्वचित् या विधायक, Yea--Saying, अथवा मांगल्यपूर्ण, सौंदर्य-पूर्ण प्रवृत्तीला विरोधी अशा 'निवृत्ती'चाहि पुरस्कार आपल्या धर्मांत केलेला आढळेल. पण धर्म हें संस्कृतीचें एक अंग आहे; – धर्म म्हणजे संपूर्ण संस्कृति

अनुक्रम ३२८३९ वि. १-१२-६५
क्रमांक २३५७ नों. दि. ६।१२।६५

नव्हे. आणि धर्मांतहि निवृत्तीचें स्तोम माजलें तें बौद्धापुढें आणि मुसलमानांपुढें आपण हार खाल्ल्यावर माजलें.

आजचा उनाड निराशावाद

निवृत्ति, विरक्ति आणि नैराश्य यांना कोणत्याहि निकोप संस्कृतींत मुळींच स्थान नसतें असें नव्हे. उथळ अनुरक्ति आणि पोरकट आशावाद तावून सुलाखून निघण्याकरितां नैराश्यरूप अग्निप्रवेश अपरिहार्य असतो. 'आगीशिवाय कढ नाहीं आणि मायेशिवाय रड नाहीं' अशी आपल्या भाषेंत म्हण आहे. याचा अर्थ निराशा यायलाहि मुळांत आशा असावी लागते. या सत्याचा आजच्या उथळ बाजारी युगांत खोल विचार व्हायला हवा. आशावादांतील पोरकटपणा व अनुरक्तींतील दुबळेपणा चव्हाट्यावर आणण्याचें कार्य मागच्या पिढ्यांनीं केलें. पण पोरकट आशावादाप्रमाणेंच उनाड निराशावादहि असूं शकतो, हें सांगण्याचें कार्य आजच्या टीकाकारांनीं करणें जरूर आहे. निराशावादांतून तावून निघाल्यावर आशावाद अधिक पक्व होतो;—उलट निराशावादालाहि मूळच्या सच्च्या मधुर आशावादामुळेंच करुणगंभीर रूप येतें. पण आजच्या असात्त्विक आणि उथळ युगांत ज्याच्या मुळाशीं मूळचा मधुर पण दग्ध झालेला आशावाद नाहीं, असा एक स्वयंभू, उनाड, चैनी निराशावाद निघाला आहे! या निराशावादाचें उथळ असात्त्विक रूप ओळखणें वस्तुतः कठीण नाहीं. पण सात्त्विक लोकांचें वैशिष्ट्य हेंच कीं, अगांतुकाला अगांतुक म्हणायलाहि त्यांना संकोच वाटतो, भामट्याला भामटा ठरविणेंहि त्यांच्या जिवावर येतें. सारांश, आजच्या युगांतील एक वाङ्मयीन सम्प्रदाय 'मायेशिवाय रड नाहीं' ही म्हण खोटी पाडून दाखवीत आहे! कशावरहि प्रेम नसतां नैराश्याचीं गीतें गाणें, कुठल्याच उच्च आदर्शाची ओढ नसता जुने आदर्श ओढून काढणें, सौंदर्याची प्रेरणा नसतांच काव्यनिर्मितीला प्रवृत्त होणें, हें आजच्या एका वाङ्मयीन सम्प्रदायाचें खास लक्षण आहे. या सम्प्रदायांत 'सौंदर्याचा' अभाव आहे असें नव्हे, तर सौंदर्याच्या आकांक्षेचाच अभाव आहे. जुगुप्सा ही या संप्रदायाची प्रेरणा आहे; तर औचित्यभंग हें त्याचें सवंग आणि ग्राम्य असें तंत्र आहे.

वाङ्मय म्हणून या सम्प्रदायाचें परीक्षण करण्याचा माझा हेतु नाहीं. कारण मीं तें माझ्या लिखाणांत अनेकवार केलें आहे. गेल्या वर्षीच्या सन्मान्य अध्यक्षांनींहि

तें मोठ्या तळमळीनें आणि मार्मिकतेनें केलें आहे. मी आज या वाङ्मयाकडे गुप्त समाजरोगाचें दृश्य लक्षण म्हणून पाहात आहें. जीवनांतील सौंदर्य, अर्थ व औचित्य यासंबंधींच ज्यांना अश्रद्धा उत्पन्न झाली, आणि त्याअश्रद्धेमुळेंहि विषाद न वाटतां ज्यांना एक प्रकारचा अमंगल उत्साह वाटत आहे, त्यांचें वाङ्मय सौंदर्यशून्य, अर्थशून्य आणि बीभत्स न झालें तरच नवल! जगद्विख्यात इतिहासाचार्य प्रो. टॉयनबी यांनीं आजच्या युगांतील कलेची मीमांसा अशीच केली आहे. ते म्हणतात,

"We have wilfully cast out of our souls; the great Masters who have been the familiar spirits of our forefathers, and, while we have been wrapped in self-complacent admiration of the spiritual vacuum that we have created; a Tropical African spirit in music and dancing and statuary has made an unholy alliance with a pseudo-Byzantine spirit in painting and bas-relief,.....the decline is not technical in its origin but spiritual." इतिहास-तत्त्वज्ञ टॉयनबी आजच्या सांस्कृतिक शक्तिपाताला Spiritual decline हे शब्द लावीत आहेत. इंग्रजींतील 'स्पिरिच्युअल' या शब्दाचें मराठी भाषांतर 'आध्यात्मिक' असें करतां येत नाहीं, हें आपल्याला सांगायला नकोच. आज पाश्चात्त्य समाजांत जें काय ढासळलें आहे–आणि ज्या पाश्चात्त्य दोषांच्या दर्शनानें आमच्याकडेहि कांहीं रोगभावना अभिमानास्पद ठरूं लागल्या आहेत त्या ऱ्हासाला व दोषांना आध्यात्मिक म्हणण्यापेक्षां भावनात्मक म्हणणेंच अधिक रास्त होईल. आज हळुवारपणा हें दौर्बल्य वाटूं लागलें आहे;—परंपरापालन म्हणजे शिळेपणा, निर्जीवपणा वाटूं लागला आहे; आणि औचित्य ही एक 'भंजनीय' वस्तु वाटूं लागली आहे. पण वस्तुस्थिति उलट आहे. हळुवारपणांत कलेचा उगम आहे, तर परंपरेंत तिचा सुखद प्रवाह आहे. परंपरारूप माध्यम अचेतन वा सचेतन बनविणें हें वापरणारावर अवलंबून आहे. परंपराहि जिवन्त बनवितां येते–आणि बंडखोरीहि निर्जीव ठोकळेबाळ असूं शकते.

आजच्या औचित्यद्वेषाचें विश्लेषण

हळुवारपणाचा, संयमाचा आणि औचित्याचा एवढा तिटकारा आपल्या जीवनाच्या आणि कलेच्या क्षेत्रांत एकदम कसा उद्भवला हा प्रश्न मानसशास्त्रज्ञाला

गुंग करून टाकण्यासारखा आहे. पण थोड्या अवलोकनान्तीं त्याचा छडा लावणें कठीण नाहीं. 'जें जें आधुनिक तें तें शिरोधार्य होय'; 'जें जें पाश्चात्य तें तें आधुनिक होय'; उलट 'जें जें परंपरागत आणि भारतीय तें तें दुर्बल, हास्यास्पद आणि त्याज्य होय.' अशी ही उथळ सिद्धान्तांची सांखळी आहे. काव्यांत भावनापूजन, जीवनांत परंपरापालन आणि कुठल्याहि स्वरूपाचा आदर, स्त्री-जीवनांत; त्या आदराचें आणि संयमाचें लज्जेच्या रूपानें दिसणारें गोड रूप; हे सर्व गुण 'जुने' म्हणजेच दुर्बल आणि दुर्गुणप्राय ठरविण्यांत आले आहेत. उत्तानपणा, निवरपणा, उद्धटपणा, संकोचशून्यता या सर्व दुर्गुणांना शौर्याचें आणि बंडखोरीचें पद देण्यांत आलेलें आहे. या 'क्रान्ती'चीं मुलें--आर्थिक हलाखी, दुसरें महायुद्ध वगैरेंत नेऊन पोहोंचविण्याचा आधुनिक शिरस्ता मला माहीत आहे. पण अलीकडेच हिंदुस्थानांत व्याख्यान देऊन गेलेल्या एका डॅनिश विद्वानानें आपल्या अवलोकनांत आलेली जी साधीच गोष्ट सांगितली तिचा इथें अधिक संबंध आहे असें मला वाटतें. तो म्हणाला, "आधुनिक सुशिक्षिताला जर कशाची सर्वांत अधिक धास्ती वाटत असेल तर ती जुनें ठरण्याची! या भीतीपायीं तो काव्यापासून ते पोषाखापर्यंत कांहींहि फेकून द्यायला क्षणांत तयार होईल!"

जुनें ठरण्याच्या भीतीबरोबरच नवनिर्मितीच्या चुकीच्या कल्पनाहि आज जीवनांत व कलेंत अराजक माजवीत आहेत. नवा अनुभव व तो व्यक्त करण्या-करितां नवा वाङ्मयप्रकार हा आजचा नवा संकल्प होऊन बसला आहे. या नावीन्याच्या वेडाचें पर्यवसान म्हणजे अनुभूतिग्रहणाचें आणि अनुभूतिचित्रणाचें साधन 'हृदया'ऐवजीं 'मेंदू' बनणें हें होय. अनुभवाशीं तादात्म्य पावण्या-ऐवजीं त्याचें विश्लेषण करण्यानें--आणि तेंहि एखाद्या पुस्तकी सिद्धान्तानुसार करण्यानें --जीवनाचा गाभा हातीं लागेल ही आजच्या नवसंप्रदायाची कल्पना आहे. आणि वाचकांचें हृदय आकर्षकतेनें काबीज करण्याऐवजीं विपरीततेनें प्रक्षुब्ध करणें हें अभिव्यक्तीच्या नावीन्यामागचें सूत्र आहे. प्रेम, आवड, आनंद आणि तन्मूलक तादात्म्य यांत कलाकृतीचा उगम आहे; केवळ नावीन्य व प्रयोग एवढ्यानें कला निर्माण होत नसून नावीन्याबरोबरच सौंदर्याचीहि निर्मिति व्हायला हवी, या गोष्टीचा आज विसर पडत आहे. 'प्रयोग' या शब्दाला आज 'प्रणव' शब्दाचें पावित्र्य येऊन बसलें आहे. जीवनांत काय कीं कलेंत काय,

अन्तर्जीवनाच्या कंगालपणामुळें परिचित विश्वावर चिद्रूप वेड्याच्या इस्पितळांतील प्रयोग करीत सुटणें याला कितपत महत्त्व देतां येईल हा एक प्रश्नच आहे.

विख्यात कलामीमांसक आनंदकुमारस्वामी हे असल्या प्रयोगबाजीबद्दल म्हणतात :

"Each seeks to invent an artistic esparanto unmistakably his and his alone."

आणि यावर भाष्य करतांना एक विख्यात अरविंद-संप्रदायी कलामीमांसक म्हणतात :

"The result is artistic bareness. Each is trying to work out an intellectual theory or follow some mental idea, not expressing his vision or inspiration. If it was that, our inmost soul would respond to it with a spontaneous understanding and sympathy".

या आधुनिक प्रयोगांच्या मागें एक गृहीत महासिद्धान्त आहे. "परिचित तंत्र किंवा रूढ शैली कलेची हानि करते, कारण या पिढीजाद आणि पायघोळ पोषाखामुळें 'विवृत्त-जघना' वास्तवतेचें दर्शन होत नाहीं!" हा तो महासिद्धान्त होय.

पण सत्य हें अशा आवरणानें झांकलेंहि जात नाहीं कीं असल्या अनावरणामुळें उघडेंहि होत नाहीं. सत्याच्या दर्शनाला तादात्म्याची गरज असते. तादात्म्याला प्रेमाची, सहानुभूतीची आणि मनःप्रसादाची गरज असते. तें प्रेम आणि तो मनःप्रसाद नसतां केवळ जुन्या तंत्राची व शैलीची मोडतोड करण्यानें सत्यहि हातीं लागणार नाहीं कीं सौंदर्यहि हातीं लागणार नाहीं. तामसीपणा, अवडंबर आणि बौद्धिक कसरती यांच्या बळावर आज सांप्रदायिक वाङ्मय निर्माण करणारांत परस्परांतहि समजूत पडणें दुरापास्त आहे. मग इतरांना त्यांत काय बोध होणार?

नवी असहिष्णुता : दंभ!

या संप्रदायांतून एक नवी असहिष्णुता आणि दंभ मात्र निर्माण होत आहे. तांबे, टागोर किंवा महर्षि अरविंद यांच्या काव्यासंबंधीं उपहासानें बोलायला

ज्यांना कांहींच वाटत नाहीं, त्यांनाच नववाङ्मयासंबंधानें अनादर दाखविला कीं लगेच विध्वंसक टीका केल्याचा धक्का बसतो ! तंत्रशून्यतेचेंहि एवढ्या लवकर तंत्र बनावें आणि मूर्तिभंजकांच्याहि मूर्ति इतक्या लवकर घडविल्या जाव्या ही गोष्ट अर्थपूर्ण आहे. विशिष्ट संप्रदायी वाङ्मयानें तुम्हांला आनंद होवो अगर न होवो, बोध होवो अगर न होवो, त्यावर तुम्हीं टीका केली कीं नवसंप्रदायी लोकांच्या भात्यांत असलेले एकूण एक अपशब्द तुमच्या वांट्याला येणार !

प्रामाणिक वाङ्मयीन मतप्रदर्शन अशक्य करून विशिष्ट संप्रदायाचें स्तोम माजवायचें हा प्रकार मराठी वाङ्मयांत नवीन नाहीं. गेल्या तीस-चाळीस वर्षांत वाङ्मय-लेखनांत व टीका-लेखनांत अनेक संप्रदाय आले व गेले. कांहीं काळ बोधवादी टीकेचें आणि बोधवादी ललित लेखनाचें माहात्म्य होतें. त्यानंतर कांहीं काळ मार्क्सवादी टीका आणि वाङ्मय यांचें माहात्म्य होतें. एकेकाळीं साने गुरुजींच्या वाङ्मयाचें केवढें माहात्म्य होतें, त्यावर टीका करणें किती कठीण होतें, हें आपल्याला स्मरत असेल. तसेंच आज मनोविश्लेषणात्मक, मनोविकृतिदर्शक वाङ्मय मनांतून कितीहि विद्रूप आणि हास्यास्पद वाटत असो, 'त्यांतहि कांहीं अर्थ आहे'–निदान भावी काळांत 'त्यांतूनच कांही इष्ट परिणाम अनुभवाला येतील' असा विश्वास व्यक्त करण्याची प्रायः सक्ती आहे म्हटलें तरी चालेल. ही एक प्रकारची बौद्धिक दमदाटीच (Intimidation, browbeating) आहे असें म्हणतां येईल. त्या दटावणीचा परिणाम सरकारी पारितोषिकांच्या निकालांतहि प्रत्ययाला येत आहे. सत्यप्रतीतीच्या सौंदर्यप्रतीतीच्या मूल्यांपेक्षां, वाङ्मयांत प्रायोगिक मूल्यांचें अवडंबर माजविल्यामुळें सरकारी पारितोषिकें विशिष्ट संप्रदायाला प्रथम मिळायचीं असा लेखकांचा समज झाला आहे. निदान ललित वाङ्मयापुरता तरी हा बोभाटा अकारण नाहीं. राज्य-सरकारचीं पारितोषिकें वर्गीकृत असल्यामुळें तर तंत्रविषयक प्रयोग जितका विचित्र तितका ललित वाङ्मयांतील पारितोषिक मिळण्याचा संभव अधिक अशी कल्पना होऊन बसणें स्वाभाविक झालें आहे.

प्रयोग अभिव्यक्तीकरितां कीं प्रसिद्धीकरितां ?

प्रयोगांना इतकें महत्त्व येणें हें शुद्ध कलात्मक व सांस्कृतिक निकर्षाच्या दारिद्र्याचें लक्षण आहे. तंत्राचा एखादा नवीन प्रयोग केल्याशिवाय मनांतला

अनुभव व्यक्त होऊंच शकत नाहीं अशी स्थिति असेल, तरच प्रयोग समर्थनीय ठरतील. आज मात्र प्रयोगांची अपरिहार्यता आशयाच्या दृष्टीनें नसून प्रसिद्धीच्या दृष्टीनेंच अधिक आहे! ज्या लेखकांना काळाच्या कठीण आणि अटळ कसोटींतून आपलें वाङ्मय उतरेपर्यंत धीर नाहीं, ते प्रयोगाच्या झटपट वाटेनें प्रसिद्धि मिळवून मोकळे होत आहेत, पण शीघ्र प्रसिद्धीबरोबरच शीघ्र विस्मृतीहि आपण पत्करीत आहोंत, हें त्यांनीं ओळखलेलें नाहीं. केशवसुत, तांबे, गडकरी, हरिभाऊ, देवल यांची लोकप्रियता आजहि वाढत आहे. पण 'रात्रीचा दिवस' ही प्रारंभशूर कादंबरी कुणाची हें देखील आज फार थोड्यांच्या लक्षांत असेल. ज्या ललित वाङ्मयाला बक्षिसें मिळत आहेत, त्यांतलें बरेंच वाङ्मय दहा-वीस वर्षांनीं कुणी वाचणारहि नाहीं, अशी स्थिति होणें बरें नव्हे. पण प्रयोग, बदल, नावीन्य, अचाटपणा हेंच एक वाङ्मयीन मूल्य बनविल्यास तसें होणें अपरिहार्य आहे. संप्रदायाचें अवडंबर माजवून स्वतःचें महत्त्व वाढविणें, फार तर एखाद्या व्यक्तीच्या किंवा नियतकालिकाच्या बाबतींत क्षम्य ठरेल; परंतु सरकारी पुस्तक-परीक्षकमंडळावर संप्रदायावडंबराचा आरोप झाला तर तें शोचनीयच ठरेल.

या पोरकट नावीन्य-प्रियतेचे परिणाम फार दूरगामी आणि खोल आहेत. विक्षिप्त तंत्राची व अर्थशून्य भाषेची गोष्ट क्षणभर दृष्टिआड केली, तरी आमच्या वाङ्मयाचे विषय आणि त्यांतील वातावरण हेंहि अधिकाधिक चिन्ताजनक बनत आहे. एखादें नाटक पाहतांना किंवा कथा वाचतांना आपण हिंदुस्थानांत आहों कीं अमेरिकेंत आहों, याचा संभ्रम पडावा ही गोष्ट भूषणावह नाहीं. ज्या देशाचा इतिहास एवढा स्फूर्तिप्रद आहे, ज्या देशाचीं प्राचीन महाकाव्यें रम्य, प्रतीकात्मक व तत्त्वज्ञानगर्भ कथांनीं समृद्ध आहेत, त्या देशाच्या कथा-लेखकांना विवाहपूर्व किंवा विवाहबाह्य मातृत्वाखेरीज विषयच सांपडूं नये, ही गोष्ट वाङ्मयांतील वाढत्या उथळपणाची आणि रोगटपणाची द्योतक आहे. नव्या वाङ्मयाकडे आणि वाङ्मयटीकेकडे पाहिलें, म्हणजे जणू प्रयोग करणें, धक्का देणें आणि अन्तर्मनाचें विश्लेषण करणें यांखेरीज वाङ्मयाला प्रयोजनच नाहीं कीं काय असा भास होईल.

ऐक्य नकाशांत कीं हृदयांत!

एखाद्या राष्ट्राचें ऐक्य म्हणजे केवळ सरहद्दीचा अखंडपणा नव्हे. भाषेचें ऐक्य हें महाराष्ट्राच्या एकजातीयत्वाचें सर्वांत प्रमुख कारण असलें तरी भाषे-

बरोबरच भावना, रिवाज, धर्म, इतिहास यांचें ऐक्य हेंहि त्याचें कारण आहे. त्या भावनात्मक एकतेवर साहित्यिकांनीं जर भर दिला नाहीं,—नव्हे त्या खऱ्या-खुऱ्या महाराष्ट्रीय भावनांचा, इतिहासाचा, शिष्टाचाराचा, कुलाचाराचा उपहास केला, तर नकाशांत एकत्र आलेल्या महाराष्ट्र नांवाच्या प्रान्तांत 'अ-महाराष्ट्रीय', इतिहासशून्य, आचारहीन, श्रद्धाहीन, बाटगे लोक राहात आहेत असें म्हणावें लागेल!

वाङ्मयाचा उत्कर्ष म्हणजे व्यक्तिवादी आणि सिद्धान्तवादी लेखकांनीं केलेले विक्षिप्त प्रयोग नव्हेत. समाजाच्या सांस्कृतिक जीवनांत वाङ्मयाला खरेंखुरें स्थान मिळणें,—नव्हे, त्या जीवनांतच त्याचा उगम असणें, यांत वाङ्मयाचा खरा उत्कर्ष आहे. प्रयोग आणि प्रगति यांच्या नांवांखालीं मराठी वाङ्मय आणि मराठी लोकजीवन यांचा संबंध आज दुरावला आहे. पण वाङ्मयाच्या स्थितीइतकीच भाषेची स्थितीहि चिन्तास्पद आहे. 'नवोन्मेषा'च्या अथवा Creativity संबंधींच्या विचित्र कल्पनांनीं आजचे ललित लेखक भाषेचेहि हाल करीत आहेत. शुद्धतेची पर्वा नाहीं, आणि निरर्थकतेचीहि दिक्कत नाहीं, असा आजचा खाक्या आहे! आजच्या सन्मानित लेखकांच्याहि लिखाणांत 'मनोकल्पना', 'वैयर्थ्यत्व' यांसारखे शब्द आढळले म्हणजे चिन्ता वाटूं लागते. पण केवळ व्याकरणाचा विचार करूनच आजच्या भाषेची दुरावस्था टळेल असें नाहीं. भाषेंतली मूळची शब्दसंपत्ति ठाऊक नसतांच त्या संपत्तींत नवनिर्मित भर घालण्याचा हव्यास धरणें, हिंदीचें अकारण अनुकरण करून आणि हिंदी-बंगालीचें अकारण ऋण काढून स्वभाषेची विटंबना करणें वगैरे अनेक प्रकार आज चालू आहेत. यांतच 'मराठीच्या अभ्यासाला संस्कृतच्या अभ्यासाची गरज नाहीं' असा एक अजब सिद्धान्त मांडला जात आहे. १९४० नंतरच्या ज्या पिढीच्या कानीं आईबापांच्या व इतर गुरुजनांच्या वाणीपेक्षांहि चित्रपट आणि रेडिओ यांची वाणी सातत्यानें पडत आहे, त्यांच्या स्वभाषेच्या उडत्या ओळखीला जर संस्कृतचाहि पाया नसेल, तर त्यांचें मराठी किती भयंकर बनतें, याचे नमुने परीक्षांचे पेपर तपासणारांइतकेच संपादकीय कचेरींत येऊन पडलेले लेख तपासणारांना ठाऊक असतील. "ती 'एकटक' पाहात होती", "मी माझ्या ओळखीला उजाळा दिला" .....यांसारखे प्रयोग तर मराठीच्या प्रगतीचे द्योतक म्हणून आम्ही पदरांत घेतच आहोंत! पण 'वक्त्याचे' याऐवजीं 'वक्ताचे' यासारखीं सामान्यरूप-

विहीन रूपेंहि तरुणांच्या लेखनांत वाचण्याची आम्हांला संवय जडत आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षांत तरुणांच्या वाचनांत व श्रवणांत काय येत आहे, सुव्यवस्थित भाषाज्ञान व विचारशक्ति वाढण्याच्या मार्गांत आज केवढ्या अडचणी आहेत, याचा गंभीरपणें विचार करण्याची आज वेळ आली आहे. भाषेच्या स्थिती-संबंधींची व तरुणांच्या मानसिक अवस्थेसंबंधींची ही भीषण वास्तवता नीट ध्यानांत न आल्यास आपण काल्पनिक रोगावरच्च औषधयोजना करीत बसण्याचा संभव आहे. मराठी शुद्धलेखनांत शास्त्रशुद्ध व सर्वमान्य बदल करणें हें कार्य महत्त्वाचें नाहीं, असें कोण म्हणेल? पण खिडकीला जाळी बसविण्यासंबंधीं नवराबायकोंत मतैक्य होण्यापूर्वीच भिंतीला भगदाड पडावें, त्यांतला प्रकार झालेला आहे. अनुच्चारित अनुस्वारांसंबंधीं सर्वमान्य नियम तयार करणें, 'पोस्ट कार्ड', 'पोस्ट ऑफिस' या शब्दांसारख्या निरुपद्रवी परकीय शब्दांऐवजीं शुद्ध संस्कृत शब्द रूढ करणें, रोमन लिपींत मराठी शब्दांचें स्पेलिंग करून माय-बोलींत तार केल्याचें पुण्य जोडणें, यांसारख्या गोष्टींवर समाधान मानण्याचे दिवस आतां संपले आहेत. या देशांतील प्रान्तिक भाषा जगणार कीं मरणार असा प्रश्न आज त्या त्या प्रान्तांतल्या साहित्य-संस्थांपुढें येऊन पडला आहे. मराठीची स्थितीहि तशीच आहे.

प्रांतिक भाषा जगणार कीं मरणार ?

एका बाजूनें भरभराट दिसत असतांनाच दुसऱ्या बाजूनें विनाशाचीं बीजें पेरलीं जात असतात. ग्रंथसंपत्तींत मराठी दरिद्री नाहीं. मात्र या बाबतींत इंग्रजी किंवा फ्रेंच यांसारख्या भाषांशीं तुलना करणें अत्यंत अनैतिहासिक आहे. ज्या देशांतील लोकांनीं इंग्रजी अंमल येईपर्यंत मुद्रणयंत्राचाहि वापर केला नव्हता, त्या देशांतील भाषा व वाङ्मय अर्वाचीन युरोपमधील वाङ्मयाइतकें संपन्न नाहीं म्हणून खेद करणें हास्यास्पद आहे. खरी तुलना मराठी व इतर भारतीय भाषा यांत आहे; व त्या दृष्टीनें पाहतां एक बंगाली सोडल्यास मराठीला खालीं पाहावयास लावणारी भाषा हिंदुस्थानांत नाहीं. पण इकडे मजल्यावर मजले चढत असतां तिकडे चांदईची भिंत खचत असावी त्यांतला हा प्रकार आहे. निकोप असो कीं विकृत असो, ललित वाङ्मय आज खूपच निर्माण होत आहे. विचार-प्रधान वाङ्मय त्या प्रमाणांत वाढत नाहीं, ही तक्रार म्हणजे देखील

ललितवाङ्मयाच्या द्वेष्ट्यांनीं दुःस्वप्नांत फोडलेली किंकाळी आहे. आज जेवढें विचारप्रधान, ज्ञानवर्धक वाङ्मय निर्माण होत आहे तेवढें पूर्वी कधींच झालें नसेल. पण ललित आणि विचारप्रधान या दोन्ही वाङ्मयांत शेंकडों नवे लेखक जी भाषा वापरीत आहेत तिजकडे पाहिलें, म्हणजे तेहेतीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रांतील एका उग्र तत्त्वचिंतकानें 'मराठी भाषा मरणाच्या पंथाला लागल्या'ची जी आरोळी ठोकली, ती खरी ठरणारसें वाटूं लागतें. इतिहासाचार्य राजवाड्यांना तें मरण ज्या वाटेनें येईलसें वाटलें त्याहून वेगळ्या वाटेनें येत आहे ही गोष्ट वेगळी! नवे विद्वान् मराठींत लिहीत नाहींत म्हणून मराठी मरेल असें चिपळूणकर-राजवाडे यांना वाटत असे. 'नवे विद्वान् मराठींत लिहीत आहेत म्हणून मराठी मरेल' असें भय आज उत्पन्न झालें आहे! आजच्या वाङ्मयांतील प्रयोग वाङ्मय-प्रकाराशीं व वाङ्मयीन आशयाशींच थांबले असते, तर फारशी चिन्ता नव्हती; कारण एका पिढींतलें वाङ्मय तेवढें वायां गेलें असतें. पण प्रयोगशीलतेच्या नांवाखालीं शब्दसंपत्ति आणि वाक्प्रचार यांच्याशींहि अतिप्रसंग सुरू झाला, म्हणजे भाषेचें मरणच ओढवलें असें म्हटलें पाहिजे. मराठीच्या प्रकृतीशीं विसंगत, दुर्बोध आणि विचित्र असें गद्य आज कित्येक लेखक जणू तत्त्व म्हणूनच लिहीत आहेत. मराठीच्या अस्तित्वालाच या प्रयोगाचा धोका आहे.

पण हे सहेतुक प्रयोग क्षणभर दृष्टिआड केले तरीहि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रत्येक प्रान्तांतल्या भाषेनें आपल्या भवितव्याचा विचार करण्याची वेळ आली आहे, यांत शंका नाहीं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध भारतीय भाषांचा दर्जा वाढेल अशी आपण आशा धरून होतों. परकीय राज्यकर्त्यांची भाषा आमच्या जन्म-भाषेच्या मुळावर आली आहे अशी आमची तक्रार होती. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्थिति काय आहे?—

हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार!

अशीच स्थिति नाहीं काय? स्वातंत्र्याचा सूर्य उगवल्यानंतर आमच्या प्रान्तिक भाषा पूर्णाधिकारी होतील, अशी आम्ही आशा करून होतों. परंतु इंग्रजी अमलांत त्यांना भविष्यकाळाकडे पाहून तरी समाधान वाटत असे. आज त्यांचें भविष्य-स्वप्नाचें सुखहि नाहींसें झालें आहे.

माझें हें बोलणें थोडें हताशपणाचें आणि अतिरंजित वाटेल. कारण तत्त्व म्हणून तरी प्रान्तिक भाषांचे हक्क विद्यापीठांनीं व शासनसंस्थांनीं मान्य केलेले आहेत. परंतु तात्त्विक मान्यता आणि वास्तवता यांत फार मोठी तफावत दिसून येईल. एका मोठ्यांत मोठ्या महाराष्ट्रवाद्याचें या बाबतींतील स्वप्नच आपण विचारार्थ घेऊं. विख्यात पंडित श्रीधर व्यंकटेश केतकर म्हणत कीं, मुंबईचा प्रान्ताधिकारी अथवा गव्हर्नर आपले हुकूम मराठी सहीनें काढील त्याच दिवशीं परराज्य गेलें असें मी म्हणेन. या व्याख्येप्रमाणें पाहिलें तर काय दिसेल? राजभवनांतच नव्हे, तर जिल्हाकचेरींत आणि तालुकाकचेरींतहि आज मराठी भाषा मानाच्या जागीं नाहीं. नव्हे, मोठ्या आशेनें आणि हट्टानें मिळविलेल्या स्वतंत्र प्रादेशिक विद्यापीठांतहि मराठी भाषा सासुरवाशिणीसारखी कोपऱ्यांतच उभी आहे.

राष्ट्रभाषा!—नव्हे कारभाराची भाषा!

प्रान्तिक भाषांच्या दर्जाचा प्रश्न इंग्रजीच्या व हिंदीच्या उद्यांच्या दर्जाशीं संबद्ध आहे, व या दोन प्रश्नांसंबंधीं आज आपल्या अनेक पुढाऱ्यांच्याहि मनांत बराच अनिश्चय आहे. 'हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे' या विचारांतच फार मोठा गोंधळ आहे. हिंदी ही आपली आन्तरप्रान्तीय व्यवहाराची भाषा होणें अपरिहार्य आहे व त्यामुळें हिंदीचा अभ्यासहि आवश्यक ठेवणें क्रमप्राप्तच आहे. पण आन्तरप्रान्तीय व्यवहाराच्या सोयीचाच फक्त विचार झाला आणि जन्मभाषेच्या अभ्यासाचा व विकासाचा विचार झाला नाहीं तर स्वराज्यांतहि परराज्याचे दोष कायम ठेवल्यासारखें होईल. इतकेंच नव्हे, तर प्रथम स्वभाषेच्या म्हणजेच प्रान्तिक भाषेच्या—रक्षणाचा, वर्धनाचा व दर्जाचा विचार, आणि नंतरच आन्तरप्रान्तीय भाषेच्या वर्धनाचा व अध्ययनाचा विचार असा क्रम पाहिजे. 'राष्ट्रभाषा' हा शब्द हिंदीला अनेकवार लावला गेल्यानें पहिलें कर्तव्य हिंदीसंबंधीं आणि नंतर जमल्यास प्रान्तिक भाषांसंबंधीं अशी स्थिति होऊन बसली आहे.

या बाबतींत नुकतीच घडलेली एक आशादायक घटना म्हणजे राजभाषा मंडळाच्या अहवालासंबंधीं संसदीय समितीनें राष्ट्रपतींना सादर केलेला अहवाल होय. या अहवालाचें वर्णन थोडक्यांत करायचें म्हटलें तर त्यांत हिंदीला

राष्ट्रभाषेच्या ऐसपैस पण विवाद्य आसनावरून राजभाषेच्या मर्यादित पण योग्य आसनावर बसविण्यांत आलें आहे. इंग्रजीच्या प्रयाणाची तरतूद करण्यांत आली आहे; आणि प्रादेशिक भाषांच्या परंपरागत दर्जाला शोभेल असें स्थान त्यांना देण्यांत आलेलें आहे. घोडयावर बसलेली हिंदी पायउतारा होण्याला कारण आमच्या दिल्लींतील प्रतिनिधींचा वास्तववाद असो कीं फ्रँक अँथनी, राजाजी यांच्यासारख्यांचा अवास्तव हिंदीविरोध असो, आज राजभाषेसंबंधीं ज्या शिफारशी करण्यांत आल्या आहेत त्या दूरदृष्टीच्या आहेत व त्यांचा अंमल दक्षतेनें करणें हें आतां मध्यवर्ती आणि राज्य सरकारांच्या कुशलतेवर अवलंबून राहील, कारण प्रजेचे, प्रदेशांचे आणि मध्यवर्ती सरकारचे हक्क येतात अगर जातात, ते नुसत्या अहवालांनीं नव्हेत, कीं प्रत्यक्ष पार्लमेंटच्या कायद्यांनींहि नव्हेत. हक्क मिळविणें, राखणें व भोगणें हें आपल्या दक्षतेवर अवलंबून असतें. म्हणूनच 'सतत डोळ्यांत तेल घालून बसल्याखेरीज स्वातंत्र्य टिकत नसतें' अशी इंग्रजींत म्हण पडली आहे. प्रादेशिक सरकारांनीं, विद्यापीठांनीं व प्रजाजनांनीं आपल्या भाषिक हक्कासंबंधीं जागृत असलें पाहिजे. इंग्रजीसारखी सर्वव्यापी भाषा आमच्या कचेऱ्यांचा व विद्यालयांचा कब्जा सोडून कायमची जाईल त्या वेळीं आपापल्या जागा धरण्यासंबंधीं प्रादेशिक भाषांनीं जागरूक असलें पाहिजे. यासबंधांत आजच राज्यकर्त्यांत व रयतेंत दिसून येणारा वैचारिक गोंधळ व आळस वृत्तपत्रांत टीकेचा विषय होत आहे.

द्वैभाषिक का हिंदी भाषिक

मुंबईराज्य हें द्वैभाषिक राज्य करणारांनीं तें कोणत्याहि हेतूनें केलेलें असो; मराठी-गुजराथींना तामीळ-तेलगूपेक्षां खालचा दर्जा देण्याकरितां तर खास केलेलें नाहीं ना ? पण प्रत्यक्षांत घडत आहे मात्र तसें. आज हिंदुस्थानांतल्या सात राज्यांनीं प्रान्तिक भाषांतून कारभार चालविण्याचें ठरविल्यावर मुंबई सचिवालयांत असो कीं मुंबई राज्यांतील रेल्वेच्या कारभारांत असो, मराठी-गुजराथीची जागा हिंदी घेत असेल, तर त्याला मी द्वैभाषिक राज्यहि म्हणायला तयार नाहीं ! गुजराथी-मराठी लोकांना आपला कारभार करतां येत नसल्यानें तो राष्ट्रपतींनीं आपल्या हातीं घेतला असा मीं या दोन भाषांच्या उच्चाटनाचा अर्थ करीन. नव्हे, राष्ट्रपतींनीं कारभार हातीं घेतला तरीहि प्रादेशिक भाषांना अर्धचन्द्र देणें

बेकायदाच होईल. मुंबई सचिवालयांतल्या पाट्यांवरील 'प्रतिस्थापन', 'लिफ्ट सिर्फ तलमंझिल जायगा', 'दर्शक कक्ष', 'संवाददातादीर्घा' यांसारखे शब्द पाहिले कीं मुंबईत द्वैभाषिक राज्य नसून हिंदीचें साम्राज्य आहे असें वाटेल! इंग्रजीनें आपला 'होल्डॉल' बांधण्यापूर्वीच नव्या हिंदीतील हे बोजड आणि हास्यास्पद शब्द तिच्या बिछान्यावर आपलें स्थूल शरीर लोटून देत आहेत! मग उद्यां हिंदी मध्यवर्ती कारभाराची भाषा बनल्यावर काय होईल याची कल्पनाच केलेली बरी! उद्यां राज्यकारभारांतून आणि आंतरप्रान्तीय व्यवहारांतून इंग्रजीचें उच्चाटण झालें कीं बढतीवादी (Careerist) सुशिक्षित लोक वक्तृत्व, लेखन वगैरेहि हिंदींतून करूं लागतील व पुन्हा मराठी ही केवळ आचारीपाण्क्यांची, अशिक्षितांची व बायकामुलांची भाषा ठरेल. पण माझें हें विधानहि दुरुस्त केलें पाहिजे. कारण एकेकाळीं अल्पशिक्षणामुळें स्त्रिया तरी बिचाऱ्या मराठीला धनी होत्या. पण आज स्त्रिया पुरुषांहूनहि हिंदीचा अधिक व्यासंग करीत आहेत. पूर्वीचे सुशिक्षित हौसेखातर इंग्रजींत पत्रव्यवहार करीत, तशा हल्लींच्या कित्येक सुशिक्षित तरुणी हिंदींत पत्रव्यवहार करतांना आढळतील.

सारांश, एकीकडून अन्तर्मनाचा आलेख काढण्याकरितां शब्दसिद्धीचे आणि वाक्यरचनेचे नवे प्रयोग करणारे लेखक; तर दुसरीकडून संस्कृत व मराठी यांच्या व्यासंगाऐवजीं हिंदीचा व्यासंग केलेल्या तरुण मातांची पिढी असे दोन्ही बाजूंनीं दोन सुरुंग लावल्यावर बिचाऱ्या मराठी भाषेची इमारत कोसळायला फार वेळ लागणार नाहीं. कांहीं दृष्टींनीं हिंदीचें माहात्म्य हें इंग्रजीच्या माहात्म्याहूनहि भारतीय भाषांना मारक ठरण्याचा संभव आहे, ही गोष्ट हिंदीच्या पुरस्कर्त्यांनीं ध्यावी तितकी लक्षांत घेतलेली नाहीं. इतकेंच नव्हे, तर प्रान्तिक भाषांची शब्द-संपत्ति आणि हिंदीची शब्दसंपत्ति यांत अधिकाधिक साधारणत्व निर्माण करण्याचेंहि एक धोरण आहे. अशा रीतीनें हिंदी आणि इतर प्रान्तिक भाषा अधिकाधिक जवळ येतील व हिंदी ही 'राष्ट्रभाषा' म्हणून अधिक स्वीकार्य होईल, अशी ही विचारसरणी आहे.

भलत्या क्षेत्रांत नियोजनांचें स्तोम!

या सर्वच विचारसरणीच्या मुळाशीं आधुनिक युगाचा एक महादोष आहे. तो दोष म्हणजे नियोजन, उत्पादन आणि केन्द्रीकरण यांवर फाजील विश्वास

आणि त्यांचा भलत्या क्षेत्रांत पुरस्कार. ज्या भाषांना अनेक शतकांची परंपरा आहे, ज्या भाषा कित्येक कोटी लोक जन्मभाषा म्हणून वापरीत आहेत, त्या भाषांच्या प्रकृतीला राज्यकारभाराच्या सोयीकरितांच काय, पण राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाकरितांहि धक्का लावणें वेडेपणाचें होईल. त्या भाषांना परकीय राज्य गेल्यावरहि 'शूद्र-भाषा' म्हणून लेखणें—न्यायालयांत, विद्यापीठांत, कायदेमंडळांत, राज्यदरबारांत त्यांना स्थान न देणें, म्हणजे एक नवी गुलामगिरी, एक नवा वर्णभेद निर्माण करणें होय. अखिल भारतवर्षाच्या उत्कर्षाकरितां व ऐक्याकरितां महाराष्ट्र वाटेल तो त्याग करील—त्यानें तो पूर्वी केलाहि आहे. आपण महाराष्ट्रीयच हा महाराष्ट्रगौरव करतों असें नव्हे, तर इतर प्रान्तीयांनींहि महाराष्ट्राची ही अखिल भारतीय वृत्ति मुक्तकंठानें प्रशंसिली आहे. अलीकडेच डॉ. कैलासनाथ काटजू यांनीं एका भाषणांत महाराष्ट्राच्या राष्ट्रीय वृत्तीची प्रशंसा करून मध्यप्रदेशांत मराठी भाषिकांचा अन्तर्भाव होणें म्हणजे प्रगतीच्या बीजांचा अन्तर्भाव होणें होय, अशा अर्थाचे उद्‌गार काढले आहेत. पण अखिल भारत-वर्षाचा उत्कर्ष म्हणजे जसा विविध प्रान्तांचा उत्कर्ष, तसाच विविध प्रान्तांचा उत्कर्ष म्हणजे अखिल भारतवर्षाचाच उत्कर्ष होय. अखिल हिंदुस्थानच्या प्रमुख प्रान्तिक भाषा पूर्ण विकसित होऊन विद्यापीठांत व विद्यापीठाबाहेरहि ज्ञानसंपादनाचें प्रमुख माध्यम बनल्या, तरच प्रत्येक प्रान्ताची प्रगति झाली असें म्हणतां येईल; आणि प्रत्येक प्रान्ताची प्रगति झाल्याखेरीज हिंदुस्थानची प्रगति झाली असें म्हणता येणार नाहीं. जोंपर्यंत आधुनिक भारतीय भाषांना इंग्रजीच्या किंवा हिंदीच्या तुलनेनें नीच स्थान आहे, जोंपर्यंत केवळ हिंदीच्या किंवा इंग्रजीच्या अध्ययनावर मनुष्य प्रतिष्ठा पावूं शकत आहे, व मराठी, गुजराथी, कानडी यांजसारख्या स्वभाषांत आपल्याला लिहितां-बोलतां येत नाहीं याची फुशारकी मारूं शकत आहे, तोंपर्यंत आपली प्रगति झालेली नाहीं,—आपण अन्य प्रान्ताची अगर अन्य देशाची गुलामगिरी पत्करण्यांत पुरुषार्थ मानीत आहों, असें समजावें. युरोपच्या टीचभर देशांच्या सतरा भाषा, रशियांत चालणाऱ्या छप्पन्न भाषा, भाषैक्याच्या मोहानें आपल्या अस्तित्वाला तिलांजलि द्यायला तयार नाहींत, याचें कारण स्वभाषा हें शिक्षणाचें आणि राष्ट्रीय विकासाचें सर्वश्रेष्ठ माध्यम होय, ही गोष्ट ते लोक उत्तम तऱ्हेनें जाणतात.

इंग्रजीसंबंधीं लाचारी

एकीकडे स्वभाषेचा दर्जा वाढविण्याची भाषा करणें व दुसरीकडे हिंदी ही हिंदुस्थानची राष्ट्रभाषा करण्याचीहि गोष्ट करणें, इंग्रजीचें महत्त्व कमी होतां उपयोगी नाहीं असेंहि एकीकडे मनांतून वाटत राहणें, हा सर्व वैचारिक गोंधळ आहे. जोंपर्यंत इंग्रजीखेरीज आपला राज्यकारभार व आपलें उच्च शिक्षण चालणें शक्य नाहीं असें कांहीं विद्वानांना मनांत तरी वाटत आहे, तोंवर आपण खऱ्या अर्थानें स्वतंत्र झालों नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. इंग्रजीच्या उच्चाटनानें शिक्षणाचा दर्जा खालावेल ही कल्पना म्हणजे एक अर्धसत्य आहे. आपल्या शिक्षणाचा दर्जा आजवर जर खराच उच्च असता तर एव्हांना विविध देशभाषांत विविध विषयांवरील ग्रंथांची वाण पडलीच नसती. खरें ज्ञान तेंच कीं ज्याचें फल ग्रंथरूपानें स्वजनांना चाखायला मिळतें. वस्तुस्थिति अशी आहे कीं, आजवर इंग्रजी ही अध्यापनाची आणि संदर्भग्रंथांची भाषा असूनहि आपले बहुसंख्य विद्वान् परीक्षार्थी आणि प्रपंचार्थीच राहिले. त्यांच्या हातून देशभाषांत काय कीं इंग्रजींत काय, रचना वेताचीच झाली. परदेशांतून येणाऱ्या ग्रंथांवर आपण अवलंबून राहिलों; आणि शिक्षणक्रम आंखतांनाहि आपण बहुतांशीं ऑक्सफर्ड व केंब्रिज येथील अभ्यासक्रमावर विसंबून राहिलों. हें परावलंबित्व, ही परपुष्टता, हें आंग्लशूद्रत्व जाईपर्यंत आपण खऱ्या अर्थानें स्वतंत्र झालों असें म्हणतां येणार नाहीं. ही परावलंबित्वाची आणि हीनत्वगंडाची भावना घालवायची असेल, तर मराठी, गुजराथी, कानडी यांसारख्या भारतीय भाषांना कुठल्याहि कारणानें आणि कुठल्याहि प्रकारानें कनिष्ठ स्थान देतां उपयोगी नाहीं. त्या आजच समर्थ आहेत असें म्हणण्याचा भाबडेपणाहि एकीकडे टाळला पाहिजे, व दुसरीकडे त्यांच्यावर सर्व प्रकारचीं महत्त्वाचीं कामें सोंपवायला प्रारंभहि केला पाहिजे.

मराठीला पूर्ण विकसित भाषेचा दर्जा यायचा असेल तर महाराष्ट्राचे सर्व व्यवहार मराठींतूनच व्हायला हवेत. उच्चतम पदवीपर्यंतचें शिक्षण, उच्चतम न्यायालयांतलें कामकाज, प्रान्तिक कायदेमंडळांतलें कामकाज आणि प्रान्तिक राज्यकारभाराची प्रत्येक बाब मराठींतूनच चालली पाहिजे. परदेशचा मनुष्य आज आपल्याकडे आला, तर त्याला आपण कॅनडांत, ऑस्ट्रेलियांत किंवा दक्षिण आफ्रिकेंत जाऊन आल्यासारखेंच वाटत असेल. रस्त्यावरील मार्गदर्शक पाट्या,

मोठमोठ्या कचेऱ्यांवरील पाट्या, कॉलेजांचीं आणि शाळांचीं नांवें, सर्व इंग्रजींत लिहिलेलीं असल्यावर या देशाला हिंदुस्थान म्हणण्याचा हक्क आपणांला नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. आपल्या नद्यांवर व पर्वतांवर इंग्रजांनीं 'गॅजेस', 'नर्बुडा', 'वेस्टर्न घाट्स' अशा प्रचण्ड पाट्या लावल्या असत्या तर आजहि आपण त्या कायम ठेवल्या असत्या असें मला वाटतें! या विस्तीर्ण देशावर 'इंडिया' अशी पाटी लटकलेली असती तर शेवटच्या गव्हर्नर जनरलच्या जयजयकारयुक्त निष्क्रमणानंतर 'India' या इंग्रजी पाटीऐवजीं 'हिंदुस्थान' ही हिंदी पाटी १९५९ पर्यन्तहि तयार झाली नसती अशी मला खात्री आहे.

हिंदी ही अखिल भारतीय राज्यकारभाराची भाषा, देवनागरी ही अखिल भारतीय लिपि, प्रान्तिक भाषा या यच्चयावत् प्रान्तिक व्यवहाराच्या भाषा हें धोरण कागदोपत्रीं ठरलेंच आहे, तर तें कडकपणें अंमलांतहि यायला हवें. पण हें अंमलांत येणें हें केवळ आपल्या भाषिक धोरणावर अवलंबून नसून शासनप्रकारावरहि (Administrative Pattern) अवलंबून आहे. आज प्रान्तिक भाषांना महत्त्व नसल्याचें कारण, आज प्रान्तांनाच असावें तेवढें महत्त्व नाहीं हें होय. अगदीं क्षुल्लक गोष्टींतहि दिल्लीच्या हस्तक्षेपाची धास्ती आढळते आणि अगदीं बारीकसारीक गोष्टींतहि दिल्लीच्या नेत्रसंकेताकडे नजर लागलेली आढळते. विद्यापीठांसारख्या स्वायत्त विद्वत्संस्थांनाहि पुष्कळदा आपली बुद्धि चालविणें कठीण जावें,—आपलें खरें मन प्रकट करणें जिवावर यावें, इतकें कडक केंद्रनियंत्रण आज अनुभवाला येत आहे. पण महात्मा गांधींसारखे जन्मजात लोकशाहीवृत्तीचे पुढारी असल्या फाजील केंद्रीकरणाच्या विरुद्ध होते, हें प्रसिद्ध आहे. ज्या दिवशीं वरच्या साहेबांच्या नजरेकडे बघून पाऊल टाकण्याची आपली वृत्ति जाईल त्याच दिवशीं आपल्या प्रान्तांना स्वायत्त घटकांचा दर्जा प्राप्त होईल आणि त्यानंतरच प्रान्तिक भाषांना प्रौढ, पूर्णांग भाषांचा दर्जा प्राप्त होईल.

भाषिक स्वायत्तता आणि भारतीय एकता

ही भाषिक आणि प्रान्तिक स्वायत्तता भारतीय एकतेच्या आड येण्याचें कारण नाहीं. सर्व भारतवर्षाचे आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय हितसंबंध समान आहेत, ही गोष्ट स्पष्ट असतां, प्रादेशिक स्वायत्ततेंतून विघटना निर्माण होणें असंभाव्य आहे. उलट कोणत्याहि आगंतुक कारणानें एका प्रान्ताला अगर

भाषेला राज्यकारभारांत अधिक महत्त्व आहे असें दिसलें तर मात्र विघटनेचें वीं रुजलेंच म्हणून समजा ! हिंदी-भाषिकांना हिंदीमुळें जन्मजात अग्रस्थान मिळेल या शंकेनेंच आज या ना त्या रूपानें हिंदीविरोध दिसत आहे. राजगोपालाचार्यांसारखे मुरब्बी मुत्सद्दी इंग्रजीचा राजभाषा म्हणून पुरस्कार करण्यापर्यंत वाममार्गी जात आहेत, तर मुंबईच्या श्री. चक्रदेवांसारखे व डॉ. काटजूसारखे कांहीं विचारवंत आज विसाव्या शतकांत संस्कृत ही राजभाषा करावी, असें प्रतिपादन करीत आहेत. या सूचना अतिरेकी आहेत यांत शंका नाहीं. पण त्यांचें मूळ प्रतिपक्षाच्या राष्ट्र आणि राष्ट्रभाषा यांच्यासंबंधींच्या अशास्त्रीय कल्पनांत आहे. हिंदुस्थान हें एकभाषिक राष्ट्र नाहीं व कोणतीहि एक भाषा हिंदुस्थानची राष्ट्रभाषा ठरविण्याचें कारण नाहीं हें सर्व विचारवंतांनीं ध्यानांत घेतलें म्हणजे आजचा वैचारिक गोंधळ बंद होईल. आपणांला जी हवी आहे ती केवळ आंतरप्रान्तीय व्यवहाराची भाषा हवी आहे. म्हणजे अर्वाचीन युरोपांत जशी फेंच व स्वातंत्र्यपूर्व हिंदुस्थानांत जशी हिंदुस्थानी अथवा हिंदी तशी व्यवहारोपयोगी Lingua Franca आपणांस हवी आहे. एकदा हिंदीला अशा Lingua Franca ची भूमिका दिली, 'राष्ट्रभाषे'ची भाषा बंद झाली, म्हणजे हिंदीसंबंधींची शंका जाईल, इंग्रजीसंबंधींचीहि उरलीसुरली वेडी आशा सहज सुटेल व प्रान्तिक भाषा आपापल्या प्रान्तांत मान वर करून चालतील.

केवळ हिंदी ! कीं बंगाली !

हिंदीव्यतिरिक्त इतर भारतीय भाषांचा अभ्यास हाहि भारतीय एकता साधण्याचा महत्त्वाचा मार्ग आहे. तो आपण आजवर दुर्लक्षिला आहे. आपल्या आन्तरप्रान्तीय संचारांतदेखील ठराविकपणा आणि संकुचितपणा किती लवकर उत्पन्न होतो, याचें उदाहरण म्हणजे गल्लोगल्लीं निघालेले हिंदीचे वर्ग होत. समजा, पुण्यासारख्या ठिकाणीं शालेय हिंदी शिक्षणक्रमाखेरीज पन्नास हिंदीचे वर्ग आहेत, तर मी म्हणेन त्याऐवजीं वीस वर्ग हिंदीचे, दहा वर्ग बंगालीचे, दहा गुजराथीचे आणि दहा कानडीचे हें प्रमाण अधिक वास्तववादी होईल. निदान नागरिकांचा सांस्कृतिक विकास हें जर भारतीय भाषांच्या अभ्यासाचें ध्येय असेल, तर हिंदीसारख्या अगदीं सोप्या आणि प्रायः मागासलेल्या भाषेच्या अभ्यासांत तरुण-तरुणींच्या झुंडी गर्क असाव्यात आणि बंगालीसारख्या पुढारलेल्या भाषेच्या अभ्यासाचा मात्र एकहि वर्ग नसावा किंवा आन्तरभारतीसारख्या दूरदर्शी

संस्थेनें काढलाच तर तो चालू नये, हें दृश्य शोचनीय आहे. यावरून आपण कमालीचे गतानुगतिक तरी ठरतों, किंवा केवळ पोटार्थी तरी ठरतों.

वास्तविक बंगाली वाङ्मयाचा परिचय करून देण्याचें काम गेल्या तीन पिढ्यांतल्या मराठी साहित्यिकांनीं दीर्घोद्योगपूर्वक केलें आहे. कै. काशिनाथ रघुनाथ मित्र, कै. वासुदेव गोविंद आपटे या गेल्या पिढींतल्या साहित्यिकांनीं आणि श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर आणि श्री. मामासाहेब वरेरकर यांच्यासारख्या आजच्या साहित्यिकांनीं मराठी भाषिकांवर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. स्वतः स्वतंत्र प्रतिभेचे साहित्यिक असूनहि वरेरकरांनीं बंगाली भागीरथीच्या ज्या कावडी मराठी रसिकांच्या घरीं आणून पोहोंचवल्या त्यांचें महत्त्व तर कांहीं आगळेंच आहे. परंतु रवींद्रनाथ, शरच्चंद्र यांच्यासारख्या जगद्विख्यात लेखकांचें लेखन अल्प आयासानें मुळांतून वाचणें शक्य असूनहि बंगालीचा अभ्यास करणारांचें प्रमाण हिंदीच्या शतांशदेखील पडूं नये, ही गोष्ट शोचनीय आहे. अलीकडे पुण्यांतील सुविद्य आणि सुस्थित बंगाली मंडळींनीं पुणें विद्यापीठांत बंगाली भाषा हा एक ऐच्छिक विषय म्हणून ठेवला जावा याकरितां थोडीफार खटपट चालविली आहे. प्रथमदर्शनीं कांहींना हा उपक्रम अनाठायीं वाटेल. पण अशा मंडळींना कदाचित् हें माहीत नसेल कीं, कलकत्ता व मद्रास यांसारख्या दूरच्या विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत आज कित्येक वर्षें मराठी हा एक अभ्यास-विषय आहे.

शब्दांच्या टांकसाळी : वाङ्मयाचें वर्कशॉप !

विविध प्रान्तीय विद्वान् आन्तरभारतीच्या कल्पनेच्या फार आधींपासूनहि एकत्र जमत आहेत, हें खरें ; पण आमच्या प्राच्यविद्यासंशोधन–परिषदांचा किंवा इतिहास-परिषदांचा आन्तरभारतीच्या उद्दिष्टाला फारसा उपयोग नाहीं ! इंग्रजींतून चालणाऱ्या त्या परिषदांत संशोधनाचें पाऊल पुढें पडतें, परंतु प्रान्तिक भाषांचें पाऊल मागेंच राहतें. हीच सर्व मंडळी हिंदींतून, बंगालींतून, मराठींतून फार काय, तेलगू किंवा कानडी भाषेंतून चालणाऱ्या चर्चेकरितांहि एकत्र जमत असती, तर संशोधन कदाचित् थोडें मंद चाललें असतें—पण परिभाषेचा बिकट प्रश्न एव्हांना मार्गाला लागला असता.

पण एका गोष्टीचें मात्र मला फार भय वाटतें आणि ती म्हणजे दिल्लीसारख्या राजधानींत काय, कीं पुण्या-मुंबईसारख्या विद्यापीठांच्या ठिकाणीं काय, विद्वानांच्या एखाद्या समितीनें ठराविक मुदतींत शेंकडों पारिभाषिक शब्द टांकसाळींतून काढायचे आणि त्यांच्या याद्या प्रान्तोप्रांतीं पाठवावयाच्या! असे यत्न झाले आहेत व यापुढेंहि होतील! आणि तरी परिभाषेचा प्रश्न आहे तेथेंच राहिला आहे. शास्त्रीय परिभाषा निर्माण व रूढ करण्याची ही तऱ्हा 'आधीं शिखर मग पाया' या स्वरूपाची आहे; व अशा शब्दनिर्मितीच्या मुळाशीं भाषेसंबंधींची यांत्रिक कल्पना आहे. नियोजन, उत्पादन, प्रयोगशीलता वगैरे कल्पना कांहीं स्थूल क्षेत्रांत ठीक असल्या तरी सूक्ष्मतर क्षेत्रांत त्यांना फार थोडी जागा आहे. आजच्या जमान्याच्या मनोरचनेला झालेला प्रमुख रोग जर कोणता असेल, तर यांत्रिक उत्पादनाची दृष्टि भलत्याच क्षेत्रांत लावण्याचा. 'लिटररी वर्कशॉप', 'फॅमिली प्लॅनिंग' या शब्दांनीं कोणत्याहि हितकर वा पथ्यकर कृति सूचित होत असोत, त्यांच्यामागें कारखान्यांच्या युगांतील लोखंडी दृष्टीच आहे. शब्दनिर्मितीच्या बाबतींत असली लोखंडी भूमिका केवळ आजची समाजवादी आणि योजनावादी पिढीच घेते असें नव्हे, जुन्या राष्ट्रवादी पिढीनेंहि भाषाशुद्धीच्या भरांत भाषेवर हाच बलात्कार चालविला होता. वाङ्मयनिर्मिति व भाषाविकास या क्षेत्रांसबंधीं राजकीय पक्षांनीं कोणती वृत्ति ठेवावी, हा प्रश्न थोडा नाजूक आहे. मी म्हणेन, त्यांनीं या क्षेत्रासबंधीं उदासहि राहूं नये आणि अतिप्रसंगहि करूं नये. समित्या बसवून शब्दनिर्मिति आणि वर्कशॉप स्थापून साहित्यनिर्मिति करता येणारच नाहीं, असें नाहीं. पण त्यांत साहित्य आणि भाषा यांच्यासंबंधींची दृष्टीच विकृत होऊन जाते. डॉ. रघुवीर यांच्यासारख्या महापंडितानें केलेली शब्दनिर्मितीहि 'टांकसाळी'निर्मिति ठरण्याचें कारण शब्दासंबंधींची ही कारखानदारी दृष्टीच होय. 'तुम्हांला त्रैलोक्याचें राज्य मिळालें आणि इकडे आत्माच गमावून बसण्याची पाळीं आली तर उपयोग काय?' अशा अर्थाचें बायबलमध्यें एक वचन आहे. भाषेसंबंधींहि गोष्ट हीच आहे. सूचकता, परंपरा, सहचारी कल्पनांचें वलय, सुगमता, माधुर्य या सर्वांच्या अभावीं शब्द म्हणजे नुसत्या तारखात्यांतल्या खुणा होऊन बसतील. तारखात्यांतील ध्वनिचिन्हें, गणितशास्त्रांतील संख्याचिन्हें आणि वाङ्मयीन भाषेंतील शब्द यांत अंतर आहे. वाङ्मयीन भाषेंतील शब्द अधिक नाजूक, हळुबार आणि सचेतन असतात. सचेतनत्वाचें कलेच्या दृष्टीनें मुख्य महत्त्व

हें आहे कीं, सचेतन पदार्थ नुसते 'वापरले जातात' असें नव्हे, विशिष्ट जागीं ते नुसते 'बसतात' असें नव्हे, तर जिथें बसतील तिथें ते आंपल्या परिसराला नवा साद आणि अर्थ देतात. हा नवा 'रेस्पॉन्स' देण्याचा गुण किंवा संदर्भानुरूप नित्य नूतन बनण्याचा गुण म्हणजेच शब्दांचें सचेतनत्व होय. हा गुण यांत्रिक शब्द-निर्मितींत नसतो आणि म्हणूनच असले शब्द मोठ्या वेगानें निर्माण होत असले, तरी भाषेला ते हानिकारकच होत.

वाङ्मयीन शब्दांत तर ही 'उत्पादना'ची भाषा नकोच पण शास्त्रीय परिभाषेंतहि हें यांत्रिक शब्दोत्पादन नको, असें मी म्हणेन. मग नवे शब्दच बनवायचे नाहींत काय?—तसें मात्र खासच नव्हे. प्रत्येक प्रतिभावान् लेखक शैली, वाक्प्रचार आणि शब्द नव्यानें घडवीत असतो. पण ते घडवितांना त्याची दृष्टि शब्दनिर्मितीची असत नाहीं. लिहिण्याच्या ओघांत जे शब्द निर्माण होतात, ते 'निर्माण करायला' म्हणून बसल्यावर होत नाहींत. आधीं ग्रंथरचना व मग त्यांतून निवडून परिभाषासंग्रह असाच क्रम असला पाहिजे. कोश, प्रत्ययोपसर्ग व पांडित्य यांच्या जोरावर आधीं शब्दांचे ढीग रचायचे, व मग प्रान्तोप्रान्तींच्या विद्वानांकडे ते धाडून त्यांना ते ग्रंथांत वापरावयाला लावायचे, हा क्रम उलटा असून भाषेच्या चैतन्याला मारक आहे. यांतहि आधीं झालेल्या उत्पादनाची खबर नव्या उत्पादनखात्याला नाहीं असें दिसून येईल. नाहींतर श्रीमंत सयाजीरावांसारख्या काळाच्या पुढें असलेल्या मराठा राज्यकर्त्यानें गुजराथी ही कारभाराची भाषा करतांना जे सुन्दर शब्द आपल्या राज्यांत रूढ केले, त्यांचें विस्मरण आजच्या राज्यकर्त्यांना झालें नसतें.

मराठींतील शास्त्रीय परिभाषा

मराठी शास्त्रीय लेखक आधीं ग्रंथरचना व मग परिभाषासंग्रह हाच क्रम अनुसरीत आहेत, ही गोष्ट आनंदाची होय. प्रिन्सिपल गो. रा. परांजपे (रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे माजी प्रमुख) यांनीं या क्षेत्रांत याच मार्गानें दीर्घ-काळ केलेला उद्योग शास्त्रीय क्षेत्रांत सर्वश्रुत आहे. त्यांचा गेल्याच वर्षीं प्रसिद्ध झालेला 'अणुशक्ति' हा ग्रंथ सुगम शैलीच्या व सुगम परिभाषेच्या दृष्टीनें मला उल्लेखनीय वाटतो. वैज्ञानिक वाङ्मयाचा परामर्श घेणें हें मी या संमेलनाचें कार्य समजत नाहीं. तथापि वैज्ञानिक वाङ्मयानें भाषेवर होणाऱ्या परिणामाची दखल

घेण्याची जागा हीच आहे, असें मात्र मी समजतों. तसेंच, आजच्या वैज्ञानिक युगांत सुबोध, मनोरंजक आणि ज्ञानवर्धक शास्त्रीय वाङ्मय मराठींत मोठ्या प्रमाणांत निर्माण होणें जरूर आहे. कारण त्याच्या अभावीं आजचा मराठी माणूस गेल्या शतकांत वावरत राहील. सुबोध मराठी वैज्ञानिक वाङ्मयाची परंपरा सव्वाशें वर्षांहून अधिक जुनी आहे. 'सृष्टिज्ञान' हें सतत तीस वर्षें चाललेलें मासिक हेंच कार्य करीत आहे. 'विज्ञानछंद' हें मासिकहि अलीकडे तेंच कार्य करीत आहे.

भारतीय भाषांचा, वाङ्मयाचा आणि शास्त्रग्रंथांचा विकास कुठल्याहि कचेरीच्या तंत्रानें न होतां, स्वतंत्रपणेंच व्हायला हवा. पण झालेल्या विकासाची दाद मात्र सरकारी वा बिनसरकारी कचेरीनें घेतली पाहिजे. विद्वत्परिषांदचें कार्य हेंच आहे. ललित व शास्त्रीय वाङ्मयाचा परामर्श घेणारी व गौरव करणारी परिषद् ही चीज भारताला अगदींच नवीन नाहीं. भोजराजाची स्मृतिशेष विद्वत्सभा, रसिकश्रेष्ठ अकबराचा दरबार या ऐतिहासिक संस्था तर सर्वश्रुत आहेतच. पण सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीच्या दक्षिण भारतांत आजच्या ॲकॅडेमीसारखी संस्था होती असें तामिळ वाङ्मयाचा इतिहास सांगतो. अर्वाचीन भारतीय भाषा-भगिनींचा दरबार दिल्लींत स्थापन झाल्याचें दृश्य इतक्या लवकर दिसेल, असें जर कोणीं १९४७ पूर्वी भाकित केलें असतें तर तें केवळ मनोराज्य वाटलें असतें, पण वाङ्मयावर राजाश्रयाचा परिणाम अहितकारकहि होऊं शकतो हें विसरतां येत नाहीं. राजाश्रयाकडे डोळे लावून साहित्य निर्माण केल्यास, राजाश्रयाचा वाईट परिणामच वाङ्मयाच्या वाट्यास येण्याचा संभव अधिक. राजाश्रयाची यत्किंचित् तमा न बाळगतां जे साहित्यिक साहित्यसेवा करतात त्यांचेंच साहित्य खऱ्या राजाश्रयाला पात्र असतें. मग त्याला राजाश्रय मिळालेला दिसो अगर न दिसो.

अर्वाचीन राजाश्रयाचे परिणाम

पण अर्वाचीन काळांतल्या राजाश्रयांत तीन गोष्टींचा अंतर्भाव होतो. पहिली म्हणजे लेखकांनीं संघटनेला तयार होणें; दुसरी म्हणजे त्यांनीं राज-पुरस्कृत संघटनेला तयार होणें; आणि तिसरी म्हणजे राजाश्रयाला अथवा राजपुरस्काराला तयार होणें. जगप्रसिद्ध फ्रेंच ॲकॅडेमीचा इतिहास पाहिला तर

विद्वत्परिषदांच्या निर्मितींतील फायदे व तोटे दोन्ही आपल्या लक्षांत येतात. इ. स. १६२९ या वर्षी — म्हणजे शिवाजीमहाराजांच्या जन्माच्या एक वर्ष आधीं—पॅरिसमधील कांहीं साहित्यिक एकमेकांच्या घरीं अधूनमधून जमून साहित्य-चर्चा करीत. त्यांची संख्या रविकिरणमंडळाच्या सदस्यसंख्येहून अधिक नव्हतीं. प्रख्यात फ्रेंच मुत्सद्दी कार्डिनल रिशेल्यू याच्या कानांवर या विद्वन्मंडळाची वार्ता गेली. तो स्वतः बुद्धिमान् आणि विद्याप्रेमी असल्यानें त्यानें या खासगी मंडळाला सरकारमान्य स्वरूप देण्याचा यत्न केला. प्रारंभीं या निरंकुश साहित्यिकांना या सोनेरी अंकुशाची थोडी भीतिच वाटली; पण अखेर त्यांनीं त्या सरकारी मान्यतेला मान्यता दिली. पण प्रगतिप्रिय आणि स्वातंत्र्यप्रिय फ्रान्समध्यें या सरकार-मान्य साहित्यपरिषदेला नाक मुरडणारे व तिचे 'तपोभंगकारी' बाहुपाश टाळणारे साहित्यिक प्रत्येक कालखंडांत होऊन गेले आहेत. स्वतःच्या कालखंडाचा अनभिषिक्त राजाच असा व्होल्टेर या परिषदेवर कधींच निवडला गेला नव्हता! पण या वैयक्तिक घटनेपेक्षां ॲकॅडेमीच्या जन्माचा इतिहासच अधिक अर्थपूर्ण आहे. आधींच एकत्र जमणाऱ्या विख्यात लेखकांकडे सरकारी मान्यता आपण होऊन गेली; व त्या लेखकांनीं मात्र थोड्या साशंकतेनेंच त्या मान्यतेला मान पुढें केली असा हा इतिहास आहे. विद्वत्ता आणि राजमान्यता यांमधील हें नातें ज्या प्रमाणांत टिकेल त्या प्रमाणांतच विद्वत्परिषदा सामाजिकदृष्ट्या समर्थ ठरतील. विशिष्ट राजकीय मतप्रणालीला किंवा विशिष्ट साहित्यसंप्रदायाला एखाद्या देशांतील साहित्य 'ॲकॅडेमी' अधिक जवळ अगर दूर आहे, असा समज होण्याला काडीमात्र जागा असतां कामा नये. तरच ॲकॅडेमीवर निवड होणें ही मानाची गोष्ट ठरेल; आणि ती तशी ठरली तरच ॲकॅडेमी हें हिंदुस्थानासारख्या विशाल देशांत विद्यावितरणाचें एक महान् साधन ठरेल.

अर्वाचीन वाङ्मय ऐहिकपर म्हणूनच अधिक प्रभावी!

अर्वाचीन युगांतलें वाङ्मय प्राचीन वाङ्मयापेक्षां श्रेष्ठ कीं कनिष्ठ या प्रश्नावर दुमत होणें संभाव्य आहे. पण साहित्याचें सामर्थ्य प्राचीन युगांत अधिक जाणवत असे, कीं अर्वाचीन युगांत अधिक जाणवतें, या प्रश्नावर मात्र दुमत होण्याचें कारण नाहीं. अर्वाचीन युगांत साहित्य ही समाजमनावर हुकुमत गाजविण्याची सर्वांत मोठी शक्ति आहे यांत शंका नाहीं. समाजमनावर अधिराज्य

गाजविण्याकरितां आजच्या वाङ्मयाला धर्मश्रद्धेचा वशिला लावावा लागत नाहीं, हेंच त्याच्या श्रेष्ठतर आकर्षणाचें आणि प्रभावाचें गमक आहे असें मी म्हणेन. पुण्य लागेल या कल्पनेनें नित्य वाचलेल्या किंवा ऐकलेल्या रामचरित्रापेक्षां आणि पांडवप्रतापापेक्षां, स्वेच्छेनें वाचले जाणारे आजचे केसरी, सकाळ, लोकसत्ता, साधना, नवयुग, मौज हेच मी अधिक यशस्वी लोकशिक्षक मानतों. कारण त्यांना वाचकरूपी बालक शाळेंत यावेत म्हणून परलोककल्याणरूपी खडीसाखर वाटावी लागत नाहीं! विविधता आणि यंत्रकृत प्रसार यांच्यामुळें आज वाङ्मयरूप रक्तवाहिन्या समाजपुरुषाला आपादमस्तक व्यापून राहिल्या आहेत. पद्याहून गद्य अधिक सर्वगामी व्हावें हा तर आजच्या युगाचा विशेष आहेच; पण ग्रंथ-निविष्ट गद्याहून वृत्तपत्रगत गद्य उद्यां अधिक शक्तिमान् ठरेल असाहि भास होत आहे; आणि ही स्थिति मी तरी वाईट समजत नाहीं. आजच्या औद्योगिक युगाचा तो एक अपरिहार्य परिणाम आहे. पण यंत्रयुगानें आलेल्या या बाळशा-बरोबर एक पथ्यहि पाळण्याची गरज आहे.

ऐहिकपर वाङ्मय म्हणजे निष्ठाशून्य वाङ्मय नव्हे!

पारलौकिक कल्याणावरची भिस्त कमी करणें म्हणजे सर्व जीवननिष्ठांचा त्याग करणें नव्हे. आजच्या नियतकालिक वा ग्रंथगत वाङ्मयानें सार्वत्रिक शिक्षणाच्या आणि यांत्रिक प्रसाराच्या जोरावर समाजाच्या रक्तवाहिन्यांची जागा घेतली आहे ही गोष्ट आशादायकच आहे; पण हें रक्त शुद्ध राखायचें असेल, तर जीवननिष्ठारूप प्राणवायूखेरीज धडगत नाहीं. सार्वत्रिक शिक्षणामुळें उफाड्यानें वाढूं लागलेल्या आमच्या समाजमनाला नैराश्य, स्वयंकेंद्रितता, विकृत कामुकता, नीतिविषयक अज्ञेयवाद, वाङ्मयीन प्रयोगपूजन या विषारी वल्लींचा खुराक मिळूं लागला, तर काय होईल हें पाहायला दूर जायला नको.

आजच्या विकृत, कामपूजक, हताश, वैतागी वाङ्मयाचा इत्यर्थ खुद्द लेखकांना माहीत होण्यापूर्वीच नव्या पिढीच्या जीवनांत दिसूं लागला आहे. स्वयं-केन्द्रितता, कामुकता, श्रद्धाशून्यता यांचें परिस्थितीच्या भूमिकेवरून अथवा मूलभूत प्रवृत्तींवरून समर्थन करणें हा आजच्या सर्व विकृत लिखाणाचा इत्यर्थ आहे. "दुसऱ्या महायुद्धानंतर मानवी जीवन किडामुंगींच्या जीवनासारखें क्षुद्र आणि श्वानसूकरांच्या जीवितासारखें बीभत्स बनणें अपरिहार्य आहे", हें आजच्या व्यासवाल्मीकींचें पालुपद आहे!

अनुमा... 39.(38)... विः ...
क्रमांक ...2347... नोंः दिः ...

या पोलुपदाचा परिणाम म्हणून आजच माणसांनीं लाज सोडल्याचें दिसत आहे असें मला म्हणायचें नाहीं. पण त्याला कारण अद्याप टिकून असलेले जुने संस्कार, जुनीं माणसें आणि व्यावसायिक क्षेत्रांतले कठोर कायदेच होत. वेगवेगळ्या कारणांमुळें आज लाज आणि माणुसकी साफ सोडणें शक्य होत नसलें, तरी त्या गुणांना युद्धोत्तर जगांत अर्थ नाहीं, हें घोकून आणि गिरवून घेण्याचा जो परिणाम व्हायचा तो होतच आहे. तो परिणाम म्हणजे कुठल्याहि सद्गुणावर, कुठल्याहि श्रेष्ठ मूल्यावर विश्वास न उरणें हा होय.

साध्या 'प्रेम' या सर्वमान्य गुणाची वा मूल्याची आजकालच्या वाङ्मयांत जी धिंड काढली जात आहे, ती पाहिली तरी आजचें वाङ्मय केवढा घात करीत आहे तें दिसून येईल. कोणत्याहि सद्गुणाची धिंड काढणें अवघड नाहीं. शेक्स्पियरचा फॉल्स्टाफ आपल्या एका स्वगत भाषणांत 'अब्रू' अथवा 'लौकिक' म्हणजे एक पोकळ बुडबुडा आहे असें बिनतोडपणें सिद्ध करतो; आणि एका अर्थानें पाहतां बाजारांतील 'पत' ही वस्तु जशी केवळ मानीव म्हणून खोटी म्हणतां येते, तशीच अब्रूची गोष्ट आहे. लाज, भीड, प्रेम, आदर यांचेंहि स्तोम आपण वाढविलें तरच आहे, एरव्हीं त्या खोट्या, किंबहुना दुबळ्या कल्पना आहेत असें सिद्ध सहज करतां येईल. पण या दौर्बल्यप्राय मनोवृत्तींतच अतर्क्य सामर्थ्य आहे हें ज्यानें ओळखलें नाहीं, त्याला वाङ्मय लिहिण्याचा तर अधिकार नाहींच, पण मनुष्य म्हणून जगण्याचाहि अधिकार नाहीं असें मी म्हणेन. कारण त्या वृत्ति म्हणजेच माणुसकी होय.

नाजुक भावना म्हणजेच—निर्मितीची शक्ति !

मनुष्याच्या नाजुक भावना एकीकडून पाहिलें तर अर्थशून्य असतात, दुसरीकडून पाहिलें तर महान् अर्थानें भरलेल्या दिसतात. ज्याला बौद्ध लोक शून्य म्हणतात, त्यालाच वैदिक लोक ब्रह्म म्हणतात. कारण एकीकडून हें शून्य आहे तर दुसरीकडून तें पूर्ण आणि अनंत आहे. मूल्यांतील सामर्थ्य किंवा Creativity आहे ती मानवांत आहे, मानवाच्या दृष्टींत आहे. जे लोक मूल्यें ढांसळल्याचा पुकारा करतात, ते मूल्यें ढांसळण्याची वाटच पाहात होते कीं काय, असा भास होतो. कारण मूल्यनाशाच्या म्हणजेच बीभत्सतेच्या त्यांच्या चित्रांत हळहळ तर कुठेंच दिसत नाहीं ! उलट 'श्रुतं श्रोतव्यम्' म्हणून कृतकृत्यता व्यक्त करणाऱ्या

कामार्त दुष्यंताची तृप्तीच दिसते. कारण 'मूल्यें ढांसळत आहेत' या आधुनिक श्रुतिवाक्याचा अनुक्त उत्तरार्ध "तीं ढांसळायलाच हवीं होतीं" हा आहे! जेव्हां एखादा मार्क्सवादी लेखक जुन्या मूल्यांच्या विलयांत आणि विनाशांत आनंद मानतो तेव्हां खरीं वा खोटीं नवीं मूल्यें त्याच्या कल्पनाराज्यांत तरी तयार असतात. पण मनोविश्लेषणवादी अथवा फ्रॉइडवादी लेखकाच्या आसुरी आनंदांत अशीं काल्पनिक मूल्यें हि सूचित नसतात. अशा केवळ विघातक भूमिकेवरून सर्व कोमल भावनांचा, सर्व ध्येयात्मक—आणि म्हणूनच नवनिर्मितिक्षम—मूल्यांचा उपहास करण्याचे प्रत्यक्ष सामाजिक परिणाम महाराष्ट्रीय सुशिक्षितांच्या संसारांत आजच दिसूं लागले आहेत.

सुख आणि विकास यांचें खरें साधन संसार आणि समाज हेंच होय. सांसारिक व सामाजिक जीवन म्हटलें कीं संयम, आत्मविसर्जन, ध्येयपूजन यांच्या खेरीज पाऊलहि टाकतां येणार नाहीं. सुख आणि आत्मविकास म्हणजे एक संयमपूर्ण प्रेमप्रधान कला आहे. वैताग, नंगेपणा, नास्तिक्य यांना त्यांत तर्कदृष्ट्या जागाच नाहीं असें कसें होईल? पण चातुर्य, कला, कसब, शहाणपण यांच्या भूमिकेवरून पाहिलें तर हा नंगा, नास्तिक आणि त्रागेखोर तार्किकपणा म्हणजे आत्मघातकी मूर्खपणा आहे असेंच दिसून येईल.

आजच्या नाजुक काळांत

जग युद्धपूर्व असो कीं युद्धोत्तर असो, त्यांत प्रेम, त्याग, संयम, देवाणघेवाण यांना फार मोठें स्थान आहे; किंबहुना या मूल्यांचें महत्त्व मनावर बिंबविणें हें समाजांतील लेखकांचें, शिक्षकांचें आणि वृद्धांचें मुख्य काम आहे. ज्या वयांत नम्रता हें पहिलें पथ्य होय, त्या वयांत सवंग बंडखोरी आणि पोकळ घमेंड यांचे पाठ मिळूं लागले तर काय गत होते, ज्यांनीं संयम शिकवावा तेंच माथेफिरूपणाचें स्तोत्र गाऊं लागले तर काय दशा होते, याचें एडमंड बर्क यानें फ्रेंच राज्यक्रांतीच्या विवेचनांत काढलेलें हृदयविदारक चित्र आपणांपैकीं पुष्कळांना आठवत असेल. आजच्या बकाली जीवनांत राजकीय आणि आर्थिक बेबंदशाहीच्या जोडीला भावनात्मक बेबंदशाही माजविण्याचें कार्य जर आम्ही लेखक करूं लागलों, तर हिंदु-मुसलमानांच्या दंग्याची पर्वणी साधून खिसे कापणाऱ्या महाभागांत आणि लेखकांत अंतर उरणार नाहीं.

तंत्रविषयक प्रयोग आणि मनोविश्लेषण यांना फाजील महत्त्व देणारे माझे बुद्धिमान् तरुण मित्र आज काय करीत आहेत, यापेक्षां ते उद्यां काय करूं शकतील यासंबंधींच मला अधिक बोलावेंसें वाटतें. आज राजकीय आणि आर्थिक भ्रष्टतेचा काळ आहे हें तर उघडच आहे; पण म्हणूनच उच्चतर भावना आणि श्रेष्ठतर ध्येयवाद जागता ठेवण्याची जबाबदारी लेखकांवर अधिक आहे. जमाना बिघडला आहे हें आपणां सर्वांनाच माहीत आहे, पण म्हणूनच धैर्याची आणि ध्येयवादाची आज गरज आहे. आपण लेखक व कवि म्हणजे समाजाच्या नाजुक भावनांचे जामदार आहांत. आपणच वैतागल्याप्रमाणें लिहूं लागलांत, तर अजाण बालकाप्रमाणें असलेला सामान्य समाज कुठल्या थराला जाईल हें सांगतां येणार नाहीं. काळ नाजुक आहे; पण त्यांतून निभाव वैतागीपणानें किंवा त्राग्यानें लागणें अशक्य आहे. वेडें प्रेम आणि सात्त्विक दुःख हींच अशा सामाजिक कसोटीच्या वेळचीं दोन अस्त्रें होत.

"आदमीको जिंदगीमें जब कोई नाजुक मुकाम आया।
जुनूहीने कयादत की खुलूसेगमही काम आया॥"

जिगर मुरादाबादी म्हणतात :—"आयुष्यांत मनुष्य जेव्हां जेव्हां नाजुक मुक्कामाकर येऊन ठेपतो तेव्हां तेव्हां वेडी भावनाच त्याला वाट दाखविते; पवित्र यातना त्याच्या उपयोगी पडते!"

आजच्या नाजुक मुक्कामांत महाराष्ट्रीय समाजाच्या भावनांचें नेतृत्व करण्याचें बळ देव आजच्या साहित्याला देवो हीच माझी त्याला प्रार्थना!



मिरज मराठी साहित्य
संमेलन अध्यक्षपदावरून
दिलेलें भाषण : मे १९५९

वाङ्मयांतील प्रेम, शृंगार आणि अश्लीलता

वाङ्मयप्रेमी बंधुभगिनींनो,

आपल्या वाङ्मयपरिषदेच्या यंदाच्या अधिवेशनाचें अध्यक्षपद मला देऊन आपण माझा बहुमान केला आहे. हा मान स्वीकारतांना मला अनेक कारणांनीं थोडें अवघड वाटत होतें. पहिलें कारण म्हणजे माझ्या स्वतःच्या पात्रतेविषयींची साशंकता व माझ्यासमोर द्रिसणाऱ्या विद्वज्जनांच्या अधिकारासंबंधींची जाणीव हें होय. हें कारण सांगणें म्हणजे केवळ नम्रतेचा देखावा होय, असेंहि कदाचित् आपणांस वाटेल. कारण गेल्या सात-आठ वर्षांत मी आपल्या सम्मेलनासारख्याच श्रेष्ठ परंपरेच्या चार-पांच तरी सम्मेलनांचें अध्यक्षस्थान स्वीकारलें आहें. पण आपल्यासारख्या साहित्यप्रेमी मंडळींचा आग्रह आणि सार्वजनिक ऋणाची जाणीव यामुळें कांहीं मानाचीं स्थानें विशिष्ट वयांत मनुष्य स्वीकारतो, याचा अर्थ त्याला स्वतःच्या अल्पत्वाची जाणीव नसते असा नव्हे. यंदा हें पद स्वीकारतांना मला संकोच वाटायला आणखीहि कांहीं कारणें आहेत. अखिल महाराष्ट्रीय साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदावरून महाराष्ट्राला माझें मनोगत मीं सांगितलें, त्याला अद्याप पुरें दीड वर्षहि झालें नाहीं. आपल्या माळव्यांतील साहित्यप्रेमी मंडळींच्या

इंदूर येथील उत्सवाचें पौरोहित्य केल्याला तर मला वर्षेंहि पुरें झालें नाहीं,—तोंच पुन्हा एकदा तशाच सुप्रतिष्ठित व्यासपीठावरून भाषण करण्याला मान्यता देणें मला खरोखरच मोठें जड वाटत होतें. तथापि, ग्वाल्हेरसारख्या मराठीच्या दूरतम पीठानें मजवर सोंपविलेली कामगिरी नाकारून तेथील कार्यकर्त्यांच्या अडचणींत भर घालणें एक प्रकारें निष्ठुरपणाचेंच झालें असतें; आणि केवळ या दृष्टीनेंच मीं आपल्या विनंतीला मान्यता दिली.

मराठीचें 'आउटपोस्ट' ग्वाल्हेर

माझे ज्येष्ठ मित्र के. माधवराव पटवर्धन, "ग्वाल्हेर हें महाराष्ट्राचें सर्वांत दूरचें 'ठाणें' आहे, 'outpost' आहे" असें म्हणत. एके काळीं तें मराठी राज्याचें शेवटचें 'ठाणें' होतें; तर आतां तें मराठी भाषेचें शेवटचें ठाणें आहे. अशा दूरदूरच्या मराठीच्या 'ठाण्यां'त मराठीची जोपासना ज्या आस्थेनें आणि निष्ठेनें होते, तिजकडे पाहिलें म्हणजे पुण्या-मुंबईकडच्या मजसारख्या माणसाला एक प्रकारची ओशाळगत वाटून कर्तव्याची जाणीव द्विगुणित होते. बृहन्महाराष्ट्रांतल्या या मराठीनिष्ठेचा,—नव्हे, नव्या महाराष्ट्रधर्माचा,—अनुभव मीं गेल्याच वर्षीच्या माझ्या माळव्यांतील दौऱ्यांत घेतला. खांडवा, महू, देवास, इंदूर या ठिकाणच्या सांस्कृतिक संस्थांना भेटी दिल्यावर मला असें वाटलें, कीं महाराष्ट्राबाहेरच्या मराठी तीर्थांची यात्रा केल्याखेरीज कुणाहि साहित्यिकाला अखिल मराठी समाजाला उद्देशून भाषण वा लेखन करण्याचा अधिकारच नाहीं.

ग्वाल्हेरच्या मराठी समाजाच्या निमंत्रणावरून आज मराठ्यांच्या या इतिहासप्रसिद्ध राजधानीशीं माझा जो संपर्क येत आहे, त्याकडे मी याच दृष्टीनें पाहतों. ज्यानें महाराष्ट्राबाहेरचा महाराष्ट्र पाहिला नाहीं त्याचें महाराष्ट्रासंबंधींचें ज्ञान अपुरेंच समजलें पाहिजे. कित्येक वैयक्तिक कारणांनीं मला प्रवास टाळावा लागत असला, तरी बृहन्महाराष्ट्रांतील साहित्यसंस्थांनीं एक प्रकारची प्रेमाची सक्ति करून मला बडोदें, हैद्राबाद, इंदूर यांसारख्या ठिकाणीं यापूर्वीच ओढून नेलें होतें. तथापि, अद्याप ग्वाल्हेरचा परिचय झालेला नसल्यानें माझ्या महाराष्ट्र-परिचयांत जें वैगुण्य राहिलें होतें, तें आज दूर होत आहे, हीच माझ्या येथें येण्याची माझ्या दृष्टीनें तरी फलश्रुति होय.

"शिंदेसरकारचें लष्कर !"

मी स्वतः शरीरानें आज येथें प्रथमच येत असलों तरी शिंद्यांच्या लष्करचें नांव आम्हां सातारा-पुण्याकडच्या लोकांच्या कानीं बालपणापासून पडत असतें,—निदान पन्नास वर्षांपूर्वी आमच्या बालपणीं तें आमच्या कानीं पडत असें. ज्योतिर्गणितावर ग्रंथ लिहिणारे आपल्या येथील प्रिन्सिपल गोविंद सदाशिव आपटे हे माझ्याच गांवचे—म्हणजे सातारा जिल्ह्यांतील पालीचे. ग्वाल्हेरचे प्रसिद्ध थिऑसॉफिस्ट प्रिन्सिपल रामकृष्णपंत ऊर्फ आर. के. कुलकर्णी हेहि आमच्या जिल्ह्यांतील व आमच्या दूरच्या आप्तांपैकींच. माझ्या लहानपणीं ही विद्वान् मंडळी पालीला आली, म्हणजे तर ग्वाल्हेरचें नांव आम्हांला ऐकूं येईच, परंतु माझ्या मातुल घराण्यांतीलहि कित्येक मंडळी उपजीविकेकरितांच 'शिंद्यांच्या लष्कर'ला अनेकदा येत असल्यानें, लष्करच्या अथवा ग्वाल्हेरच्या गोष्टी आमच्या कानावर लहानपणापासून असत. पण हे ग्रामस्थांचे आणि आप्तांचे वैयक्तिक संबंध सोडले, तरी त्यानंतर महाराष्ट्राचा व हिंदुस्थानचा इतिहास वाचतांना पदोपदीं ग्वाल्हेरचें नांव इतक्या वेळां पुढें येई कीं, ग्वाल्हेर महाराष्ट्रांतच आहे अशी मनाची धारणा झाल्याशिवाय राहात नसे.

आमचा संपर्क कीं उपसर्ग ?

ग्वाल्हेर-इंदोर-बडोदें हीं महाराष्ट्रांत असोत अगर नसोत, महाराष्ट्र मात्र या दूरच्या मराठी केन्द्रांत अधिक निखालस स्वरूपांत पाहायला सांपडतो, असें मी म्हणेन. कित्येक महाराष्ट्रीय रीतिरिवाज, कित्येक महाराष्ट्रीय वाक्प्रचार आज या बृहन्महाराष्ट्रीय केन्द्रांत जितके सुरक्षित आहेत, तितके महाराष्ट्राच्या तथाकथित गाभ्यांत—म्हणजे पुण्या-मुंबईतहि नाहींत असें आढळून येईल. या सत्याचा उल्लेख करण्यांत माझा हेतु एखाद्या प्रदेशाची स्तुति अगर निंदा करण्याचा नाहीं; —तर वस्तुस्थिति कथन करण्याचा आहे. आपण आज भरवींत आहांत, त्या प्रकारच्या संमेलनाचे वाङ्मयीन उपयोग कोणतेहि असोत, 'महाराष्ट्राच्या दूर-दूरच्या भागांचा सांस्कृतिक संपर्क' हा मला त्यापासून फार मोठा लाभ वाटतो. अर्थात् अशा संपर्कापासून मला स्वतःला अधिक लाभ आहे अशी माझी समजूत असल्यानें, तो घडवून आणल्याबद्दल मी आपले आभार मानतों.

आपला संपर्क आम्हांला आमच्या इच्छेहून व गरजेहून कमी घडत असला, तरी आमचा संपर्क मात्र आपणांला म्हणजे बृहन्महाराष्ट्रांतील मराठी वाचकांना, आपल्या गरजेहून—व कदाचित् इच्छेहूनहि !—अधिक घडतो, अशी मला भीति वाटते ! आपण आमच्या भागांतील लेखक-वाचकांइतकेच समर्थ आणि संस्कार-संपन्न असूनहि अन्य भाषांनीं वेढलेले व इतस्ततः विखुरलेले असल्यामुळें, वाङ्मयाच्या—विशेषतः नियतकालिक वाङ्मयाच्या—बाबतींत, आपण पुण्या-मुंबईवर अवलंबून असणें स्वाभाविक आहे. एक तर अशा अन्यभाषी प्रान्तांत मराठी नियतकालिकें चालविणें व्यवहार्य नाहीं. दुसरें म्हणजे मुंबई-पुण्याकडच्या राजकीय, सामाजिक प्रवाहांची दखल बारकाईनें घेणें महाराष्ट्राबाहेर पसरलेल्या महाराष्ट्रीयांना अगत्याचें आहे. पण या वस्तुस्थितीचा परिणाम म्हणजे स्वेच्छेनें असो, कीं यदृच्छेनें असो, आपणांला आमचा संपर्क घडतो;—पण आम्हांला मात्र आपला संपर्क घडावा तेवढा घडत नाहीं ! मी तरी आमच्या संस्कार-संपत्तींत ही एक उणीव राहते, असेंच मानतों. ही उणीव प्रत्येक ज्येष्ठ साहित्यिकानें आपण होऊन बृहन्महाराष्ट्राची यात्रा करून भरून काढायला हवी ;—एरव्हीं अखिल महाराष्ट्राच्या वतीनें व अखिल महाराष्ट्राला उद्देशून बोलायचा त्याला अधिकारच नाहीं असें मीं यापूर्वीहि म्हटलें आहे,—आजांहि म्हणतों. अशा स्थितींत ही न्यूनता दूर करण्याची संधि आपण होऊन चालत आल्यावर तिचा अव्हेर करणें म्हणजे संस्कारधनाचाच अव्हेर करणें नव्हे का ?

सर्वश्रेष्ठ आधुनिक कवि ग्वाल्हेरचा !

वैपुल्यानें निघणाऱ्या नियतकालिक वाङ्मयाचे व कथा-कादंबऱ्यांचे संस्कार पुण्या-मुंबईच्या दिशेनें बृहन्महाराष्ट्राकडे आक्रमण करीत असले, तरी बृहन्महा-राष्ट्रांतून पुण्या-मुंबईकडे वाङ्मयीन संस्कार वाटचाल करीतच नाहींत असा मात्र अर्थ नव्हे. सर्वश्रेष्ठ आधुनिक मराठी कवि ग्वाल्हेरनेंच महाराष्ट्राला दिला आहे. ग्वाल्हेरचे राजकवि कविवर्य भास्करराव तांबे यांनीं महाराष्ट्रीय रसिकांच्या मनावर जे सुवर्ण-संस्कार केले ते शेंकडों नियतकालिकांनाहि करतां आले नसते; फार काय विद्यापीठांनाहि करतां आले नसते. भास्करराव्यांच्या शुद्ध सौंदर्यपूजनानें आणि विदेही प्रेमपूजनानें रुक्ष, रोखठोक, उपयुक्ततावादी महाराष्ट्र, संस्कृतीच्या पुढच्या टप्प्याला पोहोंचला. ज्ञानेश्वरांच्या मराठी प्रबंधांनीं माधुर्यांत आणि गांभीर्यांत

संस्कृतभाषेशीं पैजा मारल्या,—तर भास्कररावांच्या भावगीतांनीं उत्कटतेंत आणि संगीतानुकूलतेंत हिंदी-उर्दूशीं पैज मारली. ज्या काळांत आमच्या बहुसंख्य कवींना सामाजिक सुधारणावाद आणि वैयक्तिक निराशावाद यांच्या पलीकडे तत्त्वज्ञान ठाऊक नव्हतें, अशा काळांत या अंतर्मुख भास्करानें आम्हांला प्रेमाचें अलौकिक सौंदर्य आणि जीवनांतील दुर्दम्य आशावाद शिकवला.

जीवनांत काय, कीं वाङ्मयांत काय, अस्सल सोन्याचें तेज कमी होण्याची भीति कधींच नसते; तथापि अस्सल सोन्याचें विस्मरण होण्याची भीति मात्र असते. आज मराठी वाङ्मयांत नकली मालाची गर्दी उसळली आहे. त्यामुळें भास्कररावांनीं महाराष्ट्राला दिलेल्या अस्सल सोन्याचें विस्मरण होणें शक्य नसलें, तरी त्या सुवर्णाला हिणकस ठरविण्याचें धाडस कित्येक नवसंप्रदायी लोक अधून-मधून करतांना दिसतात! वाङ्मयीन बुद्धिभ्रंशाच्या या जमान्यांत सोनें आणि पितळ, क्षीर आणि नीर, काव्य आणि अकाव्य, शृंगाररस आणि विकृत कामुकता यांमधील फरकाकडे फिरून एकदा लक्ष वेधणें जरूर आहे.

तांब्यांच्या काव्यलेखनाचें मूळ सौंदर्यजनित आनंदांतच होतें. ज्या वाङ्मयीन पिढीला, तांबे समजत नाहींत, त्या पिढीच्या वाङ्मयाचें प्रयोजन समजून घेण्याची अप्रिय कामगिरी आपण उचलली पाहिजे. "समजून घेणें" म्हणजे एक प्रकारें "क्षम्य समजणें" होय, अशा अर्थाची एक फ्रेंच म्हण आहे. अर्थात् एखाद्यानें आपला अपराध केला असेल, तरच क्षमा करण्याचा प्रश्न उपस्थित होतो. पण जर एखाद्या पिढीनें, अज्ञानानें अथवा मूर्खपणानें स्वतःचाच अपराध केला असला तर? तर क्षमा करण्याचा प्रश्नच नाहीं;—तसाच शिक्षा करण्याचाहि प्रश्न नाहीं. कारण तांब्यांच्या कवितेचें सौंदर्य नाकारणें हा जर वाङ्मयीन गुन्हा असेल, तर तांब्यांच्या कवितेंतील आनंदाला मुकणें याहून त्या गुन्ह्याला मोठी शिक्षा कोणती? शेक्स्पियरसंबंधीं हीच चूक करणाऱ्या लोकांबद्दल फ्रेंच टीकाकार सॅन्त् बव्ह यानें म्हटलें आहे, "That is their punishment."

तांब्यांच्या काव्याचें प्रयोजन

भास्करराव तांब्यांच्या काव्याचें प्रयोजन कोणतें होतें? मला वाटतें, सौंदर्यापासून होणारा आनंद शब्दांत चित्रित करणें. सौंदर्याच्या जगतांत मीं भव्योदात्त वस्तूंना आणि अनुभूतींना जागा दिली तर आपल्यासारखे रसिक कुरकुर करणार

नाहींत, अशी मला आशा आहे. विश्वात्मक देवानें आपल्या अन्तर्बाह्य चक्षूंकरितां रचून ठेवलेलें हें चराचर जगत् म्हणजे जर एक जगड्व्याळ मिरवणूक (pageant) आहे अशी कल्पना केली, तर आपल्या विवाहादिकांतील मिरवणुकींप्रमाणें ती मिरवणूकहि नारीप्रधान असल्यास नवल नाहीं. अर्थात् ती नरनारी-संमिश्र आहे. कवींना आनंद देणाऱ्या अनुभूतीहि अशा संमिश्र असतात. त्याच्या आनंदाचा उगम सुखद सौंदर्यीतहि असतो आणि उग्र भव्यतेंतहि असतो. तांब्यांच्या यच्चयावत् कवितांचा उगम या द्विविध सौंदर्यीत आहे.

जगतांत सर्वांत सुंदर वस्तु कोणती ? आजच्या संख्यापूजक, विस्तारपूजक जगांत हा प्रश्न विचारणें म्हणजे स्थलसूची आणि भूगोलवर्णनें धुंडाळण्याला आवाहन करण्यासारखेंच आहे. सर्वांत मोठें धरण, सर्वांत उंच मनोरा, (चालू साल्ची) सर्वांत सुंदर तरुणी यांची प्रतवारी जुळवीत बसलेल्या आजच्या वर्तमानपत्री जगाला मी हा प्रश्न विचारीत नसून तांब्यांच्या कर्मभूमींत तांब्यांच्या भक्तांना मी— एक तांबेभक्त, हा प्रश्न विचारीत आहे. अरबस्थानच्या शहानें जेव्हां हा प्रश्न प्रेम-वेड्या मजनूला विचारला, तेव्हां त्यानें "दुनियेंत सर्वांत अधिक 'खूबी' (सौंदर्य) आपल्याला लैलांत दिसली !" असें सांगितलें. प्रेमिक आणि पागल हे आत्मकेंद्रित आणि आत्मलक्ष्यी (Subjective) असतात. वेड्या मजनूचें हें इतिहासप्रसिद्ध उत्तर आत्मकेन्द्रांतून बाहेरच्या जगतांत आणायचें म्हटलें, तर 'सर्वांत सुंदर वस्तु 'प्रेम' ही होय !' असें उत्तर द्यावें लागेल. आणि मला वाटतें, कै. भास्करराव जींनीं या उत्तराला पसंतीची मान डोलविली असती. याच सर्वोच्च सौंदर्याचीं स्तोत्रें भास्करराव नीं आमरण गायिलीं. पण प्रेम हें निर्भेळ सौंदर्य म्हणून प्रतीत होण्याकरितां कवि आत्मकेन्द्रांतून बाहेर पडून विश्वकेन्द्री व्हावा लागतो. आपले बहुतेक प्रेमकवि आत्मकेन्द्रित होते. मी हा त्यांचा दोष म्हणून सांगत नसून स्वभाव म्हणून सांगत आहें. प्रेमिकाप्रमाणें प्रेमकवीहि सामान्यतः आत्मकेन्द्रितच असणार ! त्यामुळें त्या विचाऱ्याला यातना सहन कराव्या लागल्या तरी आपल्याला सुंदर प्रेमगीतें चाखायला मिळतात. आत्मकेन्द्राच्या आणि आत्मनिष्ठेच्या बाहेर पडल्यावरहि उत्कट प्रेमगीतें लिहिण्याला फारच विशाल आत्मा लाभावा लागतो. तांबे हे अशा प्रकारचे 'महान् आत्मा' होते. वाङ्मयीन 'महात्मता' शोधणाऱ्या नवकवींना तांब्यांचा हा 'महान् आत्मा' गवसला नाहीं, ही गोष्ट दुःखपूर्ण नसून अर्थपूर्ण आहे असें मी मानतों.

गुदमरलेलें प्रेम विरुद्ध मुक्त प्रेम !

आत्मकेंद्रित कवींच्या प्रेमकाव्यांत प्रेमाची दुःखप्रद बाजू अधिक आवेशानें चितारलेली आढळते. तांब्यांच्यासारखा विश्वकेन्द्री कविच प्रेमाची आनंदप्रद आणि सौंदर्यरूप बाजू रंगवूं शकतो. जो प्रेमांत गुरफटतो तो बहुधा प्रेमांत गुदमरतो ! जो प्रेमानें रंगून विश्वदृश्याचें आकंठ पान करतो, तो प्रेमाच्या हातांत हात घालून मोकळ्या मैदानावर उभा असतो. 'गोफ', 'हृदयास', 'शेवटचें प्रेमगीत' यांसारख्या गडकऱ्यांच्या प्रेमकविता हृदयद्रावक आहेत. पण त्या गुदमरलेल्या जिवाच्या कण्हण्यासारख्या आहेत. त्या कण्हण्याबद्दलहि आम्ही रसिक गडकऱ्यांचे शतशः ऋणी आहोंत. कारण, कवींचे निःश्वास, कवींचें कण्हणें, कवींचें आक्रंदन, सर्व—सर्व कांहीं मधुर आणि तेजोमय असतें. आणि तरी आम्हांकडे प्रकाशाचे झोत आणि प्राणवायूच्या लहरी झोकून देत असतां, बिचारा कवि मात्र अंधारांत गुदमरत आहे हें आम्ही विसरूं शकत नाहीं.

या अंधाराचाच अट्टाहासानें प्रकाश बनविण्याचा प्रयत्न ध्येयात्मक प्रेमाचे शाहीर माधव जूलियन् करीत असत. पण अंधारावर मात करणें वेगळें आणि खरोखरीच प्रकाशांत असणें वेगळें ! माधव जूलियन् यांची 'माझ्या हृदयांत तूंच राणी' या गझलसारखी कविता किंवा 'निराशेंतील समाधान'सारखी कविता घेतली, तरी तिजमध्यें हा अट्टाहासानें आणलेला प्रकाशच दिसेल.

प्रेम कुणाचें मजवर नाहीं हें खडतर दैव
असे हा तथापि आनंद ।

असती कोणी ज्यांवर माझें प्रेम सर्वथैव
न त्याला कसला निर्बंध ।

या माधव जूलियन् यांच्या ओळी सुमारें तीस वर्षांपूर्वी आम्ही वेदघोषाप्रमाणें घोषविल्या असतील. या ओळी लाखमोलाच्या आहेत. पण त्या ओळींतील घोषणेमागें 'निराशेंतलें समाधान' आहे ही गोष्ट अखेर उरतेच ! गडकऱ्यांनींहि 'प्रेम आणि मरण' या अमर कवितेंत–

निष्प्रेम चिरंजीवन तें । जगिं दगडालाही मिळतें ।
धिक् तया ।

क्षण एक पुरें प्रेमाचा । वर्षाव घडो मरणांचा ।
मग पुढें ।

हाउमदा ध्येयवाद सांगितला. पण या संपूर्ण रूपकाव्यांत प्रेमाच्या सजीवकतेक्षां दाहकताच अधिक जाणवते. यांत कवीचा दोष नाहीं—व कवीला दूषणहि नहीं. हा दोष कवीच्या अवस्थेचा आहे; आणि ती अवस्था कोणतीहि असो, कोनें प्रामाणिकपणानें आणि प्रभावीपणानें ती सांगितली यांतच त्याची कृतर्थता आणि आमची कृतज्ञता आहे.

ए हे दोन्ही विख्यात प्रेमकवि 'प्रेमाच्या आंत' उभे आहेत—प्रेमांत 'involved' आहेत; 'evolved' नाहींत, प्रेमांतून बाहेर आलेले नाहींत. तो प्रेमाचा अनुभव घेऊन बाहेर आलेले होते. प्रेमाचा अनुभव घेऊन बाहेर पल्यारहि प्रेमाचें आणि जगाचें सौंदर्य अनुभविण्याकरितां मनुष्याला असाधारण आत्मिक सामर्थ्य लाभावें लागतें. तें नसेल तर सौंदर्यवादांतून बाहेर पडल्यावर कवि वस्तववादांत 'पडतो'! वस्तुतः सौंदर्यवादाची परिणति ध्येयवादांत आणि गूढानुभववादांत व्हायला हवी. पण प्रेमाच्या अग्निदिव्यांतून कवि शाबूद राहिला तरच ध्येयवादाच्या आणि गूढवादाच्या गोष्टी! नाहींतर आहेच विसाव्या शतकत सर्वंग झालेला वास्तववाद!—कीं जो पुन्हा विढुळतो, नासतो आणि उपयुक्ततावाद,-नाहींतर सर्वविद्वेषवाद-Cynicism-देखील बनतो.

भग्नमनस्क कवि विरुद्ध पूर्णमनस्क तांब्रे

तांब्यांची 'महात्मता' ती हीच होती. उत्कट सौंदर्यपूजनांतून ते भग्नमनस्क (disintegrated) होऊन बाहेर पडले नाहींत; ते पूर्णमनस्क होऊन ध्येयवादी, गूढवादी बनले; आणि म्हणूनच सौंदर्यतत्त्वाचाच 'नरविभाग' म्हणजे जें भव्यत्व, उदात्तत्व त्यालाहि त्यांच्या काव्यांत मानाचें स्थान मिळालें. सुंदरतेइतकेंच आपणांला भव्यतेचें—नव्हे, भीषणतेचें देखील—आकर्षण कां वाटतें, हा सौंदर्य-शास्त्रांतला अथवा कलास्वरूपशास्त्रांतला प्रसिद्ध प्रश्न आहे. केवळ सुभग आकारांत आणि सुखद रूपांत सौंदर्य वसतें, असें मानणाऱ्यांना उत्तुंग, अप्रमाण पहाडाचें आकर्षण कशांत आहे याचें गूढ पडतें. अशा भीषणरम्य दृश्यांचा धाक त्यांच्या मना-पेक्षांहि त्यांच्या शास्त्राला अधिक पडतो! काव्यसृष्टींत मनोरथपूर्तीचा आनंद शोध-णाऱ्यांना रामायण-महाभारतासारख्या अलौकिक काव्यांत संसाराचें प्रायः दुःखान्त

स्वरूप कां आढळावें हें समजत नाहीं; तसेंच श्रेष्ठ पाश्चात्य नाट्यकृतींत पराभूत, विपद्ग्रस्त नायकाचें चरित्र कां आढळावें याचें कोडें पडतें.

हीं सर्व कोडीं अपूर्ण सौंदर्यदर्शनाचीं आणि अपूर्ण सौंदर्यवादाचीं आहेत. भास्करराव जींप्रमाणें ज्याला सौंदर्याच्या संपूर्ण कलांचें दर्शन घडलें त्याला हीं कोडीं सतावीत नाहींत. भास्करराव जींनींहि क्वचित् जीवनांतल्या या शल्याबद्दल तक्रार केली आहे.

पुत्रोत्सविंही प्रसववेदना । विवाहमंगलिं विरह-यातना ।
प्रणयरसोद्गमिं पापकल्पना । हीं शल्यें सलतीं, हरा ! हरा !
घट भरा शिगोशिग, भरा भरा !

पण जीवनाचा घट शिगोशिग भरणाऱ्या आणि काळजांत रुतलेलें मयाजनित शल्यें आपल्या प्रेमळ हातांनीं काढून फेकणाऱ्या मृत्युंजय 'हर'कडेच त्यांनीं तें गाऱ्हाणें केलें आहे. स्वतःच्या शेपटीचा चावा घेऊं पाहणाऱ्या, स्वतःच्या सावलीलाच दूर ढकलूं पाहणाऱ्या दुबळ्या तर्कशास्त्राकडे किंवा मानसशास्त्राकडे त्यांनीं ही फिर्याद नेलेली नव्हती; आणि म्हणूनच रुद्राचें भीषण नृत्य, स्यूची कृष्णच्छाया, महात्म्यांचें क्लेशमय जीवन हे सर्वच अनुभव तांब्यांच्या सौंदर्यदर्शनांत सामावत. या सर्वांचें चित्र तांब्यांच्या काव्यांत धीरोदात्तच नव्हे, तर म्युरहे बनत असे.

मम्मटप्रणीत प्रयोजनांची अपूर्णता

गूढानुभवी कवींच्या काव्यांत मम्मटप्रणीत प्रयोजनांचा प्रश्न नसतो. मृत्यूचें चित्र दिलदार प्रियकरासारखें काढायचें आणि आसन्नमरण जीवाचें चित्र सज्ज नववधूसारखें काढायचें हें तांब्यांचें 'प्रयोजन' नव्हतें.—तें त्यांना झालेलें 'दर्शन' होतें. सर्व कवींना एकच प्रकारचें जीवनदर्शन होईल असें मी म्हणत नाहीं. पर काय, एकाच कवीला वेगवेगळ्या वेळीं जीवनाचे रंग वेगवेगळे वाटतील. भवभूतीला दिसलेलें जग आणि कालिदासाला दिसलेलें जग यांत तफावत होती. शेक्स्पियरपुढें 'हॅम्लेट' लिहितांना जें जग होतें, तेंच जग 'टेंपेस्ट' लिहितांना होतें असें म्हणवत नाहीं. फार काय, आस्तिक आणि आशावादी भास्करराव जींना

झालेलें दर्शन तेवढें खरें आणि संशयवादी, निराशावादी उमर खय्यामला झालेलें दर्शन खोटें असेंहि मी म्हणत नाहीं. कलादृष्ट्या दोघांचींहि दर्शनें सत्य आहेत; ज्ञानदृष्ट्या भास्कररावांचें दर्शन मी अधिक पूर्ण, अधिक समग्र मानीन एवढेंच काय तें ! पण श्रेष्ठ वाङ्मयाचें प्रयोजन लेखकाला झालेलें जीवनदर्शन चितारणें हेंच असतें व असलें पाहिजे, एवढाच माझा आग्रह आहे.

सौंदर्यपूजनाचीहि शिसारी

तांब्यांना हीन कवि ठरविणारांच्या वाङ्मयाचें प्रयोजन कोणतें हा प्रश्न चिंतनीय आहे. कारण, आजचें वाङ्मयीन युग त्यांचें आहे असें म्हणतात. सौंदर्यपूजनाचाहि कधीं कधीं व्यक्तींना आणि समाजांना एक प्रकारचा वीट येतो,— हें मी जाणतों. किंबहुना पाश्चात्त्य वाङ्मयाच्या अनेक शतकांच्या 'चक्रनेमिक्रमाचा' एखादा आलेख काढला, तर सौंदर्यपूजन आणि वास्तवपूजन हें त्याचे श्वास आणि उच्छ्वास आहेत असें दिसून येईल. जुन्या जीवनपराङ्मुख वळणांतल्या निर्जीवपणाला विटलेल्या केशवसुतांनीं नवें जीवनवादी, ऐहिकपूजक, सौंदर्यपूजक वळण घालून दिलें. त्या वळणांतला जिवंत उमाळा केशवसुत, टिळक, तांबे, रेंदाळकर, गडकरी, बालकवि यांच्या काव्यांत प्रकटल्यावर त्यालाहि कलाकुसरीचें आणि परंपरेचें साचेबंद रूप देण्याचा यत्न रविकिरणमंडळाच्या कवींकडून झाला. रविकिरणमंडळाच्या कवितेंतील कृत्रिम अंशाविरुद्ध प्रतिक्रिया म्हणून अर्वाचीन कवींची टपोर, जोमदार पण व्रात्य अशीं झेंडूचीं फुलें जन्माला आलीं. अर्वाचीनांचें उपहासास्त्र केशवसुती सौंदर्यवादावर उगारलेलें नव्हतें—तर रविकिरणमंडळानें त्याला जें निर्जीव कलावादाचें ठिगळ जोडायला आरंभ केला होता, त्याविरुद्ध होतें. मुद्दाम उबवलेल्या भावना, कोरीव कातीव रचना, 'मंचरणें', 'सिसिली', 'सांजणें' यांसारखें विशिष्ट कविकंपूंतच चलनी असलेले शब्दप्रयोग, माधवराव पटवर्धनांना चार दिवस प्रिय झालेले आणि लगेच नकोसे झालेले 'हर्राजी', 'गाझी', 'हाजी', 'बाजी', 'सर्फराजी' यांसारखे अरबीफारसी शब्द या सर्व पोरकटपणाविरुद्ध अर्वाचीनांनीं आपली उपहासपटु प्रतिभा वापरली. अर्वाचीनांचा विरोध काव्यांतील सौंदर्यपूजनाला, निसर्गपूजनाला, प्रेमपूजनाला नसून, टूमबाजीला, तंत्रपूजनाला होता. सौंदर्यवादाचा गाभा कलावादांत नसून जीवनवादांत आहे.

सौंदर्यवादाचें अर्धवट आकलन

दुर्दैवानें सौंदर्यवाद ऊर्फ Romanticism या महत्त्वाच्या वाङ्मयीन प्रवृत्तीचा व संज्ञेचा खोल अर्थ समजावून न घेतांच मराठींत पुष्कळदा त्याचा वापर केलेला आढळतो. सौंदर्यवाद आणि कलावाद हे समानार्थी शब्द मानणें आणि कलावादावर घेतां येणारे आक्षेप सौंदर्यवादावर घेणें हें या घोटाळ्याचेंच उदाहरण म्हणतां येईल. सौंदर्यवाद हा कलावाद नसून जीवनवाद आहे. क्लासिकल ऊर्फ अभिजात संप्रदायाचे कवि जीवनापेक्षां जुन्या वाङ्मयीन आदर्शांचें चित्रण अधिक करीत. तर उलट रोमँटिक ऊर्फ सौंदर्यवादी कवि निसर्ग, प्रेम किंवहुना कुठलीहि उत्कट अनुभूति यांना वाङ्मयीन आदर्शापेक्षां अधिक महत्त्व देत. उत्कटतेचे भोक्ते असल्यानें साहजिकच हे लोक सौंदर्याचेहि भोक्ते होते; आणि त्यांच्या या वैशिष्ट्याचें निदर्शक म्हणून त्यांना सौंदर्यवादी हें उपपद लावलें जातें. पण तितक्याच यथार्थत्वानें त्यांना अनुभववादी, भावनावादी, नावीन्यवादी असेंहि म्हणतां येईल. कारण यांतील एकेका अभिधानांत त्यांचें एकेक लक्षण सूचित होतें.

पण मुख्य मुद्दा तो हा कीं, अन्यांचा विरोध केशवसुत-तांब्यांच्या जीवन-पूजनाला, सौंदर्यपूजनाला नसून रविकिरणमंडळाच्या टूमबाजीला होता. तांब्यांच्या एकाहि कवितेचें विडंबन अन्यांनीं केलेलें नाहीं, ही गोष्ट फार अर्थपूर्ण आहे. पण १९२६ सालीं 'झेंडूच्या फुलांच्या' रूपानें झालेल्या विरोधानंतर १९४० सालीं सौंदर्यवादी कवितेला आणखी वेगळ्याच दिशेकडून विरोध झाला. हा विरोध शैलींतील टूमबाजीला नसून जीवनविषयक दृष्टिकोणालाच होता. निसर्गपूजन, प्रेमपूजन, जीवनपूजन यांनाच विरोध करणारा एक संप्रदाय महाराष्ट्रांत निघाला. कोणत्याहि व्यक्तीचें, संस्थेचें किंवा अनुभवाचें 'पूजन' म्हटलें कीं कांहीं व्यक्तींना चीड येते. ज्याला कधीं प्रेम करतां आलें नाहीं, ज्याला कधीं सुखाचा संसार माहीत नाहीं, असा मनुष्य जर जात्या अनुदार असेल तर एखाद्या प्रेमी युगुलाकडे पाहून त्याचा जो संताप होतो तोच संताप सौंदर्यवादी निष्ठा आणि उत्साह पाहून कांहीं सौंदर्य-द्वेष्ट्या व्यक्तींचा होतो.

सौंदर्यद्वेष्टी, उत्साहद्वेष्टी पिढी

अशी पिढी १९४० सालीं मर्ढेकरांच्या अवर्ध्युत्वाखालीं निर्माण होत होती. या संप्रदायाला मीं 'सौंदर्यद्वेष्टा' म्हटलेलें आवडणार नाहीं. कारण,

चित्रकला, शिल्पकला, संगीत यांची हा संप्रदाय सदैव क्लिष्ट आणि विद्वत्ताप्रचुर चर्चा करतांना दिसेल! फार काय, काव्याकडूनहि हा संप्रदाय चित्रकलेचीच अपेक्षा करतो. वस्तुतः प्रसिद्ध जर्मन टीकाकार लेसिंग यानें मुख्यतः काव्य आणि चित्रकला यांतला भेद स्पष्ट करण्याचेंच कार्य केलें. त्याच्या Laocoon या प्रसिद्ध कलास्वरूपविषयक ग्रंथाचें दुसरें नांव 'चित्रकला आणि काव्य यांच्या मर्यादासंबंधीं' हेंच होतें. त्याचा समकालीन आणि देशबांधव विंकलमान् चित्रकला व मूर्तिकला याचा पक्ष घेई तर लेसिंग काव्याचा पक्ष घेई. आमचे नवकवि नकळत विंकलमानचा पक्ष पत्करतात. ते कोणत्याहि कलेची तळी उचलोत, ते स्वतःला सौंदर्यद्वेष्टे म्हणवीत नाहींत, तरी पण ते सौंदर्यवादी मात्र नाहींत. कारण, सौंदर्यानें उत्साहित होणें हें जें सौंदर्यवादी व्यक्तीचें प्रसिद्ध लक्षण, त्याचीच त्यांना चीड! 'Capacity to be thrilled in the presence of beauty' हें रोमँटिक मनाचें लक्षण प्रसिद्ध आहे. आमचे नवकवि-निदान त्यांचे कुलगुरु मर्ढेकर—स्वतःला सौंदर्याचे भोक्ते म्हणवतात, पण जीवनाला मात्र विटलेले आहेत. मग सौंदर्यानें पुलकित होण्याचें तर नांवच नको. अर्थात् कशाचेंहि पूजन, कशाविषयींहि उत्साह, कशाविषयींहि गाढ विश्वास आणि प्रेम म्हटलें, कीं त्यांना तें कृत्रिम आणि जुनाट वाटतें! तांब्यांच्यासंबंधीं या संप्रदायाला तुच्छता कां?—तर तांब्यांना जीवनाबद्दल, सौंदर्याबद्दल, प्रेमाबद्दल दुर्दम्य विश्वास व उत्साह होता म्हणून!

या संप्रदायाच्या वैयक्तिक तऱ्हा अथवा Idiosyncracies क्षणभर दृष्टिआड केल्या, तर त्यांची मूलभूत भूमिका सहानुभूति वाटण्यासारखी—निदान करुणा वाटण्यासारखी आहे. मनुष्याला विशिष्ट अवस्थेंत देवाविषयींदेखील अविश्वास वाटूं शकतो, तर प्रेमाविषयीं, मानवी सौंदर्याविषयीं, मानवी श्रद्धांविषयीं अविश्वास वाटला, तर त्यांत अद्भुत तें काय? सारांश, सॉक्रेटीस् म्हणतो त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीबद्दल उत्साहित होणें हा जर कवींचा मनोधर्म असेल, तर त्या मनोधर्माविरुद्धच ही प्रतिक्रिया होती. काव्यासंबंधीं आणि कविसुलभ उत्साहासंबंधीं मनाला उबग येणें हेंदेखील मी अस्वाभाविक समजत नाहीं. आपणांपैकीं प्रत्येकाला अधूनमधून असा उद्वेगाचा झटका येतो. क्वचित् आपल्याला आपल्या प्रेमाबद्दलहि राग नाहीं का येत? गोविंदाग्रजांच्या 'हृदयास', 'निर्दय बालेस' या कवितांत प्रेमावरच क्रोधाचा वर्षाव केलेला आढळेल. असाच क्रोध काव्यात्मतेबद्दल व काव्या-

बद्दलहि वाटणें शक्य आहे. पण काव्यविषयक क्रोधांतून जें निर्माण होईल त्याला काव्य म्हणतां येईल काय ?-- एवढाच प्रश्न आहे. ही मंडळी--मर्ढेकर आणि मंडळी !--त्याला 'काव्य'--नव्हे, श्रेष्ठतर काव्य म्हणण्याचा अट्टाहास करतात. आणि इथेंच वादाचा मुद्दा उपस्थित होतो.

—पण हा उबगहि उसना !

पण सौंदर्याविरुद्धची ही प्रतिक्रिया स्वभावजन्य नव्हती. त्या प्रतिक्रियेला कांहीं तात्कालिक वाङ्मयीन आणि सामाजिक कारणें होतीं. केवळ मराठी काव्यांतल्या सौंदर्यपूजनाचीहि ती प्रतिक्रिया नव्हती. रविकिरणमंडळाच्या कलावादाविरुद्धहि ही प्रतिक्रिया नव्हती. फ्रॉइड्च्या मनोविश्लेषणामुळें आणि दोन महायुद्धांतल्या विदारक जीवनानुभवामुळें पाश्चात्त्य देशांत विच्छिन्नमनस्क असा एक नवा काव्यसंप्रदाय निघाला होता. भयभीततेच्या आणि अविश्वासाच्या जगांत चांचपडणाऱ्या मॅक-बेथ्ला आणि राघोबादादाला आरशांत अथवा हवेंत जशी वेगळीच सृष्टि दिसे, तशी या पिढीच्या कांहीं पाश्चात्त्य कवींना दिसूं लागली. सौंदर्यपूजनाला विटून रुचिपालट शोधणाऱ्या आमच्याहि कांहीं कवींना हीच अन्तर्मनाच्या वांकड्या आरशांतली वेडीवाकडी सृष्टि दिसूं लागली आणि एकदम पसंत पडली !

अन्तर्मनाचे आलेख रेखाटणारीं, अन्तर्मनांतल्या प्रतिमा वापरणारीं काव्यें आतां आपल्या चांगल्याच परिचयाचीं झालीं आहेत. जुन्यांतून सुटका म्हणून हातीं घेतलेल्या या नव्या चिजा आतां स्वतःच जुन्या झाल्या आहेत. काव्याप्रमाणेंच लघुकथांतहि या 'अन्तःसृष्टी'नें बराच धुमाकूळ घातला आहे. मर्ढेकरांनीं या तंत्राप्रमाणें एक कादंबरीहि लिहून दाखविली, पण पुढच्या कादंबरींत त्यांनीं स्वतःच हें तंत्र बहुतांशीं सोडलें आणि कादंबरीसारख्या सुदीर्घ लोकप्रिय वाङ्मयप्रकारांत ही प्रयोगबाजी परवडण्यासारखी नसल्यानें त्यांना कादंबरीकारांत कुणी अनुयायीच लाभला नाहीं. सारांश, काव्य आणि लघुकथा या वाङ्मयप्रकारांपुरतेंच 'युद्धोत्तर जग' आणि 'फ्रॉइडोत्तर मन,'--तर नाटक-कादंबऱ्यांसारख्या सुदीर्घ प्रकारांत जुनें जग आणि जुनें मानसशास्त्र असा गंगाजम्नी प्रकार चालू झाला !

प्रयोगांचें पर्यवसान : अश्लीलतेची लाट !

या प्रयोगाचें भवितव्य कांहींहि होवो, या प्रयोगांचें आजचें प्रयोजन आणि पर्यवसान आपल्याला दुर्लक्षितां येत नाहीं. ध्येयपूजन, सौंदर्यपूजन व सौंदर्य-

निर्मिति यांच्या विरुद्ध या नव्या संप्रदायानें मारा सुरू केल्यामुळें जुनीं मूल्यें आणि ध्येयेंच केवळ ढांसळलीं असें नव्हे—तर जुनी औचित्यकल्पना आणि जुनी शैलीहि ढांसळली. औचित्यकल्पनांनाच केवळ नव्हे, तर शब्दसंग्रहाला, वाक्प्रचारांना, व्याकरणालाहि धक्का देणें हें आज वाङ्मयीन पराक्रमाचें लक्षण समजलें जातें. वाङ्मय आणि भाषा यांविरुद्धचे हे गुन्हे वाङ्मयांत चिरस्थायी होतील असें नव्हे. गुन्हा ही कधीं संस्था होऊं शकत नाहीं. तथापि, स्थायिक आणि स्थिर अशा वाङ्मयीन बंधांची आणि बंधनांची नासाडी मात्र अशा विकृत आणि विक्षिप्त प्रवृत्तींनीं होणें शक्य आहे, तिजकडे दुर्लक्ष करतां येत नाहीं.

तूर्त मी भाषिक गुन्ह्यांचा विचार विस्तारभयामुळें बाजूला ठेवतों. परंतु औचित्यविषयक गुन्ह्यांकडे व त्यांच्या अप्रत्यक्ष परिणामांकडे आपलें लक्ष वेधणें अपरिहार्य आहे. अश्लील भाषा, वर्णनें व कथानकें यांना आजच्या नियतकालिक वाङ्मयांत जो बेसुमार ऊत आला आहे, त्याची जबाबदारी काव्य व कथा यांच्या प्रांतांतील या नवसंप्रदायाला नाकारतां येणार नाहीं. ज्या वस्तूंचा, अवयवांचा व कृतींचा उच्चार मर्ढेकर–संप्रदायापूर्वी सुशिक्षितांच्या खासगी बैठकींतहि झाला नसता, त्यांना आज प्रतिष्ठित वाङ्मयांत राजरोस स्थान देण्याचें कार्य नवकवींनीं व कथाकारांनीं केलें आहे. त्यांच्या वाङ्मयांतले उतारे आपल्यापुढें सादर करणें म्हणजे तोच गुन्हा मी करण्यासारखें होईल. शिवाय सुप्रसिद्ध कथालेखक पु. भा. भावे यांनीं बडोदा परिषदेच्या व्यासपीठावरून आणि माझे मित्र गोपीनाथ तळवलकर यांनीं याच व्यासपीठावरून तें कार्य यापूर्वी केलेंहि आहे.

गुन्हेगार मौन !

नवकाव्यांतल्या दुर्बोधतेसंबंधींच तेवढी तक्रार करणें आणि यांतल्या अश्लीलतेसंबंधीं मात्र 'मौन' पाळणें म्हणजे Criminal Silence (गुन्हेगार मौन) होय, असें मी मानतों. नववाङ्मयाचे पुरस्कर्ते सुविद्य आहेत; तसेच ते वैयक्तिक जीवनांत नेमस्त आणि औचित्यरक्षक आहेत. विशिष्ट 'तत्त्वज्ञाना'च्या अभिमानानें ते वाङ्मयीन व भाषिक गुन्हे करीत आहेत. पण त्यांनीं पावन ठरविलेले अनुचित आणि अश्लील प्रयोग आज बाजाराकरितां वाङ्मयाची पैदास करणाऱ्या अनेक अल्पशिक्षित लेखकांना रान मोकळें करून देत आहेत. यंत्र-

युगावर चिडलेले मर्ढेकर आणि यंत्रावर स्तोत्र रचणारे विंदा करंदीकर, तत्त्वज्ञान म्हणून जे अश्लील शब्दप्रयोग वापरतात, इंद्रियसंवेदनांचें हुबेहूब चित्र काढण्याकरितां पु. शि. रेगे, गंगाधर गाडगीळ ज्या बीभत्स गोष्टींचा उल्लेख करतात—त्यांच्यामुळें बाजाराकरितां अश्लील लिहिणारांचा रस्ता आपोआपच तयार होतो, हें विसरतां येत नाहीं.

माझी माहिती बरोबर असेल तर एका प्रमुख नवलेखकावर अश्लीलतेच्या आरोपाखालीं खटला झाला असतां, त्याला दोषमुक्त करतांना न्यायाधीशांनीं जीं कारणें दिलीं होतीं, त्यांत दुर्बोधता आणि अल्पप्रसार हीं प्रमुख होतीं. न्यायाधीशांचें म्हणणें असें होतें कीं, कविमजकुरांनीं जें लिहिलें आहे तें अश्लील असलें, तरी तें वाचणार कितीसे?—आणि तें समजणार त्यांतल्या कितीजणांना? पण अंतर्मनांतल्या गोंधळाचीं आणि घाणीचीं चित्रें काढण्याची टूम एकदा निघाल्यावर ती दुर्बोध काव्यांतच थांबेल ही कल्पना चुकीची आहे. दुर्बोध काव्यांतून ती दुर्बोध कथेंत शिरली; आणि आतां ती त्या दोहोंतून बालबोध सर्वगामी नियतकालिकांत शिरली आहे. या बालबोध प्रतिमासिक अश्लीलतेला मनोविश्लेषणाशींहि कर्तव्य नाहीं, कीं यंत्रयुगावरील क्रोधाशींहि कर्तव्य नाहीं मानवी मनांतल्या – विशेषतः अपक्व तरुण मनांतल्या – अत्यंत 'सुक्षोभ' थराला उघड आवाहन करून बाजार काबीज करण्याकरितांच आतां अश्लील लिहिलें जाऊं लागलें आहे. शिमग्यांतली भाषा बारा महिने कथाकीर्तनांत ऐकूं यावी, अमावास्येच्या स्मशानांतली भुतावळ लग्नाच्या मांडवांत, गॅसबत्तीखालीं पानसुपारीला येऊन बसावी, तसें दृश्य आज दिसूं लागलें आहे. याची पुष्कळशी जबाबदारी मूल्यें, प्रतिमा, संकेत बदलण्याच्या नांवाखालीं गलिच्छ भाषा व कल्पना राजमान्य करूं पाहणाऱ्या नवकवींवर व कथाकारांवर जात नाहीं का?

पंडितवर्यांचें बौद्धिक भीरुत्व

पण या मूल्यक्रांतीच्या आणि मनोविश्लेषणाच्या नांवाखालीं जर सर्वांत कोणती मोठी हानि झाली असेल, तर ती साहित्यिकांच्या, टीकाकारांच्या आणि सामान्य वाचकांच्या विचार-शक्तीची होय. आज आम्ही गोंधळाला गोंधळ, गाढवाला गाढव, आणि उकिरड्याला उकिरडा म्हणायलाहि घाबरत आहों. वाङ्मयाच्या दरबारांतील न्यायाधीशांनींच 'धास्त खाल्ल्यामुळें' ज्यूरींतल्या

पंचांनाहि आपल्या मताबद्दल विश्वास वाटेनासा झाला आहे. अर्थशून्य लिखाणाला आम्ही अर्थशून्य म्हणायला भितों व 'दुर्बोध' म्हणतों; आणि आतां त्याहिपुढें जाऊन 'दुर्बोध' म्हणायलाहि लाजतों! आणि 'वाच्यार्थाची हानि' इ. संस्कृत संज्ञांचा आश्रय करून स्वतःच दुर्बोध बनतों! तीच गत अश्लीलतेची. मरून शंभर वर्षें झालेल्या बिचाऱ्या लावणीकार शाहिरांना 'अश्लील', 'ग्राम्य', 'घाणेरडे' ठरवायला आम्हांला कुणाची भीति? पण आजच्या मर्ढेकरांच्या, करंदीकरांच्या, गाडगिळांच्या, रेग्यांच्या दोन ओळींदेखील अश्लील म्हणायला आमचे टीकाकार भितात! 'ओळखीचें भूत अनोळखी भुतापेक्षां बरें' अशी इंग्रजींत एक व्यवहारनीति आहे. मला वाटतें, 'मेलेला शाहीर जिवंत शाहिरापेक्षां (टीका-व्यवहाराला!) बरा!' असा कांहीं टीकाकारांचा संकेत असावा. पण प्रचलित वाङ्मयांतल्या अश्लील प्रवृत्तींना अश्लील म्हणायला भिणें, म्हणजे आपलें सामाजिक कर्तव्य टाळणें होय. पण हे लोक केवळ व्यावहारिक सुरक्षिततेकरितां आपलें कर्तव्य टाळतात असेंहि सर्वस्वीं नाहीं. जाडजूड शब्द, शास्त्रीय दमदाटी आणि पाश्चात्त्य नांवांचे हवाले यांची घोडेदौड आली, कीं कित्येकांना आपल्या वैचारिक गढीचे दरवाजे बंद करून आंत बसावेंसें वाटतें. हेंच मी तथाकथित मूल्यक्रान्तीनें वाङ्मयाचें केलेलें सर्वांत मोठें नुकसान असें म्हणतों. जी वाङ्मयीन वस्तु खेड्यांतल्या खेडवळालाहि गलिच्छ म्हणून बेधडक सांगतां येईल, जिची व्याख्या विष्णुशास्त्रींसारख्या प्रसन्न बुद्धीच्या आणि ठाम बैठकीच्या आद्य टीकाकारानें एका शब्दांत केली, ती घाण यांच्यासमोर हौद भरून ठेवली, तरी आमच्या पंडितवर्यांना नाकाला पदर लावायलाहि संकोच वाटावा, यापेक्षां बुद्धिभ्रंश तो कोणता?

"अश्लीलता म्हणजे चावटपणा!"

विष्णुशास्त्रींनीं 'विद्वत्व आणि कवित्व' या आपल्या प्रसिद्ध निबंधांत अश्लीलतेची व्याख्या एका शब्दांत केली आहे. 'अश्लीलता म्हणजे चावटपणा!' यापेक्षां सुटसुटीत व्याख्या कोणती असूं शकेल? आणि 'चावटपणा' इतकी स्वसंवेद्य वस्तु कोणती असूं शकेल? एखाद्यानें 'चावटपणा' सुरू केल्यावर त्याला 'चावट' म्हणावें कीं कोश धुंडाळावे, अशी ज्याला शंका पडेल, तो खेडवळाहूनहि मंदबुद्धीचा म्हटला पाहिजे! पण आज आमची स्थिति अशी भ्रांतिष्टासारखी झाली आहे खरी. सर्वमान्य काव्यांतलेहि आम्ही एका बैठकींत

पंचवीस दोष काढून दाखवूं; परंतु ज्याला धड गद्यसुद्धां म्हणतां येणार नाहीं, तें 'अपूर्व काव्य' म्हणून कोणी जगाच्या गळ्यांत बांधूं लागला, तर त्याच्याविरुद्ध 'ब्र' काढायला आम्हांला छाती होणार नाहीं! अश्लील लिखाणासंबंधीं आज आमच्यांतल्या शहाण्या मंडळींची स्थिति अशीच विपरीत झाली आहे.

नग्नसंप्रदायी तार्किक पेंच?

"अश्लील वाङ्मयाविरुद्ध बोलणें म्हणजे कामविकारच गर्ह्य समजणें होय", निदान "कामोद्दीपन हाच गुन्हा ठरविणें होय" असें प्रतिपादन मराठींतील या विषयावर लिहिणारे सर्वांत कुशाग्र बुद्धीचे लेखक कै. र. धों. कर्वे हे करीत असत. आपण सनातनी ठरूं या भीतीनें पुष्कळसे 'आधुनिक' टीकाकार आज याच कोटिक्रमापुढें हार खातात असें दिसेल. एक, ख्रिस्त आणि गांधीजी यांच्याप्रमाणें कामव्यवहार हेंच पाप म्हणा, नाहीं तर 'कांहींच अश्लील नाहीं'—'स्त्रीपुरुषसंबंधां'तला आडपडदा म्हणजे एक सामाजिक सोंग आहे—हें तरी कबूल करा, असा हा नग्नसंप्रदायी पेंच असतो! अशा तार्किक पेंचांतले पुढचे ठराविक डाव म्हणजे, 'कालिदासाच्या काव्यांत अश्लीलता आहे कीं नाहीं?', 'सौभद्र नाटकांतला कृष्ण-रुक्मिणीचा प्रवेश अश्लील आहे कीं नाहीं'...इ इ! ज्यांच्यावर ही सरबत्ती झडते, ते लोक बहुधा कॉलेजांत हीं पुस्तकें पढलेले किंवा पढणारे असल्यानें, आपल्या पूर्व-चरित्रावर, नाहीं तर चालू चारित्र्यावर मत देण्यापेक्षां, वादविषय झालेलें वाङ्मय अश्लील नाहीं म्हणून तरी मोकळे होतात, नाहीं तर अश्लीलता ही वैयक्तिक मताची गोष्ट आहे, सर्व जगाकरितां कांहींच ठरविणें शक्य नाहीं, असें सांगून बौद्धिक क्लैब्य तरी पसंत करतात! ज्या विषयाचा विष्णुशास्त्रींनीं एका शब्दांत निकाल लावला, त्या विषयाचा निकाल जगाच्या अन्तापर्यंत लागणार नाहीं, असें म्हणणारांचा बौद्धिक क्लैब्यावरचा भरंवसाच खरोखर जबरदस्त म्हटला पाहिजे, नाहीं?

कामविकारच अश्लील आहे काय?

वस्तुतः शृंगार, कामविकार आणि विकृत (किंवा गलिच्छ) लैंगिकता या तिहींतला भेद खेडवळ माणसालादेखील समजायला हरकत नाहीं. जो वाङ्मयांत किंवा चित्रकलेंत रंगवलेला असतो, तो शृंगार होय; आणि तो 'मनोविकार' नसून एक आस्वाद्य 'रस' आहे. मूळ नैसर्गिक कामविकार हाहि मनुष्यांच्या (व

इतर प्राण्यांच्याहि) बाबतींत पुष्कळदा फार मनोहर रूप धारण करतो. स्त्रीमनांत या विकाराचा संचार झाला तर तिचे विभ्रम नकळत अधिक मनोहर होतात, इतकेंच नव्हे तर तिचें रूपदेखील त्या क्षणीं अधिक मनोहर बनतें. तिच्या डोळ्यांत अधिक चमक दिसूं लागते; ओठ अधिक आरक्त होतात. भाषणांतला नीरस गद्यपणा जाऊन त्यांत वक्रोक्तीचा ढंग येतो. या अवस्थेंत वा या अवस्थेच्या अनुरक्त अवलोकनांत कांहीं गलिच्छ आहे असें कोण म्हणेल ? तथापि, स्त्रीची ही अवस्था अथवा पुरुषाची त्या अवस्थेसंबंधींची अनुरक्ति म्हणजे काव्य नव्हे. कारण, तो अथवा ती त्या अवस्थेंत गुंतलेले, रुतलेले म्हणजेच Involved असतात. पण हीच अवस्था कवि ज्या वेळीं काव्यांत रंगवतो, त्या वेळीं तो काम-विकाराच्या बाहेर आणि वर असतो. याचा अर्थ एखाद्या जटाधारी बैराग्याप्रमाणें त्या काममोहित स्त्रीला तो दूर ढकलीत नसतो; किंवा एखाद्या परमहंसाप्रमाणें त्याला त्या वेळीं कामविकाराहून अधिक रम्य अशा वस्तूचा – ईश्वरी लीलेचा — अनुभवहि येत नसतो आणि तरी कामविकाराच्या शारीरिक संचाराहूनहि मनोहर असा अनुभव कवि घेत असतो. कामविभ्रमांनीं अधिक मनोहर दिसणाऱ्या स्त्रीचा वल्लभ तिचें लावण्य कामार्ततेमुळेंच ज्या डोळसपणानें व रसज्ञतेनें पाहूं शकत नाहीं, त्या रसज्ञतेनें कवि तिचें लावण्य पाहूं शकतो. तो कामार्तहि नसतो, कीं कामनिषेधकहि नसतो. काव्यांत चितारलेल्या कामार्ततेचें रूप हें असें स्वयंपूर्ण, अविकृत आणि positive असतें; आणि म्हणूनच कायदादेखील खऱ्या कलाकृतींना अश्लीलतेच्या आक्षेपांतून मुक्त ठरवतो.

नैतिक कामुकता ही वेगळी चीज ?

जर कामार्ततेचेंहि चित्र अश्लील नसतें, तर अश्लील असतें तरी कोणतें चित्र ? नैतिक कामुकता म्हणून वेगळी वस्तु आहे काय ? नैतिक कामुकता कोणती आणि अनैतिक कामुकता कोणती ? कांहीं लोक या प्रश्नाचें उत्तर वाजवीपेक्षां जास्त सुटसुटीत (oversimplified) देण्याची चूक करतात. स्वस्त्रीसंबंधींचा काम-विकार म्हणजे नैतिक; परस्त्रीसंबंधींचा कामविकार म्हणजे अनैतिक, ही व्याख्या समाजव्यवहारांत कदाचित् योग्य ठरेल. पण वाङ्मयाच्या क्षेत्रांत ती अतिव्याप्त आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत एखाद्याला एखाद्या परस्त्रीबद्दल कामाकर्षण वाटलें, तर तें व्यक्त करणें म्हणजे अनौचित्य ठरेल. त्या स्त्रीला तें सूचित करणें म्हणजे तर अनैतिकताच ठरेल;–कदाचित् विनयभंगाचा गुन्हाहि ठरेल. परंतु वाङ्मयांत अशा

मनोविकाराचें चित्र काढल्यास तें अनैतिक ठरेलच असें नाहीं; – अनुचितदेखील ठरणार नाहीं. स्त्रीपुरुषांचें आकर्षण हा निसर्ग होय. त्याचें अयोग्य प्रदर्शन न करणें, नव्हे, त्याचें गोपन करणें ही मानवी संस्कृति होय. पण या संस्कृतीचें चित्र वाङ्मयांत काढायचें झालें, तर प्रथम कामोद्भवाचें चित्र काढावें लागेल व नंतर कामगोपनाचें व संयमाचें काढावें लागेल. प्रत्यक्ष समाजांत कृतीचेंच काय तें दर्शन घडतें. ववचित् चर्येच्या द्वारें अर्धस्फुट भावनेचें दर्शन होतें, पण जें प्रत्यक्षांत अर्धस्फुट आणि अर्धावृत असतें त्याचें संपूर्ण चित्र वाङ्मयांत काढतां येतें. मग तो भाव सामाजिक दृष्ट्या नैतिक असो, कीं अनैतिक असो. तो "काम" समाज-दृष्ट्या अनैतिक असूनहि कलादृष्ट्या सुंदर असूं शकेल.

मनाच्या घुमटांतील पाकोळ्या

पाप आणि पुण्य, इच्छा आणि अभिव्यक्ति, अभिव्यक्ति आणि कृति यांतल्या अनंत सीमा दाखविणें ही तर वाङ्मयकलेची करामत. जें द्रौपदीलाहि कळलें नसेल, तें व्यासांनीं चितारलें! 'किती मदनमनोहर आहे हा कर्ण! हाहि माझ्या सासूचाच पुत्र!—' बस् इतकें मनांतदेखील आलें नसेल, त्या अभिमानी पांचालीच्या! पण कवि त्याचें स्पष्ट वर्णन करूं शकतो. ब्राउनिंगच्या—'Ring and the Book' या महाकाव्याची नायिका पॉपिलिया, आपल्या हिडीस पतीसह नाटकगृहांत गेली असतां एका सुंदर युवकाला पाहून—' Had I the wings of a dove ' (कबूतरासारखे मला पंख असते तर...) एवढें मनांत म्हणते पण जनांत तिनें तोंडावरचा बुरखाहि बाजूला केला नसेल. जें मनाच्या घुमटांत एखाद्या लहानशा पाकोळीप्रमाणें इकडून तिकडे जातें आणि मग अनन्त आकाशांत अदृश्य होतें तेंहि कवि रंगवितो. असले छोटे पक्षीदेखील 'स्वस्त्री' कीं 'परस्त्री' यांचा विवेक केल्यानंतरच त्या त्या घुमटांत शिरावे, ही कल्पना वाङ्मयाला मानवणारी नव्हे, कारण ती अवास्तव आहे. प्रत्यक्षांत आपल्या मनांत उठणाऱ्या लहरी नीतीपेक्षां निसर्गाला अधिक धरून असतात. पण इतकें कशाला? स्वस्त्रीव्यतिरिक्त जें आकर्षण तें अश्लील म्हटल्यास प्रेमचित्रणच वाङ्मयांत निषिद्ध ठरवावें लागेल! कारण, एखाद्या अप्राप्त स्त्रीबद्दल आकर्षण रंगविणें हा तर प्रेमकाव्याचा प्रमुख विषय होय. एखाद्या अविवाहित स्त्रीबद्दल आकर्षण दाखविणें म्हणजेहि जर विवाहबाह्य आणि म्हणून अश्लील आकर्षण ठरूं

लागलें, तर अश्लीलतेचा कायदा निसर्गाच्या कायद्यापलीकडे जाईल. सारांश, ' जें अनैतिक तें अश्लील ' ही व्याख्या अतिव्याप्त होय.

' अनैतिक ' नव्हे, ' असंस्कृत ' कामुकता

पण याचा अर्थ असा नव्हे कीं, " जे जे तरंग मनांत आणि अन्तर्मनांत उठतील ते ते रंगविणें म्हणजे वाङ्मय! " तसें करणें म्हणजे वाङ्मय तर नव्हेच, पण वास्तवतादेखील नव्हे,—सुसंबद्धतादेखील नव्हे! आणि ज्याला सुसंबद्धता अथवा unity नाहीं, तें वाङ्मय कसचें? (अर्थात् तार्किक सुसंबद्धता आणि कलात्मक unity हीं दोन्हीं एक नव्हेत, हा सिद्धान्त नवकवि समजतात तितका नवीन अगर अपूर्ण नाहीं, हें त्यांना सांगितलें पाहिजे!) वाङ्मयांत अनैतिक आकर्षणाला स्थान आहे; पण असंस्कृत, सौंदर्यहीन लैंगिकतेला आणि असंबद्ध विचारांना स्थान नाहीं; आणि बीभत्स शब्दप्रयोगांना तर स्थान नाहींच नाहीं. पण नवकवींनीं आणि मनोविश्लेषणपंथीयांनीं जर मुक्तद्वार केलें असेल, तर तें याच विकृत आणि गलिच्छ प्रकारांना! आणि एकदा बीभत्सतेला तत्त्वज्ञानाची बैठक मिळाली, कीं समाजांतल्या गलिच्छ प्रवृत्तींना खतपाणी घातल्यासारखेंच झालें!

नुसती कामुकता म्हणजेहि काव्याचा विषय नव्हे, मग विकृत लैंगिकता काव्याचा विषय कसा होईल? म्हणूनच नागडा काम आणि कामुक आकर्षण यांतला फरक ओळखला पाहिजे. ' कामुकता लपविणें ' हें समाजांतील शिष्टांनीं सुरक्षिततेकरितां काढलेलें एक ढोंग आहे, असें प्रतिपादन कै. र. धों. कर्वे करीत असत. पण निसर्गदेखील मूळची उघडी कामुकता काव्यमय आकर्षणांत झाकतो! कामाकर्षणाच्या क्षणीं स्त्री अधिक सुंदर, अधिक खेळकर, अधिक प्रेमळ व्हावी अथवा भासावी, ही निसर्गाची योजनाहि मनोविश्लेषणवादी नागड्या संप्रदायाविरुद्धच साक्ष देते;—आणि निसर्ग हा सौंदर्यवादी काव्याचा पुरस्कर्ता आहे, हेंच सिद्ध करते! उघडावागडा ' काम ' हा शास्त्राचा विषय असेल; पण काव्याचा विषय कामुक ' आकर्षण ' किंवा ' आकर्षक काम ' हाच आहे. गलिच्छ नागडा काम हा नव्हे.

अश्लीलता ही चीज संदिग्ध नाहीं!

एवढ्या विवेचनानंतर वाङ्मयीन व कलाक्षेत्रीय अश्लीलता ही गोष्ट मोठीशी संदिग्ध किंवा अनिश्चत नाहीं हें प्रांजल शंकितांना तरी मान्य होण्याला हरकत

नाहीं. ज्या ज्या काव्यांत, चित्रांत अगर शिल्पांत काव्यशून्य, आदरशून्य, पशुतुल्य कामुकता रंगविलेली असेल तें तें काव्य अगर शिल्प अश्लील होय. ज्या कलेनें कामोद्दीपन न होतां केवळ कामाकर्षणाच्या चित्रांचा रसास्वाद मिळत असेल, ती श्रेष्ठ कला होय. ज्या चित्रानें किंवा वर्णनानें रसास्वादाबरोबर थोडीफार नैसर्गिक कामुकताहि जागृत होते, ती गौण प्रतीची कला होय. पण ज्या कलेनें रम्य काव्यमय काम जागृत होण्याऐवजीं केवळ पशुतुल्य वासना जागृत होते ती अश्लीलता होय.

वस्तुतः हें विवरण करून सांगण्याची गरजच नाहीं! गंगाजल आणि गटारजल यांतला फरक जसा अशिक्षितालाहि कळतो तसाच गलिच्छ काम आणि मनोहर काम यांतला फरक कळतो. परंतु 'गटाराला गंगा कां म्हणूं नये?' असें पाखंड उत्पन्न झालें, म्हणजे 'Proving the obvious' (दिव्यानें सूर्यप्रकाश दाखवून देणें!) ज्याला म्हणतात, तो प्रपंच करावा लागतो. पण म्हणून या प्रपंचाला भिऊन 'अश्लीलतेची व्याख्याच ठरत नाहीं!', 'संस्कृत कवींनीं ज्याचा उच्चार केला त्याचाच नवकवि करीत आहेत', 'नवकाव्यांत जी बीभत्सता खपते, तीच पोटार्थी मासिकांनीं गद्यांत पेरून खपवून पैसा कां करूं नये?' अशा उतरत्या भांजणीनें टीकाकारांनीं नरकांत उतरण्याची तयारी करूं नये.

कामविषयक सुसंस्कृतता म्हणजे ढोंग; आणि कामविषयक नागडेपणा म्हणजे प्रामाणिकपणा असें एक उथळ आणि वेडगळ तत्त्वज्ञान आज 'नवें' म्हणून नाचविलें जात आहे. वास्तविक तें 'नव'हि नाहीं आणि 'तत्त्वज्ञान'हि नाहीं. तें 'नव' नव्हे, कारण कै. र. धों. कर्व्यांनीं तें चाळीस वर्षांपूर्वीच आग्रहानें व सातत्यानें मांडलें होतें; आणि तें तत्त्वज्ञान नव्हे, कारण तें उथळ आहे. कै. कर्वे आपलीं मतें शास्त्रीय विवेचनाद्वारें मांडीत. नवकवि, नवकथाकार आपली नग्न कला कलाक्षेत्रीय प्रयोग म्हणून पेश करीत असतात. कर्व्यांची अश्लीलता शास्त्रीयतेच्या बाण्यामुळें आणि नवकवींची अश्लीलता दुर्बोधतेच्या व्रतामुळें भिंतीपलीकडे उभ्या असलेल्या नग्नतेसारखी निरुपद्रवी असली, तरी आज मराठींतलीं कांहीं नियतकालिकें तिला त्या भिंतीबाहेर आणून सुबोध कथांच्या व लेखांच्या चौचाकींतून मिरवीत आहेत. या बीभत्स फाल्गुनमासीय वरातीची जबाबदारी हे नवमतवाले टाळूं शकणार नाहींत. नवनीति आणि नवकाव्य यांच्या पुरस्कारानें

त्यांनीं या लज्जास्पद वाङ्मयाला राजमार्ग करून दिला आहे. तांबेसंप्रदायी सौंदर्यपूजनाच्या वाटेला विटून जवळ केलेली अतिवास्तववादाची वाट या नरकाकडे जात असेल, अशी कदाचित् या नवकवींना कल्पनाहि नसेल!

टीकेच्या भीतीनें आणि प्रतिष्ठेच्या लोभानें या फाल्गुनी लोंढ्यासंबंधीं गुळमुळीत बोलणारे अथवा मौन पाळणारे टीकाकार आपल्या घातुक मौनानें आणि सवंग सौजन्यानें एका मोठ्या सामाजिक गुन्ह्याला संरक्षण देत आहेत, असा माझा उघड आरोप आहे.

मित्रहो! एकीकडे सभोंवतालचें समकालीन वाङ्मय आणि दुसरीकडे कविवर्य भास्कररावांची मंगल स्मृति, यांमधून जे बरेवाईट विचार सुचले, ते आपणां ग्वाल्हेरनिवासी सज्जनांपुढें ठेवले आहेत. आपल्याशीं विचार-विनिमय करण्याची जी संधि आपण मला दिलीत, त्याबद्दल मी आपला फार ऋणी आहें.

♥ ♥

ग्वाल्हेर येथील पंधराव्या वाङ्मय-
परिषदेच्या अध्यक्षपदावरून केलेलें
भाषण : ५ नोव्हेंबर १९६०

वैचारिक स्वराज्य

साहित्यप्रेमी बंधु-भगिनींनो,

नात्यानें जवळच्या पण वास्तव्यानें दूरच्या अशा आपणां मराठी बांधवांची भेट त्यांच्याच राजधानींत होणें, हा मी एक मोठा लाभ समजतों. तसेंच आपण मजवर सोंपविलेली लहान-मोठी कामगिरी यथाशक्ति पार पाडणें, हें मी माझें प्रिय कर्तव्य समजतों. या दोहोंतील पहिली गोष्ट करण्यांत – आपली भेट घेण्यांत – मजकडून बराच उशीर होत आहे, याची मला जाणीव आहे; आणि दुसरी गोष्ट करण्यास म्हणजे आपण आज मजवर सोंपविलेली कामगिरी स्वीकारण्यास मला थोडा संकोच वाटत आहे. गेल्या मे महिन्यांतच अखिल महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून मीं माझें मनोगत महाराष्ट्राला विदित केलें. एवढ्यांत पुन्हा तशाच एका परंपरासंपन्न व्यासपीठावरून बोलण्यांत 'मी अतिप्रसंग तर करीत नाहीं ना?' अशी शंका मनांत येऊन गेली. तथापि आपणां इंदूरकर मंडळींचा मजवरील अनेक वर्षांचा अहेतुक लोभ माझ्या मनांत आला; मागें कांहीं लहान-मोठ्या प्रसंगीं आपल्या प्रेमळ निमंत्रणाला नकार द्यावा लागला होता, हेंहि आठवलें; आणि आपल्या या रम्य इतिहासप्रसिद्ध भागाला – पुण्यश्लोक अहिल्या-देवीच्या या पुण्यभूमीला – भेट देण्यास इतःपर उशीर करणें योग्य नाहीं, असें वाटून मीं रुकार दिला.

जुने संबंध

सुमारें सात वर्षांमागें आपल्या या साहित्यसभेनेंच माझें नांव साहित्य संमेलनाच्या अंमळनेर येथील अधिवेशनाकरितां सुचविलें होतें, असें स्मरतें. त्यानंतरहि एकदोन वेळां माझी अनुमति येथील वाङ्मयीन मित्रांनीं विचारली होती. पण कांहीं कौटुंबिक कारणांनीं मला ती नाकारावी लागली होती. मर्यादित शरीरबलामुळें माझा संचार त्या दिवसांत महाराष्ट्राबाहेर क्वचितच होई. असें असून आपल्यासारख्या दूरस्थ मराठी बांधवांनीं अनेकदा माझें स्मरण ठेवावें, हें आपल्या साहित्यप्रेमाचें आणि सौजन्याचेंच लक्षण होय, असें मी मानतों.

आपल्या या इतिहासप्रसिद्ध भागांत मीं आज, आयुष्याच्या उत्तरार्धांत, प्रथमच पाऊल ठेवीत असलों तरी इंदूर, ग्वाल्हेर, उज्जैन, देवास हीं नांवें आम्हां मध्यमहाराष्ट्रांतील मंडळींना बालपणापासून परिचित असतात, हें कदाचित् आपणांस माहीत नसेल. माझें बालपण साताऱ्यानजिक 'पाल' या लहानशा गांवीं गेलें. खंडोबाचीं अथवा मल्हारीमार्तंडाचीं, महाराष्ट्रांत जीं दोन प्रख्यात देवस्थानें आहेत, त्यांत पालीच्या खंडोबाचें देवालय, हें एक आहे. माझ्या मातुल घराण्यांतील मंडळी कुठेंतरी दूर, शिंद्यांच्या लष्कराकडे द्रव्यार्जनार्थ जातात, हें लहानपणीं आमच्या कानीं पडत असे. झांशीच्या राणीला प्रत्यक्ष पाहून तिच्या अद्भुत कथा लहानपणीं आम्हांला सांगणारी एक आजीहि मला स्मरते. सारांश इंदूर, ग्वाल्हेर, झांशी हीं नांवें आम्हां साताऱ्यापुण्याकडच्या माणसांना पौराणिक नांवांसारखीं चिरपरिचित पण अद्भुत अशीं वाटतात. हीं आमच्या पूर्वजांच्या कर्तृत्वाचीं क्षेत्रें म्हणून आम्हांला माहीत आहेत. या मुलुखांतल्या मराठी कर्तृत्वामुळेंच महाराष्ट्राची ख्याति हिंदुस्थानांत झाली; आणि हिंदुस्थानची — विशेषतः माळव्याची — ओळख महाराष्ट्राला झाली.

महाराष्ट्राबाहेरच्या या मराठी राजधान्या म्हणजे केवळ गतकालीन कर्तृत्वाचीं स्मारकें आहेत, असें मात्र नव्हे. अगदीं परवांपरवांपर्यंत बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर हीं मराठी साहित्याचीं आणि मराठी संस्कृतीचीं केंद्रें म्हणूनच महाराष्ट्राला माहीत होतीं. इंदूर आणि माळवा हे शब्द ऐकले कीं, आमच्या कानांत भास्करबावजी तांब्यांच्या चिरस्मणीय काव्यपंक्ति घुमूं लागतात आणि डोळ्यांपुढें आमरण काव्य जगणारी त्यांची कृश मूर्ति दिसूं लागते. आधुनिक काळांतला हा

सर्वश्रेष्ठ कवि ज्या भागानें आम्हाला दिला, तो भौगोलिक दृष्ट्या मराठीचा सीमाप्रांत असला तरी साहित्यदृष्ट्या महाराष्ट्राचा गाभाच म्हटला पाहिजे. मराठी भाषिक भागापासून दूर असूनहि आपल्यांतील विद्वानांनीं मराठीच्या प्रपंचाची चिंता मध्यमहाराष्ट्रांतील विद्वानांइतकीच वाहिली आहे. एकट्याच्या बळावर आपल्या येथील तपोवृद्ध साहित्यिक सरवटे, यांनीं मराठी सारस्वताचा जो इतिहास लिहिला त्याची बरोबरी भाव्यांच्या सारस्वताखेरीज अद्याप कोणीं केलेली नाहीं. आजन्म मराठी साहित्याची सेवा करून बालबाळ्यापासून ते शब्दकोशापर्यंत अनेकविध उपयुक्त उद्योग तडीला नेणारे वासुदेवरावजी आपटे आपल्या उमेदीच्या वयांत इंदूरांतच वाढले. आधुनिक काव्याचे पहिल्यांत पहिले अभिमानी कै. रहाळकर इंदूरनेंच आम्हांला दिले. आजच्या काळांत देवासचे राजकवि गोविंद झोकरकर व आपल्या येथील प्रसिद्ध कवि काळेले, हे तांब्यांचीच परंपरा चालवीत आहेत. सौ. कमलाबाईसाहेब किबे आणि सरदार किबे यांचीं नांवें तर गेल्या दोन पिढ्या मराठी साहित्यांत दुमदुमत आहेत.

मार्गदर्शनाकरितां नव्हे !—दर्शनाकरितां !

पण विद्वत्ता आणि साहित्यनिर्मिति याखेरीज इंदूरसारख्या आमच्या बृहन्-महाराष्ट्रीय केंद्रांनीं साहित्यसंसाराची अन्य मार्गांनींहि चिंता वाहिली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद् जेव्हां घराद्याराअभावीं आपलें बिऱ्हाड पाठीवर घेऊन, कधीं मुंबईत तर कधीं पुण्यांत अंग चोरून उभी होती, तेव्हां साहित्यप्रेमी श्रीमंत तुकोजीराव महाराजांनींच तिला दहा हजारांची पहिली उदार ओवाळणी घातली. संशयकल्लोळ हें मराठींतील सर्वांत लोकप्रिय नाटक, इंदूरच्या – आजतागायत चालू असलेल्या – बाळ्यपारितोषिकामुळेंच लिहिलें गेलें. मी तर म्हणेन कीं इंदूर, ग्वाल्हेर व बडोदें या आमच्या बृहन्महाराष्ट्रीय राजधान्यांनीं मराठी साहित्याची व विद्वत्तेची जेवढी बूज केली, तेवढी सुसंस्कृत साम्राज्यकर्ते म्हणविणाऱ्या इंग्रजांनींहि केली नाहीं. डॉ. केतकर आणि डॉ. आंबेडकर हे दोन महापंडित बडोदें रियासतीनेंच लहानाचे मोठे केले, हें आम्ही विसरूं शकत नाहीं. अशा स्थितींत पुण्या-मुंबईकडचा मजसारखा साहित्यिक, या भागांत येतो तो मार्गदर्शनापेक्षां 'दर्शनाकरितां'च येतो असें म्हटलें तर तो फाजील विनय ठरूं नये.

पण आमच्या या एकेकाळच्या राजधान्यांकडे आम्ही केवळ मराठीला बाह्य प्रांतांतून रसद पुरविणारीं ठाणींच समजतों असें मात्र नव्हे. आर्थिक साहाय्यापेक्षां

आमच्या या दूरदूरच्या ठाण्यांनीं आम्हांला सांस्कृतिक साहाय्यच अधिक केलें आहे. 'आंतरभारती'ची कल्पना दहा वर्षांपूर्वी साने गुरुजींनीं पुण्याच्या साहित्य-संमेलनाला पटविली असेल; पण विविध भारतीय भाषाभगिनींशीं सांस्कृतिक देवाण-घेवाण आमच्या या तीन रियासतींनीं किती तरी वर्षांमागेंच सुरू केली होती. पुण्यश्लोक शिवाजीमहाराजांनंतर, राज्यव्यवहार कोशाची कल्पना नव्यानें हातीं घेणारे मराठी नृपति, श्रीमंत सयाजीराव हेच होत. त्यांनीं आपल्या राज्याचा कारभार लोकभाषेंत, म्हणजे गुजराथींत चालू केला व त्या निमित्तानें, कारभाराला आवश्यक अशा शब्दांचा – आठ भाषांतील प्रतिशब्द देणारा – कोश तयार केला. आज नवे, क्लिष्ट पारिभाषिक शब्द तयार करणारांना काय, कीं साहित्य परिषदेनें तेंच काम हातीं घ्यावें म्हणणाऱ्यांना काय, या सुंदर अष्टभाषिक कोशाचें स्मरण होऊं नये, हें आश्चर्य होय.

जुन्या राज्यांचें जुनें ऋण

इंदूर, ग्वाल्हेर, बडोदें येथील मराठी विद्वान् माझ्या मतें पुण्यामुंबईतील विद्वानांच्या मानानें कमी एकदेशीय अथवा कमी 'इन्स्यूलर' असतात. मराठ्यांचीं राज्यें इतर प्रांतांत झाल्यानें महाराष्ट्राचा सांस्कृतिक फायदाच अधिक झाला, असें मी मानतों; आणि तो फायदा या प्रकारचा होय. फार कशाला, कविश्रेष्ठ भास्करावजी तांबे यांच्या काव्यांत जी संगीतमयता, जी तल्लीनता व जी सौंदर्य-लोलुपता आढळते, ती ते माळव्यांत संस्थानी वातावरणांत राहात नसते तर आली असती कीं नाहीं, याची मला शंकाच आहे.

आमच्या जुन्या संस्थानांचा उल्लेख कृतज्ञपणें केला तर कित्येक लोकशाही-पूजकांना तें कसेंसेंच वाटेल, हें मी ओळखून आहें. एकतंत्री राज्याहून लोकतंत्री राज्य अधिक प्रगत होय व तें अधिक निर्दोष होण्याची शक्यताहि आहे, हें मला मान्य आहे. एकतंत्री संस्थानी राजवटींत शिरलेले दोषहि मी नाकारूं शकत नाहीं. तथापि हीं राज्यें कांहीं बाईट गोष्टींबरोबर कित्येक चांगल्या गोष्टीहि करीत होतीं, हें विसरणें कृतघ्नपणाचें होईल. मराठी साहित्य व मराठी संस्कृति यांचें रक्षण आमच्या मराठी राज्यांनीं महाराष्ट्राबाहेर जितक्या निष्ठेनें केलें, तितक्या निष्ठेनें महाराष्ट्राच्या ऐन गाभाऱ्यांतहि आम्ही तें करूं शकत नव्हतों व करूं शकत नाहीं. रंगभूमि, संगीत आणि साहित्य या कलांना मराठी संस्थानांचा उदार

आश्रय होता, ही गोष्ट तर प्रसिद्ध आहे. या तीन कलांइतकीच किंबहुना अधिक रक्षणीय अशी गोष्ट म्हणजे मराठी संस्कृति अथवा मराठी राहणी होय, असें मी तरी मानतों. मराठी माणसांचे रीतरिवाज, त्यांचे सणवार, त्यांचे कुलाचार, त्यांचे विवाहादि धार्मिक सामाजिक समारंभ पुण्या-मुंबईत विरळ होत असतांना,—नव्हे सुधारणेच्या नांवाखालीं निपटून काढले जात असतां ते महाराष्ट्राबाहेर मराठी राजधान्यांत प्रतिष्ठेनें राहिले होते.

मकरसंक्रान्त, होळी यांसारख्या सणांना मराठी राज्यांत राजदरबार भरत; तर इकडे आमच्या खालसा मुलाखांत—आणि आज स्वराज्यांतहि! —संक्रान्त, होळी, पाडवा या सणांना नातालच्या सणाइतपतहि महत्त्व राहिलें नाहीं! सुट्टीवर धाड आली तर संक्रान्तीच्या नाहींतर पाडव्याच्या एका दिवसाची प्रथम काटछाट—आणि मग नातालच्या पंधरा दिवसांचा विचार!

सांस्कृतिक स्वराज्य

मी हे विचार केवळ सुट्ट्यांच्या संख्येचा विचार करण्याकरितां किंवा कांहीं धार्मिक विधि टिकविण्याकरितां सांगत आहें असें नव्हे. स्वराज्य व स्वराष्ट्र म्हणजे केवळ परक्यांची सत्ता जाणें एवढाच अर्थ नव्हे, तर स्वतःच्या परंपरा चालू होणें हा अर्थ मी समजतों. आमच्या भाषेंत जो कायदा नाहीं, आमच्या लिपींत ज्या कायद्यावर सही नाहीं, तो आमचा कायदा नव्हे, असें ज्ञानकोशकार केतकर म्हणत. तोच विचार अधिक पुढें रेटून मी म्हणेन, ज्या दरबारांत आमचे रिवाज, आमचे शिष्टाचार, आमचे पोशाख, आमचे आहारविहार दिसत नाहींत तो दरबार अद्याप आमचा—म्हणजे 'स्व' राज्याचा झालेला नाहीं. ज्या राष्ट्रांत आमचे सणवार, समारंभ, शिष्टाचार प्रतिष्ठित समजले जात नाहींत, तें राष्ट्र अद्याप खरेंखुरें आमचें झालें नाहीं.

या देशाला केवळ धार्मिक परंपरा होत्या असें नव्हे, तर सामाजिक, राजकीय परंपराहि होत्या. या देशांत स्थायिक झालेले मुसलमान राज्यकर्ते व त्यांच्याशीं शतकानुशतकें लढा देऊन अखेर विजयी झालेले हिंदु राज्यकर्ते या दोघांचे नित्याचे राजनैतिक संबंध येत व त्यांतून दरबारी रीतरिवाज रूढ होत. हे रीतरिवाजच इंदूर, ग्वाल्हेर, हैदराबाद यांसारख्या अवशिष्ट स्वराज्यांत कालपर्यंत पाहावयास

सांपडत. या स्वराज्याच्या तुकड्यांतूनच नृत्य-नाट्य-संगीतादि जुन्या कलांना आपुलकीनें राजाश्रय मिळे. ब्रिटिश राज्य नष्ट झाल्यावर या जुन्या राज्यांतल्या राजाश्रयाचा आणि संस्कृतीचा वारसा आमच्या या विशाल स्वराज्यानें घेणें इतिहासक्रमाला धरून झालें असतें. पण आजचें स्वराज्य स्वतःला देशी राज्याचे वारसदार समजण्यापेक्षां परकीय राज्याचे वारसदार समजतें असा भास होतो. बडोदें, इंदूर यांसारख्या राजधान्यांत रसिक, स्वाभिमानी राजेमहाराजांच्या परिश्रमांनीं आणि क्वचित् लहरींनीं वाढीला लागलेली सांस्कृतिक सामग्री आजच्या राज्यांतहि जतन होणें जरूर आहे. इतकेंच नव्हे, तर आजच्या दिल्ली दरबाराला जेव्हां जेव्हां दरबारी परंपरेचा किंवा राजचिन्हाचा जुना दाखला हवासा वाटेल तेव्हां तेव्हां त्या दरबारानें इंग्लंड-अमेरिकेचा दरबारी दस्तूर न उचलतां आमच्या कालपर्यंत उभ्या असलेल्या, नव्हे—आजहि नेपाळांत जिवंत असलेल्या राजदरबाराचा शिरस्ता उचलणें जिवंत ऐतिहासिक परंपरेला धरून होईल. राजदरबाराचे किंवा सरकारी समारंभ म्हटले कीं, आज त्यांत पाश्चात्त्य शिष्टाचारच प्रतिष्ठित ठरण्याचें कारण नाहीं. आधुनिकतेच्या आणि आन्तरराष्ट्रीयतेच्या नांवाखालीं आशिया खंडांतील राष्ट्रें ख्रिस्ती संस्कृतींतल्या कितीतरी परंपरा डोळे झांकून स्वीकारीत आहेत, ही गोष्ट शोचनीय होय.

स्वतःचें जुनें टाकून दुसऱ्याचें जुनें !

एका इतिहासप्रसिद्ध संस्थानच्या राजधानींत मी आज उभा आहें, एवढ्यामुळेंच हे सांस्कृतिक परंपरेचे विचार मला सुचत आहेत असें नव्हे. आजच्या कल्पनाप्रधान वा विचारप्रधान वाङ्मयाकडे नजर टाकली, तर एक गोष्ट मनाला सलत राहते. हे लेखक विचार, भावना आणि सामाजिक वातावरण यांपैकीं एकाहि बाबतींत भारतीय नाहींत. आचार्य अत्र्यांसारख्या अस्सल मराठी शैली लिहिणाऱ्या लेखकाच्या नाटकांतहि लग्न ठरल्याची निशाणी म्हणून आंगठीचा उल्लेख आला म्हणजे कसेसेंच वाटतें. आपल्या समाजांत 'एंगेज-मेंट-रिंग' नाहीं ! मग इतर अपक्व, धेडगुजरी लेखकाच्या लिखाणांत तर मधुचंद्र, वर्षगांठ, पाहुण्याच्या आयुरारोग्यार्थ पेल्याला पेला 'लावून पिणें' इ. हरएक गोष्टींत पाश्चात्त्यांच्या वैचारिक वसाहती वाढत असलेल्या दिसतात. या सर्वांचें मूळ आपल्या सदोष स्वराज्य--कल्पनेंत आणि स्वराष्ट्र-कल्पनेंत आहे.

स्वराज्य आणि लोकशाही यांच्या पदरांची आपण गांठ बांधली तें योग्यच केलें. पण तेवढ्यामुळें ज्या स्वराज्यांत लोकशाही नव्हती त्या जुन्या भल्याबुऱ्या स्वराज्याची लगेच आपल्याला लाजच वाटायला हवी असें नव्हे. पाश्चात्त्य लोकराज्यांतहि आज असे शेंकडों रिवाज दाखवितां येतील कीं, ज्यांचें मूळ त्यांच्या जुन्या राजशाही जमान्यांत आहे. आपल्या जुन्या दरबारी परंपरांवर 'सरंजामशाही' म्हणून बहिष्कार घालणारे लोक अज्ञानानें दुसऱ्यांचे धार्मिक आणि सरंजामशाही रिवाज उचलतात. आजच्या नव्या राजवटींत जुन्या भारतीय परंपरा सनातनी आणि सरंजामशाही म्हणून त्याज्य ठरवीत असतां, आपण दुसऱ्या दारानें पाश्चात्त्यांच्या धार्मिक आणि सरंजामशाही युगांतल्या परंपरा पत्करीत आहोंत. आधुनिकतेच्या नांवाखालीं ख्रिस्ती संस्कृतीला शरण जायचें नसेल, तर 'जें जें भारतीय तें तें मागासलेलें' हा वेडगळ ग्रह आपण सोडला पाहिजे. दुर्दैवानें तो ग्रह आज वाढतच आहे. स्वराज्यस्थापनेनंतर आचार आणि विचार या दोन्ही क्षेत्रांतील पाश्चात्त्यीकरण वाढत आहे. आमच्या सरकारी मेजवान्या, आमचे स्वागतसमारंभ, आमचे सत्कारसमारंभ, आमचीं मानचिन्हें या सर्वांत आम्ही मनानें तर पाश्चात्त्य आहोंतच, पण कृतीनेंहि पुष्कळदा पाश्चात्त्य ठरत आहोंत.

परकीय नोकरशाही आणि प्रगति

राजकीय क्षेत्रांत तरी, जें जें भारतीय तें तें मागासलेलें हें समीकरण आमच्या विचारवंतांच्या डोक्यांत किती बद्धमूल झालें आहे, त्याचें एक गमतीदार उदाहरण आठवतें. चिपळूणकर–टिळकांच्या राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या व लोकहितवादींना इंग्रजपूजक म्हणणाऱ्या आजच्या एका प्रसिद्ध गद्यलेखकांनीं १८५७ चें बंड यशस्वी झालें असतें, तर भारताचें अकल्याण झालें असतें, असें प्रतिपादलें आहे. कारण काय? तर 'त्यामुळें सरंजामशाही या देशांत दृढमूल झाली असती!' स्वदेशी सरंजामशाहीपेक्षां परदेशी नोकरशाही अधिक श्रेष्ठ, या अजब विचारसरणीची थोडी खोल छाननी झाली पाहिजे. कारण तींतूनच स्वराज्यांतहि डोकें वर काढणारें पाश्चात्त्यपूजन जन्माला आलें आहे. आणि शिवाय, 'सत्तावन सालच्या बंडानें स्वराज्य स्थापित झालें असतें, तर त्यांत राष्ट्रीय अकल्याण होतें' असें म्हणणारांना लोकहितवादी, रानडे यांना परधार्जिणे म्हणण्याचा अधिकार कसा पोहोंचतो? इंग्रजी राज्य म्हणजे ईश्वरी कृपा समजणारांत त्यांनीं सामील होणेंच अधिक सुसंगत नव्हे का?

नव्या वाङ्मयामागील प्रयोजन

स्वातंत्र्यपूर्व काळांतील आमच्या सार्वजनिक उद्योगांवर पुष्कळदा एक आपेक्ष घेतला जातो. आपलें सर्व सार्वजनिक जीवन व सर्व सार्वजनिक विचार त्या काळीं राजकारणमय झाले होते. कित्येकदा साहित्याचें मूल्यमापनहि त्यांतील राजकीय विचारांवरून किंवा त्याच्या राजकीय उपयुक्ततेवरून ठरविण्यांत येई. ही विचार-सरणी अर्थातच अतिरेकी, अशास्त्रीय होती. वाङ्मयाचा हेतु राजकीय विमोचन हा नसून बौद्धिक विमोचन आणि मानसिक प्रकाश हा आहे. पण वाङ्मयानें राजकारणाचें अथवा धर्मकल्पनांचें दास्य करणें वाईट होय, याचा अर्थ वाङ्मयाला स्वराष्ट्रीय पार्श्वभूमि आणि वातावरण नको असा खासच नव्हे. भौतिक सुखसोयींच्या आणि वैज्ञानिक विकासाच्या परासीमेला पोहोंचलेल्या भांडवलशाही राष्ट्रांच्या डोक्यांत पुष्कळदा जे रिकामटेकडे किंवा विकृत विषय आणि वाङ्मय-प्रकार शोभतात, तेच आपल्यासारख्या नुकत्याच पारतंत्र्यमुक्त झालेल्या राष्ट्राच्याहि डोक्यांत घोळणें स्वाभाविक आहे, असें मला तरी वाटत नाहीं.

आपल्या प्राचीन कवींपुढें स्वजनांचे धार्मिक प्रश्न असत, तर प्राचीन गद्य-लेखकांपुढें स्वकीयांच्या राजकीय कृति असत. आपल्यांतील कांहीं शाहीर समकालीन मर्दुमकीवर आणि शृंगारप्रसंगावरहि लिहीत. आपले अर्वाचीन कवि, कादंबरीकार आणि निबंधकार समकालीन समाजाला पराङ्मुख नव्हते. इतकेंच नव्हे, तर समकालीन समस्यांतूनच त्यांना विषय सुचत. व्यक्तिस्वातंत्र्य आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य यांच्या उत्कट आकांक्षेमुळें टिळक, हरिभाऊ, केशवसुत यांच्या काळांतील लेखकांना स्फूर्ति येई. वाङ्मय एक वेळ वाङ्मयीन परंपरा धुडकावूं शकेल, पण तें राष्ट्रीय परंपरा, स्वकीय पार्श्वभूमि धुडकावूं शकत नाहीं. ज्या सामाजिक, राजकीय आणि व्यक्तिस्वातंत्र्यविषयक आकांक्षांतून १८७५ पासून १९४० पर्यंतच्या गद्यपद्याचा उगम झाला, त्या आकांक्षा आजहि पुऱ्या झाल्या आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. राष्ट्र स्वतंत्र झालें आहे, पण समर्थ व्हायचें आहे. सामाजिक दुराग्रहाची मान्यता लोपली आहे; पण उदार सामाजिक दृष्टीला मान्यता मिळवून द्यायचें काम अद्यापहि उरलें आहे. पोटभरू जीवनाच्या रहाटगाड्यांतून कारकुनी बाण्याच्या महाराष्ट्रीयाला उदात्त, उत्कट, सुंदर जीवना-कडे वळविण्याचें केशवसुत-तांब्यांनीं आरंभलेलें काम अद्याप पुरें व्हायचें आहे. स्थूलमानानें आपण असें म्हणूं कीं, टिळकांना भारतीयांची मान ताठ करायची

होती; हरिभाऊंना महाराष्ट्रीयांची सहानुभूति जागृत आणि विशाल करायची होती; तर केशवसुत-तांब्यांना महाराष्ट्रीयाला रुक्षपणाच्या, पोटभरूपणाच्या पंकांतून वर काढून ध्येयवादाचे, सौंदर्यवादाचे पंख द्यायचे होते. आतां आपणच पाहा, – हीं तिन्हीं कार्यें पुरीं झालीं आहेत का? या तिन्ही आकांक्षा तृप्त झाल्या आहेत का? मराठी मनुष्य आणि मराठी समाज, भारतीय व्यक्ति आणि भारतीय राष्ट्र, यांचें आपल्या ध्येयसृष्टींतलें चित्र अद्याप पुरें झालेलें नाहीं. वैयक्तिक अनुदारता आणि रुक्षता; सामाजिक अविश्वास आणि फुटीरपणा; राजकीय अनास्था आणि औदासीन्य,– स्वराज्यानंतरहि एवढ्या मोठ्या प्रमाणांत उरलें आहे कीं, आणखी एखादे टिळक, आणखी एखादे गांधी, आणखी एखादे रवींद्रनाथ आणि तांबे या देशाला हवे आहेत.

अर्वाचीन काळांतील हे सर्व द्रष्टे, लेखक आणि कवि एकाच दर्जाचे नसतील; एकाच विचाराचेहि नसतील. पण ते एकाच समाजांतले, एकाच प्रदेशांतले, एकाच संदर्भांत लिहिणारे, एका बंधनानेंच बद्ध, एका विमोचनार्थच व्याकुळ असे आत्मे वाटत. शब्दांच्या, तंत्राच्या आणि मनोविकारांच्या खेळापलीकडची त्यांची जातकुळी ओळखतां येई आणि ती महाराष्ट्रांत आणि भारतांतच सांपडे. वाङ्मयाचा संबंध वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय आकांक्षांपेक्षां वाङ्मयीन प्रयोगाशीं जडूं लागला, तो रविकिरणमंडळाच्या काळापासून. तथापि स्वाभाविक भावना व समकालीन आकांक्षा यांचा विसर रविकिरणमंडळाला झालेला नव्हता. अनिलांच्या काव्यांतहि तांत्रिक प्रयोग, परदेशी विषय आणि प्रामाणिक स्वानुभूति यांचा सुंदर मिलाफ दिसून येतो. परंतु स्वानुभूति आणि स्वजनांच्या आकांक्षा या दोन स्थिर आणि सकस भूमींवरून पाय उचलून ते तिरकस शैलीच्या आणि विकृत मनोविश्लेषणाच्या पारंब्यांना अडकविण्याची ट्रूम त्यानंतरच्या पिढींत सुरू झाली. एका टोकाला चालू चळवळीची 'री' ओढा, असें साहित्यिकांना सांगणारे लोक, तर दुसऱ्या टोकाला चालू समाजजीवनापासून फटकून जाऊन तथाकथित अन्तर्मनांतून अजब शंखशिंपले काढून दाखविल्याचा दावा सांगणारे प्रयोगवीर! एका टोकाला, रामनाम आणि वैराग्य हे विषय असल्यावर नीरस पद्यरचनेला श्रेष्ठ काव्य ठरविणारे जुने धर्मवीर; तर दुसऱ्या टोकाला रूढ नीतीला, शैलीला, आणि औचित्यकल्पनेला एकाच दगडांत रक्तबंबाळ करणारे नवे क्रांतिवीर!

धर्माच्या पगड्याऐवजीं प्रयोगाचा पगडा !

मला कधीं कधीं असें वाटतें कीं, आपण भारतीय लोक प्रामाणिक, स्वाभाविक, निकोप, जोरकस असें जीवन फार क्वचितच जगलों आहोंत. कुठल्या तरी अतिरेकाच्या गळ्यांत पडण्याची संवय इतिहासकालापासून आपणांला इतकी जडली आहे कीं, धर्म, राजकारण वा वाङ्मय कांहींहि असो, स्वाभाविक, व्यवहार्य, वास्तवनिष्ठ मार्ग आपण फार काळ आक्रमूं शक्तच नाहीं. कोणा तरी अतिरेकी वाटाड्यानें आपणांला हाक द्यावी आणि आपण खुशाल स्वतःच्या डोक्यांना दिसणारा मार्ग सोडून अंधारांत उडी घ्यावी! पूर्वी आम्हांला अंधारांत लोटायला धर्म आणि परमार्थ हे शब्द प्रभावी ठरत; तर आज प्रयोग आणि क्रांति हे शब्द उपयोगी पडतात एवढेंच काय तें! आमची विचारशक्ति बधिर करणारीं हीं मंत्राक्षरें आमच्या कानांवर पडायचा अवकाश कीं, आम्ही (बायबलमध्यें अन्य संदर्भात म्हटल्याप्रमाणें) कापणी करीत असलों तर धान्य गोळा करायलाहि थांबणार नाहीं; दळण दळीत असलों तर पीठ गोळा करायलाहि थांबणार नाहीं;– स्नान करीत असलों तर (कृष्णाची बासरी ऐकून भान विसरणाऱ्या गोपींप्रमाणें) वस्त्र नेसायलाहि थांबणार नाहीं!

पहिली वैचारिक क्रान्ति अर्धीच !

आपल्या वाङ्मयीन संसारांत अशीच स्थिति झाली आहे कीं नाहीं पाहा. ब्रिटिश अमलापूर्वीचें आपलें अध्ययनहि एकदेशीय असे, आणि लेखनहि एकदेशीय असे. समाजाचा फारच थोडा भाग जीवनांतील थोडाफार काल ग्रंथावलोकनांत घालवी. मुद्रणकला नसल्यानें ग्रंथांचा प्रसारहि बेताचाच असे. तो त्रुटित लेखन-वाचनाचा काळ जाऊन ब्रिटिश अमलांतील मुद्रित ग्रंथांचा, विपुल लिखाणाचा, विपुल वाचनाचा काळ प्राप्त झाला. धर्मप्रधान विचारसरणीला धक्का देणारी पाश्चात्त्यांची भौतिक विचारसरणी आणि राहणी आम्हां कूपमंडूकांना धक्का देण्याकरितां आमच्या कूपांतच उतरली ! यांत्रिक प्रगतीबरोबर येणाऱ्या कांहीं प्रगत राजकीय कल्पना बरोबर घेऊन हे परद्वीपस्थ बनिये आले असल्यानें, आपल्या परदेशी प्रजेला त्यांनीं सुकर प्रवास आणि सुलभ शिक्षण यांचीहि सोय करून दिली. स्वधर्म आणि स्वदेश या दोन तटांच्या आंत शतकानुशतकें बसलेल्या भारतीयांना घरबसल्या परदेश आणि परसंस्कृति यांचें दर्शन घडलें. यांपूर्वीहि आम्हां प्रवासभीरु, क्रान्तिभीरु लोकांच्या भेटीला आमचे मुसल्मान भाई आले

होतेच; पण ते भौतिक सुधारणेंत आमच्याहून फारसे पुढें नसल्यानें आणि धार्मिक बाबतींत आमच्याहून कट्टर असल्यानें, आमच्या सनातन सामाजिक जीवनांत क्रान्ति करण्याचें कार्य ते करूं शकले नाहींत. इंग्रजांच्या आगमनानंतर मात्र आमच्या विचारांची दिशाच बदलली व त्याबरोबरच वाङ्मयाचीहि दिशा बदलली. काव्यांतील ठरीव आणि कांहींशी खोटी अशी धार्मिकता जाऊन काव्य खरेंखुरें संसाराभिमुख अथवा सौंदर्यवादी बनलें. कथा-कादंबऱ्यांतला पोरकट अद्भुतपणा जाऊन तें अधिक प्रौढ, गंभीर आणि सत्यदर्शी बनलें. पूर्वी समाजाशीं संवाद करण्याचें, त्याला जागृत करण्याचें, काव्य हें एकमेव साधन असे व त्याचाहि प्रसार कीर्तनकारांच्या, पुराणिकांच्या मुखांतून होईल तेवढाच होई. ती स्थिति जाऊन जिवंत मानवी वाणीप्रमाणें भासणारे गद्य-निबंध लिहिले जाऊं लागले व ते मुद्रित साप्ताहिकांच्याद्वारें घरोघर पोहोंचूं लागले. व्यक्ति आणि राष्ट्र जणू नव्यानेंच जागृत होऊन वाङ्मय-रूपी आरशांत स्वतःच्या बेचाळीस कुळ्यांचें रूप पाहूं लागलीं ! आजवर आपण खोट्या-कृत्रिम धार्मिकतेंत गुरफटलों होतों, आजवर आपण ठराविक अद्भुत कथा वाचीत होतों. आजवर आपणांला रूढ सांकेतिक जीवनाखेरीज अन्य जीवन माहीत नव्हतें; फार काय, आपल्याच भावना, आपलींच सुखदुःखें, आपलाच इतिहास आपणांस माहीत नव्हता. आतां पाश्चात्त्य शिक्षणाच्या, संस्थांच्या आणि संस्कृतीच्या रूपानें जणू रात्रीचा दिवस झाल्यासारखा या पिढ्यांना भास झाला. राममोहन रॉय, लोकहितवादी, विवेकानंद यांचे सामाजिक-धार्मिक विचार; केशवसुत, रेव्ह० टिळक यांच्यासारख्यांचीं उत्कट वैयक्तिक, सामाजिक सुखदुःखांचीं गीतें; टिळक-आगरकरांनीं अखिल महाराष्ट्राला जणू कुटुंबीय समजून दिलेली हाक, हरिभाऊंनीं मध्यमवर्गीय कुटुंब आणि भारतीय इतिहास यांचीं सारख्याच समरसतेनें काढलेलीं अन्तर्भेदी चित्रें, गडकऱ्यांच्या अमोघ रसवंतींत आणि सप्तरंगी कल्पनाविलासांतहि दिसून येणारें त्यांचें अस्सल महाराष्ट्रीय मन यांकडे पाहिलें म्हणजे इंग्रजी राजवट आणि पाश्चात्त्य सांच्याचीं विद्यापीठें यांनीं आमच्या या चिरनिद्रित देशाचा जणू पुनर्जन्म किंवा 'रेनेसन्स' घडवून आणलें, असा कांहीं काळ भास झाला. पण त्या पुनरुज्जीवनाच्या वाऱ्यांचा पुरा फायदा घेण्याच्या आंतच आमचीं गतानुगतिकत्वाला सवकलेलीं मनें पुन्हा नव्या चाकोरीनें जाऊं लागलीं ! राजकारणांत, सामाजिक विचारांत आणि वाङ्मयांत डोळे मिटण्याच्या नव्या वाटा आम्हीं शोधून काढल्या. ठराविक मंत्रांना

आणि ठराविक तंत्रांना अथवा विधींना जिवंत आचारविचारापेक्षां महत्त्व देणें हा जो आमचा पिढीजात दोष तो या तिन्ही क्षेत्रांत शिरला. सारांश, आम्हीं नवें गतानुगतिकत्व शोधून काढलें व पुन्हा बौद्धिक निद्रा भोगूं लागलों.

राजकारणांत संघटनेपेक्षां जहाल भाषेला महत्त्व, समाजसुधारणेंत उदार-मनस्कतेपेक्षां पाश्चात्त्यानुकरणाला महत्त्व आणि वाङ्मयांत स्वानुभूतीपेक्षां तांत्रिक प्रयोगाला महत्त्व असे मार्ग ठरून गेल्यामुळें खऱ्या जागरूक लोकांहून डोळे मिटून ठराविक शिक्क्याचा माल काढणाऱ्या लोकांना खोटें महत्त्व आलें. इंग्रजी संपर्कानें आणि इंग्रजी शिक्षणानें जागृत झालेल्या अखिल भारतीय मनापुढें आम्ही आदर्श कोणते ठेवीत आहोंत?—तर परदेशी प्रयोगांच्या आंधळ्या अनुकरणाचे! काव्यांत जीवनाभिमुख सौंदर्यवादानें, कथा-कादंबऱ्यांत निकोप वास्तववादानें, निबंध-वाङ्मयांत निर्भय आत्मपरीक्षणानें आणि लढाऊ राष्ट्रवादानें पहिल्या पहिल्या अर्वाचीन पिढ्यांत जें मूळ धरलें होतें, तें टिळक–हरिभाऊ–गडकरी यांच्या पिढीबरोबरच लुप्त झालें.

न पचलेला गांधीवाद

१९२० पर्यंतच्या कवींना, कथा-लेखकांना, वृत्तपत्रकारांना, राजकीय पुढाऱ्यांना आणि सामाजिक सुधारकांना समाजांतील आपल्या भूमिकेसंबंधींची जाणीव, निष्ठा आणि परंपरेची चाड होती. त्यानंतर या सर्व परंपरेला पहिला धक्का गांधीवादानें दिला. पण तो धक्का केवळ विध्वंसक नव्हता. ज्यांना झेपेल त्यांना गांधीवादानें एक सर्वंकष आणि अस्सल भारतीय अशी निष्ठा दिली. गांधीजींची निष्ठा सामाजिक वा वाङ्मयीन क्षेत्रांत फारच थोड्यांना झेपली. येईल त्या वाऱ्याप्रमाणें पाठ फिरवणारे बरेच निघाले असले, तरी गांधीवादाचा आत्मा ज्यांच्या कार्यांत किंवा लेखनांत दिसतो, असे लोक महाराष्ट्रांत तरी क्वचितच दाखवतां येतील. राजकारणांतहि गांधीजींची स्फूर्ति घेतलेल्लेच फार; पण त्यांची कडक शिस्त परवडणारे थोडेच. वास्तविक राजकारणांत गांधीवाद टिकवणें स्वातंत्र्यानंतर अधिक अवघड आहे. पण इतर जीवनांत मात्र गांधीवाद स्वीकारणें सोपेंच केवळ नव्हे तर हितकरहि आहे. गांधीवाद आम्हीं अंशतः जरी पचवला असता, तरी आजच्या खासगी व सार्वजनिक जीवनांत बोकाळलेलें पाश्चात्त्यानुकरण बोकाळलें नसतें. आम्हीं गांधीवाद पचवला असता, तर क्षुद्र अधिकारलालसेंतून आणि भेद-

नीतींतून वाढीला लागलेली जातीय वृत्ति महाराष्ट्रांत वाढली नसती. आम्हीं गांधीवाद पचवला असता, तर वाङ्मयांत जडवाद, नास्तिक बुद्धि आणि काम-जिज्ञासा यांचें राज्य दिसण्याऐवजीं नम्र आत्मसमर्पण आणि निर्भय आत्मपरीक्षण यांचें राज्य दिसलें असतें. आम्हीं गांधीवाद पचवला असता, तर आजच्या जीवनांतला वेगडीपणा पार नाहींसा झाला असता. आमच्या दुर्दैवानें गांधीवादाचा उपयोग इंग्रजी राज्यांत नव्यानेंच आम्हांला लाभलेली निकोप ऐहिकपर दृष्टि आणि लढाऊ राष्ट्रवादी वृत्ति खिळखिळी करण्यापुरताच झाला;—आमच्यांत होता-नव्हता तो सार्वजनिक प्रामाणिकपणा आणि वास्तववाद नष्ट करण्यापुरताच झाला.

स्वसंपादित दोष

आज मराठी भाषिक समाज नव्या राजवटीच्या देहलीवर उभा आहे. त्यानें नुसते नव्यानें संपादलेले दोष जरी टाकले, तरी तो उद्यांच्या बलसंपन्न व संस्कृति-संपन्न भारतवर्षाचा खंबीर आधार बनून राहील. पण त्यानें आपल्या आनुवंशिक दोषांत अलीकडच्या स्वसंपादित दोषांची आणखी भर टाकली, तर मात्र बुद्धिमान्, इतिहासवान्, सुविद्य व प्रयत्नशील असूनहि तो मागासलेल्या, निर्धन, उपेक्षित, अशा भारतीय भागांत मोडेल. या विषादकारक भवितव्याची जबाबदारी राजकीय नेत्यांहूनहि साहित्यिकांवर आहे, असें मी तरी मानतों. कारण राजकारणी लोक सत्तेशीं आणि सत्तेकरितां लढा करीत असतील; तरुण पिढीला लढाऊ कार्यक्रम पुरवीत असतील; पण तरुण पिढीचीं मनें सकस किंवा निकस, गतानुगतिक वा स्वतंत्र, वास्तववादी वा भ्रांतिष्ट, प्रामाणिक वा दांभिक बनवण्याचें कार्य दशदिशांनीं कानांवर आदळणारें, डोळ्यापुढें येणारें आजकालचें वाङ्मयच करीत असतें. सकाळीं चहाबरोबर हातांत पडणाऱ्या दैनिकापासून ते रात्रीं दिवा बारीक केल्यावरहि कानांत शिरत राहणाऱ्या रेडिओकार्यक्रमापर्यंत, लिखित वाङ्मयच आज आपलें जीवन व्यापून टाकीत असतें. तुमच्या माझ्या वयाच्या लोकांपेक्षांहि गेल्या वीस वर्षांत लहानाची मोठी झालेली पिढी वृत्तपत्रें, चित्रपट, रेडिओ-कार्यक्रम यांच्या मांडीवरच वाढत आहे, हें विसरून चालणार नाहीं. फार काय, शाळा-कॉलेजांवरहि वृत्तपत्रें, चित्रपट व रेडिओ यांचीच दाट छाया पडत आहे. पण हीं तिन्हीं माध्यमें तुमच्या माझ्या म्हणजे लेखकांच्या हातांतच आहेत. आपल्यांतील बेजबाबदार, उतावीळ, अनुकरणबहाद्दर, अदूर-दर्शी लोकांचाच प्रभाव वरील तीन माध्यमांवर पडणार असेल, तर आजचीं

शाळा-कॉलेजें तरी त्या 'सहस्रहस्त' माध्यमापुढें टिकाव धरणार नाहींत, असें मला वाटतें. आजच शालान्तर्गत विद्येनें या बहिःशाल 'अविद्ये'पुढें हात टेकल्याचें दृश्य दिसत आहे!

आजच्या जमान्याचे दोन मुख्य रोग

पण शांतपणें अशा परिषदांत जमणारे तुम्ही-आम्ही लोक आणि चित्रपट-रेडिओंना वळण लावणारे लोक, हे दोन प्राणिशास्त्रदृष्ट्याच भिन्नजातीय लोक आहेत असें समजण्याचें कारण नाहीं. आजच्या सर्व जमान्याला दोन मुख्य रोग झाले आहेत. एक वैपुल्य-पूजन आणि दुसरा नावीन्य-पूजन. पण थोड्या विचारा-अंतीं असें दिसून येईल कीं, यांतील एकाचा उद्भव दुसऱ्यांतून आहे व दोहोंचें मूळ यंत्रसंस्कृतींत आहे. दिवसाचे सतरा तास एका सर्वगामी ध्वनियंत्राला इंधन पुरवायचें म्हटल्यावर, लिखित शब्दाचें अथवा Script चें विपुलोत्पादन ओघानेंच आलें; आणि आकाशमार्गें दैनंदिन वाङ्मयप्रसार करायची जबाबदारी म्हटली कीं, तोच-तो-पणा येण्याची भीति आलीच! ती टाळण्याकरितां डायरेक्टरांना आणि प्रोड्यूसर्सना अहोरात्र नव्या कल्पनांची प्रतीक्षा करावीच लागणार! वास्तविक रेडिओच्या ठिकठिकाणच्या केन्द्रांवर स्थापित केलेले निर्माते हे आमच्यांतील विख्यात, सन्मान्य असे लेखक व कविच आहेत. पण विचाऱ्यांच्या प्रतिभेला कधीं स्वप्नांत सुद्धां वाटलें नसेल कीं, आपल्याला आयुष्यांत एक दिवस रोजंदारीवर एका यंत्राला घास घालावा लागेल! अर्थात् या बुद्धिमान् 'प्रोड्यूसर्स्' ना उत्पादनराशीकडे अथवा Output कडे डोळे लावून बसावें लागतें आणि त्यांतहि रोज नवा पदार्थ करून घातला तर उत्तमच! त्याकरितां, सवंग, उथळ, घेडगुजरी, क्वचित् विदूषकी मालाला राजमान्यता द्यावी लागली तर नवल नाहीं.

वैपुल्याबरोबर गुणवत्तेचा पुरवठा करणें आजच्या स्थितींतहि अशक्य नाहीं. पण 'वरचे अधिकारी आणि खालची सामान्य जनता या दोघांजवळहि गुणवत्तेचें चीज नाहीं!' असा निराशावाद आज सर्वच क्षेत्रांत दिसेल. शिवाय आजच्या फाजील केन्द्रीकृत कारभारांत, आत्मीयता वाटण्याइतकें स्वातंत्र्य कुणालाच नाहीं. या सर्व अडचणी मान्य करूनहि आजच्या कांहीं युगदोषांकडे बोट दाखविलें पाहिजे. वाङ्मयाच्या आशयापेक्षां त्याच्या मांडणींतील नावीन्याला किंबहुना भडक-पणाला आपण आज अधिक महत्त्व देऊं लागलों आहों; आणि तें नावीन्य पुर-

वण्याचा एकमेव मार्ग म्हणून पश्चिम दिशेकडे डोळे लावून बसत आहों! माझ्या मनांत तर कधीं कधीं एक निर्वाणीचा इलाज येऊन जातो. अधूनमधून एक दोन वर्षें नवे चित्रपट, नवीं नाटकें, नव्या श्रुतिका, नव्या कादंबऱ्या या सर्वांच्या प्रकाशनाला बंदी करून कालाच्या कठोर कसोटीला उतरलेले जुने चित्रपट, जुन्या श्रुतिका, जुनीं भावगीतें लावण्यासच काय ती परवानगी ठेवावी!

राष्ट्रीय स्वभावावर परिणाम

या सर्व उथळ आणि उतावीळ वाङ्मयनिर्मितीचा परिणाम आपल्या राष्ट्रीय स्वभावावर आज केवढा होत आहे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. आज पुष्कळदा अर्थपूर्ण चेहरे करून असें सांगण्यांत येतें कीं, परप्रांतांत आज महाराष्ट्रीयांचें नांव बद्दू झालें आहे. ही वार्ता आणणारांचीं राजकीय मतें आणि राजकीय हेतु कोणतेहि असोत, पण एक गोष्ट खास कीं, महाराष्ट्रीयांच्या राष्ट्रीय स्वभावांत गेल्या कांहीं पिढ्यांत बराच बदल झाला आहे व होत आहे. इतिहास-कालीन महाराष्ट्रीयांतहि दोष नव्हते असें नव्हे. शिवकालीन महाराष्ट्रीय कांहींसा रुक्ष आणि रोखठोक होता असें म्हणतां येईल. म्हणजेच तो हिंदुस्थानी माणसा-हून कमी विलासी, कमी दरबारी होता. पण त्याबरोबरच त्याचे अंगीं अनेक जीवनोपयोगी, राजकारणोपयोगी गुणहि होते. निष्ठा, चिकाटी, साहस आणि व्यावहारिक लवचिकपणा हे गुण त्याचेजवळ खास होते. या आमच्या राष्ट्रीय स्वभावांत झालेला पहिला बदल इंग्रजी राजवटींत झाला. येथें मी तात्त्विक दृष्टि-कोणाबद्दल बोलत नसून प्रत्यक्ष वागण्यांत दिसून येणाऱ्या वृत्तीबद्दल बोलत आहें. इंग्रजी शिक्षणानंतरच्या महाराष्ट्रीयाचा स्वभावच आजकाल आमचा राष्ट्रीय स्वभाव म्हणून ओळखला जातो. या पिढींत आमच्यांत कांहीं नवे दोष शिरले. ते म्हणजे सरकारी किंवा निमसरकारी नोकरीला फाजील महत्त्व देणें, सामान्य जनतेशीं कमी संपर्क ठेवणें, निःस्पृहपणाच्या नांवाखालीं तुसडी आत्मकेंद्रित राहणी वाढवणें इ० होत. हेच इंग्रजी राजवटींत महाराष्ट्रीयांचे स्वभावविशेष म्हणून गणले जाऊं लागले. पण हे दोष आमच्या राष्ट्राचे अगर मानववंशाचे नसून परकीय राज्यांतील नोकरीमुळें तुसड्या बनलेल्या विशिष्ट वर्गाचे होत, हें उघड आहे. याहि पिढ्यांत कांहीं जुने व कांहीं नवे राष्ट्रीय गुण महाराष्ट्रीयांचे म्हणून ओळखले जात. त्यांत विद्याव्यासंग, सचोटी, स्वच्छ राहणी, स्त्रीपुरुषांच्या वागण्यांतील धीट भारदस्तपणा इ० गुण येत. पण ही पिढीदेखील सुमारें पंचवीस

वर्षांमागें इतिहासजमा झाली. यानंतरच्या म्हणजे आजच्या पिढींत इतिहासकालीन निष्ठा आणि साहस यांचाहि प्रत्यय येत नाहीं; इंग्रजीशिक्षितांच्या पहिल्या पिढ्यांत दिसणारा व्यासंग, आणि भारदस्तपणाहि दिसत नाहीं. आजच्या महाराष्ट्रीयाची भिस्त कांहीं वेगळ्याच गोष्टींवर आहे व त्या गोष्टी फारशा स्थिर अथवा भारदस्त नाहींत !

महायुद्धाच्या माथीं कां मारतां !

या अस्थिरतेचा, या अश्रद्धेचा आणि या चांचल्याचा संबंध केवळ गेल्या महायुद्धाशीं आहे, असें म्हणणारे लोक विचार न करतां तरी बोलत असावेत, नाहींतर विचार करण्याची त्यांची पात्रताच बेताची असावी. आपण जें पेरलें तें उगवत असेल, तर त्या पिकाला खोटें नांव देऊनहि भागणार नाहीं – कीं, कानांवर हात ठेवूनहि भागणार नाहीं. गेल्या कांहीं वर्षांतील वाचनीय, श्राव्य वा दृश्य वाङ्मयाचा विचित्र परिणाम आपल्या तरुण पिढीवर दिसत आहे ही गोष्ट नाकारण्यांत हंशील नाहीं; ती कबूल करून त्यासंबंधीं गंभीरपणें विचार करण्याची वेळ आहे. वाङ्मयाला उघड सामाजिक हेतु असावा कीं नसावा, या तात्त्विक पण शिळ्या प्रश्नांत मी शिरत नाहीं. पण वाङ्मयाचा उघड सामाजिक परिणाम नाकारण्याइतका 'कलावादीपणा'हि बरा नव्हे. प्रामाणिक आत्माविष्कार आणि मानसिक आरोग्य यांत विरोध आहे असें मला कधींच वाटलें नाहीं;—आजहि वाटत नाहीं. वाङ्मयानें आत्माविष्कार हा हेतु ठेवावा कीं समाजहित हा हेतु ठेवावा असा पेंच आजहि निर्माण झालेला नाहीं. आजच्या वाङ्मयानें समाजमनावर अनिष्ट परिणाम होत आहे तो प्रामाणिक आत्मविष्कारानें होत नसून, हास्यास्पद पंथांच्या नादानें केलेल्या अप्रामाणिक आत्माविष्कारामुळेंच होत आहे. पण परिणाम वाङ्मयांतील कोणत्याहि वृत्तीमुळें होत असो; परिणाम होत आहे व त्याचा परिहार करणें अगत्याचें आहे, हें प्रथम स्वतःशीं कबूल केलें पाहिजे. त्याचा परिहार करणें शक्य आहे हेंहि जाणून घेतलें पाहिजे, आणि त्याचा परिहार करण्याची पहिली जबाबदारी साहित्यिकांची आहे हेंहि ओळखलें पाहिजे.

इतिहासकालीन महाराष्ट्रीयाचा खंबीरपणा

आजच्या आपल्या पिढींतील मानसिक अराजक पाहून ज्याला भय वाटत नसेल, तो एक अंध तरी असला पाहिजे, नाहीं तर निष्ठुर तरी असला पाहिजे. इतिहास-

कालीन महाराष्ट्रीय आमच्याइतके विद्वान् नसतील; हिंदुस्थानबाहेरच्या जगाचा पुस्तकी भूगोल त्यांना माहीत नसेल; विज्ञानाचा त्यांना गंध नसेल; रूढीला विरोध करण्याचें धाडस त्यांच्यांत नसेल; पण त्यांचीं मनें आपल्या मनांहून निश्चित खंबीर होतीं हें तत्कालीन पत्रव्यवहार व बखरी वाचणारांस कबूल करावें लागतें. वास्तविक आम्हा मराठ्यांची संस्कृति म्हणजे एक प्रकारें खेडवळ, भावड्या, निर्धन लोकांची संस्कृति म्हणतां येईल. पण आमची ऐतिहासिक कृति तुटपुंज्या पण बोलक्या कागदपत्रांतून पाहिली, तर तोंडांत बोट घालावेसें वाटतें. जेव्हां प्रायः निरक्षर स्त्री-पुरुष जणू घरच्या लग्नाकार्यांत वावरावेत तितक्या सराईतपणें लढाईच्या मैदानांत आणि तहाच्या बैठकींत वावरतांना दिसतात, तेव्हां त्यांच्यासंबंधींच्या कौतुकाला पारावर उरत नाहीं. स्वतःच्या मनगटाच्या जोरावर पेशवाईत पुढें आलेल्या मल्हारराव होळकरांची सून म्हणजे कोणी ऑक्सफर्ड केम्ब्रिजला शिकलेली, पुरुषांच्या बरोबरीचे हक्क मागणारी आधुनिक विदुषी नव्हती. पण समकालीनांनीं काढलेलें तिचें शब्दचित्र पाहिलें म्हणजे माणसें तयार करण्याच्या त्या काळच्या शाळा वेगळ्या होत्या असें वाटल्यावांचून राहात नाहीं. एक अनामिक बखरकार वर्णन करतो तें ऐकण्यासारखें आहे.

पुण्यवान् व कारस्थानी !

"हरिपंततात्या, फौज खानदेशांत पुणें मार्गाकडे रवाना करून, सडे, अहिल्याबाई पुण्यवान् व कारस्थानी दोन्ही अंगें एकसारखीं, तेव्हां दर्शन घेऊन यावें या भावीं, महेश्वरास आले. बाईसाहेबांची भेट झाली. शिष्टाचार आदर-सत्कार बहुत झाला. तात्यांचे मनांत बाईसाहेबांसारखें मनुष्य, यांचें आपलें कांहीं प्रामाण्य असावें असें मनांत येऊन, कृष्णाजी मुरार यांशीं बोलण्याचा व्यूह काढला. त्यांनीं स्पष्ट उत्तर दिलें कीं, 'अशा गोष्टी बाईसाहेबांशीं आम्ही-कोणी बोलाव्या, इतकें कोणाचेंहि पुण्य नाहीं ! येथें त्यांचे मुखावाटें आज्ञा होईल तितका व्यवहार करून आहों. अगोदर पुत्रशोक. त्यांत राज्य दुसऱ्याचे स्वाधीन केलें. त्यांत मनस्वी किलाफ. मातुश्रीच्या स्वभावांत पीळ. सूर्योदयापासून पुन्हा सूर्योदयापर्यंत सदाचरणाच्या घटका नेमलेल्या. त्यांत अवकाश करून हाक मारली असतां जाऊन, प्रश्न करतील तितकी विनंति करावी ! अधिक बोललें असतां मर्जी कोणे कलास जाईल ही भीति. 'उदास' म्हणोन गवताची पेंडी अथवा पावशेर तेल आज्ञेशिवाय

कोणास प्राप्त होईल, इतकी मुखत्यारी कोणाकडे नाहीं. हा विषय आपण समक्ष बोलले असतां रुकार किंवा अन्य विचार उत्तरानें काय काय निष्पन्न होईल तो खरा!"

अहिल्याबाईसाहेबांजवळच्या लोकांनीं इतका कडक इषारा दिला असून हरिपंतांनीं अहिल्याबाईवर आपल्या मुत्सद्देगिरीचा प्रभाव पाडण्याचा व्यूह एकान्त बैठकींत काढून पाहिला. त्या बैठकींत या संसारपराङ्मुख बाईकडून त्या मुरब्बी मुत्सद्द्याला जें उत्तर मिळालें, त्यामुळें त्याची उडालेली गाळण बखरकार वर्णन करतो.

"परन्तु तात्यांची साधकता विशेष, यामुळें तो बोलण्याचा संबंध तोडून... पोटांत कळ निघाली म्हणोन पाव घटका तेथेंच निद्रा करून बोलले कीं, 'उपद्रव विशेष होत चालला. आज्ञा होईल तरी मी डेऱ्यास जाईन.' 'बहुत उत्तम आहे' असें बोलून त्यांस बिदा केलें!"

'स्नान-संध्या' (हा शब्द बखरकार वापरतो) आणि राज्यव्यवहार या दोहोंत सारखीच कडक असलेली ही थोर स्त्री, कोणत्या तालमींत तयार झाली हा विचार मनांत येऊन मति गुंग होते!

पण पुण्यश्लोक अहिल्यादेवी या असाधारण म्हणून अपवाद मानल्या, तरी तत्कालीन सर्वसामान्य माणसांतहि एक प्रकारचा विलक्षण पीळ आणि एक प्रकारचा विलक्षण जागरूकपणा दिसून येतो, हें नाकबूल करतां येत नाहीं. त्यांची धार्मिकता त्यांस व्यवहारशून्य करीत नसून व्यवहारनिपुण करते असें दिसतें. कोणती तरी एक कडक निष्ठा असेल, तरच बुद्धीला निश्चय प्राप्त होईल; मनाचा निर्धार होईल; कृतीला धार येईल; मित्रांना आधार वाटेल आणि शत्रूला धाक वाटेल – असाच याचा अर्थ नव्हे का?

सरंजामशाहीतील मर्द माणसें

त्या वेळीं विद्यापीठें नव्हतीं, काँग्रेससारख्या संघटना नव्हत्या, राजकीय तत्त्वज्ञानें नव्हतीं, परंतु ज्यावर विश्वास ठेवून रणमैदानांत उतरतां येईल अशीं मर्द माणसें होतीं;—नव्हे रणमर्द स्त्रिया होत्या! त्यांच्या हिमतीचें आणि भरंवशाचें इंगित कशांत होतें? त्यांच्याजवळ कांहीं अचल निष्ठा होत्या. एकदा ठरवल्यानंतर

ते एखाद्या कामांत प्राण गमवायला उघड्या डोळ्यांनीं तयार होतील याबद्दल त्यांच्या मित्रांना खात्री असे आणि शत्रूंना दहशत असे ! धर्मनिष्ठ आणि वचनाला जागणें हे गुण सरंजामशाही युगांतील कीं यंत्रयुगांतील याचें मला तादृश महत्त्व वाटत नाहीं. त्या गुणामुळें हीं निरक्षर माणसें आजच्या पदवीधरांहून आणि ग्रंथकारांहून अधिक भरंवशाचीं ठरत हें आजच्या युगांत अधिक महत्त्वाचें ठरेल. धर्मनिष्ठा आपण एक वेळ सरंजामशाही युगांतली ठरवली आणि बुद्धिनिष्ठेची कास धरली, तरी जिचें उल्लंघन आपण मानेवर सुरी धरली तरी करणार नाहीं अशी एखादी श्रद्धा आज आपल्या जीवनांत आहे का ?—हा प्रश्न महत्त्वाचा ठरतोच. कारण तशी निष्ठा जीवनांत नसेल, तर राजकीय स्वातंत्र्य मिळूनहि आपण गुलाम राहूं. प्राचीन काळांत जीं माणसें लढाईत गिरफदार होऊन विकलीं जात त्यांना गुलाम हें नाम प्राप्त होई. आज ती गुलामगिरी नष्ट झाली आहे. पण पैशाकरितां स्वतःची विक्री करणारी गुलामगिरी आजहि शिल्लक आहे. जीवनांतील निष्ठांच्या अभावीं स्वतःचा लिलांव मांडणाऱ्या अशा गुलामांची पिढी निर्माण होण्याची आज भीति आहे.

उथ्री हाकाटी

कुलदेवतांवरील व कुलधर्मांवरील जुनी निष्ठा आज लुप्त झालीच पाहिजे असें म्हणणारांपैकीं मी नाहीं. पण विज्ञानयुगांत तिचा प्रभाव कमी होणें शक्य आहे हें मी ओळखतों. त्या निष्ठेची जागा घेणारी राष्ट्राच्या, मानवाच्या आणि जीविताच्या प्रतिष्ठेसंबंधींची निष्ठा आमच्यांत नव्यानें जोम धरते न धरते, तोंच 'दुसऱ्या महायुद्धानें मूल्यें ढासळलीं !' ही उथ्री पाश्चात्य हाकाटी आमच्या कांहीं लेखकांनीं चूष म्हणून उचलली. वास्तविक दुसऱ्या महायुद्धाचा वेताळ आम्हांला केवळ वृत्तपत्रांतच दिसलेला होता ! त्याच्या आगीची केवळ आर्थिक झळ आमच्यापर्यंत पोहोंचली होती. आर्थिक विपन्नतेंत तर नैतिक मूल्यें अधिक दृढ होतात असा जगाचा विशेषतः भारताचा अनुभव आहे. 'एकच प्याल्यां'तील सिंधु आपल्या विपत्काळीं म्हणते त्याप्रमाणें "आतां तर मला अधिकच जागरूक असायला हवें !" असेंच प्रत्येक विपन्न समाजानें म्हटलें पाहिजे. आमच्या लेखकांचा खाक्या कांहीं औरच ! "मूल्यें ढासळण्याची वेळ आली आहे" या इशाऱ्याचा अर्थ त्यांनीं "मूल्यें लाथाडण्याची वेळ आली आहे" असा केला. नैतिक

अराजकाचा फाल्गुनमास गाजवण्याचा या मंडळींना आधींच उल्हास होता,याहून याचा दुसरा कोणता अर्थ करतां येणार ?

स्वकीय परंपरांशीं काडीमात्र संबंध नसलेले चित्रपट, विकृत आणि उत्तान कामुकतेचें चविष्ट चित्रण करणारें कथावाङ्मय, यच्चयावत् पूज्य भावनांचा अकारण धिक्कार करणारें काव्य, या सर्व वर्षावांतून पोटपूजेपलीकडची एखादी भावना शिल्लक राहिली तरच नवल !

रजपुतांचा, मराठ्यांचा, विजयनगरादि राज्यांचा स्फूर्तिदायक इतिहास, अर्वाचीन भारताचें राजकीय आणि धार्मिक क्षेत्रांत झालेलें अपूर्व पुनरुत्थान; व्यक्तीच्या प्रतिष्ठेसंबंधींची नवी निष्ठा यांसारखे शेंकडों विषय ज्यांना स्फूर्ति देत नाहींत, त्यांना मनोविकृतिदर्शन एवढाच विषय सांपडला तर नवल नाहीं. जें जें जुनें तें तें वाईट असें घोकतां घोकतां आमच्या निरर्थक बंडखोरी करणाऱ्या साहित्यिकांनीं जें जें निष्ठायुक्त, कर्तृत्वप्रेरक तें तें जुनें, असा प्रतिसिद्धान्त काढला कीं काय अशी शंका येते. कशालाच महत्त्व नाहीं, कांहींच पूज्य नाहीं, कांहींच रक्षणीय नाहीं अशी हाकाटी करणें ही आज एक फॅशन बनली आहे.

उथळ शून्यवाद

नव्या पिढीच्या मनःकोशावर या उथळ आणि अकारण शून्यवादाचा केवढा घातुक परिणाम होत आहे याची कल्पना प्रत्येक विचारवन्ताला आहे. नवसंप्रदायी म्हणवणारें वाङ्मय दुर्बोध आहे, विचित्र आहे, अगर कृत्रिम आहे या गोष्टींना तादृश सामाजिक महत्त्व नाहीं; पण तें कोणतीहि निष्ठा देऊं शकत नाहीं; व आहेत त्या निष्ठा मात्र दुर्बल करतें ही गोष्ट उपेक्षणीय नाहीं. याचा परिणाम म्हणजे पोटार्थीपणा, संधिसाधूपणा, कुचेष्टा, अश्रद्धा यांखेरीज आपणांस कोणताच धर्म उरणार नाहीं.

स्वतंत्र झालेला भारत छप्पन्न राष्ट्रांच्या स्पर्धेत उभा आहे. त्यांतील जीं थोडीं सत्तेच्या आणि संपन्नतेच्या लाटेवर आहेत, त्यांची उभारी वेगळीच आहे. इतरांना जीवनार्थ कलहांत उभारी टिकवण्याकरितां कोणती ना कोणती निष्ठा, कोणता ना कोणता धर्म, पत्करण्याखेरीज इलाज नाहीं. आपल्या आकांक्षांना, धैर्याला, व्यक्तिमत्त्वाला एकत्र बांधण्याला एखादी प्रबळ निष्ठा नसेल, तर त्या फुटकळ मानसिक शक्ति वाहून जातील. कांहीं राष्ट्रांना आज जागतिक कम्यूनिझमची

निष्ठा बळ देत आहे; तर कांहींना अनेक शतकें पोसलेला राष्ट्रवाद जोर देत आहे. राजकारणप्रधान अर्वाचीन जगाचे हे दोन धर्मच आहेत म्हटले तरी चालतील. हे धर्म अंगीं बाणल्यानंतर आणि या धर्मीकरितां सर्व सामाजिक जीवनाची रचना केल्यावर त्या देशांचे कांहीं सुखावलेले, सुस्तावलेले जीव मूर्त्यें ढासळल्यासंबंधीं गाणीं गात असले तरी त्या गाण्यांचा परिणाम त्यांच्या राष्ट्रीय जोमावर फारसा होत नाहीं! आमच्या देशांत मात्र स्वातंत्र्य मिळवीपर्यंत जो काय थोडाफार राष्ट्रवाद होता तोहि आज खिळखिळा झाला आहे.

या पिढीचे विद्यार्थी व साहित्यिक, तरुण व तरुणी याच्या अन्तरंगाची मला जी ओळख आहे, तिजवरून मी सांगतों, कीं ते सरळ, निष्पाप, आणि कार्योत्सुक आहेत. पण त्यांचा देश, त्यांचा वेश, त्यांचा पंथ, त्यांची निष्ठा यांचा मात्र मला कधींच अंदाज झालेला नाहीं! ज्याला ना मित्र ना आईबाप असा मुलगा वा मुलगी बिलंदर माणसांच्या वस्तींत येऊन दाखल झाली, तर त्यांच्यासंबंधीं जी चिन्ता वाटेल, तीच आजच्या महाराष्ट्रीय आणि भारतीय तरुण पिढीसंबंधीं वाटते. जो कुठल्याच संप्रदायांत नाहीं, परंपरेंत नाहीं, कुठल्याच निष्ठेशीं बांधलेला नाहीं, तो समाज आजच्या राजकीय स्पर्धेच्या काळांत एकपरी निराधार आणि दिङ्मूढच म्हटला पाहिजे.

पक्षनिष्ठा आणि तत्त्वनिष्ठा

आजकालच्या राजकीय संप्रदायांचें स्मरण मी विसरलेलों नाहीं. राजकीय निष्ठा असलेले तरुण आजच्या इतर तरुणांहून अधिक जाणते आणि जबाबदार असतात हें खरें. पण राजकीय पक्षांतील अगदीं वरच्या थरांतील माणसें सोडलीं तर बाकीच्यांना पक्षनिष्ठेपलीकडे फारशी निष्ठा नसते; आणि राजकीय पक्षांची बहुतेक शक्ति आपल्या पक्षांचें संख्याबळ टिकविण्यांतच खर्च होते. त्यांचीं उच्च मूलतत्त्वें त्यांच्या प्रचारपत्रकांतच फक्त सांपडतात. सारांश, राजकीय पक्ष एखादा तीव्र अन्याय दूर करण्याचें कार्य करतील, वेळ पडल्यास शासनयंत्रहि चालवतील, पण सर्वसामान्य लोकांत चिरस्थायी निष्ठा उत्पन्न करण्याचें काम राजकीय पक्ष करूं शकणार नाहींत. ज्याच्या राजकीय कार्यक्रमाला सर्वांगीण तत्त्वज्ञानाचें अधिष्ठान आहे, असा टिळक, गांधी, रॉय यांच्यासारखा पुढारी कदाचित् सर्वांगीण राष्ट्रीय निष्ठा देऊं शकेल. आजच्या पिढीकडे पाहिलें, तर तिच्या कृतीवरून,

उक्तीवरून, आवडीनिवडीवरून ती पिढी कुणाच्या पंथांतील, अथवा पक्षांतील आहे, हें सांगणें कठीणच जाईल. मला आजची पिढी एम्. एन्. रॉयसारख्या उघड नास्तिकाची अनुयायी झालेली दिसली तरी भय वाटणार नाहीं. पण तसेंहि दिसत नाहीं. वाङ्मयांत शून्यवादी, जन्तुवादी संप्रदायाचें अनुकरण; आणि जीवनांत नव्यांत नव्या चित्रपटांतील नटनटींचें अनुकरण, हा ज्या पिढीचा बाणा तिचा संप्रदाय आणि तिची निष्ठा सांगणें माझ्या शक्तीबाहेरचें आहे !

या माझ्या चिन्तनावर अथवा चिन्तेवर कांहीं साहसवादी लोक वृथा आरोप करतात. पण देशापुढें खरेंखुरें संकट उभें राहिल्यावर या संप्रदायाच्याहि लोकांना, राष्ट्रीय निष्ठा (अथवा morale) टिकेल कीं नाहीं याची आज चिन्ता पडली आहे. युद्ध–अणुयुगांतील खग्रास युद्ध ! – सुरू झालें, तर जे राष्ट्रीय उपास-तापास (austerity drive) बिनबोभाट करावे लागतात, ते आमच्या हातून होतील कीं नाहींत ?–कीं प्रत्यक्ष पंढरीनाथाचें दर्शनहि जादा 'फी' देऊन घेणारे आणि देणारे आम्ही लोक, ती काळाबाजार करण्याची दुर्मिळ पर्वणी समजूं ? या शंका आज मजसारख्या शाश्वत मूल्यांच्या भोक्त्यांनाच येत आहेत असें नव्हे, तर क्रांतिपूजकांनाहि येत आहेत. परंपरा-भजनापलीकडे कोणतीच शौर्यकल्पना आम्हीं समाजापुढें ठेवली नसेल, तर राष्ट्रैक्याची, शिस्तीची, सामाजिक संयमाची अपेक्षा आम्हीं काय म्हणून करावी ?

इतिहासाध्ययनाला आज पडता काळ !

आज आपण समाजापुढें कोणतीं ध्येयें, कोणते चिन्तनविषय ठेवीत आहोंत, याचें एक साधें गमक सांगतां येईल. आपल्या बृहन्महाराष्ट्रीय समाजांतील परिस्थिति कदाचित् अन्यथा असेल; पण पुण्या-मुंबईच्या विद्यापीठांची हकीकत मात्र अशी आहे कीं, इतिहास या विषयाइतका अप्रिय असा दुसरा विषयच दाखवितां येणार नाहीं ! विद्यापीठाच्या इतिहासविभागाला आमच्या भागांत आजकाल अशी चिन्ता पडली आहे कीं, कोणतें ना कोणतें आमिष दाखवून या विषयाकडे पदवीचे व पदवी घेतलेले विद्यार्थी आत्तांपासूनच ओढले नाहींत, तर उद्यां विद्यार्थ्यांचीच नव्हे, तर शिक्षकांचीहि वाण पडून हा विषय विद्यापीठांतून काढून टाकावा लागेल. आणि ही स्थिति कोणत्या कालखंडांत ?—तर ज्यांत नूतन-स्थापित

लोकराज्यामुळें राज्यशास्त्राला अभूतपूर्व महत्त्व आलें आहे त्या युगांत ! ज्या युगांत मार्क्सप्रणीत 'ऐतिहासिक भौतिकवाद' हें एक विजिगीषु तत्त्वज्ञान गणलें जातें, त्या युगांत ! इतिहासविद्वेष ही नावीन्यपूजनाची तर दुसरी बाजू नसेल ? पण ज्यांना नवी रचना करायची असेल, त्यांना तर जुना इतिहास सर्वांत अधिक माहीत हवा ! म्हणजेच राजकारणी लोकांना, सामाजिक पुढाऱ्यांना व वाङ्मयीन बंडखोरांना इतिहासाचें अध्ययन सारखेंच आवश्यक वाटावयास हवें. आज राष्ट्रीय दृष्टीपेक्षां उथळ बंडखोरीला अधिक महत्त्व दिलें जातें याचेंच मी हें एक गमक समजतों.

शिक्षित लोकांतील उघड पोटार्थी लोकांची गोष्ट सोडली तरी सामाजिकदृष्ट्या विचार करणारांचा भर समाज समजून घेण्यापेक्षां उथळ बंडखोरीवर अधिक आहे; स्वसंस्कृति समजावून घेण्यापेक्षां नव्या संस्कृतीच्या वल्गना करण्यावरच अधिक आहे; भारतीय जातिभेदाचा प्रदीर्घ इतिहास समजावून घेण्यापेक्षां त्वरित प्रसिद्धी-पुरती आणि सोयीपुरती जात मोडण्यावर आहे. इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या-टप्प्यावर भारतीय पुनरुज्जीवनाची नांदी झाली. तिचाच भरघोस आणि शास्त्रशुद्ध विस्तार करण्याकरितां ज्ञानकोशकार केतकरांनीं भारतीय संस्कृतीचें जाळें इंग्रजी चष्म्यांतून नव्हे, तर राष्ट्रीय दृष्टींतून उलगडून दाखविलें. जातिभेदाचा शास्त्रशुद्ध इतिहास आणि राष्ट्रीय भूमिकेवरून समाजसुधारणा या केतकरांच्या दोन प्रमुख वैचारिक देणग्या आमच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना आजहि बहुमोल वाटण्या-सारख्या आहेत. इंग्रजांचे बौद्धिक गुलाम न बनतां, भूतकालांतील घटनांचें खापर एकमेकांच्या डोक्यावर न फोडतां, नवसमाजरचना करण्याचीं सूत्रें या आधुनिक ऋषींनें सांगितलीं आहेत. तसेंच, अंधळा आत्मगौरव न करतांहि राष्ट्रीय आशावादाला केवढी जागा आहे, हें टिळक, राजवाडे, केतकर यांनीं दाखवून दिलें आहे. आजच्या या आधुनिक ऋषींच्या विचारसंपदेचा परिचय आजचे आमचे वाङ्मयीन व सामाजिक प्रयोगवहादर कितपत करून घेतात, हा एक प्रश्नच आहे !

वैचारिक दास्यांतून मुक्तता

म्हणूनच मोठ्या दुःखानें असें म्हणावेंसें वाटतें कीं, राजकीयदृष्ट्या आपल्यावरील परराज्य संपलें असलें, तरी वैचारिकदृष्ट्या आपण परराज्यांतच –

अनुक्रम 39.6.39 वि: 7.9.6
क्रमांक 52.6.9 ऐ.1224

कदाचित् अराजकांतहि—आहोंत. ज्यांनीं स्वदेशाच्या इतिहासाचें परिशीलन आणि चिन्तन केलें नाहीं; ज्यांच्या जीवनांत पोकळ बंडखोरीखेरीज कोणतीहि निश्चित करणात्मक (Positive) निष्ठा निर्माण झाली नाहीं, तंत्राच्या दृष्टीनें 'लेटेस्ट' आणि मंत्राच्या दृष्टीनें जास्तींत जास्त भडक ग्रंथ हेच ज्यांचे गुरु, अशा लेखकांची छाप आजच्या पिढीच्या मनावर आहे. अशा पिढींत राष्ट्रबलवर्धक निष्ठा निर्माण होणें शक्य आहे काय ?

ज्या वेळीं पुढारलेले लोक दगा देतात, तेव्हां समाजानें आपलें व नेत्यांचें दोघांचेंहि परीक्षण पुन्हा करण्याची गरज असते. आज समाजापुढें ठळकपणें मांडले जाणारे विचार कोणत्याहि प्रकारचे असले, तरी सबंध समाजाचें विचारधन तेवढेंच आहे असें नव्हे. महाराष्ट्रसमाज विशाल आहे, तसाच त्याचा वैचारिक वारसाहि फार मोठा आहे. महाराष्ट्राबाहेर पसरलेल्या आमच्या समाजाचें आणि संस्कृतीचें महत्त्व मला विशेष वाटतें, तें यामुळेंच. एखादे वेळीं आम्ही जो इतिहास विसरलों असूं तो तुमच्या भागांत अधिक जिवंत असेल. एखादे वेळीं आम्ही स्थानिक दुष्ट वर्तुळांत सांपडलों, तर तुम्ही दूर आहां याचाच तुम्हांला व आम्हांलाहि फायदा होऊन ऐन वेळीं तुम्ही आम्हांला हात द्यायला याल. दूर-दूरच्या मराठी राजधान्यांकडे, फार काय, आमच्या अन्यभाषिक बांधवांकडेहि, मी एक राखीव बळ म्हणून पाहतों. पुण्या-मुंबईच्या लेखकांना स्वतःच्या परंपरेचा विसर पडला, तर इंदूर-ग्वाल्हेरकडच्या लेखकांनीं त्यांचाच कित्ता न गिरवतां, त्यांचा कान पकडला पाहिजे. कारण गेल्या शंभर वर्षांत इतिहास आणि परंपरा यांची संगत आमच्याहून तुम्हांला अधिक लाभली आहे.

इतर प्रांतांकडूनहि शिकूं या

इतर प्रान्तांच्या विचारांचा आणि उद्योगांचा कानोसाहि आपण आमच्या-पेक्षां अधिक जवळून घेऊं शकतां, हें मीं माझ्या भाषणाच्या पूर्वार्धांत सांगितलेंच आहे. राजकारणांत कधीं कधीं स्पर्धेकरितां एकमेकांचें निरीक्षण करणारे लोक सांस्कृतिक वाङ्मयीन बाबतींत एकमेकांपासून कितीतरी शिकूं शकतात, हें आपण जाणतांच. आपलेच वाङ्मयीन आणि सामाजिक प्रश्न आपल्या शेजारच्या प्रान्तांत वेगळ्या तऱ्हेनें सोडवले गेले आहेत,—जात आहेत, हें पाहिलें म्हणजे आपले आग्रह कमी कडक होत जातात, आपले प्रश्न अधिक सुगम होत जातात. पुण्यासारख्या एके

काळच्या बहुशः एकजातीय शहरांतहि आज हिंदुस्थानचे सर्व प्रान्त प्रतिनिधित्वानें हजर आहेतसें दिसेल. पण आम्ही सुशिक्षित लोक मात्र त्यांच्या आगमनाचा अहवाल 'बिऱ्हाडाच्या जागा महागल्या!' यापलीकडे देऊं तर शपथ! आमच्या थिट्या सदाशिवपेठी विचारसरणीचा विस्तार होण्याला ही घरीं चालून आलेली सुसंधीच नव्हे का? जेव्हां आम्हांला सदाशिवपेठेच्या बाहेर पडायची गरज भासेल तेव्हां आम्ही एकदम लंडनचें नाहीं तर मास्कोचें तिकीट काढतों हें दुर्दैव नव्हे का?

आज प्रान्तांच्या नवरचनेच्या काळांतहि, राजकारणांतलीं क्षणिक भांडणें सोडलीं, तर वाङ्मयाच्या आणि संस्कृतीच्या क्षेत्रांत दोन भाषांच्या भारतीयांनीं एकत्र बसून विचार करण्याची केवढी गरज आहे हें मीं आपणांस सांगितलें पाहिजे असें नव्हे. ज्या वेळीं महाराष्ट्राच्या दक्षिण सरहद्दीकर अत्यन्त निर्धारपूर्वक सत्याग्रह, साराबंदी यांसारख्या चळवळी चालू होत्या व ज्या वेळीं आम्ही त्यांना जोरदार ठरावांनीं साहित्यसंमेलनांत निःसंदिग्ध पाठिंबा देत होतों, त्याच वेळीं त्याच मिरजेच्या सम्मेलनांत कन्नड वाङ्मयाचे विद्वान् प्रतिनिधि अगत्यपूर्वक हजर होते. देश विशाल आहे व त्याची विविधता हीच त्याची सम्पन्नता आहे.

इतर प्रान्तांत स्थायिक झालेल्या महाराष्ट्रीयांकडूनहि त्या प्रान्तांच्या याच अपेक्षा असणार हें उघडच आहे. खोटा अभिमान न बाळगतां मी असेंहि म्हणेन कीं, बंगाल आणि महाराष्ट्र यांच्याकडून इतर भारतीयांच्या साहजिकच अधिक अपेक्षा दिसून येतात. आणि नेमक्या त्याच दोन प्रान्तांवर थोडा तुटकपणाचा व मानीपणाचा आरोप होतो हेंहि कबूल करणें प्राप्त आहे! ज्यानें उभ्या जन्मांत स्वतःच्या प्रान्ताबाहेर दोन आठवडेहि काढले नसतील, अशा मजसारख्या माणसानें इतर प्रान्तांतील बांधवांना या बाबतींत कांहीं सांगणें म्हणजे धाडस होय. पण मनमिळाऊपणा व मिसळण्याची वृत्ति आपण महाराष्ट्रीयांनीं वाढवणें जरूर आहे यांत शंका नाहीं. आपल्या तुटक वृत्तीचा उगम आपल्या निःस्पृहतेंत आहे असें आपण कधीं कधीं म्हणतों. पण निःस्पृहपणाचा (bluntness) लौकिक आतां थोडा कमी झाला तरी नुकसान नाहीं; पण तुटकपणाचा बोभाटा कमी झाला पाहिजे. तुमचें अंतःकरण निर्मळ आहे, तुमची दानत मोठी आहे हें कळायला आधीं लोकांनीं तुमच्याजवळ यायला हवें ना? आज सर्व भाषिकांनीं एकमेकांना

जवळ करण्याची संधीहि आहे आणि गरजहि आहे. इंग्रजीरूपी परकी सासू आतां दूर्यापार होत असल्यानें, सख्ख्या बहिर्णींची फार दिवसांनीं समोरासमोर भेट होत आहे ही सुसंधि आहे. विशेषतः आपण इंदूरकर तर हिंदी भाषिकांच्या प्रान्तांत आहांत. बालपणींच आपलीं मुलें भारताची आंतरप्रान्तीय भाषा उत्तम प्रकारें आत्मसात् करतात, हा आपला व आमचाहि एक मोठा लाभ आहे. मला अशी खात्री आहे कीं, महाराष्ट्रीयांच्या येथील वास्तव्यामुळें अखिल भारतीय ऐक्याचीहि वाढ होईल व महाराष्ट्राच्या लौकिकांतहि भर पडेल.

साहित्यप्रेमी व राष्ट्रप्रेमी मित्रहो !

आपल्या या थोर व्यासपीठावरून माझे बरेवाईट मनमोकळे विचार बोलून दाखविण्याची आपण मला आज्ञा केलीत म्हणूनच अल्पसंचारी अशा मजकडून येथवर येणें घडलें. आपण हा लोभ व हें पुण्य जोडण्याची संधि मला दिलीत याबद्दल मी आपला फार फार ऋणी आहें.

माझ्या या थोड्या लांबलेल्या भाषणामुळें आपल्यासारख्या विचारी मंडळींच्या विचाराला थोडी जरी चालना मिळाली, तरी मी माझ्या श्रमांचें सार्थक झालें असें मानीन. महाराष्ट्रांतील व बृहन्महाराष्ट्रांतील मराठी भाषिकांना आपल्या वाङ्मयाच्या व संस्कृतीच्या द्वारें स्वतंत्र भारताची उदंड सेवा करण्याचें श्रेय उद्यांच्या भविष्यकाळांत लाभो हीच माझी या थोर व्यासपीठावरून परमेश्वराजवळ प्रार्थना आहे !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32.C.37.... दि: 15.12....
आंक ...22.C.37.... नों दि: 2/12/...
जनरल ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 99429

महाराष्ट्र साहित्य सभा, इंदूर
शारदोत्सव : अध्यक्षीय भाषण : जानेवारी १९६०


REFBK-0011529



प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनीं महाराष्ट्र साहित्य-संमेलन, बडोदे वाङ्मय परिषद, ग्वाल्हेर वाङ्मयपरिषद वगैरेंच्या अध्यक्षपदावरून केलेलीं भाषणें या पुस्तकांत समाविष्ट झालेलीं आहेत. श्री. के. क्षी. हे नांव केवळ वाङ्मयीन टीकेच्या क्षेत्रांतच प्रसिद्ध आहे असे नव्हे तर समाज व संस्कृति यांचे टीकाकार व तत्त्वचिंतक म्हणूनहि प्रसिद्ध आहे. महत्वाच्या प्रसंगीं केलेल्या या पांच भाषणांत साहित्य व संस्कृति यांच्या-संबंधींचे 'श्री. के. क्षीं.'चे जणूं परिपक्व संदेशच आढळतील. तर्कशुद्ध सडेतोड विचारसरणी-बरोबरच भाषाप्रभुत्वाची जोड ही या पांचहि भाषणांस असल्याने त्यांचें स्थान सुंदर विचार-प्रधान मराठी गद्यांत अढळ राहील. ● ●

सुविचार प्रकाशन मंडळ
सत्यम् शिवम् सुन्दरम्